# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

# १९ व्या शतकातील महाराष्ट्र
## (Making of 19th Century Maharashtra)

(शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून)

**एम. ए. भाग–१**

**इतिहास**

HIST-110 (Optional Paper)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१८
एम. ए. भाग - १ करिता (१९ व्या शतकातील महाराष्ट्र)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-81-938801-2-8

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

# दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## इतिहास समन्वय समिती

अध्यक्ष - **प्राचार्य ए. एल. बेलवटकर**
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, जि. सांगली

- **डॉ. व्ही. आर. पाटील**
  आर्टस् कॉलेज, कोवाड,
  ता. चंदगड, जि. कोल्हापूर
- **प्रा. डॉ. नंदा पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**(१९ व्या शतकातील महाराष्ट्र)**
**एम. ए. भाग-१ : इतिहास** HIST 110

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **प्राचार्या डॉ. भाग्यश्री म. जाधव**<br>सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय, रहिमतपूर, जि. सातारा | १ |
| **डॉ. संतोष जेठीथोर**<br>डी. आर. माने महाविद्यालय, कागल | २ |
| **डॉ. व्ही. आर. पाटील**<br>आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, कोवाड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर | ३ |
| **डॉ. संघमित्रा विठ्ठलराव सरवदे**<br>मा. आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले | ४ |

■ संपादक ■

**प्राचार्या डॉ. भाग्यश्री म. जाधव**
सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय,
रहिमतपूर, जि. सातारा

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०१७-१८ पासून अभ्यासक्रम बदललेला आहे, सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, एम. ए. भाग-१ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''**१९ व्या शतकातील महाराष्ट्र**'' या विषयाचे स्वयं अध्ययनासाठी हे पुस्तक सन २०१८-१९ या वर्षात लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, शब्दार्थ व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

१९ व्या शतकातील महाराष्ट्र या स्वयं अध्ययन साहित्यामध्ये १९ व्या शतकाच्या सुरुवातीची महाराष्ट्राची सामाजिक आणि आर्थिक स्थिती, ब्रिटिश धोरण आणि प्रशासकीय बदल, सामाजिक सुधारणा, अर्थव्यवस्था इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये काही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे.

शिवाजी विद्यापीठ दूर शिक्षण अंतर्गत स्वयं अध्ययन साहित्य निर्मितीसाठी मा. कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे सर यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन मोलाचे ठरले. दूर शिक्षण केंद्र संचालक, समन्वयक, इतिहास अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ. अवनिश पाटील, शिवाजी विद्यापीठ इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर यांचे सहकार्य लाभले. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी तसेच पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूर शिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या सर्वांच्या मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार!

**■ संपादक ■**

**प्राचार्या डॉ. भाग्यश्री म. जाधव**

सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय,

रहिमतपूर, जि. सातारा

# दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ अभ्यासमंडळ : इतिहास ■

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अबंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भारतभुषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | १९ व्या शतकाच्या सुरुवातीची महाराष्ट्राची सामाजिक आणि आर्थिक स्थिती | १ |
| २. | ब्रिटीश धोरण आणि प्रशासकीय बदल | ३० |
| ३. | सामाजिक सुधारणा | ५० |
| ४. | अर्थव्यवस्था | ११५ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक : १

# १९ व्या शतकाच्या सुरुवातीची महाराष्ट्राची सामाजिक आणि आर्थिक स्थिती

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

- १.२.१ सामाजिक स्थिती
  - अ) जातिव्यवस्था
  - ब) अस्पृश्यता
  - क) गुलामगिरी
  - ड) स्त्रियांची स्थिती
- १.२.२ आर्थिक स्थिती
  - अ) शेती
  - ब) उद्योग
  - क) व्यवसाय आणि व्यापार
- १.२.३ शिक्षण

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.४ सारांश

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला १९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या कालखंडातील महाराष्ट्राची-

- सामाजिक स्थिती कशी होती याची माहिती होईल.
- आर्थिक जीवनात घडून आलेले अनेक बदल समजून घेता येतील.
- आर्थिक स्थिती कशी बदलत गेली हे समजेल.
- महाराष्ट्रातील शिक्षणाबाबतची माहिती जाणून घेता येईल.

## १.१ प्रास्ताविक

छत्रपती शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकात हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर हे राज्य नष्ट होईल असे औरंगजेब बादशहाला वाटत होते. पण शिवाजी महाराजांच्यानंतर संभाजी महाराज आणि त्यानंतर राजाराम महाराज यांनी सर्वोतोपरी प्रयत्न करून मराठ्यांचे राज्य अबाधित राखले. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर महाराणी ताराबाई यांनी औरंगजेब बादशहाशी लढा देऊन मराठ्यांचे राज्य टिकविले. औरंगजेब बादशहा स्वत: दिल्लीचे तख्त सोडून महाराष्ट्रात आला. पण तो मराठ्यांचे राज्य नष्ट करू शकला नाही. त्याच्या मृत्यूनंतर मोगल साम्राज्याला उतरती कळा लागली. मोगलांचे अनेक सरदार स्वतंत्र झाले. मोगलांच्या कैदेत असलेले संभाजीराजांचे पुत्र शाहू महाराष्ट्रात आले. सातारा येथे मराठ्यांची राजधानी स्थापन करून ते राज्य करू लागले. महाराणी ताराबाई यांनी कोल्हापूर येथे मराठ्यांचे दुसरे राज्य स्थापन केले. पुढे सर्व सत्ता पेशव्यांच्या हाती एकवटली. पेशवेकाळात मराठी राज्याच्या सीमा विस्तारित होत गेल्या. १८ व्या शतकात स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर झाले. पण पुढे पेशव्यांमधील अंतर्गत यादवीचा फायदा इंग्रजांनी घेतला आणि मराठ्यांचे राज्य नष्ट केले. १८१८ मध्ये पेशव्यांची सत्ता संपुष्टात आली आणि संपूर्ण महाराष्ट्रावर ब्रिटिश सत्तेचा अंमल प्रस्थापित झाला.

ब्रिटिश सत्तेच्या अंमलामुळे महाराष्ट्रात आणि भारतात दूरगामी परिणामी घडून आले. ब्रिटिश सत्तेने महाराष्ट्रीय व भारतीय संस्कृतीला आव्हानच दिले. इंग्रजांसारख्या सुधारित पाश्चात्य संस्कृतीमुळे महाराष्ट्राचा सर्वांगीण चेहरामोहराच बदलू लागला. महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रात इंग्रजी सत्तेच्या अंमलामुळे परिणामकारक बदल जाणवू लागले. इंग्रजी सत्तेमुळे महाराष्ट्रातील मराठी माणसाचा पाश्चिमात्य विद्या, कला व शास्त्र यांच्याशी संबंध आला. त्यामुळे जुन्या चालरीती, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, जातिव्यवस्था इत्यादीवर आघात होऊ लागला. महाराष्ट्रातील जुन्या विचारांच्या

समाजमनावर पाश्चिमात्य विचारवंताचे वैचारिक हल्ले होऊ लागले. पाश्चिमात्यांचे विचार महाराष्ट्रातील समाजमनाला सहजासहजी पचनी पडत नव्हते. त्याचबरोबर महाराष्ट्रातील समाज पाश्चिमात्यांच्या विचाराला, परिवर्तनाला पूर्णपणे विरोधही करू शकत नव्हता. अशावेळी महाराष्ट्रातील समाजाची वैचारिक कोंडी फोडण्याचे कार्य १९ व्या शतकाने केल्यामुळे या शतकाला महाराष्ट्राच्या इतिहासात महत्त्वपूर्ण स्थान आहे.

## १.२ विषय विवेचन

१९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात महाराष्ट्राच्या समाज जीवनात अनास्था, अराजकता व अशांततेचा कालखंड संपून सुव्यवस्थित व योजनाबद्ध शासनपद्धतीला प्रारंभ झाला. शासन व समाज यांच्यातील परस्पर संबंधाचा विचार मांडला गेला. जातिव्यवस्थेच्या श्रेष्ठ-कनिष्ठ विचारांनी जखडलेल्या व अनेक अनिष्ठ रूढी, परंपरांनी बंदिस्त झालेल्या समाजाला सामाजिक समतेचा साक्षात्कार झाला. या समाजाने आत्मपरीक्षण करण्यास सुरुवात केली. त्यातून या समाजाला नवे आचार, विचार स्वीकारण्याची जाणीव झाली. इंग्रजासारख्या परकीय सत्तेचे राजकीय स्वरूप आणि त्यांचा आर्थिक हेतू वेगळाच असल्याची जाणीव होण्यास सुरुवात झाली. तसेच सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक जीवनातील नवीन व प्रगत विचारांचा स्वीकारच कोणत्याही देशातील समाजाच्या सर्वांगीण विकासाला साहाय्यभूत ठरतो याची जाणीव महाराष्ट्रातील समाजात निर्माण करण्याचे काम या शतकाने केले. त्यामुळे आधुनिक महाराष्ट्राचा अभ्यास करताना १९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. म्हणूनच या घटकात आपण १९ व्या शतकाच्या सुरूवातीच्या महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणार आहोत.

### १.२.१ सामाजिक स्थिती

#### अ) जातिव्यवस्था

जातिव्यवस्था हे भारतीय समाज जीवनाचे प्रमुख अंग आहे. सुरुवातीला वर्णव्यवस्था अस्तित्वात आली. त्यामध्ये ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र असे प्रमुख चार वर्ण होते. हे वर्ण जन्माधिष्ठित होते. व्यक्ती ज्या वर्णात जन्माला आली त्याच वर्णात तिला राहावे लागत होते. अध्ययन, अध्यापन करणारे ब्राम्हण, राजा व शस्त्र बाळगणारे क्षत्रिय, शेती व व्यापार करणारे वैश्य आणि या तीन वर्णांची सेवा करणारे शुद्र अशी समाजरचना होती. वर्णव्यवस्था जन्माधिष्ठित बनल्यावर त्यांच्यात रोटीबेटी व्यवहार बंद झाले. या वर्णव्यवस्थेतून जातिव्यवस्थेचा उदय घडून आला. जातीमध्येही अनेक उपजाती होत्या. प्रत्येक जातीतील लोक आपल्याच जातीपुरते रोटीबेटी व्यवहार करत असत. वर्णव्यवस्था अथवा जातिव्यवस्थेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यास जबर शिक्षा देण्यात येत असे.

इ.स. पू. पहिले शतक ते इ.स. पहिले शतक याकाळात वर्णव्यवस्था अधिक कडक स्वरूपात अस्तित्वात आली. याचकाळात मनुस्मृतीचा अंमल मोठ्या प्रमाणात सुरू झाला. ब्राम्हणवर्गाचे वर्चस्व वाढले. प्रत्येक वर्ग अनेक जाती उपजातींमध्ये विभागला गेला. समाज एकजिनसी नसल्यामुळे त्यांना परकीय आक्रमणे रोखता आली नाहीत. परंतु परकीय राजांनीही इथे प्रचलित व्यवस्था स्वीकारल्यामुळे भारतातील जातिव्यवस्थेच्या स्वरूपात फारसा फरक पडला नाही. मध्ययुगीन काळात देशावर मुस्लिम सत्तांची राज्ये होती. पण याकाळातही जातिव्यवस्थेमध्ये फारसा बदल झाला नाही. पुढे छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जातीधर्माच्या लोकांची एकी करून स्वराज्य निर्माण केले. याही काळात जातिव्यवस्थेमध्ये बदल घडून आले नाहीत. प्रचलित गावगाड्यात लोक आपआपल्या जातीनुसार वागत असले तरी सामान्य जनतेचा जातीच्या नावाने छळ करण्यात येत नव्हता. उलट महाराष्ट्रातील मराठ्यांना परत त्यांच्या जातीमध्ये आणण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. पुढे १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाला. यावेळी दुसऱ्या बाजीरावाचे राज्य बुडाल्याबद्दल लोकांनी आनंद व्यक्त करून ब्रिटिश सत्तेचे स्वागत केले. कारण बाजीरावाने मनुस्मृतीच्या दंडसंहितेची कडक अंमलबजावणी केल्याने सामान्य जनता जातीच्या अन्यायाखाली भरडली जात होती. १९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील महाराष्ट्रातील जातिव्यवस्था पुढील प्रमाणे होती.

**जाती**

**१) ब्राम्हण**

१९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात महाराष्ट्रातील जातिव्यवस्थेत ब्राम्हणांनाच वेदोक्ताचा अधिकार होता. क्षत्रिय व वैश्य यांना शुद्र ठरविण्यात आले होते. त्यांना ब्राम्हणांप्रमाणे वेद अध्ययनाचा अधिकार नव्हता. परशुरामाने पृथ्वीवरील क्षत्रिय २१ वेळा मारून नि:क्षत्रिय केल्यामुळे आता क्षत्रिय शिल्लक नाहीत असे सांगितले जात होते. त्यामुळे ब्राम्हण व शुद्र हे दोन वर्ण अस्तित्वात होते.

**२) शूद्र**

ब्राम्हणानंतर मराठा, माळी, धनगर, सोनार, कायस्थ प्रभू या स्वत:ला उच्च समजणाऱ्या जातींनाही पेशवेकाळात शूद्र मानण्यात आले होते. तसेच सुतार, कुंभार, परीट, न्हावी, लोहार, गुरव, कोळी या बलुतेदार जाती शुद्र म्हणून ओळखल्या जात होत्या. त्याशिवाय तेली, तांबोळी, शिंपी, माळी, भोई, साळी, गोंधळी, गोसावी, जिनगर, जोगी, कासार, कोष्टी, कुणबी, गवळी, पारधी, भंडारी, बेलदार, वडर, पाथरवट, वंडारी वैरागी, बुरूड, घिसाडी, कैकाडी इत्यादी अलुतेदार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जाती शूद्रवर्णात मोडत होत्या.

## ३) अतिशूद्र

ज्या जाती महाराष्ट्रात अस्पृश्य म्हणून ओळखल्या जात होत्या त्यांना अतिशूद्र म्हटले जात होते. यामध्ये प्रामुख्याने महार, मांग, चांभार, ढोर, व्हलार या जातींचा समावेश होता. या जातींना अस्पृश्य ठरविल्यामुळे त्यांना कोणतेही अधिकार नव्हते. महात्मा फुले यांनी त्यांना अतिशूद्र जाती असे म्हटले आहे.

## पोटजाती

### १) ब्राम्हण

समाजातील सर्वश्रेष्ठ जात म्हणून ब्राम्हणांना मान होता. त्यांना सर्व धार्मिक विधी करण्याचा अधिकार होता. ब्राम्हणांच्या पोटजाती त्यांच्या मूळ निवासस्थानावरून, त्यांच्या वेदपठणाच्या प्रावीण्यावरून आणि उपनिषदांच्या नावावरून पडलेल्या होत्या. कोकणस्थ ब्राम्हणांमध्ये चितपावन, देवरूखे, सारस्वत, गौड सारस्वत तसेच देशस्थ ब्राम्हणांमध्ये ऋग्वेदी, युजर्वेदी, सामवेदी, अग्निहोत्री, धर्मोपाध्ये, पुराणिक इत्यादी पोटजाती होत्या.

### २) मराठा

मराठा ही महाराष्ट्रातील स्वत:ला क्षत्रिय समजणारी जात होती. मराठा समाजात ९६ कुलनामे असल्यामुळे त्यांना ९६ कुळी मराठा असे म्हटले जाते. हा मराठा समाज युद्ध करण्याबरोबरच शेती व्यवसाय करीत असे. मराठ्यांच्यातील दुसरा वर्ग म्हणजे कुणबी होय. त्यांना लढाई करण्याची परंपरा नव्हती व ते शेती हाच प्रमुख व्यवसाय समजत होते. पेशवाईत मराठा व कुणबी हे शुद्र जातीत मोडत होते.

### ३) कायस्थ प्रभू

कायस्थ प्रभू ही जात स्वत:ला क्षत्रिय समजणारी, लढाई आणि लेखनवृत्तीची कामे करणारी आणि अत्यंत विश्वासू होती. शिवाजी महाराजांचे चिटणीस मंडळ प्रामुख्याने कायस्थ प्रभू जातीचे होते. तसेच किल्ल्यावर कारखानीस म्हणूनही ते काम पाहत होते. मराठा, कुणबी यांच्याप्रमाणेच कायस्थ प्रभूंनाही वेदोक्त पद्धतीने विधी करण्याचा अधिकार नव्हता.

## इतर शूद्रजाती

१९ व्या शतकाच्या सुरुवातीला महाराष्ट्रातील बलुतेदार आणि अलुतेदार जातींमध्ये अनेक पोटप्रकार अस्तित्वात होते. बलुतेदारांमध्ये जोशी व मुलाणी सोडून इतर सर्व शूद्रवर्णात मोडत होते. ते पुढीलप्रमाणे होत.

**बलुतेदार**

बलुतेदार पद्धत हे शिवकालीन महाराष्ट्राचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये होय. समाजात बारा बलुतेदार होते. (काही ठिकाणी त्यांची संख्या कमी-जास्त झाल्याचेही दिसते) या बारा बलुतेदारांपैकी महत्त्वाचे काही बुलतेदार असे -

**१) कुंभार**

कुंभार जातीचे महत्त्वाचे काम म्हणजे मातीच्या वस्तू बनविणे, मातीची भांडी तयार करणे, लहान-मोठी चाके तयार करणे, विटा व कौले यांची निर्मिती करणे होय. कुणब्यांना या वस्तू देऊन त्यांच्याकडून त्यांना धान्य स्वरूपात मोबदला मिळत होता.

**२) सुतार**

शिवकाळ आणि पेशवेकाळात अनेक ग्रामीण भागात सुतार जातीचे लोक असत. शेतीची औजारे, लाकडी वस्तू, सर्व प्रकारची लाकडी कामे सुतार करीत असत. या कामाच्या मोबदल्यात त्यांना शेतकऱ्यांकडून धान्य मिळत असे.

**३) लोहार**

गावातील शेतकऱ्यांना लागणारी कुऱ्हाड, कुदळ, विळे, खुरपे यासारखी अवजारे तयार करण्याचे आणि या अवजारांच्या दुरूस्तीचे काम लोहारास करावे लागे. तसेच लष्करास आवश्यक असलेली साधने बनविण्याचे काम ही त्यास करावे लागे.

**४) परीट**

परीट हा महत्त्वाचा बलुतेदार होता. लग्नप्रसंगी नवरा मुलगा व नवरी मुलगी ज्या मार्गाने जाणार त्या मार्गावर कापड अंथरणे, गावातील लोकांचे कपडे धुणे, मनुष्याचे निधन झाल्यावर व स्त्री बाळंत झाल्यावर काही दिवस या घरातील कपडे धुण्याचे काम त्यांना करावे लागे.

**५) न्हावी**

गावकऱ्यांचे दर पंधरा दिवसांनी डोक्यावरचे केस कापणे, दाढी करणे, नखे कापणे, मालीश करणे ही कामे न्हावी समाजातील लोकांना करावी लागत. रात्रीच्या मिरवणुका व समारंभामध्ये मशाल धरण्याचे काम त्यांना करावे लागे. तसेच केशवपणाचे कामही त्यांना करावे लागे.

**६) गुरव**

गुरव हा खेड्यातील ग्रामदेवतांची पूजा करणारा पुजारी होता. महाराष्ट्रामध्ये निरनिराळ्या ठिकाणी असलेल्या बहुजन समाजाच्या जोतिबा, नाईकबा, खंडोबा यासारख्या कुलदैवतांची तसेच ग्रामदैवतांची पूजा करण्याचे काम गुरव जातीकडे होते.

## ७) कोळी

शेतकरी, वतनदारांकडे पाणी भरणे, चावडी स्वच्छ करणे, मासेमारी करणे अशी कामे करून कोळी आपली उपजीविका करीत. कोळ्यांमध्येही गावगाड्यातील कोळी, डोंगरी कोळी, महादेव कोळी, सोनकोळी अशा पोटजाती होत्या.

## ८) चांभार

शिवकाळात आणि पेशवेकाळात ग्रामीण भागात चांभार जातीचे लोक होते. गावकऱ्यांसाठी चप्पला तयार करणे, वतनदारांना चप्पलांचे जोड देणे अशी कामे चांभार लोक करत असत. चांभार लोकांची वस्ती गावाच्या बाहेर असे.

## अलुतेदार

महाराष्ट्रातील समाजात बारा बलुतेदाराप्रमाणे अठरा अलुतेदारही होते. त्यामध्ये सोनार, तेली, तांबोळी, शिंपी, माळी, साळी, कासार, जिनगर, धनगर, भोई, कोष्टी, गोसावी यासारख्या उपजातींचा समावेश होता. त्यापैकी काही महत्त्वाचे वर्ग पुढीलप्रमाणे -

## १) सोनार

दागदागिने, अलंकार बनविणे हा या वर्गाचा परंपरागत व्यवसाय होता. टांकसाळीतील नाणी तयार करण्याची कामे सोनार वर्गाकडून केली जात असत. त्याबाबत त्यांना शासन दरबारी कर भरावा लागत असे.

## २) तेली

एक किंवा दोन बैल वापरून तेलाचा घाणा चालविणे आणि गावातील लोकांना तेलाचा पुरवठा करणे ही कामे तेली करत असत. महाराष्ट्राच्या बहुसंख्य भागात ही जात तेल गाळण्याचा व्यवसाय मोठ्याप्रमाणात करीत होती.

## ३) तांबोळी

गावगाड्यामध्ये राहणारी तांबोळी ही जात पाने विकण्याचा व्यवसाय मोठ्याप्रमाणात करीत होती. पानाबरोबरच शेतीचाही व्यवसाय करीत होती. बहुसंख्य तांबोळी लोक हे मुस्लिम धर्मिय होते.

## ४) शिंपी

महाराष्ट्रातील समाजात शिंपी ही शिवणकाम करणारी जात म्हणून प्रसिद्ध होती. अंगवस्त्रे तयार करणे, राजदरबारी पडदे, कापड तयार करणे या स्वरूपाची कामे शिंपी वर्गाला करावी लागत. या व्यवसायावर त्यांचा उदरनिर्वाह चालत असे.

## ५) माळी

माळी लोक प्रामुख्याने बागकाम करणे, बागेची निगा राखणे हे काम करीत असत. गावाला मुंडावळ, फुलपात्री व इनामदारांच्या घरी गजरे, हार पुरविण्याचे काम करीत. तसेच जमीनदारांच्या बागावर या वर्गातील लोक कामास जात असत.

## ६) साळी

विणकाम करणारी जात म्हणून ही समाजात प्रसिद्ध होती. ही जात सामान्य विणकर या जातीत मोडत होती. स्वकुल साळी ही या जातीची पोटजात होती. या पोटजातीत ओर, सूत, टिकले, बांगड, गुजर, पद्म सळी या सहा उपजाती होत्या.

## ७) कासार

या जातीत बांगड्यांचा व्यवसाय केला जात असे. तांब्याची व पितळेची भांडी तयार करून विकणे हा त्यांचा प्रमुख व्यवसाय होता. तोफगोळे ओतण्याचे कामही कासार लोक करीत असत. या जातीत कासार, बोगार, पांचाळ अशा पोटजाती होत्या.

## ८) जिनगर

चित्रे, बाहुल्या इ. तयार करणारी ही जात होती. शिवाय बाशिंग, नक्षत्रमाळा तयार करणे आणि त्या लग्नात पुरविण्याचे काम जिनगर करीत असत. जिनगर जातीत चित्रकाम, सुतारकाम, लोहारकाम इत्यादी व्यवसायही केले जात असत.

## ९) धनगर

शेळ्या, मेंढ्या, बकऱ्या आणि म्हैशी पाळण्याचा व्यवसाय धनगर जातीचे लोक करीत असत. पशुधनाच्या उपजीविकेसाठी ते भटकंती करीत असत. म्हस्के, मेंडके, खुटेकरे या त्यांच्यातील प्रमुख जाती होत्या.

## १०) भोई

भोई ही जात डोली व पालखी वाहण्याचे, तसेच मासे मारण्याचा व्यवसाय करीत असे. भोई जातीत पोटभेद होते. या जातीमध्ये खास भोई आणि लाड भाई अशा पोटजाती होत्या.

## ११) कोष्टी

कापड तयार करून त्याची विक्री करण्याचा व्यवसाय कोष्टी लोक करीत असत. त्यामध्ये अनेक पोटजाती अस्तित्वात होत्या. देवांग कोष्टी ही जात कोष्टी जातीमध्ये प्रमुख जात म्हणून ओळखली जात होती.

## १२) गोसावी

गोसावी जात समाजामध्ये भिक्षा मागणे व पूजा करणे ही कामे करीत असे. गोसावी ज्या प्रदेशात राहात त्यावरून त्यांच्यात धरधारी, मठधारी, संन्यासी हे पोटभेद होते. याशिवाय गवळी, पारधी, वडर, पाथरवट, बुरूड, कैकाडी, घिसाडी या जातीही गावगाड्यात अस्तित्वात होत्या.

१९ व्या शतकाच्या सुरुवातीला महाराष्ट्रामध्ये अस्तित्वात असलेली जातिव्यवस्था अत्यंत बंदिस्त होती. ब्राम्हण सोडले तर बाकी सर्व जाती शुद्र समजल्या जात होत्या. त्यांना मूंज करणे किंवा जानवे धारण करण्याचा अधिकार नव्हता. प्रचलित धर्मरूढीविरूद्ध वर्तन केले तर त्यांना मनुस्मृतीच्या नियमानुसार शिक्षा होत असे. जात पूर्वजन्माच्या संचितावरून मिळते यावर तत्कालीन समाज विश्वास ठेवून होता. परमेश्वराने ज्या जातीत जन्माला घातले त्याच जातीत आयुष्यभर काम करून मोक्ष मिळविणे ही समाजाची प्रवृत्ती होती. परिणामी १९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात जातिव्यवस्थेच्या स्वरूपात कोणतेही विशेष बदल घडून आले नव्हते.

## ब) अस्पृश्यता

## १) प्रस्तावना

अस्पृश्यतेचा उगम प्राचीन काळापासून टप्प्या-टप्प्याने झाला. हिन्दू धर्मात प्राचीन काळापासून समाजातील एक वर्ग अस्पृश्य समजण्यात आला होता. हिन्दू धर्मात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र असे चार वर्ण अस्तित्वात होते. अध्ययन, अध्यापन, पौरोहित्य हे ब्राम्हणाला, लोकरक्षण, दान करणे हे क्षत्रियाला, व्यापार करणे, व्याजाने पैसे लावणे, शेती करणे हे वैश्याला तर ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य या तिघांची विनातक्रार सेवा करणे हे काम शुद्राला देण्यात आले होते. नंतरच्या काळात प्रत्येक वर्णात जाती व पोटजाती निर्माण झाल्या. मध्ययुगात जातिव्यवस्थेच्या स्वरूपात बदल झाला. क्षत्रिय व वैश्य या जाती शूद्र ठरविण्यात आल्या. पुढे या सर्व जातींना अतिशूद्र ठरविण्यात येऊन त्यांना अस्पृश्य जाती म्हणून ओळखले जाऊ लागले. यामध्ये प्रामुख्याने महार, मांग, चांभार, ढोर या जातींचा समावेश होता.

## २) अस्पृश्यतेचे स्वरूप

प्राचीन काळापासून भारतात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे चार वर्ण होते. ही वर्णव्यवस्था उत्तरोत्तर घट्ट होत गेली. यातील शुद्रामध्ये असा एक वर्ग होता की, जो इतरांपासून बहिष्कृत होता. अशा लोकांना अस्पृश्य असे म्हटले जात होते. अस्पृश्यता हा हिंदू धर्माला लागलेला कलंक होता. हिन्दूचे धर्मशास्त्र 'मनुस्मृतीत' या वर्गावर अत्यंत कठोर बंधने लादण्यात आली होती. शूद्रवर्णाला वरील तीन वर्णांनी स्पर्श करायचा नाही असा धर्मनियम होता. हा वर्ण गावकुसाबाहेर राहत होता. त्याचा स्पर्श एखाद्या व्यक्तीला झाला तर ती व्यक्ती अस्पृश्य समजली जात होती. अशा व्यक्तीला

गोमूत्र शिंपडून शुद्ध केले जाई. थोडक्यात, हिन्दू धर्मात ज्याचा स्पर्श झाल्यास अपवित्र मानले जात होते व ज्याला इतर कोणतीही व्यक्ती स्पर्श करू शकत नव्हती अशा व्यक्तीला अस्पृश्य मानले जात होते. अस्पृश्यांनी उच्च वर्गाची सेवा करणे मात्र कोणत्याही अधिकाराची अपेक्षा न करणे हेच त्यांचे जीवन होते. अशा प्रकारे, अस्पृश्यांसाठी धर्माने घालून दिलेले नियम पाळून जो व्यवहार केला जाई त्याला अस्पृश्यता असे म्हटले जात होते.

### ३) अस्पृश्यांना मिळणारी वागणूक

अस्पृश्य लोकांना उच्चवर्णीयांची सेवा करावी लागत होती. तसेच या लोकांनी गावापासून दूर, गावकुसाबाहेर वस्ती करावी असे बंधन होते. त्यांना गावात राहण्याची परवानगी नव्हती. अस्पृश्य जातीतील महार लोकांना गावात प्रवेश करताना गळ्यात मडके अडकवून यावे लागे. कारण त्यांची थुंकी गावात पडली तर गाव विटाळेल अशी समजूत होती. तसेच त्यांच्या पावलांच्या स्पर्शाने जमीन विटाळेल म्हणून जमीनीवर उमटलेली पावले पुसली जावीत यासाठी त्यांच्या कमरेला झाडू बांधण्याचा प्रघात होता. अस्पृश्यांचे दर्शनही अशुभ मानले जात असलेने त्यांना पहाटे किंवा दुपारीच आपली कामे उरकावी लागत होती. संध्याकाळी जेव्हा सावल्या लांब पडतात तेव्हा त्यांना गावात येण्यास बंदी होती. उच्चवर्णीयांच्या विहिरींना किंवा पाणवठ्यांना स्पर्श करण्याचा तसेच बाजारातून नवीन कपडे खरेदी करण्याचा त्यांना अधिकार नव्हता. शिवाय त्यांना मंदिरामध्ये प्रवेश नव्हता. अशा प्रकारची अमानवी वागणूक अस्पृश्यांना दिली जात होती.

### ४) अस्पृश्यांची कार्ये

मनुस्मृतीमध्ये अस्पृश्यांकडून कोणती कामे करून घ्यावीत, त्यांना कोणते अधिकार द्यावेत, त्यांना कसे वागवावे तसेच घालून दिलेल्या नियमाविरूद्ध वर्तन केल्यास त्यांना कोणत्या शिक्षा द्याव्यात हे स्पष्ट केले आहे. अस्पृश्यांमध्ये महार लोकांना गावाची झाडलोट व रात्रीच्यावेळी गावाची राखण करावी लागे. ढोर लोकांना गावातील मेलेली जनावरे ओढण्याचे काम करावे लागे. मांग लोकांना गावकऱ्यांना दोर व दोरखंड पुरविणे, लोकांना फाशी देणे हे काम करावे लागे. तसेच चांभारांना चामड्याच्या विविध वस्तू आणि प्रत्येक गावकऱ्यासाठी प्रत्येक वर्षी एक चप्पलांचा जोड बनवावा लागत असे. अस्पृश्य जातींना आपला व्यवसाय बदलता येत नव्हता. त्यांनी तसे केल्यास शिक्षा देण्यात येत असे. तसेच शुद्रांनी ब्राम्हणांची सेवा करावी, त्या सेवेच्या मोबदल्यात ब्राम्हणांनी त्यांना आपल्या घरातील शिल्लक राहिलेले अन्न, जुने कपडे, जुने धान्य द्यावे. अशा प्रकारे त्यांनी काय करावे व काय करू नये याबाबत अनेक बंधने मनुस्मृतीमध्ये अस्पृश्यांवर लादली होती. या सर्व नियमांचे काटेखोरपणे पालन केले जात होते. त्यामुळे अस्पृश्यांची स्थिती अतिशय हलाखीची होती.

## ५) सारांश

मराठेशाहीतही अस्पृश्यता अस्तित्वात होती. पण शिवकाळ आणि पेशवेकाळातील अस्पृश्यतेत फरक होता. हिन्दवी स्वराज्याची स्थापना करताना छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जाती-जमातीच्या लोकांना आपल्या उदात्त कार्यात सहभागी करून घेतले होते. अस्पृश्य लोकांचा न्यायदान पद्धतीत सहभाग होता. स्वराज्याच्या रक्षणात रामोशी, बेरड लोकांच्या नेमणुका केलेल्या होत्या. शिवकाळात १२ बलुतेदारांपैकी 'महार' हा महत्त्वाचा बलुतेदार होता. त्याच्या इतकेच मांग, चांभार, ढोर यांनाही महत्त्वाचे स्थान होते. शिवकाळात अस्पृश्यांनाही इतर बलुतेदारांप्रमाणेच समान वागणूक दिली जात होती. पुढे पेशवेकाळात ब्राम्हणवर्गाचे समाजातील महत्त्व जसे वाढीस लागले तसे अस्पृश्यांवरील बंधने अधिक कडक बनली. स्वराज्याच्या लष्करात अस्पृश्यांचे असलेले स्थान संपुष्टात आले. महार, मांग, चांभार, ढोर या जातींच्या बाबतीत शिवाशिव, भेदाभेद वाढीस लागून अस्पृश्यांचे जीवन अधिक कष्टमय बनले. अशा प्रकारे, शिवकाळात अस्पृश्यांना उदार वागणूक दिली जात होती तर पेशवेकाळात ब्राम्हण वर्गाच्या हाती सत्ता आल्याने अस्पृश्यांची स्थिती बिकट बनली.

## क) गुलामगिरी

## १) प्रस्तावना

हिन्दुस्थानात प्राचीन काळापासून गुलामगिरी अस्तित्वात होती. मनुस्मृतीमध्ये गुलामगिरी पद्धतीविषयी  माहिती मिळते. मध्ययुगीन भारतात हिन्दू-मुस्लिम दोन्ही समाजात गुलाम ठेवण्याची पद्धत होती. स्त्रिया आणि पुरूष गुलामांचे बाजार भरत असत. पेशवेकाळातही महाराष्ट्रात गुलामगिरीची पद्धत होती. पुरूष गुलामांना 'पोरगे' आणि स्त्री गुलामांना 'कुणबीण' म्हणत. गुलामांच्या स्वरूपात दास-दासी बाळगण्याची पद्धत होती. राजे, सरदार, जहागिरदार यांच्या पदरी दास-दासी असत. पेशवेकाळात दासाची म्हणजे पोरग्याची किंमत १२५ ते १५० रूपये आणि दासीची म्हणजे कुणबीणीची किंमत ६० ते ७० रूपये होती. कुणबीण अथवा बटीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्त्रियांकडून घरातील कोणतीही कामे करून घेतली जात असत. काहीवेळा अंगवस्त्र म्हणून त्यांचा वापर केला जात असे. सामान्यत: कुणबीण ही संज्ञा घरकाम करणाऱ्या स्त्री गुलामांना वापरली जात असे आणि बटीक ही संज्ञा वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्री गुलामांना वापरली जात असे. राजे, सरदार, जहागिरदार आपल्या नातेवाईकांच्या मुलीच्या लग्नात तिच्याबरोबर कुणबीण किंवा बटीक भेट स्वरूपात देत असत. पेशवेकाळात पुरूष गुलामांपेक्षा स्त्री गुलामांची संख्या जास्त होती.

## २) गुलामगिरीचे स्वरूप

गुलामांची निर्मिती साधारणत: शुद्र वर्गामधून मोठ्या प्रमाणात झाली होती. तसेच युद्धामध्ये पराभूत झालेल्यांनाही गुलाम म्हणून वापरले जात होते. कर्जाची परत फेड न केल्यामुळे व्यापारी किंवा धनिकांकडे लोक गुलामीची कामे करत असत. दुष्काळासारख्या आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये कुंटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी पुरूष सावकार किंवा धनिकांकडे गुलाम म्हणून राहात. राजे, सरदार, प्रधान आपल्या नातेवाईकांना गुलाम भेट म्हणून देत असत. अशा गुलाम व्यक्तींच्या सर्व प्रकारच्या हक्कांवर नियंत्रण येत असे. कसल्याही प्रकारचे स्वातंत्र्य गुलामांना नसे. त्यांच्या इच्छा, आकांक्षांना स्थान नसे. त्यांचा शारीरिक आणि मानसिक छळ झाला तरी त्यांना मालकाकडे कोणत्याही प्रकारची तक्रार करता येत नसे.

## ३) गुलामांना मिळणारी वागणूक

गुलाम स्त्री-पुरूषांना मिळणारी वागणूक त्यांच्या मालकाच्या स्वभावावर अवलंबून असे. मालक चांगला असेल तर त्यांना चांगली वागणूक मिळत असे. गुलाम ज्यांच्या घरात असतील त्यांच्या घरातील लोकांप्रमाणे त्यांना खाणेपिणे, धडूत मिळत असे. काहीवेळा त्यांना त्यांच्या सेवेबद्दल रोख रक्कम व बक्षीसही मिळत असे. गुलामांची लग्ने लावताना दोन्ही मालकांची संमती घेणे गरजेचे होते. गुलामांना जर मुले झाली तर त्यांची मालकीही गुलामांच्या मूळ मालकाकडेच असे. गुलामांना त्यांचा मालक फक्त त्यांची खरेदी-विक्री किंवा बक्षीस यानिमित्तानेच बदलता येत होता. पेशवेकाळात गुलामांची स्थितीे चांगली होती. याकाळात सरदार, संस्थानिक यांनी आपल्या कुणबीण अथवा पोरग्यावर जुलूम केले नाहीत. उलट सणवार अथवा मंगलप्रसंगी पेशवे कुणबीणींना लुगडी-चोळीखण तर पोरग्यांना रोख रक्कम देऊन संतुष्ट करीत असत. मुलांना घरगुती नोकरासारखे वागवत असत.

## ४) गुलामांची कार्ये

पेशवेकाळात गुलाम स्त्रियांची संख्या अधिक होती. स्त्री गुलामांना अनेक कामे करावी लागत. त्या ज्यांच्याकडे गुलाम म्हणून आहेत त्यांच्या घरातील कामे, शेतीची कामे, दळणकांडण, लहान मुलांचा सांभाळ अशा प्रकारची सर्व कामे त्यांना करावी लागत होती. तसेच मातब्बर नसलेले सरदार आपला वेळ स्त्री बटीकांच्या सहवासात घालवत असत. त्यांना मालकाच्या सर्व इच्छांची पूर्तता करावी लागे. अशा स्त्रियांशी संबंधही ठेवले जात. पुरूष गुलामाचे प्रमाण स्त्री गुलामापेक्षा अल्प असले तरी त्यांना प्रचंड कष्टाची कामे करावी लागत होती. जेव्हा या गुलामांना मालकाकडून लग्न करण्याची परवानगी मिळत असे किंवा वृद्धवस्थेत हे गुलाम त्यांच्या कामातून मुक्त होत असत.

## ५) सारांश

एकंदरीत, मानवजातीला शाप ठरलेली ही गुलामगिरीची प्रथा प्राचीन काळापासून चालत आलेली होती. या प्रथेमुळे माणसाचे जीवन पशुवत बनले होते. शिवकाळात राजकीय हालचालींच्या धामधूमीमुळे गुलामगिरीच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यास वेळच नव्हता. परिणामी पुढे पेशवेकाळात गुलामगिरीच्या प्रथेत वाढ झाली. पेशवेकाळात कोकणभागात समुद्रकिनारी स्त्रियांना पळवून नेऊन गुलाम म्हणून विकत असत. पेशवेकाळात सरदारांप्रमाणेच ब्राम्हणांच्या घरीही बटीक असत. त्या उच्च जातीतील असून परिस्थितीमुळे त्या बटीक बनत. याकाळात पुरूष गुलामांपेक्षा स्त्री गुलामांची संख्या जास्त होती. स्त्री गुलामांना नानाविध प्रकारची कामे करावी लागत. तर पुरूष गुलामांना अतिशय कष्टाची कामे करावी लागत.

## ड) स्त्रियांची स्थिती

## १) प्रस्तावना

भारतीय समाजात प्रारंभापासून पुरूषप्रधान संस्कृती असल्यामुळे स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन निकोप नव्हता. भारतीय समाजात स्त्री-पुरूष समानता अस्तित्वात नव्हती. स्त्रियांना दुय्यम स्थान होते. विविध प्रकारच्या सामाजिक आणि धार्मिक बंधनांनी स्त्रियांचे जीवन बद्ध झालेले होते. त्यांना कोणतीही संपत्ती धारण करता येत नव्हती. स्त्रियांवर अनेक व्रतवैकल्ये लादलेली होती. मध्ययुगात परकीयांच्या सततच्या आक्रमणामुळे स्त्रियांना पुरूषांच्या संरक्षणाखाली राहावे लागत होते. हिन्दवी स्वराज्य स्थापनेच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्त्रियांकडे आदराने पाहण्याचा दृष्टिकोन निर्माण केला. पुढे पेशवेकाळात स्त्रियांवर अनेक बंधने लादण्यात आली.

## २) बालविवाह

प्राचीन काळापासून भारतात बालविवाहाची पद्धत अस्तित्वात होती. या पद्धतीमुळे मुलींचे शिक्षण संपुष्टात येई. मुलीचा आठ वर्षाच्यापुढे विवाह राहू देणे हा अधर्म मानला जात होता. बालविवाहतून उद्‌भवणाऱ्या समस्याही भयानक होत्या. एखाद्या स्त्रीचा पती अकाली मृत्यू पावला तर तिला सती जावे लागत होते अथवा विधवेचे असहाय जीवन जगावे लागत होते. अजाणतेपणी तिला आलेल्या या वैधव्यामुळे समाजात मिसळता येत नसे. तिचे दर्शनही अमंगल मानले जात असे. तिला सामाजिक किंवा धार्मिक समारंभात भाग घेता येत नसे. तसेच तिला पुनर्विवाह करता येत नसे. व्रतवैकल्यांचे पालन करणे हेच उर्वरित आयुष्यात तिचे कर्तव्य बनत असे. बालविधवा अवस्थेमुळे अशा स्त्रियांकडून वाकडे पाऊल पडलेच तर त्यांना अतिशय दयनीय जीवन जगावे लागत होते.

### ३) विधवाविवाह

तत्कालीन महाराष्ट्रात पुरूषांना कितीही विवाह करता येत होते. मात्र स्त्रियांना पतीच्या निधनानंतर विवाह करता येत नव्हता. आयुष्यभर त्यांना विधवा म्हणूनच राहावे लागत होते. मुलीच्या विवाहाचे वय साधारणत: आठ ते नऊ वर्षे असावे असे मानले जात होते. मुलीचा विवाह नऊ वर्षाच्या आत झाला पाहिजे असे बंधन होते. पुरूषांना मात्र विवाहाबाबत वयाचे बंधन नव्हते. सत्तर वर्षाचा पुरूष दहा वर्षाच्या मुलीशी विवाह करू शकत होता. म्हातारा नवरा लवकरच मृत्यू पावत असल्याने अशा मुलीच्या वाट्याला विधवापण येत असे. पण कोणत्याही परिस्थितीत ब्राम्हण, मराठा आणि इतर जातींमध्ये विधावांचा विवाह केला जात नसे. त्यांना आयुष्यभर बालविधवा म्हणूनच जीवन जगावे लागत होते.

### ४) सती पद्धत

पूर्वापार चालत आलेली सतीची पद्धत मराठेशाहीतही अस्तित्वात होती. महाराष्ट्रात ब्रिटिशकाळात कोकणस्थ ब्राम्हणांनी ही पद्धत चालू ठेवली. पतीच्या निधनानंतर पतीच्या प्रेताबरोबर स्त्रीला त्याच्या चितेवर स्वत:ला जाळून घ्यावे लागे. काही स्त्रिया हा सन्मान समजून अग्नीत उड्या घेत असत. तर काहीवेळा इच्छा नसतानाही स्त्रियांना सती जावे लागे. पेशवेकाळात या प्रथेस मोठ्या प्रमाणात प्रतिष्ठा देण्यात आली. अगदी दहा-बारा वर्षाच्या मुलीला सुद्धा पतीच्या मृत्यूनंतर सती घालवत असत. या हिंसक प्रथेविरूद्ध राजाराममोहन रॉय यांनी चळवळ सुरू केली. पुढे लॉर्ड बेंटिंगने या प्रथेविरूद्ध १९२९ साली कायदा करून स्त्रियांना सती घालविणाऱ्या लोकांवर खूनाच्या आरोपाखाली शिक्षेची तरतूद केली आणि लोकजागृती करून ही अमानुष प्रथा मोठ्या धाडसाने नष्ट केली.

### ५) केशवपण

ब्राम्हण जातीमध्ये केशवपणाची पद्धत प्रचलित होती. पतीच्या निधनानंतर पत्नीच्या डोक्यावरील केस कापण्यात येत. तिला संपूर्ण डोके गुंडाळून पदर घ्यावा लागे. त्यामुळे ती विद्रुप दिसत असे. तिच्या या विद्रुप दिसण्यामागे इतरांनी तिच्याकडे वाईट नजरेने बघू नये हा हेतू होता. त्यातूनही अशा स्त्रियांचा पाय घसरला व गर्भधारणा झाली तर त्यांना समाजातून बहिष्कृत केले जाई. केशवपन केलेल्या स्त्रियांना अत्यंत साधेपणाने राहावे लागे. त्यांच्याकडे घरातील स्वयंपाकाचे काम सोपवलेले असे. अतिशय दु:खमय जीवन या स्त्रियांच्या वाट्याला येत असे. मात्र महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी केशवपणाविरूद्ध आवाज उठवून विधवा पुनर्विवाहासाठी प्रयत्न केले.

## ६) सारांश

१९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात ब्राम्हणांपासून शुद्रापर्यंतच्या सर्व स्त्रिया शुद्रवर्णामध्ये मोडत होत्या. धर्माने घालून दिलेल्या नियमांनुसार स्त्रियांना आपले आचरण करावे लागत होते. जी स्त्री धर्मानुसार आचरण करेल तिला समाजामध्ये आदर्श मानले जात असे. तिला अनेक सामाजिक बंधनांनी जखडून ठेवण्यात आले होते. तसेच शुद्र आणि स्त्रिया यांना शिक्षणाचाही अधिकार नव्हता. याशिवाय बहुजन समाजात अनेक अंधश्रद्धा होत्या. त्यातून मुरळी, जोगीण, देवदासी म्हणून लहान मुलींना देवाच्या नावाने सोडले जात असे. अशा स्त्रिया समाजातील पुरूषी वासनेची शिकार बनत. अशा प्रकारे १९ व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात महाराष्ट्रातील स्त्रियांची स्थिती अतिशय दयनीय, असहाय व निराधार झालेली होती.

## स्वयं अध्ययन प्रश्न - १

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१. वर्णव्यवस्थेतील प्रमुख चार वर्ण कोणते ?

२. मराठा समाजात किती कुलनामे आहेत ?

३. अस्पृश्यांबाबतचे नियम कोणत्या ग्रंथात आहेत ?

४. पुरूष गुलामांना कोणती संज्ञा वापरली जात असे ?

५. सती प्रथेविरूद्ध १८२९ साली कोणी कायदा केला ?

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१. ........ शतकात हिन्दवी स्वराज्याची स्थापना झाली.

(अ) १७ व्या (ब) १६ व्या (क) १९ व्या (ड) १८ व्या

२. वर्णव्यवस्थेतून .......... चा उदय झाला.

(अ) कुटुंबव्यवस्था (ब) समाजव्यवस्था (क) शिक्षणव्यवस्था (ड) जातिव्यवस्था

३. ........ साली पेशवाईचा अस्त झाला.

(अ) १८०० (ब) १८१८ (क) १९०० (ड) १९१८

४. ……… हा हिन्दू धर्माला लागलेला कलंक होता.

(अ) अस्पृश्यता (ब) गुलामगिरी (क) वर्णव्यवस्था (ड) जातिव्यवस्था

५. घरकाम करणाऱ्या स्त्री गुलामाला ……. ही संज्ञा वापरली जात असे.

(अ) कुणबीण (ब) बटीक (क) वेश्या (ड) सहचारिणी

## १.२.२ आर्थिक स्थिती

### अ) शेती

प्राचीन काळापासून महाराष्ट्रात शेती हाच प्रमुख व्यवसाय होता. महाराष्ट्रातील लोक शेतीवर आपला उदरनिर्वाह करीत असत. सर्वात जास्त आणि सर्वात कमी पाऊस पडणारा भू-प्रदेश महाराष्ट्राला लाभला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात शेती हा व्यवसाय पावसावरच अवलंबून होता. मध्ययुगीन काळात वारंवार होणाऱ्या परकीय आक्रमणांमुळे महाराष्ट्रातील शेती व्यवसाय उध्वस्त झाला होता. अनेक शेतकरी गावे सोडून निघून गेले होते. त्यामुळे शेतीबरोबरच गावे उध्वस्त झाली होती. अशा परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक शेतकऱ्यांना एकत्र करून उध्वस्त झालेल्या गावांचे पुनर्वसन केले. नवीन गावे वसवून पडीक जमीन लागवडीखाली आणली. शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत जमिनीची प्रतवारी ठरवून तीन वेळा मोजणी करण्यात आली. सुरुवातीला दादोजी कोंडदेव नंतर मोरोपंत पिंगळे व त्यानंतर अण्णाजी दत्तो यांनी जमिनीची मोजणी केली. तसेच शेतकऱ्यांसाठी कर्जे व बी-बियाणे उपलब्ध करून दिले. यामुळे शिवकाळात शेती व शेतकऱ्यांची स्थिती सुधारली. परंतु पुढील काळात ही स्थिती कायम राहिली नाही.

शेती हाच प्रमुख व्यवसाय असल्याने गावात शेतकऱ्यांचा वर्ग मोठ्या प्रमाणात होता. शिवाय शेतीपूरक अनेक व्यवसाय गावात चालत होते. शेती व्यवसाय करणाऱ्यांना ‘कुणबी’ म्हणजे शेतकरी म्हटले जात होते आणि शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्यांना ‘बलुतेदार’ व ‘अलुतेदार’ म्हटले जात होते. बलुतेदार व अलुतेदार यांचे व्यवसाय जातीनुसार ठरत असत. ते गावाची गरज पूर्ण करीत असत. त्याच्या मोबदल्यात त्यांना शेतकऱ्यांकडून धान्य मिळत असे. हा हक्काचा हिस्सा खळ्यावरच त्यांना मिळत असे. त्यातूनच त्यांना सरकारी सारा, सावकाराचे कर्ज भागवावे लागे. यातून जे काही शिल्लक राहील त्यावर त्यांना आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागे. आपल्या कुटुंबाची उपजीविका करता येईल इतके देखील धान्य त्यांच्याकडे शिल्लक राहत नसे. त्यामुळे कर न देणाऱ्या शेतकऱ्याला फटके मारणे, तिखटाची धुरी देणे इत्यादी शिक्षा दिल्या जात असत.

पुढे सातारचे छत्रपती शाहू महाराज हे नामधारी राहिल्यामुळे सर्व सत्ता पेशव्यांच्या हातात एकवटली. पेशवेकाळात त्यांनी शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने सारा गोळा करण्यास सुरुवात केली. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारांच्या ताब्यात गेल्या. शेतकरी कर्जबाजारी बनला. त्यामुळे शेतकऱ्यांवर अवलंबून असणाऱ्या गावगाड्यातील इतरांची स्थितीही दयनीय बनली. राज्यकर्ते चैन, विलास, दानधर्म, भोजनावळी यासाठी रयतेकडून गोळा झालेला पैसा खर्च करीत होते. १९ व्या शतकाच्या प्रारंभापर्यंत शेतकऱ्यांकडून उत्पन्नाच्या १/३ भाग सरकार जमीन महसूल म्हणून गोळा करीत होते. राज्यकर्ते फक्त महसूल गोळा करण्याचे काम करीत होते. परंतु शेतकऱ्याला मात्र त्यासाठी कसल्याही सोयी-सवलती देत नव्हते. त्यामुळे शेती हा प्रमुख व्यवसाय असला तरी शेती करणाऱ्या व त्यावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांचे जीवन आर्थिकदृष्ट्या हलाखीचे होते.

### ब) उद्योग

प्राचीन काळापासून महाराष्ट्रात शेती हाच प्रमुख व्यवसाय असला तरी शेतीला पूरक असे अनेक व्यवसायही गावगाड्यात चालत होते. गावातील लोकांच्या गरजा भागविणे हे या उद्योगांचे प्रमुख उद्दिष्ट होते. यातूनच जहाजबांधणी, मीठ निर्मिती, मासेमारी, चर्म, रेशीम यासारखे अनेक उद्योग सुरू झाले व भरभराटीस आले.

### १) जहाज बांधणी उद्योग

छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार उभारण्यासाठी जहाज बांधणी उद्योग सुरू केला. हा उद्योग महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर अनेक ठिकाणी चालत होता. कोकणात ठाणे, कल्याण, भिवंडी, अलिबाग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, मालवण या ठिकाणी जहाज बांधणी उद्योग चालत होता. कल्याण, भिवंडी येथील जंगलातून जहाज बांधणीसाठी लाकूड पुरवठा होत होता. जहाज बांधणी उद्योगातून अनेक स्थानिक लोकांना रोजगार मिळत होता.

### २) मीठ उद्योग

प्राचीन काळापासून कोकण किनारपट्टीवर मीठ उद्योग भरभराटीस आला होता. समुद्राला भरती आल्यावर काठावरच्या खाचरांमध्ये खारट पाणी साठत असे व हे पाणी आटल्यावर मीठ तयार होत असे. मीठ तयार होणाऱ्या ठिकाणास 'मीठागर' असे म्हणत. प्रत्येक मीठागरावर एक टक्का जकात लावली जात होती. महाराष्ट्रात १८ व्या शतकात राजापूर, ठाणे, पेन, पनवेल, दाभोळ, चिपळूण इत्यादी ठिकाणे मीठ उद्योगासाठी प्रसिद्ध होती. येथे तयार झालेले मीठ मुंबई, पुणे, सातारा येथे विकले जात होते.

### ३) मत्सोद्योग

महाराष्ट्राला पश्चिमेस मोठा समुद्रकिनारा लाभल्याने रत्नागिरी, साष्टी, वसई येथे मासेमारी उद्योग मोठ्या प्रमाणावर चालत होता. हा उद्योग प्रामुख्याने कोळी लोक करीत होते. खारवलेले मासे बाजारामध्ये विक्रीस येत असत. रोहा, पनवेल, नागोठाणा, कल्याण येथे मासेमारी मोठ्याप्रमाणावर चालत होती.

### ४) चर्मोद्योग

चामड्यापासून वस्तू तयार करणे हा चांभार किंवा चर्मकार यांचा पिढीजात उद्योग होता. कातड्यांपासून जोडे, चप्पल तयार करणे त्याचबरोबर शेतीला लागणाऱ्या चामडी वस्तू उदा. मोट, चाबुक, तेलाच्या बुधल्या, वाद्य इत्यादी वस्तू प्रत्येक गावातील चांभार लोक तयार करीत व त्या गरजेनुसार गावातील लोकांना पुरवित होते.

### ५) रेशीम उद्योग

रेशीम उद्योगासाठी पैठण व येवला ही दोन प्रमुख केंद्रे होती. पेशव्यांनी १६५७ मध्ये १० कारागीर येवला येथे आणून रेशीम उद्योग भरभराटीस आणला होता. पैठण व येवला या पेठांमध्ये रेशीम साड्या विणण्याची कला घराघरांमध्ये विकसित झाली होती. रेशीम वस्त्रे तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल खाणदेश व बऱ्हाणपूरमधून मागविला जात होता. कान्होजी आंग्रेच्या काळापासून रेशीम वस्त्रे तयार करण्याचे उद्योग चौल बंदरामध्ये सुरू झाले होते.

महाराष्ट्रामध्ये सुरुवातीच्या काळातील अनेक उद्योग हे कुटीरोद्योगाच्या स्वरूपात होते. त्यासाठी पारंपरिक तंत्रज्ञान वापरले जात होते. अतिरिक्त उत्पादन घेण्यासारखी परिस्थिती याकाळात नव्हती. साधारणत: कोकण किनारपट्टीवर जहाज बांधणी, मीठ, मासेमारी, चर्म, रेशीम इत्यादी उद्योग मोठ्या प्रमाणावर केले जात होते.

### क) व्यवसाय आणि व्यापार

महाराष्ट्रात शेती हाच अर्थव्यवस्थेचा कणा आणि खेडे हा अर्थव्यवस्थेचा पाया होता. उद्योग, व्यवसाय आणि व्यापार यांचा संबंध खेडेगावांशी असे. शेतीच्या जोडीला इतर उद्योग व व्यवसाय चालत असत. खेड्यातील कारागीरांनी स्थलांतर करू नये म्हणून त्यांना गावामध्येच सर्व प्रकारच्या सोयी उपलब्ध करून देण्याकडे ग्रामव्यवस्थेचा कल असे. कारागीरांना जमिनी इनाम देण्यात येत असत किंवा बलुत्याच्या रूपाने आवश्यक त्या वस्तू किंवा धान्य त्यांना पुरविले जात असे. त्यामुळे तत्कालीन खेडी स्वयंपूर्ण होती. शिवकाळात आणि पेशवेकाळात पुढीलप्रमाणे व्यवसाय आणि व्यापार केला जात होता.

## १) विणकाम / कापड व्यवसाय

मध्ययुगीन कालखंडापासून महाराष्ट्रामध्ये विणकाम व्यवसायाला महत्त्वाचे स्थान आहे. सोलापूर, भिवंडी, नागपूर, येवले, पैठण, चौल इत्यादी ठिकाणी कापड व्यवसाय प्रसिद्ध होता. पेशवेकाळात या व्यवसायाला प्राधान्य मिळाले. स्थानिक लोकांपैकी लिंगायत कोष्टी यांच्याकडे विणकामाचा व्यवसाय असे. पुण्यामध्ये धोतरजोड्या व जाडेभरडे कापड बनविणारे विणकर आणि हातमाग मोठ्या प्रमाणात होते. सोलापूर शहरात प्रत्येक घरात विणकाम चालत असे. पेशव्यांनी १८ व्या शतकात मलमलीच्या कापड व्यवसायाला प्रोत्साहन दिले. चौल हे मलमलीच्या कापडाच्या व पैठण हे रेशीम कापडाच्या व्यवसायासाठी प्रसिद्ध होते.

## २) लाकडी वस्तूंचा व्यवसाय

महाराष्ट्रात १८ व्या शतकात लाकूड व्यवसाय मोठ्या प्रमाणात भरभराटीस आला होता. शेतीची औजारे व घरे, वाडे बांधण्यासाठी लाकूडकाम गावाच्या गरजेनुसार करण्यात येत असे. तसेच वाहतुकीसाठी बैलगाड्या, घोडागाड्या, मेणा, पालख्या, नौका तयार करण्याचे काम कुशल सुतार करीत असत. अहमदनगर हे कौशल्यपूर्ण सुतारकामासाठी प्रसिद्ध होते. वसई हे शहर लाकडी वस्तू तयार करण्याच्या व्यवसायासाठी प्रसिद्ध होते. कल्याण येथून लाकडी वस्तू बनविण्यासाठी लागणारे लाकूड मागविले जात असे. एकंदरीत, प्रत्येक गावात लाकडी वस्तूंचा व्यवसाय केला जात असे. गावाच्या मागणीनुसार लाकडी वस्तू तयार करण्यात येत असत.

## ३) लोखंड, तांबे, पितळ व्यवसाय

१८ व्या शतकात मराठी राज्याचा जसजसा विस्तार होऊ लागला तसतसे नवे व्यवसाय महाराष्ट्रात सुरू झाले. ग्रामीण भागात लोखंडाचे काम शेतीच्या औजारांची निर्मिती करण्यासाठी व घरगुती वापराच्या वस्तू म्हणजेच खोरे, टिकाव, कुऱ्हाड, कुदळ, विळा, खुरपे, पार इत्यादी तयार करण्यासाठी केले जात असे. लोखंडाचे काम लोहार करीत असत. लोहाराप्रमाणेच घिसाडी लोक लोखंडी वस्तू तयार करण्याचा व्यवसाय करीत. तांबट लोक तांब्याची व पितळेची भांडी बनविण्याचा व्यवसाय करीत. तसेच ते तोफा ओतण्याचेही काम करीत. तसेच शिकलगार हे मुस्लिम धर्मिय लोक तलवार, चाकू यासारखी शस्त्रे बनविण्याचा व्यवसाय करीत.

## ४) सोन्या-चांदीचा व्यवसाय

प्राचीन काळापासून सोने व चांदी या धातूचा उपयोग दागिने तयार करण्यासाठी केला जात होता. पेशवेकाळात सोने व चांदी यापासून दागिने बनविण्याचा व्यवसाय भरभराटीला आला. सोन्याच्या दागिन्यांमध्ये बांगड्या, पाटल्या, मंगळसूत्र, कंठीमाळ, बाजूबंद, नेकलेस, नथ, झुबे इत्यादींचा समावेश असे. तर चांदीच्या दागिन्यांमध्ये देवांच्या मूर्ती, चांदीचे टाळ, देवाच्या काठ्या, साखळ्या, मुगवट

इत्यादींचा समावेश असे. सोन्याचांदीच्या दागिन्यांवर मिनाकारी केलेली असे. श्रीमंत लोकांसाठी चौकडा केला जात असे. महाराष्ट्रात सोन्याचांदीचा व्यवसाय चांगल्या स्थितीत होता.

**५) गूळ व्यवसाय**

पेशवेकाळात महाराष्ट्रात साखर कारखाने नसल्यामुळे ऊसापासून गूळ तयार करण्यासाठी खेडेगावात शेतामध्ये ठिकठिकाणी गुऱ्हाळे असत. या काळात मोठ्याप्रमाणावर ऊसाची लागवड केली जात होती. इंद्रापूर भागात ऊसाची गुऱ्हाळे मोठ्या प्रमाणात होती. शेतकरी गूळ पेठांमध्ये विक्रीसाठी नेत असे. अशा प्रकारे महाराष्ट्रात गूळ व्यवसायही मोठ्याप्रमाणात चालत होता.

१९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात महाराष्ट्रात खेडेगावातील लोकांच्या गरजा खेडेगावातील कारागीरांकडून पूर्ण करण्याकडे ग्रामव्यवस्थेचा कल होता. त्यातूनच खेडेगावात छोटे-मोठे उद्योग-व्यवसाय सुरू झाले होते. पुढे मुंबई बंदराची झपाट्याने वाढ झाली. मुंबईची लोकसंख्या वाढीस लागली. इंग्लडमधील औद्योगिक क्रांतीमुळे भारतातील कापसावर कापड गिरण्या सुरू झाल्या. मुंबईमध्ये १८५१ साली पहिली कापड गिरणी सुरू झाली. तत्पूर्वी महाराष्ट्रातील सर्व उद्योग व व्यवसाय कुटीरोद्योगाच्या स्वरूपात होते.

**व्यापार**

शिवकालीन गावगाड्यामध्ये व्यापाराची ठिकाणे म्हणून पेठांची निर्मिती करण्यात आली होती. या पेठेचा कारभार शेटे व महाजन यांच्याकडे सोपविण्यात आला होता. तथापि पेशवेकाळात व्यापाराचे अंतर्गत व्यापार व बाह्य व्यापार असे दोन भाग तयार झाले. बंगालमधून तांदूळ, रेशीम, लोकर, साखर, अफू, कागद, सुंठ, चिंच, ताग, गोणपाट, मोरचूद; गोव्यामधून पत्रा, कागद, नारळ, विड्याची पाने, सुपारी, केशर, मेणबत्ती, पारा, जस्त, तांबा तर हुबळीवरून मीठ, कथील यांची महाराष्ट्रात आवक होत असे. महाराष्ट्रातून कापड, डिंक, लाख, निरनिराळी धान्ये, मसाल्याचे पदार्थ, गुलाबपाणी, विविध अत्तरे बाहेरच्या देशात पाठविली जात असत.

थोडक्यात, १९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात महाराष्ट्रात विणकाम, लाकडी वस्तू, लोखंड, तांबे, पितळ, सोनेचांदी, गूळ असे अनेक व्यवसाय मोठ्या प्रमाणात केले जात होते. तसेच महाराष्ट्रातून इतर देशात डिंक, लाख, मसाल्याचे पदार्थ, अत्तरे इत्यादींची निर्यात केली जात होती.

## स्वयं अध्ययन प्रश्न - २

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१. शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत किती वेळा जमिनीची मोजणी करण्यात आली ?

२. मीठ तयार होणाऱ्या ठिकाणास काय म्हणतात ?

३. कोणते शहर कौशल्यपूर्ण सुतारकामासाठी प्रसिद्ध होते ?

४. पहिली कापड गिरणी कोठे सुरू झाली ?

५. पेठेचा कारभार कोणाकडे सोपविण्यात आला होता ?

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१. प्राचीन काळापासून महाराष्ट्रात ........... हाच प्रमुख व्यवसाय होता.

(अ) शेती (ब) गूळ (क) कापड (ड) लाकूड

२. शिवाजी महाराजांनी आरमार उभारणीसाठी ........ उद्योग सुरू केला.

(अ) चर्म (ब) मासेमारी (क) रेशीम (ड) जहाज बांधणी

३. ....... हे ठिकाण रेशीम कापडाच्या व्यवसायासाठी प्रसिद्ध होते.

(अ) चौल (ब) पैठण (क) भिवंडी (ड) सोलापूर

४. ....... हा अर्थव्यवस्थेचा पाया होता.

(अ) कसबा (ब) परगणा (क) खेडे (ड) पेठ

५. .... हे शहर लाकडी वस्तू तयार करण्याच्या व्यवसायासाठी प्रसिद्ध होते.

(अ) वसई (ब) येवला (क) अहमदनगर (ड) नागपूर

### १.२.३ शिक्षण

#### १) प्रस्तावना

१९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात भारतात वेद, धर्मशास्त्र, व्याकरण, वेदांत, तर्कशास्त्र, वैद्यकशास्त्र, ज्योतिष, न्याय यासारख्या विषयांचेच शिक्षण दिले जात होते. भारताप्रमाणे महाराष्ट्रातही शिक्षणाची हीच अवस्था होती. ब्रिटिशपूर्व काळात शिक्षण ही सरकारची जबाबदारी नाही अशी राज्यकर्त्यांची समजूत होती. तसेच शिक्षण हे सार्वत्रिक नव्हते. ते उच्चवर्णीय आणि श्रीमंत लोकांपुरतेच मर्यादित होते. शुद्र स्त्रिया आणि अतिशूद्र महार, मांग, चांभार यांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. शिक्षण पारंपरिक आणि धार्मिक स्वरूपाचे होते. विज्ञान, मानवी मूल्ये या गोष्टींचा शिक्षणात अंतर्भाव नव्हता. पेशवेकाळात शास्त्री व पंडितांनी खाजगी पाठशाळा सुरू केल्या. या पाठशाळा मंदिरे आणि चावडींमध्ये भरत असत. या शाळांचा भर पाठांतरावरच अधिक होता. तत्कालीन

राज्यकर्त्यांनी संपूर्ण समाजाला शिक्षण देण्याचा प्रयत्न केलेला नव्हता. फक्त श्रीमंत वर्गाचीच मुले येथे शिक्षण घेत होती. कनिष्ठवर्गाला किंवा जातीला शिक्षणाचा अधिकार नव्हता. व्यावहारिक उपयुक्ततेसाठी आवश्यक तेवढेच पारंपरिक शिक्षण याकाळात दिले जात होते.

## २) इंग्रजांचे शिक्षणविषयक धोरण

इंग्रजांनी भारतात व्यापाराबरोबरच राज्य विस्तार केला. राज्य विस्तार करीत असतानाच त्यांनी शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली. ईस्ट इंडिया कंपनीने इ.स. १८१३ च्या सनदी कायद्यानुसार भारतीयांच्या शिक्षणासाठी दरवर्षी एक लाख रूपये खर्च करावेत असे ठरविले. अशा प्रकारे ब्रिटिशांनी भारतात आधुनिक शिक्षणाचा प्रारंभ केला.

ईस्ट इंडिया कंपनीने भारतीयांना शिक्षण देण्यास सुरुवात करण्यामागे अनेक कारणे होती. त्यामध्ये - (१) ब्रिटिशांचा राज्यकारभार इंग्रजी भाषेत चालत होता. त्यांना कार्यालयात इंग्रजी भाषा जाणणाऱ्या लोकांची आवश्यकता होती. इंग्रजी शिक्षणामुळे ही गरज पूर्ण होणार होती. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीयांची कारकून म्हणून नेमणूक करता येणार होती. (२) इंग्लंडमध्ये तयार होणारा विविध प्रकारचा माल भारतातील सुशिक्षितवर्गामुळे भारतात अधिक खपण्याची शक्यता होती. (३) इंग्रजांना आपल्या सांस्कृतिक श्रेष्ठत्वाचे गोडवे गाणारा एक वर्ग तयार करावयाचा होता. (४) भारतीय समाजाला शिक्षणाद्वारे नवीन विषयांचे ज्ञान द्यायचे होते. (५) पाश्चात्य शिक्षण दिल्यामुळे भारतीय लोक इंग्रजी सत्तेचे समर्थक बनतील अशी आशा इंग्रजांना वाटत होती. इत्यादी कारणांचा समावेश होता.

## ३) एल्फिन्स्टनचा शिक्षणविषयक दृष्टिकोन

एल्फिन्स्टन हे मुंबई इलाख्याचे गव्हर्नर होते. इ.स. १८२७ मध्ये ते सेवानिवृत्त झाले. धार्मिक भावना न दुखविता शिक्षणाच्या माध्यमातून भारतीयांची प्रगती घडवून आणणे हा त्यांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन होता. मुंबई इलाख्यामध्ये कंपनीच्यावतीने निरनिराळ्या शाळा सुरू करण्यासाठी इ.स. १८१६ मध्ये मुंबई येथे 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटीची' स्थापना करण्यात आली. कंपनीच्या नियंत्रणाखालील प्रदेशात राहणाऱ्या गरीब लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे हा या संस्थेचा उद्देश होता. एल्फिन्स्टन हे या संस्थेचे अध्यक्ष व आधारस्तंभ होते.

एल्फिन्स्टन यांच्या प्रेरणेने इ.स. १८२० मध्ये मुंबई येथे 'दि नेटिव्ह स्कूल ॲण्ड स्कूल बुक कमिटीची' स्थापना करण्यात आली. शिक्षणासाठी निधी जमा करणे, शाळा चालविणे, ग्रंथनिर्मितीला चालना देणे ही या संस्थेची उद्दिष्टे होती. शिक्षणविषयक माहिती संकलित करण्यासाठी इ.स. १८२३ मध्ये 'लोकशिक्षण समिती' स्थापन करण्यात आली. या समितीने इ.स. १८३३ पर्यंत आग्रा व दिल्ली येथे पौर्वात्य महाविद्यालयाची स्थापना केली. तसेच बनारस, मद्रास, कलकत्ता येथील महाविद्यालयात सुधारणा केली. मुंबई येथे इ.स. १८२४ मध्ये सुरू झालेल्या एल्फिन्स्टन हायस्कूलचे इ.स. १८३४ मध्ये 'एल्फिन्स्टन महाविद्यालयात' रूपांतर करण्यात आले.

## ४) संस्कृत महाविद्यालय

इ.स. १८१८ मध्ये पुण्यातील पेशव्यांचे राज्य इंग्रजांनी नष्ट केले. त्यामुळे पुण्यातील ब्राम्हण वर्ग असंतुष्ट होऊन त्यांनी ब्रिटिश सत्तेला विरोध करू नये त्यासाठी त्यांना संतुष्ट करणे ब्रिटिशांना आवश्यक वाटू लागले. म्हणूनच एल्फिन्स्टनने मुत्सद्देगिरीने इ.स. १८२१ मध्ये पुणे येथे 'संस्कृत कॉलेज'ची स्थापना केली. वेद, वेदांगे, व्याकरण यासारख्या विषयांच्या शिक्षणाची तेथे सोय करण्यात आली. शिक्षणाचे माध्यम संस्कृत व मराठी ठेवण्यात आले. तथापि, विद्यार्थ्यांकडून योग्य प्रतिसाद न मिळाल्याने इ.स. १८५१ मध्ये या महाविद्यालयाला 'पुना कॉलेज' असे नाव देण्यात आले आणि शिक्षणाचे माध्यम संस्कृतऐवजी इंग्रजी करण्यात आले. इ.स. १८६१ मध्ये या कॉलेजची 'डेक्कन कॉलेज' व 'व्हर्नाक्युलर कॉलेज' अशी दोन महाविद्यालये निर्माण करण्यात आली. डेक्कन कॉलेजमधील शिक्षणाचे माध्यम इंग्रजी आणि व्हर्नाक्युलर कॉलेजमधील शिक्षणाचे माध्यम मराठी होते. परंतु या काळात इंग्रजी शिक्षणाला महत्त्व प्राप्त झाल्यामुळे व्हर्नाक्युलर कॉलेजला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. पुण्यातील डेक्कन कॉलेज मात्र महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे स्फूर्तिस्थान बनले.

## ५) शिक्षण मंडळाची स्थापना

ब्रिटिश शासनाने महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रसारात सुसूत्रता आणण्यासाठी इ.स. १८४० मध्ये मुंबई येथे 'बोर्ड ऑफ एज्युकेशनची' स्थापना केली. या मंडळात तीन सरकार नियुक्त व तीन बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे प्रतिनिधी होते. शाळा स्थापन करण्याचे, शाळांना मान्यता देण्याचे आणि शाळांची तपासणी करण्याचे अधिकार या मंडळाला देण्यात आले होते. या मंडळाने गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी नादारीचे तत्त्व स्वीकारले. प्रत्येक वर्गासाठी प्रथमच अभ्यासक्रम तयार केला. शिक्षणात भारतीय भाषांना उत्तेजन मिळावे या उद्देशाने मराठी व गुजराती भाषेमधून ग्रंथ निर्मिती केली. या शिक्षण मंडळाच्या कार्यामुळे महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार घडून आला. या मंडळाच्या प्रोत्साहनामुळे महाराष्ट्रात इंग्रजी व मराठी शाळांची संख्या वाढीस लागली.

## ६) चार्लस् वूडचा शिक्षणविषयक खलिता

भारतात ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रयत्नामुळे शिक्षणाला गती मिळाली. शिक्षण क्षेत्रात झालेल्या या प्रगतीचे सर्वेक्षण करून शैक्षणिक पुनर्रचनेसाठी एक नवे धोरण आखणे कंपनी सरकारला गरजेचे वाटू लागले. ही गरज चार्लस् वूडच्या शिक्षणविषयक खलित्याने पूर्ण केली. तत्पूर्वी शिक्षण क्षेत्रात लॉर्ड मेकॉले यांनी झिरपण्याचा सिद्धांत मांडला होता. समाजातील काहीना प्रथम उच्च शिक्षण द्यावे व नंतर ते समाजाच्या खालच्या थरापर्यंत झिरपत जाईल अशी या सिद्धांतामागील भूमिका होती. तथापि, सर चार्लस् वूड यांच्या खलित्याने ती योजना मागे पडली. ईस्ट इंडिया कंपनीचे अध्यक्ष सर चार्लस् वूड यांनी १९ जुलै १८५४ रोजी भारतात शिक्षणविषयक धोरणाचा खलिता पाठविला. त्यामध्ये त्यांनी भारतीय शिक्षण पद्धतीविषयी पुढील सूचना केल्या होत्या.

(१) शासनाने आपल्या अग्रक्रमाच्या कार्यात शिक्षणाचा समावेश करावा. (२) भारतातील शिक्षण धर्मातीत असावे. (३) शिक्षणाचे माध्यम म्हणून देशी भाषांना प्रोत्साहन देण्यात यावे. (४) कनिष्ठ पातळीपासून उच्च पातळीपर्यंतच्या शिक्षणात सुसंवाद असावा. (५) प्रांतात प्राथमिक व माध्यमिक शाळा असाव्यात. (६) खाजगी शाळांना सरकारने अनुदान द्यावे. (७) पदवीपर्यंतचे शिक्षण महाविद्यालयात द्यावे व महाविद्यालये विद्यापीठास संलग्न असावीत. (८) उच्च शिक्षणावर नियंत्रण ठेवण्यासाठी भारतात विद्यापीठांची स्थापना करावी. (९) शिक्षणाच्या व्यवस्थेत व कार्यात सुसूत्रता येण्यासाठी व शाळांची तपासणी करण्यासाठी एक स्वतंत्र शिक्षण खाते असावे.

सर चार्लस् वूडच्या खलित्यामध्ये मांडलेल्या सूचनांचा भारतात लगेचच स्वीकार करण्यात आला. त्यामुळे लॉर्ड मेकॉलेचा झिरपण्याचा सिद्धांत मागे पडला आणि भारतातील शिक्षणव्यवस्थेत सुसूत्रता येऊन शैक्षणिक प्रगतीला चांगलीच गती आली.

## ७) हंटर आयोग

सर चार्लस् वूडच्या खलित्याचा स्वीकार केल्यानंतर शिक्षणाच्या क्षेत्रात झालेल्या प्रगतीची पाहणी करण्यासाठी व पुढील काळात आवश्यक त्या सुधारणा सुचविण्यासाठी लॉर्ड रिपन याने इ.स. १८८२ मध्ये सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एका आयोगाची नेमणूक केली. या आयोगाने अनेक शिक्षण संस्थांना भेटी दिल्या. शैक्षणिक कार्याची पाहणी केली व पुढील शिफारशी शासनाला सादर केल्या.

(१) खाजगी शिक्षण संस्थांना उत्तेजन द्यावे. (२) महाविद्यालयांना आर्थिक साहाय्य करावे. (३) प्राथमिक शिक्षण स्थानिक स्वराज्य संस्थाकडे द्यावे. (४) शासकीय शाळा खाजगी शिक्षण संस्थाकडे सोपवाव्यात. (५) लोकशिक्षणाकडे विशेष लक्ष द्यावे. (६) प्राथमिक शिक्षणावर सरकारने अधिक लक्ष द्यावे. (७) सरकारने आपल्या उत्पन्नाचा काही भाग दरवर्षी शिक्षणासाठी बाजूला काढून ठेवावा.

आयोगाच्या या शिफारशींमुळे भावी काळात प्राथमिक शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्यात आले. परिणामी शिक्षणाच्या प्रगतीला चालना मिळाली.

## ८) सारांश

महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात एल्फिन्स्टनचा मोठा वाटा आहे. तो स्वत: उत्तम प्रशासक, विद्या व कलाप्रेमी असल्याने त्याने महाराष्ट्रातील शिक्षणाला योग्य दिशा व गती दिली. महाराष्ट्रात ठिकठिकाणी शिक्षण संस्थांची स्थापना करून सर्व प्रकारच्या शिक्षणाची सोय केली. इंग्रजांनी विशिष्ठ हेतूने शिक्षणाला चालना दिली असली तरी त्याचे पुढील दूरगामी परिणाम झाले. (१) भारतीयांना पाश्चिमात्य व भौतिक शिक्षणाची संधी मिळाली. (२) समाजातील वरिष्ठ वर्गाचे श्रेष्ठत्व नष्ट झाले.

(३) कोणत्याही वर्णाच्या व जातीच्या व्यक्तीला शिक्षणाची संधी मिळाली. (४) ब्रिटिशांना आवश्यक असलेला कारकूनवर्ग उपलब्ध झाला. (५) उदारमतवादी चळवळीला चालना मिळाली. (६) भारतात राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली. यातूनच पुढील काळात भारताची स्वातंत्र्य चळवळीकडे वाटचाल सुरू झाली.

## स्वयं अध्ययन प्रश्न - ३

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१. 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी' ची स्थापना कोठे करण्यात आली ?

२. पौर्वात्य महाविद्यालयाची स्थापना कोठे करण्यात आली ?

३. 'बोर्ड ऑफ एज्युकेशनची स्थापना' कोणत्या साली झाली ?

४. शिक्षणक्षेत्रात 'झिरपण्याचा सिद्धांत' कोणी मांडला ?

५. भारतात शिक्षणविषयक धोरणाचा खलिता कोणी पाठविला ?

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१. ......... हे मुंबई इलाख्याचे गव्हर्नर होते.

(अ) एल्फिन्स्टन (ब) सर चार्लस् वूड (क) लॉर्ड रिपन (ड) सर विल्यम हंटर

२. ...... येथे 'संस्कृत कॉलेज'ची स्थापना करण्यात आली.

(अ) मुंबई (ब) पुणे (क) दिल्ली (ड) आग्रा

३. ......... साली डेक्कन कॉलेजची स्थापना करण्यात आली.

(अ) १८६१ (ब) १८५१ (क) १८२१ (ड) १८३३

४. ....... यांच्या अध्यक्षतेखाली हंटर आयोगाची नेमणूक केली.

(अ) लॉर्ड रिपन (ब) सर विल्यम हंटर

(क) एल्फिन्स्टन (ड) सर चार्लस् वूड

५. ......... कॉलेजला 'पुना कॉलेज' असे नाव देण्यात आले.

(अ) डेक्कन (ब) व्हर्नाक्युलर (क) संस्कृत (ड) एल्फिन्स्टन

## १.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जिनगर | - | चित्रे, बाहुल्या इत्यादी तयार करणारी जात |
| २. | अस्पृश्यता | - | अस्पृश्य जातीशी संबंध न ठेवणे, त्यांचा विटाळ मानणे |
| ३. | कुणबी | - | शेतीची कामे करणाऱ्या जातींपैकी एक, शेतकरी |
| ४. | कुणबीण | - | कुणब्याची बायको |
| ५. | बटीक | - | वेश्या व्यवसाय करणारी स्त्री |
| ६. | दास | - | गुलाम, लहान-सहान कामे करणारा चाकर |
| ७. | मीठागर | - | मीठ तयार होणारे ठिकाण |
| ८. | बलुते | - | गावकऱ्यांच्या गरजा भागविण्यासाठी बलुतेदारांना कुणब्यांकडून मेहनताना म्हणून मिळणारा पिकांचा वंशपरंपरा वाटा |
| ९. | बलुतेदार | - | बलुत्यावर हक्क असलेला गावचा वतनदार |
| १०. | अलुतेदार | - | बलुत्याचे खालचे बारा कामगार; तेली, तांबोळी, माळी, सोनार इत्यादी (यांना शेतकऱ्यांकडून धान्य मिळते पण त्याचे प्रमाण ठरावीक नाही) गाव कामगार |
| ११. | केशवपण | - | पतीच्या निधनानंतर महिलेच्या डोक्यावरील केस कापण्याची (मुंडण करण्याची) पद्धती |
| १२. | मेणा | - | चारी बाजूंनी झाकलेली पालखी |
| १३. | बाजूबंद | - | दंडाला बांधायचा स्त्रियांचा एक दागिना |
| १४. | मिनाकारी | - | मिन्याचे काम, काचेचा मुलामा देण्याचे काम |
| १५. | मोरचूद | - | एक विषारी खनिज पदार्थ |
| १६. | मुंडावळ | - | वधूच्या व वराच्या डोक्याला बांधायची फुलांची (मोत्यांची) माळ |
| १७. | धडूत | - | रोज नेसण्यासाठी उपयोगी वस्त्र |
| १८. | चौकडा | - | पुरूषांचे एक कर्णभूषण |

## १.४ सारांश

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात १९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीच्या अभ्यासाला विशेष महत्त्व आहे. जातिव्यवस्था, अस्पृश्यता, गुलामगिरी आणि स्त्रियांची हलाखीची स्थिती ही तत्कालीन समाज व्यवस्थेची ठळक वैशिष्ट्ये होत. जातिव्यवस्थेत अनेक जाती, पोटजाती, इतर शूद्र जाती निर्माण झालेल्या होत्या. अस्पृश्यता आणि गुलामगिरीची प्रथा मोठ्या प्रमाणात वाढीस लागलेली होती. बालविवाह, सती पद्धती आणि केशवपण यामुळे स्त्रियांची स्थिती अतिशय दयनीय, असहाय व निराधार झाली होती.

प्राचीन काळापासून शेती हाच महाराष्ट्राच्या आर्थिक स्थितीचा केंद्रबिंदू राहिलेला आहे. लहरी पाऊस, परकीय आक्रमणे आणि राज्यकर्त्यांची अनास्था यामुळे शेतकऱ्यांचे जीवन आर्थिकदृष्ट्या हलाखीचे झाले होते. मात्र जहाज बांधणी, मीठ निर्मिती, मासेमारी, चर्म व रेशीम उद्योग यासारखे काही उद्योग तसेच कापड, लाकडी वस्तू, लोखंड, तांबे, पितळ, सोने-चांदी, गूळ व्यवसाय सुरू झाले. विविध वस्तूंचा व्यापार वाढला.

१९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील महाराष्ट्रातील शिक्षण अत्यंत पारंपरिक आणि धार्मिक स्वरूपाचे तसेच उच्चवर्गीय लोकांपुरतेच मर्यादित होते. मात्र ब्रिटिशांनी भारतात आधुनिक शिक्षणाचा प्रारंभ केला. त्यांनी मुंबई इलाख्यामध्ये अनेक शिक्षण संस्था सुरू केल्या. शिक्षण मंडळाची स्थापना करून मराठी व इंग्रजी शाळांची संख्या वाढविली. एल्फिन्स्टन, सर चार्लस् वूड, सर विल्यम हंटर यांनी शिक्षण प्रसाराचे महत्त्वाचे काम केले. त्यामुळे समाजातील सर्व घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येता आले. महाराष्ट्रात प्रबोधनाचे युग सुरू झाले. पुढे पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या सुधारकांनी नवे विचार समाजात रुजविण्यास सुरुवात केली. यातून राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागून स्वातंत्र्य प्रेरणा निर्माण झाली. म्हणून १९ व्या शतकाला महाराष्ट्राच्या इतिहासात 'नव्या युगाची पहाट' असे संबोधिले जाते.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न - १**

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१) ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र २) ९६ ३) मनुस्मृती

४) पोरगे ५) लॉर्ड बेटिंग

**ब)** **योग्य पर्याय निवडा.**

| | | |
|---|---|---|
| १) १७ व्या | २) जातिव्यवस्था | ३) १८१८ |
| ४) अस्पृश्यता | ५) कुणबीण | |

**स्वयं अध्ययन प्रश्न - २**

**अ)** **एका वाक्यात उत्तर द्या.**

| | | |
|---|---|---|
| १) तीन | २) मीठागर | ३) अहमदनगर |
| ४) मुंबई | ५) शेटे व महाजन | |

**ब)** **योग्य पर्याय निवडा.**

| | | |
|---|---|---|
| १) शेती | २) जहाज बांधणी | ३) पैठण |
| ४) खेडे | ५) वसई | |

**स्वयं अध्ययन प्रश्न - ३**

**अ)** **एका वाक्यात उत्तर द्या.**

| | | |
|---|---|---|
| १) मुंबई | २) आग्रा व दिल्ली | ३) १८४० |
| ४) लॉर्ड मेकॉले | ५) सर चार्लस् वूड | |

**ब)** **योग्य पर्याय निवडा.**

| | | |
|---|---|---|
| १) एल्फिन्स्टन | २) पुणे | ३) १८६१ |
| ४) सर विल्यम हंटर | ५) संस्कृत | |

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ)** **दीर्घोत्तरी प्रश्न**

१. १९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील महाराष्ट्राची सामाजिक स्थिती विशद करा.

२. १९ व्या शतकाच्या सुरुवातीची महाराष्ट्रातील आर्थिक स्थिती स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१) जातिव्यवस्था
२) अस्पृश्यता
३) गुलामगिरी
४) स्त्रियांची स्थिती
५) शेती
६) उद्योग
७) व्यवसाय व व्यापार
८) शिक्षण

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. आचार्य जावडेकर श. द. : आधुनिक भारत
कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे (१९३८)

२. कोलारकर श. गो. : आधुनिक भारत
श्री मंगेश प्रकाशन, नागपूर (२००४)

३. फडके य. दि. : विसाव्या शतकातील महाराष्ट्र
के सागर प्रकाशन, पुणे (२००५)

४. सरदेसाई बी. एन. : आधुनिक महाराष्ट्र
फडके प्रकाशन, कोल्हापूर (२०००)

५. भिडे जी. एल.; एन. डी. पाटील : महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास
फडके प्रकाशन, कोल्हापूर (१९९७)

६. सरदार गं. बा. : महाराष्ट्र जीवन - खंड १ व २
जोशी व लोखंडे प्रकाशन, पुणे (१९६०)

७. Mahajan V. D. : British Rule in India and After
S. Chand and Company
New Delhi (1971)

# घटक : २

# ब्रिटिश धोरण आणि प्रशासकीय बदल

२.० उद्दिष्टे
२.१ प्रास्ताविक
२.२ विषय विवेचन
२.२.१. नवीन जमीन धारणा : रयतवारी पध्दती
२.२.२. पाश्चात्य कायदेपध्दतीची महाराष्ट्रातील सुरुवात
२.२.३. पाश्चात्य शिक्षणाची सुरुवात
२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
२.४ सारांश
२.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे
२.६ सरावासाठी स्वाध्याय
२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.०. उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यावर आपल्याला -

- ब्रिटिशांची नवीन जमीन धारणा पध्दती व त्याचे गुण-दोष समजतील
- पाश्चात्य कायदाव्यवस्थेची सुरुवात कधी व कशी झाली याचे आकलन होईल.
- पाश्चात्य शिक्षणाची सुरुवात कधी झाली व यामुळे कोणेकोणते बदल झाले हे समजेल.

## २.१. प्रास्ताविक

भारतात १७५७ च्या प्लासीच्या लढाईने ब्रिटिशांनी आपल्या सत्तेचा पाया घातला, तर १७६४ च्या बक्सारच्या लढाईने भारतातील आपली सत्ता मजबूत केली. महाराष्ट्रात प्रामुख्याने ब्रिटिशांची खरी सत्ता इ.स.१८१८ मध्ये पेशव्यांच्या अस्तानंतर सुरू झाली. तत्पूर्वी पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्यासाठी ब्रिटनची राणी एलिझाबेथ हिने ईस्ट इंडिया कंपनीस व्यापारी सनद बहाल केली. तेव्हापासून ब्रिटिशांचा भारताशी संबंध होता. कंपनीचा मूळ हेतू म्हणजे भारताशी व्यापार करून अधिकाधिक फायदा मिळविणे हा होता. कालांतराने कंपनीने भारतातील राजकीय अस्थिरतेचा व दुर्बलतेचा फायदा घेऊन येथील शासनव्यवस्थेत हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली व हळूहळू संपूर्ण देशावर आपली अधिसत्ता स्थापन केली. ब्रिटिश सरकारने महाराष्ट्रात जमीन महसूल पध्दती, कायदे व्यवस्था व शिक्षण व्यवस्था कशी राबविली हे पाहणे गरजेचे ठरते.

प्रस्तुत प्रकरणात आपण ब्रिटिश सत्तेचे काही पैलू महाराष्ट्राच्या संदर्भात पाहणार आहोत. महाराष्ट्रामध्ये ब्रिटिशांनी आपली सत्ता कशी चालविली व महाराष्ट्राचा गव्हर्नर लॉर्ड एल्फिन्स्टनने येथील प्रशासनाला कसे वळण लावले यावरून पूर्वीची प्रशासन पध्दती व ब्रिटिश प्रशासन पध्दती यातील फरक आपल्या लक्षात येईल.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ नवीन जमीन धारणा : रयतवारी पध्दती

भारतात व्यक्ती व जमीन यांचे नाते वेगवेगळया परिस्थितीमध्ये वेगवेगळे आहे. आजसुध्दा जवळजवळ ८० टक्के समाज शेतीवर अवलंबून आहे. भारतातील भौगोलिक परिस्थिती, समाजरचना व ग्रामीण अर्थव्यवस्था यामुळे व्यक्ती आणि जमीन यांचे नाते ठिकठिकाणी वेगळे दिसते. पुढे १९ व्या शतकाच्या सुरुवातीला ब्रिटिशांनी आपले आर्थिक धोरण येथील जमीनीच्या धारणा पध्दतीनुसार बदलले.

### १) रयतवारी पध्दती

ब्रिटिशांनी भारतात स्थिर झाल्यानंतर बंगालमध्ये कायमधारा पध्दत, माळव्यात महालवारी पध्दत व मद्रास इलाख्यात रयतवारी पध्दत लागू केली होती. कायमधारा पध्दत म्हणजे सरकारने जमीनदाराला कायमचा महसूल ठरवून देणे. यामध्ये जमीनदार व सरकार यांचा संबंध येत असे. रयतेला काही स्थान नव्हते. महालवारीमध्ये विशिष्ट व्यक्तीचा मालकी हक्क असे. यामध्ये खेडेगावातील

जमीन त्याठिकाणी राहणाऱ्या सर्वांच्या सामायिक मालकीची असे. म्हणजे या पध्दतीत संपूर्ण गाव व सरकार यांचा संबंध असे. यामध्येही रयतेचा संबंध येत नसे. रयतवारीमध्ये मात्र व्यक्ती व सरकार यांचा संबंध असे. ही पध्दत महाराष्ट्रात एलूफिन्स्टनने मराठयांकडून जिंकलेल्या प्रदेशात लागू केली.

**रयतवारी पध्दती का ?**

जेरोमी बेन्थॅम या रयतवारी पध्दतीचा पुरस्कार करणाऱ्या ब्रिटिश अधिकाऱ्याचा प्रभाव मोठया प्रमाणात होता. त्याच्या मते, प्रशासनात वैयक्तिक सहभाग, वैयक्तिक जबाबदारी व चांगली नोकरशाही यांना महत्त्व आहे. भारतामध्ये बेन्थॅमवादीचा संबंध जमीन महसूलाशी आला. भारत हा शेतीप्रधान देश असल्याने व त्यावेळी उत्पन्नाची इतर साधने नगन्य असल्याने शेतसारा ही राज्याच्या उत्पन्नाची महत्त्वपूर्ण बाब होती. तेव्हा हा शेतसारा कसा व किती गोळा करावयाचा ही समस्या होती. यावर चर्चा होऊन इंग्लंडमध्ये मिल्ल व भारतात सर थॉमस मन्रो यांनी रयतवारीचा पर्याय मान्य केला. मिल्लच्या मते रयतवारीमुळे तीन महत्त्वाच्या क्षेत्रात राष्ट्राची प्रगती होते. १.कर पध्दती २.राज्याची उभारणी कोणत्या तत्त्वावर केली आहे व ३.कशा प्रकारची न्यायदान व्यवस्था निर्माण केली आहे.या सर्व बाबींचे समाधानकारक उत्तर रयतवारी पध्दतीने मिळण्यासारखे असल्याने रयतवारी पध्दत महाराष्ट्रात सुरू करण्याचे ब्रिटिशांनी ठरविले.

## २) रयतवारी पध्दतीचे गुण

१. जमीन कसणारे व सरकार याच्यामध्ये रयतवारीमुळे प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाला. जमीनदार व अन्य मध्यस्थांचे महत्त्व संपले.

२. जमीनीवर मालकी असणाऱ्यांकडेच जमीनीची मशागत गेल्यामुळे जमीनीची उत्पादन क्षमता वाढली.

३. शेतीचा अथवा कृषी व्यवसायाचा विकास घडवून आणणे शेतकऱ्याला शक्य झाले.

४. समाजस्वास्थ्याच्यादृष्टीने रयतवारीचा वर्ग उपयुक्त ठरला. छोटे छोटे शेतकरीच स्वतःच शेती करत असल्यामुळे बेकारी, वर्ग कलह व जुलूम हे दोष कमी झाले.

५. सरकारलासुध्दा शेतीची प्रगती घडवून आणण्यासाठी योग्य धोरण आखणे व त्याची अंमलबजावणी करणे सोयीचे झाले.

६. डॉ. ताराचंद यांच्या मते, रयतवारीने शेतकऱ्यांची स्थिती बदलली त्याच्या व्यक्तिमत्त्वात शेतमजूर, शेतकरी व जमीनदार यांची वैशिष्ट्ये निर्माण झाली. ही पध्दत शेत कसणारा व सरकार या दोघांनाही फायदेशीर ठरली.

७. शेतकऱ्यांकडे जमीनीची मालकी आल्याने तो आपल्या शेतीमध्ये नवे प्रयोग करण्यास व जादा जमीन मशागतीखाली आणण्यास प्रवृत्त झाला. त्याच्या शेतीचा दर्जा वाढला.

रयतवारी पध्दतीचे गुणगौरव करताना न्या. रानडे म्हणतात की,''रयतवारी पध्दत कायम करावी व शेतीतील उत्पादनापैकी किती भाग शेतसारा घ्यावयाचा ते निश्चित करावे. हाच शेतीच्या प्रश्नावर उपाय आहे. मुंबई प्रांतात रयतवारी पध्दत दीर्घकाळ चालू असून ग्रामीण समाजाच्या लोकशाही घडणीस तिच योग्य आहे.''

## ३) रयतवारी पध्दतीचे दोष

१. ग्रामीण समाजात पूर्वापार आढळणारी ऐक्याची भावना नष्ट झाली.

२. शेतसारा वसुलीसाठी स्वतंत्र महसूल विभाग निर्माण करावा लागला. त्यामुळे सरकारचा खर्च वाढला.

३. सरकारी अधिकारी त्यांच्या इच्छेनुसार शेतसारा निश्चित करीत. त्यामुळे शेतकऱ्यावर अन्याय होण्याची शक्यता वाढली.

४. या पध्दतीत जमीन महसूलाचे प्रमाण एक तृतीयांश पासून ते एक व्दितीयांशपर्यंत होते. इतका प्रचंड शेतसारा संस्थानिकसुध्दा द्यायला जनतेकडून वसूल करीत नव्हते.असे स्वतः इंग्रज अधिकाऱ्यानीच लिहून ठेवले आहे.

५. या पध्दतीत जमीनीचा मालक स्वतः जमीन न कसता तो दुसऱ्याकडून जमीन कसून घेत असे. या पध्दतीमुळे जमीन कसणाऱ्या लोकांचा एक वर्ग आपोआपच तयार झाला.

६. रयतवारीमध्ये जमीन महसूलाच्या रक्कमेत तीस वर्षांनी बदल केला जात असे. दरम्यानच्या काळात जर एखाद्याने अधिक गुंतवणूक करून जमीनीची उत्पादकता वाढविली तर त्याच्याबाबतीत जमीन महसूलाची आकारणी अधिक दराने केली जाण्याची भीती त्याला वाटत असे. त्यामुळे जमीनीमध्ये कायमस्वरूपाच्या सुधारणा करण्याकडे रयतेचा फारसा कल नव्हता. त्याचप्रमाणे सरकारचे उत्पन्न बुडत होते.

७. पूर्वी जमीन महसूल गोळा करणे ही रयत, पाटील, कुलकर्णी यांची संयुक्त जबाबदारी असे. आता तसे नसल्यामुळे कोणी कोणाला जुमानत नव्हते.

## ४) रयतवारी पध्दतीचे परिणाम

१. या पध्दतीमुळे जमीनीची मालकी, जमीन कसण्याची पध्दत, खंड घेण्याची पध्दत, मालक व कुळ यांचे संबंध आणि समाजातील विविध घटकांचे एकमेकांशी असलेले कायदेशीर आणि सामाजिक संबंध पूर्णपणे बदलले गेले.

२. खेडेगावची पारंपरिक सामाजिक आणि आर्थिक व्यवस्था नष्ट झाली.

३. खेडयातील सामाजिक व आर्थिक ऐक्य नष्ट झाले.

४. खेडयातील समाजाचे विघटन झाले.

५. जमीनीची खरेदी-विक्री वाढली. जमीन आपल्या मालकीची असणे हा प्रकार प्रतिष्ठेचा मानला जाऊ लागला. त्यामुळे जमीनीच्या खरेदी-विक्रीस महत्त्व आले.

**स्वयं अध्ययन प्रश्न - १**

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१. कोणत्या लढाईने ब्रिटिशांनी भारतात आपल्या सत्तेचा पाया घातला ?

२. रयतवारी पद्धत म्हणजे काय ?

३. रयतवारी पद्धतीमुळे कोणकोणत्या क्षेत्रांत राष्ट्राची प्रगती होते ?

४. कायमधारा पद्धत म्हणजे काय ?

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१. भारतात रयतवारी पध्दत ............ यांनी सुरू केली.

(अ) लॉर्ड कॉर्नवालिस (ब) वॉरन हेस्टिंग्ज (क) लॉर्ड वेलस्ली (ड) थॉमस मन्रो

२. रयतवारी पध्दत ............. साली लागू केली.

(अ) १८२५ (ब) १७३५ (क) १८२७ (ड) १८५७

३. रयतवारीमध्ये जमीन महसूलाच्या रक्कमेत ........ वर्षांनी बदल केला जात असे.

(अ) १० (ब) १५ (क) २० (ड) ३०

४. रयतवारीमुळे ग्रामीण भागातील ......... ची भावना नष्ट झाली.

(अ) संघर्ष (ब) ऐक्य (क) पक्षपात (ड) राग

## २.२.२ पाश्चात्य कायदेपध्दतीची महाराष्ट्रातील सुरुवात

मराठयांचा पराभव केल्यानंतर महाराष्ट्राबरोबरच संपूर्ण भारतात ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित झाली. महाराष्ट्रात एलूफिन्स्टनची गव्हर्नर म्हणून नेमणूक झाल्यानंतर त्याने महाराष्ट्रातील न्यायदान व्यवस्थेकडे लक्ष दिले. न्यायदान हा त्याच्या जिव्हाळयाचा विषय होता. तत्कालीन प्रचलित न्यायव्यवस्थेत सुसुत्रता नव्हती. समाजातील प्रत्येक घटकाची धर्मसूत्रे, संकेत, परंपरा, वेगळया होत्या. त्यानुसार न्याय दिला जात असे. गुन्हा, शिक्षा व न्याय याबाबत समान धोरण नव्हते. तरीही मराठयांच्या न्यायव्यवस्थेत फारसा बदल करण्यास एलफिन्स्टन तयार नव्हता. कारण (१) ब्रिटिशांना या देशाचे रीतीरिवाज, चालरीती घाईगर्दीने समजण्यासारख्या नव्हत्या.(२) बदल करून महाराष्ट्रातील राजकीय वातावरण ब्रिटिशांविरूध्द जाऊ नये अशी खबरदारी त्याला घ्यावयाची होती.

### १) एल्फिन्स्टनची कायदेसंहिता

### १८२७ बॉम्बे रेग्युलेशन

महाराष्ट्रातील प्रशासन चालवित असताना एलूफिन्स्टनच्या लक्षात आले की, भारतात हिंदूचे एकच एक असे काय़द्याचे पुस्तक नाही. प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे कायदे आहेत. हे कायदे अंधविश्वास, परंपरा व चालरीतीवर आधारित आहेत. त्याला धर्मशास्त्र म्हणतात. त्याची व्याप्ती ब्राम्हणापुरती मर्यादित आहे. जाती-जातीचे कायदे व वहिवाटी निरनिराळया आहेत. अशास्थितीत धर्मशास्त्र व वहिवाट यांचा आधार घेऊन जनतेसाठी दिवाणी कायद्याचे नवीन पुस्तक तयार करावे असे एलूफिन्स्टनला वाटले. त्यानुसार त्याने १८२० साली बॅबिंगटन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीच्या सेक्रेटरीपदी स्टील याची नियुक्ती केली. तत्पूर्वी त्याची मूळ कल्पना गुजरातमध्ये सुरू करण्यात आली होती. परंतु याची संपूर्ण जबाबदारी कलेक्टरला देण्यात आली होती. एलूफिन्स्टनने आपल्या नव्या समितीमधून कलेक्टरला वगळले. त्याच्याकडून फक्त सूचना मागविण्यात येऊ लागल्या. या समितीला पुढीलबाबतीत अधिकार कक्षा ठरवून देण्यात आल्या.

१. या समितीने शास्त्री, पंडित, वेगवेगळया जातींच्या, गटांच्या प्रमुखाशी चर्चा करावी. ज्यांना कायदा माहीत आहे अशा व्यक्तीशी संपर्क साधावा.

२. जुन्या मराठी राजवटीमधील खटल्यांची कागदपत्रे तपासून पहावीत व कोणत्याही प्रकारची घाईगर्दी न करता पुरावा गोळा करावा.

३. रयतेच्या स्वाभिमानाला धक्का पोहोचणार नाही, त्यांच्या ठिकाणी ब्रिटिशांबद्दल चीड निर्माण होणार नाही याचा विचार करावा. रयतेबद्दल आपल्या मनात सहानुभूती आहे. अशा प्रकारचे वातावरण निर्माण करावे. असे केले तर ब्रिटिश कायदे प्रशासन व संस्था या देशात रूजू होतील याचा गांभीर्याने विचार करावा.

या समितीमध्ये असलेले चार्लस नॉरिस यांनी कायदा (रूं) व विधिनियम (त्महनसंजपवद) या शब्दाच्या वापराबाबत गफलत लक्षात आणून दिली. यावर चर्चा होऊन गव्हर्नरच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य सी. सी. पेंडरगास्ट यांनी या शब्दाचे अर्थ स्पष्ट केले. त्यांच्या मते कायदा या संकल्पनेचा संबंध मूलभूत विषयाशी येतो. उदा. खाजगी मालमत्तेचा प्रश्न, सुधारित नागरी जीवनाशी निगडित प्रश्नाची उकल करण्यासाठी केलेली उपाययोजना इत्यादी तर विधिनियम (त्महनसंजपवद) म्हणजे कोर्टाची अधिकार कक्षा व कामे यांची चौकट ठरवून देणारी नियमावली होय.या समितीने आपला कच्चा मसुदा तयार केला. त्यालाच 'बॉम्बे रेग्युलेशन १८२७' असे म्हणतात. याला कायद्याचे स्वरूप देण्यात आले. ती म्हणजेच १८२७ ची कायदेसंहिता होय.

## १८२७ ची कायदेसंहिता

यामध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात आला.

१. पंचायत पध्दतीने दिवाणी खटले चालवावेत. अशा खटल्यामध्ये वादी - प्रतिवादींनी एकमताने पंचायतीच्या हस्तक्षेपास मान्यता देणे आवश्यक ठरविण्यात आले.

२. वादी - प्रतिवादीच्या संमतीनेच पंचाची नेमणूक करावी.

३. पाटील, कुलकर्णी यांनी पंचायतीवर काम करावे.

४. पंचायत आपला निवाडा तोंडी किंवा लेखी स्वरूपात देऊ शकेल.

५. पंचायतीच्या निवाडयावर अपील करावयाचे असेल तर फक्त लेखी निवाडयाचाच विचार केला जाईल.

६. पंचायतीमध्ये भ्रष्टाचार किंवा पक्षपाती निर्णय होऊ नये म्हणून वादी - प्रतिवादीना अपील करण्याचा हक्क देण्यात आला.

७. कोर्टाची १) सद्र अदालत, २) जिल्हा अदालत व सर्वात कनिष्ठ कोर्ट, आणि ३) नेटिव्ह कमिशनर अशी त्रिस्तरीय रचना करण्यात आली.

८. सद्र अदालतचे १) सद्र दिवाणी अदालत २) सद्र फौजदारी अदालत असे विभाग केले.

९. जिल्हास्तरावर अशीच दिवाणी व फौजदारी तर खालच्या कोर्टातून जिल्हा अदालतमध्ये अपील करण्याची तरतूद केली.

१०. जिल्हा अदालतीची कार्ये १) कनिष्ठ अदालतीवर लक्ष ठेवणे २) कामात सुसूत्रता आणणे ३) कनिष्ठ कोर्टाला मार्गदर्शन करणे ४) कनिष्ठ न्यायाधीशाची नेमणूक करणे.

११. कनिष्ठ न्यायालयात फक्त नेटिवांचे रू.५०० पेक्षा कमी रक्कमेचे खटले चालवावेत असे ठरले.

## २) पोलिस यंत्रणेची उभारणी

ब्रिटिशपूर्व काळात महाराष्ट्रात म्हणजे पेशवाई संपुष्टात येण्यापूर्वी दंगे करणे, चोरी करणे, दरोडे टाकणे इत्यादी प्रकार सुरू झाले होते. यामध्ये पुढे वाढ होत गेली. त्यामुळे सामान्य जनतेचे जीवन धोक्यात आले होते. याकरिता एलूफिन्स्टनने नागरी संरक्षणासाठी पोलीस यंत्रणेची उभारणी केली. जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली एक पोलिस अधिकारी नियुक्त करण्यात आला. त्याच्यावर जिल्हयातील शांतता व सुरक्षितता याची जबाबदारी देण्यात आली. इ.स. १८६१ पासून जिल्हावार स्वतंत्र पोलिस अधिकाऱ्यांची नेमणूक करून त्याच्याकडे संरक्षणाची जबाबदारी देण्यात आली. या अधिकाऱ्याने काही अंतरावर पोलिस चौक्या व पहारे सुरू केले. या पोलिस दलाची कामे पुढीलप्रमाणे होती.

१. नागरिकांच्या जीवित व संपत्तीचे रक्षण करणे.

२. खेडयातील पारंपरिक रखवालदारावर नियंत्रण ठेवणे.

३. दरोडेखोर, लुटारू व चोरांचा नायनाट करणे.

ब्रिटिश सरकारने शांतता व सुव्यवस्था निर्माण केल्यामुळे शेती, व्यापार व उद्योगधंद्याच्या विकासाला चालना मिळाली. महाराष्ट्रातील जनतेला शांतता व सुराज्यव्यवस्थेचे जीवन उपभोगता आले. त्यामुळे समाजात आत्मविश्वास निर्माण झाला. कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंत कोठेही काठीला सोने बांधून गेले तरी काही भीती नाही असा विश्वास जनतेत निर्माण झाला.

## ३) कारागृहाची निर्मिती

गुन्हेगारांना पकडल्यानंतर त्यांना डांबण्यासाठी कारागृहाची निर्मिती करण्यात आली. यामध्ये मध्यवर्ती कारागृह व जिल्हा कारागृह असे दोन विभाग केले. दीर्घकाळ शिक्षा झालेले गुन्हेगार मध्यवर्ती कारागृहात तर अल्प काळाची शिक्षा झालेले जिल्हा कारागृहात असत. मुंबई इलाखा व इतर प्रांतासाठी त्याविषयी कायदे केले गेले. पुढे १८९४ मध्ये संपूर्ण भारतासाठी बंदीशाळा कायदा केला. या कायद्यानुसार स्वतंत्र कारागृह अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली. कारागृहामध्ये अनेक जाचक बंधने असत. कारण गुन्हेगाराने पुन्हा गुन्हा करण्यास प्रवृत्त होऊ नये ही यापाठीमागची अपेक्षा होती.

## ४) शस्त्रास्त्र नियंत्रण

अंतर्गत शांतता व सुव्यवस्थेकरिता इ.स. १८७८ मध्ये शस्त्रास्त्रविषयक कायदा पास केला गेला. या कायद्यानुसार भारतीयांना शस्त्र बाळगण्यासाठी परवानगी घेणे बंधनकारक केले. भारतीयांना नि:शस्त्र करण्यासाठी ब्रिटिशांनी हा कायदा पास केला. परंतु युरोपियन व अँग्लो इंडियन यांना शस्त्र बाळगण्यासाठी परवानगीची आवश्यकता नव्हती.

## ५) कायदाव्यवस्था

कायदाव्यवस्थेच्या बाबतीत प्रांता-प्रांतात भिन्नता होती. एकूणच संपूर्ण देशात देशव्यापी कायदेव्यवस्था नव्हती. परिस्थितीनुसार त्या त्या प्रांतातील गव्हर्नर कायदे करीत असत. महाराष्ट्रात मात्र एलूफिन्स्टनने केलेले कायदे १८३४ पर्यंत प्रमाणभूत मानण्यात आले. लॉर्ड मेकॉलेपासून यामध्ये बदल होत गेले. १८३३ च्या चार्टर ॲक्टनुसार कायदा आयोग स्थापन झाला. तर १८३७ मध्ये पिनल कोड अस्तित्वात आले. त्यामुळे भारतीय समाजजीवनाचे संहितीकरण घडून आले. या कायद्यानुसार सर्व मानवजात समान मानली जाऊ लागली. गुन्हा सिध्द होत नाही तोपर्यंत व्यक्तीला निर्दोष समजण्यात यावे अशी शिफारस या कायद्यात करण्यात आली होती. १८३६ च्या कायद्याने इंग्रजांनाही कंपनीच्या दिवाणी न्यायालयाच्या अधिकार कक्षेत समाविष्ट केले गेले. इ.स. १८३३ च्या सनदी कायद्यानुसार प्रांताचे कायदे करण्याचे अधिकार काढून घेतले आणि सर्व भारतासाठी कायदे करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरल आणि त्याच्या कार्यकारी मंडळास देण्यात आला. या कार्यकारी मंडळाने केलेले कायदे मुंबई इलाख्याला लागू होते. १८५३ च्या सनदी कायद्याने कायदेविषयक कार्यासाठी कायदेमंडळाच्या सदस्यांची संख्या वाढविण्यात आली. प्रांताचे ४ सदस्य, १ मुख्य न्यायाधीश आणि १ इतर न्यायाधीश यांना कार्यकारी मंडळाचे सदस्यत्व दिले. अशा प्रकारे संपूर्ण देशासाठी कायदे करणारी एक स्वतंत्र यंत्रणा निर्माण झाली.

इ.स. १८३४ मध्ये लॉर्ड मेकॉलेच्या अध्यक्षतेखाली कायदा आयोगाची स्थापना करण्यात आली. त्यांनी भारतीय दंडसंहितेचा एक मसुदा तयार केला. १८५३ च्या सनदी कायद्यानुसार दुसरा कायदा आयोग नेमण्यात आला. या आयोगाने मेकॉलेच्या दंडसंहितेत आवश्यक त्या सुधारणा केल्या आणि पुढील ३ कायदेसंहिता तयार झाल्या.

१. दंडसंहिता : १८६२ मध्ये भारतीय दंडसंहिता अंमलात आली. या दंडसंहितेत विविध गुन्हे व शिक्षांची माहिती दिली आहे.

२. फौजदारी न्यायदान प्रक्रिया संहिताः १८४७ मध्ये फौजदारी न्यायदान प्रक्रिया संहितेचे काम चालू झाले. पण या संहितेची अंमलबजावणी १८६२ मध्ये झाली. १८९८ पर्यंत संहितेचे काम लवचीक राहिले. जेम्स स्टिफन यांनी संहितेत शेवटच्या सुधारणा केल्या. या संहितेत फौजदारी गुन्हे, शिक्षा व न्यायपध्दतीची माहिती दिली आहे.

३. दिवाणी न्यायदान प्रक्रिया संहिताः ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे तत्कालीन अध्यक्ष वूड यांच्या सूचनेनुसार दिवाणी प्रकरणात वापरण्याची लवचीक संहिता निर्माण करण्यात आली. या संहितेत दिवाणी गुन्हे, शिक्षा व न्यायपध्दतीची माहिती दिली आहे.

## ६) न्यायव्यवस्था

ब्रिटिश सत्ता स्थापन होण्यापूर्वी विविध कायदे व न्याय पध्दती होत्या. न्यायदानात सर्वांनाच समान वागणूक दिली जात नव्हती. गुन्हेगाराच्या जातीनुसार कमी-अधिक शिक्षा दिली जात असे. ब्रिटिशांनी भारतात न्यायालये स्थापन केली व त्यांनी न्यायालयासमोर सर्व भारतीयांना समान मानण्यास सुरुवात केली. महाराष्ट्रात न्यायालयीन यंत्रणा उभारण्याचे काम एलूफिन्स्टनने केले. त्यांनी प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र न्यायालय निर्माण केले. तसेच जिल्हा न्यायालयाने दिलेल्या निकालावर अपील करण्यासाठी सद्र दिवाणी न्यायालय निर्माण केले. १८२३ मध्ये मुंबई येथे सर्वोच्च न्यायालय स्थापन केले. इ.स.१८६१ च्या भारतीय उच्च न्यायालय कायद्यानुसार मुंबई, कलकत्ता, मद्रास येथे उच्च न्यायालये स्थापन केली. पुढे १४ ऑगस्ट १९६२ रोजी दिवाणी व फौजदारी न्यायालये रद्द करून मुंबईला हायकोर्ट स्थापन केले. संपूर्ण मुंबई इलाखा या कोर्टाच्या अखत्यारित होता. लहान खटल्याच्याबाबतीत न्यायदान करण्यासाठी भारतीय न्यायाधीशांच्या नियंत्रणाखाली कनिष्ठ न्यायालये निर्माण करण्यात आली. मुंबईला उच्च न्यायालय स्थापन केल्याने पूर्वीची सर्वोच्च न्यायालये व सद्र दिवाणी अदालत ही न्यायालये रद्द झाली. इ.स. १८८३ मध्ये इल्बर्ट बिल पास झाले. या विधेयकानुसार युरोपियन गुन्हेगारावरील फौजदारी खटला भारतीय न्यायाधीशासमोर चालविण्यास असलेली बंदी उठविण्याचा प्रयत्न लॉर्ड रिपन यांनी केला होता. परंतु युरोपियनांनी या गोष्टीस प्रखर विरोध केला.

### स्वयं अध्ययन प्रश्न - २

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१. ब्रिटिशांची भारतात सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर महाराष्ट्रातील न्यायदान व्यवस्थेकडे सर्वप्रथम कोणी लक्ष दिले ?

२. १८२७ च्या कायदेसंहितेनुसार कोर्टाची त्रिस्तरीय रचना कशी होती ?

३. ब्रिटिशांनी शस्त्रास्त्रविषयक कायदा का पास केला ?

४. भारतीय दंडसंहिता कोणत्या साली अंमलात आली ?

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१. मुंबई उच्च न्यायालयाची स्थापना ............... साली झाली.

(अ) १८६१ (ब) १८६२ (क) १८६३ (ड) १८६४

२. ......... साली इल्बर्ट बिल पास झाले.

(अ) १८८० (ब) १८८१ (क) १८८२ (ड) १८८४

३. संपूर्ण भारतासाठी बंदीशाळा कायदा ............. साली करण्यात आला.

(अ) १८९४ (ब) १८९० (क) १९३७ (ड) १८२७

४. शस्त्रास्त्रविषयक कायदा ........... साली पास केला.

(अ) १८२० (ब) १८५८ (क) १८७८ (ड) १८३३

## २.२.३. पाश्चात्य शिक्षणाची सुरुवात

भारतात इंग्रजी सत्तेची स्थापना झाल्यानंतर येथील समाजजीवनात वेगवेगळया क्षेत्रांत मोठे बदल घडून आले. पूर्वी भारतात अनेक सत्ता निर्माण झाल्या. मात्र त्याचा भारतीय समाजजीवनावर फारसा प्रभाव पडला नाही.त्याचबरोबर समाजजीवनाची चौकट आहे तशी टिकून राहिली. मात्र याला इंग्रजांची सत्ता अपवाद ठरली. इंग्रजी राजवटीने भारतीय समाजजीवनात अनेक परिवर्तने घडवून आणली. इंग्रजांनी शिक्षणात जे महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले त्यामुळे समाजसुधारणेला चालना मिळाली. त्यामुळेच महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास पाहताना येथील शिक्षण पध्दतीत झालेले बदल प्रथम पाहणे गरजेचे ठरते. ब्रिटिशांनी शिक्षणात आमूलाग्र बदल केले. या शिक्षणामुळे ब्रिटिश राज्यकर्त्यांचा जितका फायदा झाला, त्यापेक्षा जास्त फायदा भारतीय समाजाचा झाला. या शिक्षणामुळेच महाराष्ट्र तसेच भारतातील समाजजीवनात एक परिवर्तन घडून आले. इथे, ब्रिटिशांनी शिक्षणात केलेले बदल आपणास पहावयाचे आहेत.

### १) ब्रिटिशपूर्वकालीन शिक्षणपध्दती

ब्रिटिशपूर्व काळात शिक्षण ही सरकारची जबाबदारी नाही अशी राज्यकर्त्यांची समजूत होती. तसेच शिक्षण हे सार्वत्रिक नव्हते. ते फक्त उच्चवर्णीयापुरते मर्यादित होते. शुद्र स्त्रिया, महार, मांग आणि चांभार या जातीतील लोकांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. शिक्षण हे पारंपरिक व

धार्मिक स्वरूपाचे होते. मानवी मूल्ये, विज्ञाननिष्ठा व ऐहिकता या गोष्टींचा शिक्षणात अभाव होता. तत्कालीन शिक्षणाचा भर पाठांतरावरच होता. समाजातील कोणत्याही वर्गाने भौतिक विद्या आत्मसात करण्याचा प्रयत्न केला नव्हता.

## २) कंपनीचे शिक्षणविषयक धोरण

इ.स. १८१३ च्या सनदी कायद्यानुसार भारतीय लोकांच्या शिक्षणासाठी दरवर्षी एक लाख रूपये खर्च करण्याचे ठरविले. या कायद्यानुसार शिक्षण ही सरकारची जबाबदारी आहे हे स्पष्ट झाले. परंतु भारतीयांना शिक्षण देण्याची काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे होती.

१. कंपनीचा राज्यकारभार इंग्रजी भाषेत चालत होता. तसेच कार्यालयात इंग्रजी भाषा जाणणाऱ्या लोकांची आवश्यकता होती. इंग्रजी शिक्षणामुळे ही गरज पूर्ण होणार होती. शिक्षण घेतलेल्या भारतीयांना कारकून म्हणून नेमता येत होते.

२. इंग्रजांना आपल्या सांस्कृतिक श्रेष्ठत्वाचे गोडवे गाणारा वर्ग तयार करावयाचा होता.

३. ब्रिटनमध्ये तयार होणारा माल भारतातील सुशिक्षित वर्गामुळे अधिक खपण्याची शक्यता होती.

४. भारतीयांना शिक्षणाद्वारे नवीन विषयाचे ज्ञान देता येणार होते.

५. पाश्चात्य शिक्षणामुळे भारतीय लोक इंग्रजी सत्तेचे समर्थक बनतील अशी अपेक्षा होती.

## ३) कंपनी राजवटीतील शिक्षणाचे स्वरूप

इंग्रज काळात महाराष्ट्रात सार्वत्रिक शिक्षणप्रसाराला सुरुवात झाली. इंग्रजांनी पारंपरिक शिक्षण पध्दतीत आमुलाग्र बदल घडवून आणले. सर्व जातीधर्माच्या लोकांना शिक्षणाची दारे खुली करून दिली. शिक्षण ही सरकारची जबाबदारी आहे हे त्यांनी प्रथम स्पष्ट केले व ठरावीक रक्कम शिक्षणावरती खर्च केली पाहिजे हे बंधनकारक केले. त्यामुळेच शिक्षणाचा प्रसार सरकारी पातळीवरून सुरू झाला. या अगोदर ख्रिश्चन मिशनऱ्यांनी भारतात मानवतेच्या भूमिकेतून शिक्षण देण्यास सुरुवात केली होती. त्यांचा मुख्य उद्‌देश ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणे हा होता. तसेच ब्रिटिश राज्यकर्त्यांना प्रशासनात कारकुनांची गरज होती. या शिक्षणाव्दारे त्यांना कारकून मिळणे शक्य होते. तसेच आपल्या सांस्कृतिक श्रेष्ठत्वाचे गुणगाण करणारा एक वर्ग तयार करावयाचा होता. या अल्प शिक्षणाने तसा वर्ग तयार करणे शक्य होते. अशा विविध हेतूनेच भारतात आधुनिक शिक्षणाचा पाया घातला.

## ४) एल्फिन्स्टनचे शैक्षणिक कार्य

एल्फिन्स्टनने आपल्या कारकीर्दीत शिक्षणविषयक अनेक योजना कार्यान्वित करण्याचा प्रयत्न केला. परंतु १८२७ मध्ये सेवानिवृत्त झाल्यामुळे त्याच्या शिक्षणविषयक बऱ्याच योजना अपूर्ण राहिल्या. भारतीयांच्या धार्मिक भावना न दुखावता शिक्षणाच्या माध्यमातून त्यांची प्रगती घडवून आणणे हे त्यांचे शिक्षणविषयक धोरणाचे सूत्र होते. म्हणून त्यांनी इ.स. १८२० मध्ये 'सोसायटी फॉर द प्रमोशन ऑफ द एज्युकेशन ऑफ पुअर' ही संस्था स्थापन करून त्याद्वारे देशी भाषेतून शिक्षण देण्यास सुरुवात केली. इ.स. १८२४ मध्ये मुंबई येथे इंजिनिअरिंग कॉलेज सुरू केले. इ.स. १८१६ मध्ये बॉम्बे एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. या सोसायटीचा मुख्य उद्‌देश म्हणजे मुंबई प्रांतात शाळा सुरू करणे हा होय. या संस्थेने मुंबई, भडोच व ठाणे या ठिकाणी शाळा सुरू केल्या. इ.स. १८२० मध्ये मुंबई येथे 'दि नेटिव्ह स्कूल अँण्ड स्कूल बुक कमिटी' ही संस्था स्थापन केली. या संस्थेतर्फे मुंबईत अनेक शाळा सुरू झाल्या. तसेच गुजराती व मराठी भाषेत इंग्रजी पुस्तकांची भाषांतरे करण्यात आली. इ.स. १८२४ मध्ये एका इंग्रजी शाळेची स्थापना झाली. त्याच शाळेला पुढे 'एल्फिन्स्टन हायस्कूल' असे नाव देण्यात आले. इ.स. १८३४ मध्ये या हायस्कूलचे रूपांतर 'एल्फिन्स्टन महाविद्यालयात' झाले.

## ५) पुण्यात संस्कृत कॉलेजची स्थापना

इ.स. १८१८ मध्ये पेशव्यांची सत्ता इंग्रजानी संपुष्टात आणली. त्यामुळे पुण्यातील उच्चवर्णीयांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला. या असंतोषाचा उद्रेक होऊ नये म्हणून एल्फिन्स्टनने मुत्सद्‌देगिरीने काही निर्णय घेतले. ब्राम्हण लोकांना श्रावणमासाच्या दक्षिणेत ५ लाख रूपये खर्च केले जात होते. यातील काही रक्कमेतून विद्वानांना उत्तेजन देण्याच्या हेतूने व शिक्षणप्रसार व्हावा म्हणून इ.स. १८२१ मध्ये पुण्यात 'संस्कृत कॉलेज' सुरू केले. या कॉलेजमध्ये वेद, वेदांगे, न्याय, व्याकरण, ज्योतिष यासारखे विषय शिकविले जात होते. इ.स. १८३७ मध्ये येथील अभ्यासक्रमात मराठीचा समावेश करण्यात आला. इ.स. १८५१ मध्ये संस्कृतऐवजी इंग्रजी भाषेला प्राधान्य देण्यात आले. याचे रूपांतर 'पुना कॉलेज' मध्ये करण्यात आले. इ.स १८६१ मध्ये या कॉलेजचे विभाजन करण्यात येऊन डेक्कन कॉलेज व व्हर्नाक्युलर कॉलेज अशी दोन महाविद्यालये निर्माण करण्यात आली. डेक्कन कॉलेज मधील शिक्षणाचे माध्यम इंग्रजी होते. तर व्हर्नाक्युलर महाविद्यालयातील शिक्षणाचे माध्यम मराठी होते. पण याकाळात इंग्रजी शिक्षणाला महत्त्व प्राप्त झाल्यामुळे व्हर्नाक्युलर कॉलेजला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे इ.स. १८६५ मध्ये या कॉलेजचे रूपांतर 'ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन' मध्ये केले. परंतु डेक्कन कॉलेजला चांगला प्रतिसाद मिळाला. या कॉलेजमधून लोकमान्य टिळक, आगरकर, विष्णूशास्त्री चिपळूणकर इत्यादींनी शिक्षण घेतले.

## ६) शिक्षणमंडळाची स्थापना

महाराष्ट्रातील शिक्षणाला निश्चित दिशा देण्यासाठी व शैक्षणिक प्रसारात सुसुत्रता आणण्यासाठी १८४० मध्ये ब्रिटिश शासनाने मुंबई येथे 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' हे मंडळ स्थापन केले. यामध्ये तीन सरकारी व तीन बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे प्रतिनिधी याचा समावेश करण्यात आला होता. महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासात या मंडळाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. हे मंडळ १५ वर्षे कार्यरत राहिले. या मंडळामार्फत शाळा सुरू करण्याचे आणि त्या शाळांना मान्यता देण्याविषयीचे नियम तयार केले. प्रत्येक इयत्तेनुसार अभ्यासक्रम तयार केला. शिक्षणात भारतीय भाषांना उत्तेजन मिळावे म्हणून गुजराती व मराठी भाषेतून ग्रंथनिर्मिती केली. शाळा तपासणीसाठी मुंबई इलाख्याचे तीन विभाग करून प्रत्येक विभागासाठी 'सुपरिण्टेण्डण्ट्' नेमला. महाराष्ट्रात शैक्षणिक प्रगती घडवून आणण्यात या मंडळाचा मोठा सहभाग होता. त्यामुळेच महाराष्ट्रात १८४८ मध्ये मुंबई इलाख्यात २१६ शाळा शिक्षण मंडळाच्या नियंत्रणात होत्या. या शाळांत १२००० विद्यार्थी शिक्षण घेत होते.

## ७) वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई

कलकत्ता येथे १८२२ मध्ये एक वैद्यकीय शाळा सुरू केली होती. याच धर्तीवर इ.स. १८२६ मध्ये मुंबई येथे वैद्यकीय शाळा स्थापन करण्यात आली. तर १८३६ मध्ये कलकत्ता येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यात आले. त्याच धर्तीवर मुंबई येथे लोकांनी वर्गणी जमा करून आणि काही सरकारी अनुदानातून १८४५ मध्ये वैद्यकीय महाविद्यालय सुरू केले. यालाच रॉबर्ट ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय या नावानेही ओळखले जाते.

## चार्लस् वूडचा खलिता (१८५४)

लॉर्ड विलियम बेंटिकच्या कारकीर्दीत लॉर्ड मेकॉले यांनी केलेल्या शिफारशींनुसार भारतात पाश्चात्य शिक्षणाचा प्रारंभ झालेला होता. परंतु सरकारकडून अपुरा पैसा मिळत असल्यामुळे मेकॉलेची योजना यशस्वी झाली नाही. अशास्थितीत शैक्षणिक व्यवस्थेची पूनर्रचना करणे आवश्यक होते. देशी आणि इंग्रजी शिक्षणाच्या चौकशीसाठी ब्रिटिश संसदेने एक समिती नेमली. या समितीत अलेक्झांडर डफ, सर चार्लस ट्रॅव्हेलियन आणि जॉर्ज मार्शमेन हे शिक्षण तज्ञ होते. सर चार्लस वूड हे बोर्ड ऑफ कंट्रोलचे अध्यक्ष होते. त्यांनी वरील समितीच्या अहवालानुसार शिक्षणविषयक एक योजना तयार करून ती लॉर्ड डलहौसी यांना १९ जुलै १८५४ रोजी सादर केली. त्यांची ही योजना भारतातील शिक्षणपध्दतीचा शुभारंभ मानला जातो. या योजनेतील शिफारशी पुढीलप्रमाणे होत्या.

१. प्राथमिक शिक्षणास उत्तेजन द्यावे.

२. भारतीय लोकांनी प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी सुरू केलेल्या शाळांमधून प्रादेशिक भाषेतून शिक्षण द्यावे.

३. खाजगी शाळांना सरकारने अनुदान द्यावे.

४. माध्यमिक शिक्षणापर्यंतचे शिक्षण मातृभाषेतून देण्यात यावे.

५. उच्च शिक्षण इंग्रजी भाषेतून द्यावे.

६. शिक्षण धर्मातीत असले पाहिजे. अभ्यासक्रमात धार्मिक विषय असू नये.

७. सरकारने स्त्रियांच्या शिक्षणास प्रोत्साहन द्यावे.

८. लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर मुंबई, चेन्नई, कलकत्ता येथे विद्यापीठांची स्थापना करावी.

९. शाळांच्या तपासणीसाठी प्रत्येक प्रांतात स्वतंत्र शिक्षण विभाग स्थापन करावा.

१०. शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण शाळा असाव्यात.

११. खाजगी शाळा व कॉलेजला सरकारने अनुदान द्यावे. शैक्षणिक संस्था काढणाऱ्यांना प्रोत्साहन द्यावे.

१२. कनिष्ठ आणि उच्च पातळीपर्यंतच्या शिक्षणात सुसंवाद निर्माण करावा.

१३. विविध स्तरावर शैक्षणिक शिष्यवृत्ती ठेवावी.

चार्लस वूड यांनी शिक्षणविषयक केलेल्या सूचना म्हणजे भारतातील भविष्यकाळातील मार्गदर्शक तत्त्वे होती. वूड यांच्या खलित्यात केलेल्या सूचनांनुसार लॉर्ड डलहौसीने शिक्षणाची पूनर्रचना करण्याचे कार्य हाती घेतले. कंपनीच्या अखत्यारीतील प्रांतात एका वर्षात शिक्षण खाते सुरू केले. त्याचप्रमाणे अभ्यासक्रम, परीक्षा पध्दती, अनुदान देण्याची पध्दत यात सुसूत्रता आणली. शाळांच्या तपासणीसाठी स्वतंत्र अधिकारी नेमले. पुढे १८५७ मध्ये मुंबई, चेन्नई, कलकत्ता येथे विद्यापीठांची स्थापना केली. चार्लस वूडच्या या खलित्याने शैक्षणिक प्रगतीला गती मिळाली.वूडच्या या शिक्षणविषयक अहवालाला 'मॅग्नाकार्टा ऑफ इंग्लिश एज्युकेशन इन इंडिया' या नावानेही ओळखले जाते.

### हंटर आयोग (१८८२)

वूडचा खलिता स्वीकारल्यानंतर शिक्षण क्षेत्रात झालेल्या प्रगतीची पाहणी करून पुढील काळासाठी त्यात सुधारणा सुचविण्यासाठी लॉर्ड रिपनने १८८२ मध्ये सर विल्यम हंटर याच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना केली. त्याला हंटर आयोग किंवा कमिशन या नावाने ओळखले जाते. या आयोगाने संपूर्ण देशाचा दौरा करून प्रत्येक प्रांताच्या शिक्षणाची पाहणी केली. अनेक शिक्षण क्षेत्रातील तज्ञांशी विचारविनिमय करून आपला अहवाल तयार करून तो १९ ऑक्टोबर १८८२ रोजी सरकारला सादर केला. या अहवालातील महत्त्वाच्या शिफारशी पुढीलप्रमाणे होत्या.

१. खाजगी शिक्षण संस्थांना शैक्षणिक कार्यात प्रोत्साहन द्यावे. त्यांना अनुदान द्यावे.

२. शिक्षणावरील सरकारी नियंत्रण कमी करावे.

३. महाविद्यालयांना आर्थिक साहाय्य करावे.

४. प्राथमिक शिक्षण स्थानिक स्वराज्य संस्थाकडे सोपवावे. सरकारने त्यावर नियंत्रण ठेवावे.

५. लोकशिक्षणाकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावे.

६. शासकीय शाळा खाजगी संस्थाकडे सुपूर्त कराव्यात.

७. प्रांतिक सरकारांनी आपल्या उत्पन्नापैकी ठरावीक हिस्सा राखून ठेवावा.

८. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, बौध्दिक व नैतिक शिक्षणाला महत्त्व द्यावे.

९. विद्यापीठाने पर्यायी ऐच्छिक विषयाचे अभ्यासक्रम सुरू करावेत.

हंटर आयोगाने एकूण २३ शिफारशी केल्या होत्या. भारतातील शिक्षणक्षेत्रातील प्रगतीबद्दल आयोगाने समाधान व्यक्त केले. मात्र प्राथमिक शिक्षणात असलेली हेळसांड दूर करण्यासाठी सरकारने लक्ष द्यावे असे प्रतिपादन केले. सरकारने १८८४ मध्ये हंटर आयोगातील काही सूचना वगळून बाकीच्या शिफारशी स्वीकारल्या. त्यामुळे पुढील काळात प्राथमिक शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्यात आले. खाजगी शिक्षण संस्थांना द्यावयाच्या अनुदान पध्दतीचे सूत्र निश्चित झाल्यामुळे खाजगी संस्थांना प्रोत्साहन मिळाले. पुढील काळात शिक्षणाच्या प्रगतीला गती मिळाली.

**शिक्षणाचे परिणाम**

इंग्रजांनी शिक्षणाविषयी काही उद्देश डोळयासमोर ठेवून भारतातील शैक्षणिक प्रगतीला चालना दिली. मात्र त्याचे पुढील काही दूरगामी परिणाम येथील समाजजीवनावर झाले.

१. पाश्चिमात्य शिक्षणामुळे लोकांना भौतिक प्रगत ज्ञान मिळाले.

२. शिक्षणाची संधी सर्वांना मिळाल्यामुळे समाजातील वरिष्ठ वर्गाचे श्रेष्ठत्व संपले.

३. समाजातील प्रत्येक जातीतील व्यक्तींना शिक्षणाची संधी मिळाली.

४. शिक्षण घेतलेल्या लोकांनी पारंपरिक रूढी - परंपरा व जातिसंस्थेस विरोध केला व त्यांनी समाजसुधारणेची मागणी केली.

५. ब्रिटिश सरकारला राज्यकारभारात इंग्रजी जाणणाऱ्या भारतीयांची आवश्यकता कारकून म्हणून हवी होती. त्यांची ही गरज पूर्ण झाली.

६. उदारमतवादी चळवळीस चालना मिळाली.

७. स्वातंत्र्य व समता या विचारांनी प्रभावित झालेल्या समाजसुधारकांनी समाज प्रबोधन आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

८. राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली.

**स्वयं अध्ययन प्रश्न - ३**

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१. कोणत्या कायद्यानुसार शिक्षण ही सरकारची जबाबदारी आहे हे स्पष्ट झाले ?

२. एलूफिन्स्टनच्या शिक्षणविषयक धोरणाचे सूत्र काय होते ?

३. एलूफिन्स्टनने देशी भाषेतून शिक्षण देण्यासाठी कोणती संस्था स्थापन केली ?

४. महाराष्ट्रातील पहिले वैद्यकीय महाविद्यालय कोठे सुरू झाले ?

५. महाराष्ट्रातील पहिल्या वैद्यकीय महाविद्यालयाचे नाव काय होते ?

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१. १९ ऑक्टोबर १८८२ रोजी ......... आयोगाने शिक्षणाविषयी महत्वपूर्ण शिफारशी केल्या.

(अ) मेकॉले (ब) हंटर (क) डलहौसी (ड) रिपन

२. एलूफिन्स्टनने संस्कृत कॉलेजची स्थापना ........... येथे केली.

(अ) मुंबई (ब) सातारा (क) पुणे (ड) सांगली.

३. १८१६ साली मुंबई येथे मुंबई इलाख्यात शिक्षणप्रसार करण्यासाठी ......... ची स्थापना केली.

(अ) बॉम्बे एज्युकेशन सोसायटी (ब) बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी

(क) बोर्ड ऑफ एज्युकेशन (ड) कंट्रोल ऑफ बोर्ड

४. ........ साली मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली.

(अ) १८८२ (ब) १८५६ (क) १८५७ (ड) १८६१

५. ब्रिटिश शासनाने मुंबई येथे बोर्ड ऑफ एज्युकेशनची स्थापना ...... साली केली.

(अ) १८३८ (ब) १८३९ (क) १८४० (ड) १८४१

## २.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. रयतवारी : रयतेने वंशपरंपरेने जमिनीचा उपभोग घ्यावा अशी व्यवस्था

२. कायमधारा पद्धत : सरकारने जमीनदाराला कायमचा महसूल ठरवून देण्याची व्यवस्था

## २.४ सारांश

इंग्रजांच्या आगमनामुळे भारतात वेगवेगळया क्षेत्रांत आमूलाग्र बदल घडून आले. भारतीयांमध्ये पाश्चात्य ज्ञानाची आस निर्माण झाली. एक नियोजनबध्द व्यवस्था निर्माण करण्यात आली. सरकार आणि जनता यांच्यामध्ये सरळ संबंध निर्माण झाले. ब्रिटिशांच्या आगमनाने मुख्य प्रवाहाच्या बाहेर फेकलेला वर्ग मुख्य प्रवाहात येण्यास मदत झाली. त्यांच्यात आपल्या हक्कासाठी लढण्याची वृत्ती निर्माण झाली. त्याचबरोबर बुध्दीच्या कक्षा रूंदावण्यास मदत झाली. यामुळेच पुढील काळात स्वातंत्र्य चळवळीला वेग आला.

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न - १**

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१. १७५७ च्या प्लासीच्या लढाईने

२. रयतेने वंशपरंपरेने जमिनीचा उपभोग घ्यावा अशी व्यवस्था

३. कर पद्धती, राज्याची उभारणी कोणत्या तत्त्वावर केली आहे आणि कशा प्रकारची न्यायव्यवस्था निर्माण केली आहे

४. सरकारने जमीनदाराला कायमचा महसूल ठरवून देण्याची व्यवस्था

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१) थॉमस मन्रो २) १८२७ ३) ३० ४) ऐक्य

**स्वयं अध्ययन प्रश्न - २**

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१. एल्फिन्स्टन

२. १) सद्र अदालत, २) जिल्हा अदालत व सर्वात कनिष्ट कोर्ट, ३) नेटिव्ह कमिशनर

३. अंतर्गत शांतता व सुव्यवस्थेसाठी तसेच भारतीयांना नि:शस्त्र करण्यासाठी

४. १८६२ साली

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१) १८६२ २) १८८४ ३) १८९४ ४) १८७८

**स्वयं अध्ययन प्रश्न - ३**

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१. १८१३ च्या सनदी कायद्यानुसार

२. भारतीयांच्या धार्मिक भावना न दुखावता शिक्षणाच्या माध्यमातून त्यांची प्रगती घडवून आणणे

३. सोसायटी फॉर द प्रमोशन ऑफ द एज्युकेशन ऑफ पुअर

४. मुंबई

५. रॉबर्ट ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१) हंटर २) पुणे ३) बॉम्बे एज्युकेशन सोसायटी

४) १८५७ ५) १८४०

## २.६. सरावासाठी स्वाध्याय

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. रयतवारी पध्दती म्हणजे काय ते सांगून तिचे गुण व दोष स्पष्ट करा.

२. एलूफिन्स्टनने महाराष्ट्रात सुरू केलेल्या न्यायव्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करा.

३. कंपनी काळातील आधुनिक शिक्षणाची थोडक्यात रूपरेषा द्या.

**ब) टीपा लिहा.**

१. रयतवारी पध्दती

२. १८२७ ची कायदेसंहिता

३. रयतवारी पध्दतीचे परिणाम

४. चार्लस वूडचा खलिता

५. हंटर कमिशन

६. शिक्षणातील बदलाचे समाजजीवनावर झालेले परिणाम

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. सरदेसाई बी.एन. आधुनिक महाराष्ट्र (१८१८ - १९६०), फडके प्रकाशन, कोल्हापूर जानेवारी २०००

२. कठारे अनिल आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८१९ - १९६०), विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद जून २००९.

३. सहस्त्रबुध्दे पु. ग. महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे २००३.

४. History of Modern India (1800-1984), Keswani K. B. Himalaya Publishing House Bombay, 1985.

५. Agrarian System in South India, Dua J. C.

६. Choksy R. D. Economic Life in the Deccan 1888- 1896, Asia Publishing House, Bombay, 1965.

# घटक : ३
# सामाजिक सुधारणा

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ ख्रिश्चन मिशनऱ्यांचे योगदान

३.२.२ स्त्री मुक्ती

३.२.३ अस्पृश्यता निर्मूलन आणि जातिभेदाचा अंत

३.२.४ वृत्तपत्रांची कामगिरी

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.४ सारांश

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- ख्रिश्चन मिशनऱ्यांनी महाराष्ट्रात केलेल्या समाजसुधारणांचा आढावा घेता येईल.
- १९ व्या शतकातील स्त्री जीवन समजून घेता येईल.
- स्त्री उद्धारासाठी समाजसुधारकांनी केलेल्या कार्याची माहिती होईल (महात्मा जोतीबा फुले, महर्षी कर्वे, पंडिता रमाबाई इ.)

- अस्पृश्यता निर्मूलनासाठी महात्मा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाजसुधारकांचे योगदान अभ्यासता येईल.
- महाराष्ट्रातील वृत्तपत्रांची सुरुवात व विकास यांचा आढावा घेता येईल.

## ३.१ प्रास्ताविक

मिशन याचा अर्थ धर्माच्या प्रसारासाठी संघटितरित्या प्रयत्न करणे असा होतो. ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणाऱ्या संस्थांना 'मिशन' आणि धर्मप्रसाराचे कार्य करणाऱ्या व्यक्तीना 'मिशनरी' असे म्हणतात. ख्रिस्ती धर्माप्रमाणेच बौद्ध व इस्लाम हे धर्म देखील मिशनरी धर्म म्हणून ओळखले जातात. आधुनिक काळात काही हिंदू धर्मातील पंथानी मिशनरीमार्फत कार्य करण्यास प्रारंभ केला आहे. आधुनिक काळात ख्रिश्चन मिशनरी हे परकीय आणि एत्तदेशीय अशा दोन विभागात विभागले आहेत. परकीय देशातील मिशनरी इतर देशात जाऊन कार्य करतात, तर एत्तदेशीय मिशनरी आपल्या देशात वास्तव्य करून कार्य करीत असतात. ख्रिश्चन मिशन इतिहासाबाबत अनेकांनी अभ्यास केला असून यामध्ये केनेथ स्कॉट, एडवर्ड मूर इत्यादींचे संशोधन महत्त्वाचे समजले जाते. सन १८१३ पर्यंत कंपनी सरकारने ख्रिस्ती मिशनऱ्यांना भारतात येण्यास बंदी घातली होती. परंतु १८१३ च्या सनदी कायद्यानुसार मिशनऱ्यांना भारतात येण्यास परवानगी मिळाली.

## ३.२ विषय विवेचन

### ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे मिशनऱ्यांबाबतचे धोरण

भारतात डच, फ्रेंच, पोर्तुगीज यांच्याबरोबच ख्रिश्चन मिशनरीही आले होते. पोर्तुगीजांची गोव्यात राजकीय सत्ता स्थापन होत असताना त्या भागात धर्मप्रसाराचे काम मिशनरी करीतच होते. भारतात आलेल्या इंग्रजांचा व्यापार करणे हा प्रमुख हेतू होता. पुढे येथील व्यापारी व राजकीय हित संबंधाचे रक्षण करणे इंग्रजांना जास्त आवश्यक वाटू लागले. त्यामुळे इंग्रजांनी आपल्या नियंत्रणाखालील प्रदेशात ख्रिश्चन धर्मप्रसारकांना कार्य करू दिले नाही. ईस्ट इंडिया कंपनीच्या या धोरणामुळे ब्रिटिशांच्या नियंत्रणाखालील प्रदेशात ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या कार्याला उत्तेजन मिळाले नाही. सन १८१३ च्या सनदी कायद्यापर्यंत कंपनीने आपल्या प्रदेशात धर्मप्रसार करू दिला नाही. कंपनी सरकारने ख्रिश्चन मिशनऱ्यांबाबतचे धोरण बदलावे असा आग्रह विल्बर फोर्स या मिशनऱ्याने इंग्लंडमधील ब्रिटिश सरकारकडे धरला. विल्बर फोर्सच्या प्रयत्नामुळेच १८१३ च्या सनदी कायद्यात कंपनी सरकारने मिशनऱ्यांना काही सवलती द्याव्यात अशी तरतूद केली. त्यामुळेच पुढील काळात कंपनीच्या नियंत्रणाखालील प्रदेशातही धर्मप्रसार करणे ख्रिश्चन मिशनऱ्यांना शक्य झाले.

### ख्रिश्चन धर्मप्रसार करणाऱ्या संस्था

महाराष्ट्रात १) चर्च मिशनरी सोसायटी, २) स्कॉटिश मिशनरी सोसायटी, ३) मुंबई बायबल सोसायटी, ४) लंडन मिशनरी सोसायटी, ५) अमेरिकन मराठी मिशन या धर्मप्रसाराचे काम करणाऱ्या संस्था होत्या. १८१३ मध्ये अमेरिकन मराठी मिशन ही संस्था मुंबईत कार्यरत झाली. या अमेरिकन सोसायटीपैकी अमेरिकन बॉप्टिष्ट युनियन, अमेरिकन बोर्ड आणि अमेरिकन प्रेस बिटेरियन मिशन बोर्ड या प्रमुख संस्था होत्या. यापैकी अमेरिकन बोर्ड या संस्थेने महाराष्ट्रात धर्मप्रसाराचे कार्य केले.

### प्रमुख मिशनरी

महाराष्ट्रात आलेल्या प्रमुख मिशनऱ्यांमध्ये जॉन विल्सन, कुमारी फेरार, ॲबर्ट, वायलर, डॉ. वानलेस इत्यादींनी महत्त्वाची कामगिरी केली आहे. जॉन विल्सनने मुंबईत शिक्षण प्रसारात मोलाचे कार्य केले. विल्सन कॉलेज, तसेच मुंबई विद्यापीठ उभारण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा समजला जातो. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. कुमारी फेरार यांनी अहमदनगर भागात प्राथमिक शिक्षणबाबतचे मूलगामी स्वरूपाचे कार्य केले. पाठ्यपुस्तकाच्या मदतीने प्राथमिक शिक्षण दिले पाहिजे अशा प्रकारची भूमिका त्यांनी घेतली होती. तसेच मुलींच्या शिक्षणाबाबत त्यांनी पुढाकार घेतला होता. विशेष म्हणजे महात्मा फुल्यांच्यावर त्यांचा प्रभाव पडला होता. महात्मा फुले यांनी अहमदनगर येथे जाऊन त्यांच्या कार्याची माहिती घेतली होती. रॉयल वाईल्डर यांनी कोल्हापूर शहरात प्राथमिक शिक्षणासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले. त्यांनी आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या पाच वर्षात कोल्हापूर येथे आठ प्राथमिक शाळा सुरू केल्या. या काळात त्यांनी एकही धर्मांतर केले नाही याचा अर्थ त्यांनी शिक्षणप्रसारास अधिक महत्त्व दिले होते. डॉ. विल्यम वॉनलेस यांनी वैद्यकीय क्षेत्रात क्रांतिकारक स्वरूपाचे कार्य केले. त्यांनी मिरज येथे सुरू केलेले मिशन हॉस्पिटल आजही पश्चिम महाराष्ट्रातील रूग्णांसाठी अत्यंत महत्त्वाचे ठिकाण समजले जाते. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मिरज येथे दवाखाना सुरू केला. नंतरच्या काळात त्यांच्या प्रेरणेने कोल्हापूर, कोडोली, निपाणी इत्यादी ठिकाणी मिशन दवाखाने सुरू झाले. आजही काही मिशन दवाखाने चांगल्या अवस्थेत चालले आहेत. ख्रिश्चन मिशनरी धर्मप्रसारासाठी भारतात आले असले तरी त्यांनी केवळ धर्मप्रसार केला नाही तर त्यांनी महाराष्ट्राच्या समाजव्यवस्थेत मूलगामी स्वरूपाचे बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी धर्म, शिक्षण, उद्योग, आरोग्य, समाजसेवा इत्यादी महत्त्वाच्या क्षेत्रात कार्य केले.

### महाराष्ट्रातील विविध ख्रिस्ती धर्माचे पंथ

रोमन कॅथॉलिक आणि प्रोटेस्टण्ट हे ख्रिस्ती धर्माचे दोन पंथ असले तरी सुरुवातीच्या काळात रोमन कॅथॉलिक पंथाने धर्मप्रसारांच्या कार्यात आघाडी घेतली होती. पुढे १६ व्या शतकापासून प्रोटेस्टण्ट पंथाने आपल्या कार्यात आघाडी घेतली. इंग्लंडमध्ये द सोसायटी फॉर प्रमोटिंग ख्रिश्चन

नॉलेजची स्थापना १६९८ साली झाली तर द सोसायटी फॉर द प्रपोगेशन ऑफ द गॉस्पेल इन फॉरेन पार्टस्ची स्थापना १७०१ साली झाली. जॉन वेसले आणि विल्यम कॅरे या दोन प्रमुख मिशनऱ्यांनी १८ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून भारतात प्रोटेस्टण्ट मिशनच्या कार्यास प्रारंभ केला. पुढील काळात वेगवेगळ्या मिशन संस्थानी धर्मप्रसाराबाबत महत्त्वाचे कार्य केले. यामध्ये द प्रेस बिटेरियन चर्चेस इन स्कॉटलंड, दि. आयरिश प्रेस बिटेरियन चर्च, दि युनायटेड प्रेस बिटेरियन चर्चेस, द लंडन मिशनरी सोसायटी, द बेसल आणि इतर जर्मन मिशनरी संस्था, अमेरिकन मराठी मिशन, अमेरिकन प्रेस बिटेरियन मिशन इत्यादींचा समावेश होता. त्याचबरोबर मुंबई राज्यात कॅथॉलिक मिशन संस्थेद्वारेही कार्य सुरू होते.

**ख्रिस्ती मिशनची महत्त्वाची केंद्रे**

ख्रिस्ती मिशनऱ्यांनी शहराप्रमाणेच ग्रामीण भागातही आपल्या सेवेची केंद्रे निश्चित केली. यामध्ये मुंबई हे सर्वात महत्त्वाचे केंद्र होते. या शहरात त्यांनी शैक्षणिक संस्था सुरू केल्या. १८२० पर्यंत मुंबई येथे मिशनची सात शैक्षणिक केंद्रे होती. त्याचबरोबर सामाजिक बदलासाठी या काळात मिशनने पुढाकार घेतला होता. मुंबईप्रमाणेच अहमदनगर हे मिशनचे आणखी एक महत्त्वाचे केंद्र होते. या शहरात फेरार बाईनी आदर्शवत अशा प्राथमिक शाळा सुरू केल्या होत्या तसेच वडाळा, शिरूर, राहुरी, वाई, सोलापूर, सातारा, कोल्हापूर अशा ठिकाणी मिशनऱ्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. तसेच त्यांनी ग्रामीण भागातही महत्त्वाची कामगिरी केली.

## ३.२.१ ख्रिश्चन मिशनऱ्यांचे योगदान

## मिशनऱ्यांचे विविध प्रकारचे कार्य

### १) शैक्षणिक कार्य

ज्ञानदान हे पवित्र दान आहे याची खात्री मिशनऱ्यांना होती. त्यांनी आपल्या कार्यास प्रारंभ केल्यानंतर शिक्षण केंद्रे उभारण्यासाठी प्रयत्न केले. प्राथमिक शाळा सुरू केल्या. अशा शाळेमध्ये आधुनिक स्वरूपाचे शिक्षण देण्यासाठी पुढाकार घेतला. पाठ्यपुस्तकाच्या निर्मितीकडे अधिक लक्ष दिले. महाराष्ट्रात वसतिगृह शाळा उभारण्यास प्रारंभ त्यांनीच प्रथम केला. रात्रशाळेचा प्रयोगही त्यांनीच यशस्वीपणे राबविला. मिशनऱ्यांच्या शाळांमध्ये दर्जेदार शिक्षण मिळते याची खात्री अनेक नेत्यांना झाली होती. विशेष म्हणजे डॉ. आंबेडकर यांनी मिशन शाळेत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाबाबत समाधान व्यक्त केले होते. सन १९१९ मध्ये अमेरिकन मिशनने कोलकत्ता येथे मुलींसाठी पहिली शाळा काढली. सन १८२४ मध्ये महाराष्ट्रात मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरू केली. इ.स. १८१३-१८१८ मध्ये गार्डन हॉल यांनी खेतवाडी व गिरगाव येथे मराठी मुलांसाठी शाळा काढल्या.

## २) वैद्यकीय केंद्रांची उभारणी

१९ व्या शतकात साथीच्या रोगांचे प्रमाण फार मोठे होते. त्याचप्रमाणे तत्कालीन समाज आरोग्याबाबत फारसा जागृत नव्हता. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारच्या रोगांमुळे मृत्यूचे प्रमाण प्रचंड होते. म्हणून मिशनऱ्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या साथीच्या रोगापासून रोग्यांना मुक्त करण्यासाठी दवाखान्यांची उभारणी केली. गरीब, अनाथ रूग्णांकडून कोणत्याही प्रकारची फी घेतली जात नसे. त्यामुळे गोरगरीब रूग्ण मोठ्या संख्येने मिशन दवाखान्यात औषधोपचारासाठी येत असत. त्यामुळे काही मिशन दवाखान्यांचा लौकिक आजही टिकून आहे. यामध्ये मिरजेच्या मिशन दवाखान्याचा आवर्जून उल्लेख करता येईल.

## ३) मराठी साहित्य क्षेत्रातील कार्य/वाङ्मयीन कार्य

मिशनऱ्यांनी मराठी साहित्य विश्वात वेगवेगळ्या विषयांवर लेखन करून मोलाची भर घातली आहे. मराठीतील पहिले पुस्तक छापण्याचा मान मिशनऱ्यांचा आहे. पहिले मराठी व्याकरण, पहिला शब्दकोश, पहिले मुद्रणालय या उपक्रमात ख्रिस्ती मिशनरी अग्रेसर होते. १८२५ साली कलकत्त्यातील सेहरामपूर येथील डेन्मार्क मिशनने मराठी टाईप (खिळे) मिळवून अनेक पुस्तके मराठीत छापली. अंकलिपी, मुलांची गीते, खगोलविद्या, पदार्थविज्ञान, भूगोल, तर्कशास्त्र या विषयांवरही मिशनऱ्यांनी प्रारंभी काळात लेखन केले. जेम्स टी मोल्सवर्थ यांनी मराठी भाषेच्या कोशाची निर्मिती केली. यामध्ये ४० हजारपेक्षा अधिक शब्दांचा समावेश होता. त्याकाळात महाराष्ट्र शासनाने मराठी शाळेसाठी पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्यास प्रारंभ केला होता. यामध्येही मिशनचा पुढाकार महत्त्वाचा ठरला. विशेष म्हणजे रेव्हरेंट जस्टिस ॲबट यांनी मराठी संत वाङ्मयाचा अभ्यास करून ते साहित्य इंग्रजीत अनुवादीत केले होते. बाबा पदमनजी (बेळगाव) यांनी मराठीत १०३ ग्रंथांचे लेखन केले. विशेष म्हणजे मराठीतील पहिली कादंबरी 'यमुना पर्यटन' त्यांनीच लिहिली आहे. तसेच रेव्ह. नारायण वामन टिळक, लक्ष्मीबाई टिळक, पंडिता रमाबाई यांचे योगदान साहित्याच्या क्षेत्रात महत्त्वाचे समजले जाते. तसेच मिशनऱ्यांनी २२ जून १८४२ रोजी 'ज्ञानोदय' मासिक सुरू केले. आजही हे मासिक प्रसिद्ध होत आहे. या मासिकाचा महात्मा फुले यांच्यावर मोठा प्रभाव पडला होता. शिवाय त्यांच्याबाबत बरीचशी माहिती सदरच्या मासिकात आढळते.

## ४) शेतीविषयक मार्गदर्शन

महाराष्ट्रातील बहुतेक सर्व जनता शेतीशी निगडीत आहे याची जाणीव मिशनऱ्यांना होती. म्हणूनच मिशनऱ्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी उत्तेजन दिले. यामध्ये शेती अवजारांचाही समावेश झाला होता. शेतकऱ्याने पारंपरिक लाकडाचा नांगर न वापरता पाश्चात्य पद्धतीचा नांगर वापरला पाहिजे याकडे त्यांनी शेतकऱ्यांचे लक्ष वेधले. त्याचप्रमाणे ऊस, बटाटा, कापूस अशा नगदी पिकांची चांगल्या प्रकारे लागवड कशी करता येईल याबाबतही त्यांच्याकडून

मार्गदर्शन लाभले. त्या काळात शेतकरीवर्ग कर्जाच्या सापळ्यात सापडत असे म्हणून मिशनऱ्यांनी अनावश्यक बाबींवर (लग्न इ. मध्ये) अधिक प्रमाणात खर्च करू नये असा सूचक सल्लाही दिला होता, त्यामुळे शेतकरीवर्गात काही प्रमाणात जागरूकता होण्यास मदत झाली.

शेतकरीवर्गाने शेती व्यवसायाबरोबरच काही छोटे-मोठे उद्योग सुरू करावेत याबाबत मिशनऱ्यांनी मार्गदर्शन केले होते. शेतकऱ्यांनी विलायती मेंढ्यांचे पालन केले तर चांगल्या प्रकारची लोकर उपलब्ध होऊ शकते आणि त्याचा आर्थिक फायदा शेतकऱ्यांना होऊ शकतो. तसेच त्यांनी कुक्कुट पालनाविषयीची माहिती शेतकऱ्यांना दिली होती. शेतकऱ्यांनी शेतीबरोबरच कुक्कुटपालनाकडे लक्ष दिले तर त्यांची आर्थिक परिस्थिती निश्चित चांगली होईल असा विश्वास व्यक्त केला होता.

### ५) सामाजिक प्रश्नांबाबत जागृती

महाराष्ट्रातील समाज का मागासलेला आहे याचे बारकाईने निरीक्षण मिशनऱ्यांनी केले होते. या समाजाच्या प्रगतीस अडथळा ठरणाऱ्या अनेक घटकांचा त्यांनी आढावा घेतला होता. विशेषत: जातिभेदामुळे समाजाचे फार मोठे नुकसान होत असल्याचे दाखवून दिले होते. या व्यवस्थेच्या विरोधात त्यांनी विविध मार्गांचा अवलंब करून जागृती घडवून आणली होती. समाजातील कनिष्ठवर्गास नेमक्या कोणत्या सामाजिक प्रश्नांना तोंड द्यावे लागते याचा त्यांनी ऊहापोह केला होता. या समाजाच्या प्रगतीसाठी वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब करणे गरजेचे असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले होते. उदा. दलितांनी धर्मांतर करावे याबाबत स्पष्ट भूमिका मांडली होती. तसेच या समाजाने शिक्षणाकडे अधिक लक्ष देण्याबद्दलही त्यांनी सुचविले होते. त्याचा परिणाम असा झाला की सुरुवातीच्या काळात कनिष्ठवर्गातील काही मंडळांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. तसेच मिशनऱ्यांनी बालविवाह प्रथेस विरोध केला होता. विधवानी परत लग्न करणे अगत्याचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. मुलींना शिक्षण मिळाले पाहिजे याबाबत त्यांची भूमिका आक्रमक होती. मिशनऱ्यांच्या या कार्यामुळे समाजात बदलाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. काही मंडळीना जुन्या धोरणाचे समर्थन करणे योग्य वाटले नाही. त्यामुळे समाज सुधारकांचा उदय झाला आणि त्यांनी जातिभेद, सामाजिक विषमता याबाबत जागृती घडवून आणण्यात पुढाकार घेतला. याला मिशनऱ्यांचे कार्य कारणीभूत झाले होते.

### ६) नैसर्गिक आपत्तीच्या काळात सहकार्य

महाराष्ट्रात प्रत्येक दहा वर्षाच्या काळातील चार वर्षे दुष्काळाची समजली जातात. काहीवेळा सलग दोन वर्षे दुष्काळ पडत असे. त्याचे समाजावर अत्यंत घातक परिणाम होत असत. लाखो लोकांचे निधन होत असे. त्याकाळात सरकार जनतेच्या संरक्षणाची जबाबदारी घेत असल्याने त्यांच्या आर्थिक बाबीकडे फारसे लक्ष देत नसे. याचा अर्थ त्याकाळात कल्याणकारी शासनव्यवस्था नव्हती. परंतु ही कल्याणकारी व्यवस्था मिशनऱ्यांनी रूजविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी दुष्काळाच्या काळात जनतेला मदत करण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले. त्याचबरोबर त्यांना वैद्यकीय सेवा पुरविली. त्यांनी

दुष्काळी छावण्या सुरू केल्या. त्याचा गरीबांना चांगला फायदा झाला. दुष्काळामुळे अनेकवेळा आई-वडिलांचे निधन होत असे. त्यांची मुले अनाथ होत असत. अशा अवस्थेत त्यांनी अनाथगृहांची व्यवस्था केली. अनाथगृहात मुला-मुलींचा चांगल्या प्रकारे सांभाळ करण्यात आला. काहीवेळा महापुरामुळे मोठे नुकसान होत असे. अशावेळी मिशनरी महापुरामुळे अडचणीत आलेल्यांना सहकार्य करीत असत.

### ७) स्त्री उद्धार

समाजात स्त्रियांची संख्या पुरूषाइतकीच असली तरी त्यांच्या प्रश्नांकडे शासनव्यवस्थेने अथवा समाजाने फारसे लक्ष दिले नव्हते. स्त्रीवर्गावर सातत्याने अन्याय करण्याचे धोरण समाजाने स्वीकारले होते. याला पुरूषप्रधान संस्कृती कारणीभूत ठरली होती. मिशनऱ्यांना स्त्री प्रश्नांचे गांभीर्य समजून आले होते. मिशनरी भारतात येताना आपल्याबरोबर आपल्या पत्नीस आणत असत आणि त्या सहायक मिशनरी म्हणून कार्य करीत असत. अशा महिला मिशनऱ्यांनी स्त्री प्रश्नांकडे अधिक लक्ष दिले. अनाथ महिलांना (मुलींना) राहण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली. त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी उपयुक्त शिक्षण देण्यात आले. यामध्ये शिक्षिका म्हणून कार्य करण्यास अधिक प्राधान्य दिले. कारण मिशनऱ्यांनी मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरू केल्या होत्या आणि त्यांनी ज्ञानदानाचे कार्य करण्यासाठी शिक्षिकांच्या नेमणुका केल्या होत्या. काहीवेळा महिला मिशनऱ्यांनी अत्यंत प्रभावीपणे शिक्षिका म्हणून काम केले आहे. कुमारी फेरार, इलिझाबेथ कायलर अशा महिला मिशनऱ्यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यांच्या प्रयत्नामुळे मुली शिक्षणासाठी शाळेत उपस्थित राहू लागल्या. याचा फायदा महिलावर्गास झाला. तसेच निराधार महिलांसाठी रोजगाराची संधी मिळावी म्हणून काही संस्था सुरू करण्यात आल्या. यामध्ये गालिचे तयार करणे, पायपुसणे, नक्षीच्या बॅगा तयार करणे इत्यादी आकर्षक आणि रंगीबेरंगी वस्तू तयार करण्यात येऊ लागल्या. या वस्तूंना बाजारपेठेत चांगली मागणी येऊ लागली. पुढील काळात नव्या वस्तू बाजारपेठात आल्याने उत्पादनावर त्याचा प्रतिकूल परिणाम झाला. परंतु मिशनऱ्यांनी आपले उत्पादन अधिक चांगल्या प्रकारे कसे होईल याकडे लक्ष देण्याचा प्रयत्न केला. मिशन दवाखान्यात परिचारिकांची गरज अधिक प्रमाणात असे. सुरुवातीच्या काळात परिचारिका म्हणून काही महिला मिशनऱ्यांनी मोलाची कामगिरी केली. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन स्थानिक महिलांनीही परिचारिकेचे कार्य करण्यात समाधान मानले. काही मिशन दवाखान्याच्या ठिकाणी परिचारिका प्रशिक्षण केंद्रांची उभारणी झाली. याबाबत मिशनऱ्यांचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले.

### ८) कामगारांसाठी कार्य

मिशनऱ्यांनी कामगारांसाठी काही विधायक उपक्रम राबविले. सोलापूरसारख्या ठिकाणी कामगारांची संख्या अधिक होती. म्हणून त्यांनी कामगार वस्तीत कामगारांसाठी उपयुक्त ठरणारे केंद्र

सुरू केले. या केंद्रांमध्ये कामगारांच्या मुलींसाठी व कुटुंबासाठी आरोग्य केंद्र व लहान मुलांसाठी पाळणाघराची व्यवस्था केली. तसेच महिला साक्षर होण्यासाठी प्रौढ शिक्षणवर्गाची व्यवस्था केली. जे कामगार शेतीशी संबंधित होते त्यांच्यासाठी विहीर खणणे, बी उत्पादन, पाणी उपसाकेंद्र उभारणे इत्यादीची व्यवस्था केली. मिशनऱ्यांचे हे कार्य सुरू असताना त्यांना शासनाकडूनही काहीवेळा मदत होत असे.

थोडक्यात, मिशनऱ्यांनी आपल्या कार्यास प्रारंभ करताना केवळ धर्मप्रसारासाठी प्रयत्न केले नाहीत. मिशनऱ्यांनी धर्मप्रसार महत्त्वाचा मानला असला तरी त्यांनी समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. मिशन शैक्षणिक केंद्रात (शाळांत) शिक्षण घेतलेल्या अनेक मंडळींनी नंतरच्या काळात विविध क्षेत्रांत महत्त्वाचे कार्य केले. काहींनी राजकीय तर काहींनी सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात मोलाची कामगिरी केली. मिशनऱ्यांनी सुरू केलेले दवाखाने हे सुद्धा पुढील काळात समाजास दिशादर्शक ठरले.

**मिशनऱ्यांचे धर्मप्रसाराचे कार्य**

भारतात आलेल्या बहुतेक सर्व मिशनऱ्यांनी धर्मप्रसाराला अधिक महत्त्व दिले होते. परंतु सुरुवातीच्या काळात धर्मप्रसार करणे मिशनऱ्यांना तितकेसे सोपे झाले नाही. प्रारंभीच्या काळात येथील हवामानामुळे अनेक मिशनऱ्यांचे निधन झाले. निधन पावलेल्या मिशनऱ्यांच्या संख्येइतके देखील स्थानिक लोक ख्रिस्ती झाले नाहीत. कारण येथील सामाजिक व धार्मिक परिस्थिती अत्यंत ताठर असल्यामुळे धार्मिक बदल या जनतेस सहन होणारा नव्हता. मुंबईत आलेल्या मिशनऱ्यांने पहिला बाप्तिस्मा एका आफ्रिकन मुलाला केले. यानंतर उमाजी गोविंद या नावाच्या मराठी माणसाने ख्रिस्ती धर्म स्वीकारला. याचा अर्थ ख्रिस्ती धर्म स्वीकारणाऱ्यांची संख्या प्रारंभीच्या काळात अत्यंत नगण्य होती. मिशनऱ्यांनी पुढील काळात पुणे, अहमदनगर, वडाळा, सातारा, सोलापूर, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी मिशन केंद्राची उभारणी केली. पण तेथेही धर्मप्रसाराचे कार्य फार मोठ्या प्रमाणात होऊ शकले नाही. कोल्हापूर येथे रेव्ह रॉयल वायल्डर यांचे आगमन सन १८५२ मध्ये झाले. पुढील पाच वर्षाच्या काळात कोल्हापुरात आठ शाळा सुरू केल्या. पण या काळात एकाही व्यक्तीने ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला नाही. याला येथील समाजव्यवस्था व धर्मव्यवस्था कारणीभूत ठरली.

ख्रिस्ती मिशनऱ्यांनी पुढील काळात शहरांप्रमाणे ग्रामीण भागातही आपल्या कार्यास प्रारंभ केला. त्याकाळात ब्रिटिशांची राजवट असल्याने मिशनऱ्यांना समाजाकडून फारसा विरोध होत नसला तरी समाजाचा ख्रिस्ती धर्माकडे पाहाण्याचा दृष्टिकोन अनुकूल नव्हता. याकाळात कनिष्ठवर्ग अत्यंत हलाखीचे जीवन जगत होता. म्हणून मिशनऱ्यांनी यावर्गाला जागृत करायचा प्रयत्न केला. त्यांना

शिक्षणाच्या मदतीने नवा मार्ग दाखविण्याचा प्रयत्न सुरू झाला. परंतु ख्रिस्ती झालेल्यांची संख्या पाहिली तर मिशनऱ्यांच्या प्रयत्नांना फार यश आले नव्हते. सन १९४७ पर्यंत भारतावर ब्रिटिशांची राजवट होती आणि मिशनऱ्यांना राजकीय पाठबळ प्राप्त करणे फारसे कठीण नव्हते. परंतु त्यांनी बळाचा मार्ग स्वीकारून धर्मांतर घडवून आणले नाही. या मिशनऱ्यांसमोर पोर्तुगीजांचे उदाहरण होते. पोर्तुगीजांनी आक्रमक धोरण स्वीकारून धर्मांतर घडवून आणले होते. त्यांचे अनुकरण मिशनऱ्यांना करावयाचे नव्हते. समाजात जागरूकता निर्माण झाल्यानंतर आणि ही जागरूकता शिक्षणाने होईल, त्याद्वारे येथील समाजाला आपल्या धर्मातील व समाजातील उणीवा आढळून येतील आणि तो आपल्या इच्छेप्रमाणे धर्म बदलेल अशी मिशनऱ्यांची समजूत होती. म्हणून त्यांनी सामाजिक व धार्मिक प्रबोधनाद्वारे जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. विष्णू भास्कर करमरकर, रामकृष्ण विनायक मोडक, नारायण शेषाद्री, बाबा पद्‌मनजी, नीळकंठ शास्त्री गोरे, पंडिता रमाबाई, नारायण वामन टिळक इत्यादी महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्यक्तींनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला होता.

थोडक्यात, आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक जडणघडणीत प्रारंभीच्या काळात ज्या घटकांनी महत्त्वपूर्ण कार्य केले त्यामध्ये ख्रिस्ती मिशनऱ्यांचा क्रमांक वरचा होता. त्यांनी आद्य समाजसुधारक म्हणून बजावलेली भूमिका खरोखरच नंतरच्या समाजसुधारकांना प्रेरणा देणारी ठरली. त्यांच्या प्रयत्नांमुळेच जुन्या व्यवस्थेत काही प्रमाणात सुधारणा झाली. त्यांनी येथील समाज का मागासलेला आहे याचे अचूक निदान केले. त्यासाठी त्यांनी पर्याय शोधून काढले. त्यांनी शिक्षण प्रसाराला अधिक प्राधान्य दिले. प्रादेशिक अथवा इंग्लिश भाषेत शिक्षण अशा प्रकारचा वाद निर्माण न करता येथील समाजशिक्षणासाठी कसा प्रयत्न करता येईल याकडे लक्ष दिले. त्यांना मिळणाऱ्या आर्थिक मदतीतील जास्तीत जास्त पैसा शिक्षणासाठी खर्च केला. त्यामुळे काहीवेळा त्यांच्या मुख्य कार्यालयाकडून याबाबत विचारणा होत असे. मुख्य कार्यालयाकडून अधिक प्रमाणात धर्मप्रसाराची मागणी होत असे. परंतु 'कृत्रिम' स्वरूपाचे धर्मप्रसार अनेक मिशनऱ्यांना मान्य नव्हते. म्हणून येथील समाज उदारमतवादी विचारांचा बनल्यानंतर धर्मप्रसाराचे कार्य शक्य होईल असे त्यांना वाटे. परंतु तसा त्यांनी केलेला प्रयत्न फारसा यशस्वी झाला नाही. ख्रिस्ती झालेल्यांची संख्या फार मोठी नव्हती.

ख्रिस्ती मिशनऱ्यांबाबत सतत उलट-सुलट स्वरूपाची मते मांडली जातात. मिशनऱ्यांनी धार्मिक बाबतीत समाजात दुरावा निर्माण केला असे मत मांडणाऱ्या काही व्यक्ती होत्या. परंतु मिशनऱ्यांनी अत्यंत मागासलेल्या भागात महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. तेथील समाजात जागृती निर्माण करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा त्यांचा प्रयत्न खरोखरच महत्त्वाचा होता. त्यांच्या कार्याचे महत्त्व विशद करताना 'मुंबईचे वर्णन' या नावाच्या ग्रंथात गोविंद नारायण माडगावकर म्हणतात ''ज्या अडचणी

मिशनरी लोकांस भारत खंडात राहण्यास प्राप्त जाहल्या त्याचा शतांश जरी आमच्या एखाद्या धर्माभिमानी पुरूषास प्राप्त झाल्या असत्या तर त्याने केव्हाच गाशा गुंडाळून काशी यात्रेची वाट धरली असती. परंतु मिशनरी लोकांस ज्या अडचणी प्राप्त झाल्या त्याच त्यांच्या भरभराटीस कारणीभूत झाल्या''.

## स्वयं अध्ययन प्रश्न - १

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आपल्या धर्माच्या प्रसारासाठी कोणते मासिक सुरू केले ?

२. ख्रिस्ती धर्मातील प्रमुख दोन पंथांची नावे सांगा.

३. कोल्हापूर येथे रेव्ह रॉयल वायल्डर यांच्या काळात किती शाळा सुरू झाल्या ?

४. ख्रिस्ती मिशनऱ्यांना भारतात धर्मप्रसार करण्याची परवानगी कोणत्या कायद्याने मिळाली ?

५. ख्रिस्ती धर्माचा प्रमुख धर्मग्रंथ कोणता ?

६. डॉ. विल्यम वॉनलेस यांनी मिरज येथे कोणते हॉस्पिटल सुरू केले ?

७. ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणाऱ्या व्यक्तींना काय म्हणतात ?

८. मराठी भाषेच्या शब्दकोशाची निर्मिती कोणी केली ?

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१. गोविंद नारायण माडगावकर यांनी .......... हा ग्रंथ लिहिला.

(अ) मुंबईचे वर्णन　　(ब) येशूचे चरित्र

(क) अस्पृश्यता निवारण　　(ड) अरूणोदय

२. अमेरिकन मराठी मिशनचे प्रमुख केंद्र ........ येथे होते.

(अ) सातारा　　(ब) पुणे　　(क) अहमदनगर　　(ड) सोलापूर

३. मराठी संत वाङ्मयाचा अभ्यास ......... या मिशनऱ्याने केला.

(अ) कॅरे　　(ब) रेव्हरंट जस्टिस ॲबट

(क) बाबा पद्मनजी　　(ड) पंडिता रमाबाई

४. द सोसायटी फॉर प्रमोटिंग ख्रिश्चन नॉलेजची स्थापना ...... या देशात झाली.

(अ) फ्रान्स (ब) डेन्मार्क (क) इंग्लंड (ड) अमेरिका

५. १९२० पर्यंत मुंबई येथे ख्रिस्ती मिशनची ........ केंद्रे होती.

(अ) ५ (ब) ९ (क) ७ (ड) १०

६. ....... यांनी अहमदनगर भागात प्राथमिक शिक्षणाबाबत मूलगामी स्वरूपाचे धोरण स्वीकारले.

(अ) डॉ. वानलेस (ब) ॲबेकॅरे (क) जस्टिस ॲबर्ट (ड) कुमारी फेरार

## ३.२.२ स्त्री मुक्ती

**प्रस्तावना**

स्त्री व पुरूष हे समाजव्यवस्थेचे अत्यंत महत्त्वपूर्ण दोन घटक आहेत. समाजाचे सातत्य टिकवून ठेवण्यासाठी स्त्री-पुरूष दोघांचीही गरज आहे. स्त्री आणि पुरूष हा भेद नैसर्गिक आहे. परंतु मानवी इतिहासाच्या वाटचालीत स्त्री म्हणून स्वतंत्र अस्तित्व न मानता तिच्याकडे पुरूष केंद्रित दृष्टिकोनातून पाहिले गेले. त्यामुळे समाजात स्त्रीला दुय्यम स्थान मिळाले. स्त्री ही कोणातरी पुरूषांची मुलगी, बहिण, पत्नी, माता, आजी म्हणूनच जीवन जगत राहिली. वंश निर्मिती व वंश सातत्यात स्त्रीचे स्थान नेहमीच दुय्यम राहिले आहे. या काळात महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात समानता, सामाजिक एकता यासारख्या विचारांचे अस्तित्वही नव्हते. तर जातिसंस्था, अस्पृश्यता, बालविवाह, बाल-जरठ विवाह, बहुपत्निकत्व, विधवा केशवपन, सती अशा अनेक अनिष्ठ परंपरा प्रचलित होत्या. स्त्रियांना सामाजिक जीवनात कोणतेही स्वतंत्र स्थान नव्हते. केवळ एक उपभोगाची वस्तू किंवा घरातील एक हक्काचा गुलाम म्हणूनच स्त्रीकडे पाहिले जात होते.

तथापि, एकोणिसाव्या शतकात स्त्री सुधारणेस प्रारंभ झाला. या काळात महिलांच्या बाबतीत जेवढ्या सुधारणा झाल्या तेवढ्या सुधारणा या पूर्वीच्या काळात झालेल्या नव्हत्या. ब्रिटिशांच्या राजवटीमुळे या काळात. सामाजिक, धार्मिक व राजकीय प्रबोधनास सुरुवात झाली. भारतात स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचार व शोषणाकडे लक्ष वेधले गेले. बंगाल व महाराष्ट्रातील सुशिक्षित तरूण वर्ग आपल्या समाजातील वाईट प्रथांकडे चिकित्सकदृष्टीने पाहू लागला. इंग्रजांच्या संपर्कात आलेल्या तरूणांमध्ये वैचारिक बदल होऊ लागला. त्यामुळे धर्मसुधारणा व स्त्रीसुधारणा चळवळीकडे त्यांचे लक्ष वेधले गेले.

## १९ व्या शतकाच्या प्रारंभीची महाराष्ट्रातील स्त्रियांची स्थिती

१९ व्या शतकातील महाराष्ट्रातील स्त्री जीवन अत्यंत करूणाजनक होते. पुरूषप्रधान कुटुंब व्यवस्थेत स्त्रीचे स्थान दुय्यम होते. महाराष्ट्राच्या इतिहासात राधाबाई, गोपिकाबाई, अहिल्याबाई यासारख्या स्त्रियांची नावे गाजली असली तरी महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात स्त्रियांना प्रतिष्ठा नव्हती. आपले मत व्यक्त करण्याचा, सल्ला देण्याचा, कौटुंबिक निर्णय घेण्याचा तिला अधिकार नव्हता. स्त्रीला शिक्षणाचा अधिकार नव्हता. बालविवाहाची पद्धत रूढ होती. वयाच्या आठव्या वर्षातच मुलींचा विवाह केला जात असे. बालविवाहामुळे अनेक स्त्रियांना वैधव्य प्राप्त होई. विधवा स्त्रीला केशवपन करावे लागत असे. व्रतवैकल्ये व अनेक बंधनांचे पालन करीत जीवन जगावे लागत होते. बंधनांचे पालन न केल्यास, बदकर्म केल्यास तिला कठोर शिक्षा केली जात होती. बहुपत्निकत्वाची पद्धत प्रचलित असल्याने पुरूष कोणत्याही वयात कितीही लग्ने करीत असे. नाना फडणीस साठाव्या वर्षी वारले. त्यावेळी त्यांच्या नऊ बायकांपैकी सर्वात लहान बायकोचे वय नऊ वर्षाचे होते. महादजी शिंदेनी एका बालिकेशी विवाह केला होता. माणुसकीला काळीमा फासणारी सतीची पद्धत समाजात प्रचलित होती. पुरूषाचा मृत्यूनंतर स्त्रीने जगणे पाप समजले जात होते. त्यातून सतीच्या प्रथेला प्रोत्साहन मिळाले. दहा-बारा वर्षाच्या मुलीलाही सती जावे लागत होते. कित्येकदा या स्त्रियांना जबरदस्तीने सती जाण्यास भाग पाडत असत. थोडक्यात, या काळात महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात स्त्रीला कोणतेही स्वातंत्र्य नव्हते. तिचे जीवन अत्यंत निकृष्ट दर्जाचे व हलाखीचे होते.

## स्त्री स्वातंत्र्याची चळवळ

पाश्चात्य देशांतही स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचे हक्क मिळावेत म्हणून १८ व्या शतकापासून विशेष प्रयत्न झाले होते. युरोपात १८ व्या शतकातील वैचारिक प्रबोधनाने धार्मिक विचारांवर हल्ला चढविला. या प्रबोधनातून स्त्री स्वातंत्र्याची चळवळ उदयास आली. ईश्वर हा सर्व प्रकारच्या ज्ञानाचा स्त्रोत आहे हा विचार वैचारिक प्रबोधनाच्या विचारवंतानी अमान्य केला. हिप्पल (Hippal) यांनी 'ऑन द सिव्हिल इम्प्रव्हमण्ट ऑफ वुमेन' हा ग्रंथ १७४४ मध्ये प्रकाशित केला. त्यांने या ग्रंथात स्पष्ट केले की, 'स्त्रियांच्या क्षमता पुरूषांप्रमाणेच आहेत. त्यांना दुर्लक्षितच केले नाही तर जाणून बुजून दाबून ठेवले'. थोडक्यात, मानव प्राणी (स्त्री-पुरूष) समान आहेत असा विचार हिप्पलने मांडला. युरोपमध्ये स्त्रीवादी प्रेरणा आणि विकासामध्ये वैचारिक प्रबोधन, फ्रान्सची क्रांती याप्रमाणे प्रोटेस्टॅण्ट पंथाची सामाजिक विचारसरणीही महत्त्वाची होती. जॉन स्टुअर्ट मिल यांनी 'द सब्जेक्शन ऑफ वुमेन' (The Subjection of Women) हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथातील विचारसरणीचा परिणाम जगातील सर्व सुशिक्षित स्त्रियांवर झाला. हा ग्रंथ इंग्लड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, स्वीडन, डेन्मार्क इत्यादी

देशातील विविध भाषांमध्ये अनुवादीत झाला. मानवी समाजाच्या पूर्ण विकासासाठी महिलांना पूर्ण समता असणे आवश्यक असल्याचे मत मिल यांनी मांडले.

### भारतातील स्त्री सुधारणा

१९ व्या शतकात ब्रिटिशांचा अंमल हिंदुस्थानात प्रस्थापित होऊन भारत पारतंत्र्यात जखडला गेला. भारतात इंग्रजी अंमल प्रस्थापित होईपर्यंत स्त्रियांचा दर्जा मध्ययुगीन काळाप्रमाणेच होता. स्त्री सुधारणेच्यादृष्टीने कोणतेही प्रयत्न झाले नव्हते. याच काळात व्यक्तीस्वातंत्र्य, समानता, बंधुभाव, बुद्धिवाद, लोकशाही, उदारमतवाद इत्यादी युरोपियन नवविचारांचे प्रवाह इंग्रजी भाषेच्या मदतीने आपल्याकडे आले. इंग्रजी भाषेचे ज्ञान आत्मसात केलेली नव सुशिक्षितांची एक पिढी निर्माण झाली. त्यांना आपल्या समाजाकडे पाहायची एक नवी दृष्टी प्राप्त झाली. यातूनच आपला धर्म, चालरीती, परंपरा या नावाखाली आपण आपल्याच बांधवांवर काय-काय अन्याय करतो याचे हृदयद्रावक चित्र त्यांच्या डोळ्यासमोर उभे राहिले. आपल्या समाजातील अमानुष, अनिष्ठ चालरीती बंद झाल्या पाहिजेत असे त्यांचे ठाम मत बनले. त्याचबरोबर भारतीय स्त्रीची निकृष्ट अवस्था त्यांच्या डोळ्यासमोर उभी राहिली. स्त्री जातीला अशा जाचातून, छळातून आणि गुलामगिरीतून मुक्त करून तिला समाजात प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी समाजसुधारकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले.

### महाराष्ट्रातील स्त्री मुक्तीसाठी झालेले प्रयत्न

#### १) अमानुष सती प्रथेस विरोध

भारतात प्राचीन काळापासून सतीची चाल रूढ असल्याचे पुरावे मिळतात. सती प्रथेचा उल्लेख ऋग्वेदात आला आहे. पण त्याकाळात सतीची चाल रूढ नव्हती. पुराणकाळात सतीच्या चालीचे उदात्तीकरण करण्यात आले. स्त्रीने सती गेल्यास स्वत:ला व पतीला स्वर्गात स्थान मिळते. तिच्या पूर्वजांचा उद्धार होतो. सतीच्या व पतीच्या पापांचे संपूर्ण क्षालन होते अशी आकर्षक व फलदायी पारलौकिक फळे तिच्या समोर ठेवली जात असत. सती न जाणाऱ्या स्त्रियांना अत्यंत खडतर जीवन जगावे लागत असे. समाजाच्या व घराण्याच्या खोट्या प्रतिष्ठेसाठी आणि विधवांचा इस्टेटीतला हक्क डावलण्यासाठी विधवा स्त्रियांना सती जाण्यास भाग पाडत. पतीच्या चितेवरच तिला जिवंत जाळले जात असे. जळत असतानाच्या वेदनांनी तिने फोडलेल्या आर्त किंकाळ्या ऐकू येऊ नयेत म्हणून मोठमोठ्याने ढोल, नगारे व शंख वाजविले जात. आधुनिक भारताचे जनक राजाराम मोहन रॉय यांच्या घरातच अशा प्रकारचा अघोरी प्रकार घडला होता. त्यामुळे त्यांचे मन द्रवले. ही अमानुष

चाल बंद करण्यासाठी त्यांनी प्रबोधन सुरू केले. त्यावेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिंग यांची त्यांना साथ मिळाली व सती बंदीचा कायदा अस्तित्वात आला. राजाराम मोहन रॉय यांना हिंदूधर्म मार्तंडाचा खूप विरोध झाला. पण रॉय यांनी कंपनी सरकारचे व गव्हर्नर जनरल बेंटिंगचे सहकार्य मिळविले. लॉर्ड बेंटिंग यांनी ४ डिसेंबर १८२९ रोजी कायद्याने भारतातील सती प्रथेवर बंदी घातली. विधवेचे मन वळविणारे, तिच्यावर सती जाण्यास जबरदस्ती करणारे, तसेच सती जाण्याच्या कार्यक्रमाच्या वेळी हजर राहणारे सर्व खून करण्यासारख्या गुन्ह्यास पात्र ठरतील असा कायदा केला. पेशवाईत ही प्रथा प्रतिष्ठेची मानली जात होती. त्या प्रथेस आळा बसला तरी जनमानसावर धर्माचा जास्त पगडा असल्याने अनेक स्त्रिया स्वत:हून सती जात असत.

## २) विधवा पुनर्विवाह

विशिष्ट परिस्थितीत हिंदू विधवेस पुनर्विवाहाची संमती हिंदूधर्म ग्रंथानीच दिली आहे. पण याचा समाजास विसर पडला. समाज परंपरांचा गुलाम बनला आणि उच्चवर्णीय हिंदू समाजात विधवांच्या पुनर्विवाहास बंदी घातली. एखाद्या विधवेचा पुनर्विवाह झाल्यास तिला होणारी मुले अनौरस मानली जात. राजाराम मोहन रॉय यांच्या ब्राम्हो समाजाने विधवा पुनर्विवाह चळवळ सुरू केली. विधवेच्या विवाहास कायद्याने मान्यता द्यावी अशी मागणी केली. सनातनी उच्चवर्णीयांनी विधवा पुनर्विवाहास टोकाचा विरोध केला. यावेळी ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी विधवा पुनर्विवाहाचे जोरदार समर्थन केले. विधवांच्या पुनर्विवाहास धर्मशास्त्रांचे आधार दाखवून दिले. २९ जुलै १८५६ मध्ये 'हिंदू विवाह कायदा समिती' स्थापन करून कंपनी सरकारने हिंदू पुनर्विवाहचा कायदा पास केला. या कायद्याने विधवांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार प्राप्त झाला. विष्णुशास्त्री परशुरामशास्त्री पंडितांनी डिसेंबर १८६५ रोजी मुंबईत विधवाविवाह मंडळाची स्थापना केली. या मंडळाच्यावतीने १५ जून १८६९ रोजी पहिला पुनर्विवाह घडवून आणला. सन १८७४ मध्ये विष्णुशास्त्री विधूर झाले. त्याच वर्षी त्यांनी स्वत: विधवेशी विवाह केला. डॉ. रा. गो. भांडारकर यांनी आपल्या विधवा झालेल्या शांता या कन्येचा पुनर्विवाह करून आपण बोलघेवडे सुधारक नाही तर कर्ते सुधारक आहोत हे दाखवून दिले. महात्मा जोतिबा व सावित्रीबाई फुले यांचे विधवा पुनर्विवाहाच्या बाबतीत मोलाचे योगदान ठरले. विधवा स्त्रियांच्या जीवनात पुन्हा आनंद निर्माण करणेसाठी महात्मा फुले दाम्पत्याने विधवा पुनर्विवाहचा पुरस्कार केला. ८ मार्च १८६४ रोजी एका शेणवी विधवा विधुरांचा पुनर्विवाह नातू बागेत घडवून आणला.

## ३) बालविवाह प्रथेस विरोध

मुलींचा जन्म हा हिंदू वा मुस्लिम समाजात अप्रिय असे. मुलीचा जन्म म्हणजे आपत्ती वाटत असे. मुलगी ही आई-बापांच्या डोक्यावरचे ओझे समजले जात असे. म्हणून मुलीचा विवाह आठ वर्षाच्या आतच केला जात असे. काही ठिकाणी मुलगीचा पाळण्यात असतानाच विवाह केला जात असे. बालविवाहामुळे अनेक स्त्रियांना वैधव्य प्राप्त होत असे. अशा स्त्रियांना अत्यंत हलाखीचे जीवन

जगावे लागत असे. विधवा स्त्रियांना केशवपन करावे लागत असे. व्रतवैकल्ये व अनेक बंधनांचे पालन करीत जीवन जगावे लागत असे. बालविवाह प्रथेवर पंडिता रमाबाई (१८८७-८८) यांनी 'द हाय कास्ट हिंदू वुमन' हे पुस्तक लिहिले. ११ मार्च १८८९ रोजी मुंबई येथे 'शारदा सदनची' स्थापना केली. केशवपनाच्या प्रथेविरूद्ध त्यांनी लढा दिला. २४ सप्टेंबर १८९० रोजी पुण्याजवळ केडगाव येथे मुक्तिसदनची स्थापना केली. कृपासदन, शांतिसदन, प्रीतिसदन या सदनांच्या माध्यमातून त्यांनी अनाथ व विधवा महिलांच्या कल्याणाचे कार्य केले.

### ४) स्त्री शिक्षण

भारतीय समाजाने स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारला होता. स्त्रियांना समतेपासून वंचित ठेवण्यात आले होते. व्यक्तीच्या जीवन विकासासाठी शिक्षण आवश्यक असून ते सर्व सुधारणांचे मूळ असल्याचे समाजसुधारकांनी जाणले होते. म्हणून समाजसुधारकांचे स्त्री शिक्षणाकडे लक्ष वेधले गेले. स्त्री शिक्षणाचे पहिले प्रयत्न ब्रिटिश राजवटीच्या सुरवातीच्या काळात मिशनऱ्यांनी केले. सन १८१५ मध्ये मुंबई शहरात अनाथ मुला-मुलींसाठी एक प्राथमिक शाळा सुरू केली. त्यानंतर सन १८१९ मध्ये पहिली मिशनरी शाळा कोलकत्ता येथे सुरू झाली. या शाळेत काही मुलींनाही प्रवेश दिला. १८२४ मध्ये ख्रिस्ती मिशनऱ्यांनी मुलींची शाळा सुरू केली. सन १८३४ मध्ये कोलकत्यास मिशनऱ्यांनी चालविलेल्या तीन शाळा होत्या.

महाराष्ट्रात महात्मा फुले यांनी १ जानेवारी १८४८ रोजी पुण्याच्या बुधवार पेठेत मुलींची शाळा सुरू केली. या शाळेने भारतीय स्त्री शिक्षणाचा पाया घातला. या शाळेत पहिल्या शिक्षिका व पहिल्या मुख्याध्यापिका म्हणून सावित्रीबाई कार्य करू लागल्या. सन १८४८-१८५२ या काळात जोतीबा व सावित्रीबाई फुले यांनी पुणे व पुण्याबाहेर १८ शाळा सुरू केल्या. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी पुण्याजवळ हिंगणे येथे १८९९ मध्ये महिलाश्रमाची स्थापना केली. सन १९०७ मध्ये हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेची स्थापना केली. २० जून १९१६ रोजी कर्व्यांनी महिला विद्यापीठाची स्थापना केली. त्याचबरोबर पंडिता रमाबाई यांनी स्त्री शिक्षणाच्या व अनाथ महिलांच्यादृष्टीने महत्त्वपूर्ण कार्य केले.

### ५) केशवपन प्रथेस विरोध

या काळात समाजात केशवपनाची पद्धत होती. एखाद्या स्त्रीचा पती मेल्यानंतर त्या स्त्रीचे मुंडन केले जात होते. तिला पांढरी वस्त्रे नेसावी लागत होती. अलंकार वापरण्यास परवानगी नव्हती. तिने घराबाहेर पडावयाचे नाही. तिचे दर्शन अशुभ मानले जात असे. या अमानुष प्रथेविरूद्ध महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी क्रांतिकारक स्वरूपाचे कार्य केले. त्यांनी या घातक प्रथेविरूद्ध पुण्यातील नाभिकांचा संप घडवून आणला आणि या अमानुष प्रथेविरूद्ध आवाज उठविला.

## ६) जरठ-कुमारी विवाहास विरोध

जरठ-कुमारी विवाह म्हणजे वयाने वधुपेक्षा जास्त असणाऱ्या किंवा म्हाताऱ्या वराबरोबर केला जाणारा विवाह होय. आपली मुलगी श्रीमंत घरात सुखाने जगेल म्हणून श्रीमंत असलेल्या म्हाताऱ्या नवऱ्याशी तिचा विवाह लावून दिला जात होता. पेशवाईच्या काळात अशी अनेक उदाहरणे सापडतात. उदा. नाना फडणीस वयाच्या साठाव्या वर्षी वारले. त्यावेळी त्यांच्या नऊ बायकांपैकी सर्वात लहान बायकोचे वय नऊ वर्षाचे होते. या जरठ-कुमारी विवाहामुळे समाजात विधवांचे प्रश्न निर्माण होत असत. या जरठ-कुमारी विवाहास समाजसुधारकांनी विरोध करून समाजात जागृती घडवून आणली.

## ७) बहुपत्निकत्वाला विरोध

यावेळी समाजात बहुपत्निकत्वाची पद्धत अस्तित्वात होती. एका पेक्षा जास्त बायका असणे समाजामध्ये मोठेपणाचे लक्षण समजले जात होते. श्रीमंत कुटुंबातील पुरूषांना याचा शौक होता. अंगवस्त्र बाळगल्याने आपली प्रतिष्ठा वाढते असे श्रीमंताना वाटत होते. समाजसुधारकांनी या प्रथेस विरोध केला. महात्मा फुले यांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांनी दुसरे लग्न केले नाही. तर त्यांनी एका विधवेच्या मुलास दत्तक घेतले. त्यांनी बहुपत्निकत्वाचे दुष्परिणाम समाजाला समजून सांगण्याचा प्रयत्न केला.

## स्त्री मुक्तीसाठी कार्य करणारे समाजसुधारक

### ● महात्मा फुले (१८२७ ते १८९०)

हिंदुस्थानातील सामाजिक गुलामगिरीविरूद्ध बंड पुकारणारे, बहुजन समाजात आत्मविश्वास निर्माण करणारे, स्वातंत्र्य, समता व बंधुता या त्रयींवर नितांत विश्वास असणारे, प्राचीन काळापासून चालत आलेली वाट बदलणारे, शेतकरी, कष्टकरी यांच्या दु:खाचे, दारिद्र्याचे निवारण करणारे, चातुर्वर्ण्य व जातिभेदावर कडाडून हल्ला करणारे, क्रांतीची तुतारी फुंकणारे आणि बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी आग्रह धरणारे महात्मा जोतिबा फुले हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील पहिले थोर पुरूष होत. त्यांनी स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी, त्यांच्यावरील इतर जाचक अटी नष्ट करण्यासाठी, त्यांना रूढी परंपरेच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी स्त्री उद्धाराचे कार्य हाती घेतले. स्त्रियांना सर्व प्रकारच्या बंधनात जखडून ठेवले होते. त्यांना सर्व प्रकारचे हक्क नाकारले होते. स्त्रियांना समाजात सन्मानाची वागणूक मिळावी यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. त्यामुळे स्त्री मुक्ती चळवळीचे अग्रणी म्हणून महात्मा फुले यांना ओळखले जाते.

जोतिबांचे पूर्वज सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील कटगुण गावचे गोऱ्हे फुलमाळी होते. पुढे फुले घराणे व्यवसायानिमित्त पुण्यास स्थायिक झाले. फुरसुंगीचे क्षीरसागर व नायगावचे नेवासे यांचा जुना नातेसंबंध होता. धनकवडीच्या पाटलांच्या धोंडाबाई आणि चिमणाबाई या दोन मुली होत्या. चिमणाबाई यांचा विवाह पुण्यातील गोविंदराव फुले यांच्याशी झाला होता. सगुणा जोतिरावांच्या मावस बहिण होत्या. सावित्रीबाई धनकवडीच्या झगडे-पाटील यांच्या कन्या होत. सावित्रीचा जोतिबांशी विवाह नायगाव येथे इ.स. १८४० मध्ये झाला.

**स्त्री शिक्षण**

शिक्षण हे समाजक्रांतीचे एक प्रमुख साधन आहे. मानवी हक्क आणि कर्तव्य यांची जाणीव करून देण्याचे माध्यम शिक्षण आहे. जोतिबांनी समाजक्रांतीचे पहिले शस्त्र म्हणून स्त्री शिक्षण हाती घेतले. स्त्रीने शिक्षण घेतले तर तिला अकाली वैधव्य येईल, ती कुमार्गाला लागेल, पापाचरण करील व घराचे वाटोळे होईल अशी त्यावेळची समजूत होती. म्हणून स्त्रियांना शिक्षण देणे हे त्याकाळातील सनातनी लोकांना भ्रष्टाचार व महापातक वाटे. म्हणून स्त्रियांना शाळेचे दरवाजे बंद केले होते.

महात्मा फुले यांनी सनातनी लोकांच्या मतांचा धिक्कार करून महाराष्ट्रात प्रथम स्त्रीस शाळेचा दरवाजा उघडून दिला. स्त्री शिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलांचे शिक्षण होय. आपण जर एखाद्या पुरूषाला शिक्षण दिले तर ते एका व्यक्तीला दिल्यासारखे आहे. परंतु एखाद्या स्त्रीला शिक्षण दिले तर ते सर्व कुटुंबाला दिल्यासारखे आहे. हे ओळखून जोतिबांनी स्त्री स्वातंत्र्यासाठी व स्त्री शिक्षणासाठी आग्रह धरला. आपल्या देशाचे हित साधावयाचे असेल तर ते स्त्री शिक्षणावाचून साधणार नाही हा विचार महात्मा फुलेंच्या मनात बिंबला. कुमारी फेरारबाईमुळे या विचाराला चालना मिळाली.

महात्मा जोतिबा फुले यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व जाणून सन १८४८ मध्ये पुण्याच्या बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. या शाळेत स्वत: जोतिबा शिक्षक म्हणून काम करत असत. त्याकाळी मुलींच्या शाळेत काम करण्यासाठी दुसरा शिक्षक मिळत नव्हता. म्हणून जोतिबांनी आपली अशिक्षित पत्नी सावित्री यांना प्रथम घरीच लिहिण्या-वाचण्यास शिकविले. त्यानंतर पुण्यातील नॉर्मल स्कूलमध्ये सावित्रीबाई आणि सगुणाबाई यांना दाखल केले. नॉर्मल स्कूलच्या प्रमुख मिचलेबाईनी या दोघींची कडक परीक्षा घेतली. या परीक्षेत त्या यशस्वी झाल्या. त्यामुळे त्यांना नॉर्मल स्कूलच्या तिसऱ्या वर्गात प्रवेश मिळाला. सन १८४७ मध्ये त्यांनी आपला अभ्यासक्रम पूर्ण केला. पुढे सन १८४९ मध्ये सावित्रीबाईनी अहमदनगरच्या कुमारी फेरारबाईंच्या शाळेत शिक्षिकेचे प्रशिक्षण घेतले. सावित्रीबाई पुण्याच्या शाळेत शिक्षिका म्हणून काम करत असताना त्यांना सनातन्यांकडून फार त्रास सहन करावा लागला. शाळेत जाता-येता त्यांच्या अंगावर चिखल फेकणे, घाण टाकणे,

दगड मारणे, अपशब्द वापरणे अशा मार्गाने त्रास दिला. परंतु त्यांनी आपले कार्य नेटाने चालूच ठेवले. सनातन्यांनी चिडून सावित्रीबाईंच्या सासऱ्यांचे (गोविंदराव) कान भरून आपल्या सूनेचे काम योग्य नसून हे काम ताबडतोब बंद करण्याची समज दिली. गोविंदरावांनी सावित्रीबाईने शिक्षिकेचे काम बंद करावे किंवा घर तरी सोडावे अशी अट घातली. महात्मा फुल्यांनी घर सोडण्याचा निर्णय घेतला पण समाजसुधारणेचा मार्ग सोडला नाही.

महात्मा फुले यांनी सुरू केलेली पहिली शाळा आर्थिक अडचणींमुळे लवकरच बंद पडली. पण नाउमेद न होता ३ जुलै १८५१ रोजी बुधवार पेठेतील अण्णासाहेब चिपळूणकरांच्या वाड्यात मुलींची दुसरी शाळा सुरू केली. १७ सप्टेंबर १८५१ रोजी रास्ता पेठेत तिसरी आणि १५ मार्च १८५२ रोजी वेताळ पेठेत (आताची गुरूवारपेठ) मुलींची चौथी शाळा सुरू केली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य केले. याची दखल सरकारला घ्यावी लागली. १६ नोव्हेंबर १८५२ रोजी ब्रिटिश सरकारकडून पुणे महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य थॉमस कँडी यांच्या अध्यक्षतेखाली पुण्याच्या विश्राम बागेत त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. सन १८२४ मध्ये मिशनऱ्यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली असली तरी व्यक्तिगत पातळीवर मुलींसाठी शाळा सुरू करणारे जोतिबा हेच पहिले समाजसुधारक होत. तेच स्त्री शिक्षणाचे आद्यजनक आहेत.

### विधवा पुनर्विवाह

भारतीय समाजात त्याकाळात बालविवाह प्रथा रूढ होती. जरठ-कुमारी विवाह देखील होत असत. त्यामुळे समाजात विधवांची संख्या मोठी होती. त्यांची स्थिती अत्यंत शोचनीय होती. विधवा स्त्रियांना भोगावे लागणारे दु:ख पाहून त्यांचे मन अस्वस्थ होत असे. स्त्रियांचे हाल थांबवावेत, त्यांच्या जीवनाला चांगले वळण लागावे म्हणून जोतिबांनी विधवा पुनर्विवाहाचा धडाडीने पुरस्कार केला. त्यांनी स्वत: पुढाकार घेऊन पुण्यातील गोखल्यांच्या बागेत सन १८६४ मध्ये एक विधवा पुनर्विवाह घडवून आणला.

### बालहत्या प्रतिबंधक गृहांची स्थापना

विधवा पुनर्विवाहाची चळवळ समाजाच्या लगेच पचनी पडेल हे अवघड होते. त्याला बराच कालावधी जाणार होता. एखाद्या विधवेचे चुकून वाकडे पाऊल पडले तर संतती निर्माण होत होती. बऱ्याच वेळा अनैतिक संबंधातून बालविधवा गरोदर राहत. अशा वेळी समाजापासून स्वत:ला वाचविण्यासाठी, आपली विटंबना टाळण्यासाठी भ्रूणहत्या करत किंवा स्वत: आत्महत्या करत असत. या आपत्तीतून या स्त्रियांची सुटका व्हावी म्हणून महात्मा फुल्यांनी सन १८६३ मध्ये विधवाना गुप्तपणे येऊन बाळंत होण्यासाठी आपल्या घराशेजारी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. या गृहात बाळंतपणासाठी येणाऱ्या विधवा स्त्रियांच्या मुलांच्या पालन पोषणाची संपूर्ण जबाबदारी त्यांनी स्वीकारली.

एवढेच नव्हे तर, अशाच एका काशिबाई नावाच्या ब्राम्हण विधवेच्या पोटी जन्मास आलेल्या यशवंत नावाच्या मुलास त्यांनी स्वत: दत्तक घेतले.

**बहुपत्निकत्वाला विरोध**

याकाळात बहुपत्निकत्वाची पद्धत प्रचलित होती. ब्राम्हण व श्रीमंत लोक एकापेक्षा अनेक बायका करत. ही पद्धत स्त्रियांवर अन्याय करणारी होती. पहिली पत्नी जिवंत असताना दुसरी करणे हा अत्यंत वाईट प्रकार आहे असे महात्मा फुले यांचे मत होते. पुरूषांना एकापेक्षा जास्त बायका करण्याचा अधिकार आहे तर मग स्त्रियांनी एकापेक्षा जास्त नवरे केल्यास चुकीचे होणार नाही असे त्यांचे मत होते. या अमानुष पद्धतीस त्यांनी विरोध करून ही प्रथा बंद झाली पाहिजेत अशी आग्रही भूमिका घेतली.

अशा प्रकारे महात्मा जोतिबा फुलेनी आपल्या संपूर्ण हयातीत स्त्री उद्धार करण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब केला. बालविवाह, जरठ-कुमारी विवाह, केशवपन, सती प्रथा, वाघ्या व मुरली इत्यादी अनेक अनिष्ट प्रथांविरूद्ध महात्मा फुले व त्यांच्या अनुयायांनी चळवळी सुरू केल्या. त्यांच्या या कार्यामुळेच त्यांना स्त्रियांचे कैवारी समजले जाते.

- **महर्षी धोंडो केशव कर्वे (१८५८ ते १९६२)**

भारतात स्त्रियांच्या उद्धारासाठी ज्या महापुरूषांनी आपले आयुष्य खर्ची घातले अशा महापुरूषांपैकी महर्षी धोंडो केशव कर्वे हे एक होत.

महर्षी कर्वे यांचा जन्म १८ एप्रिल १८५८ रोजी मुरूडपासून १५ मैलांवर असणाऱ्या शेखली या गावी झाला. त्यांचे वडील अतिशय निग्रही, शांत, सत्वशील आणि दीर्घोद्योगी होते. आईचा स्वभाव थोडा रागीट, तापट असला तरी त्याची झळ इतरांना पोहचत नसे. त्यांची घरची परिस्थिती गरीबीची होती. त्यामुळे त्यांना खडतर परिस्थितीत शिक्षण घ्यावे लागले. प्राथमिक शिक्षण मुरूड येथे झाले. पुढील शिक्षणासाठी ते मुंबईला गेले. त्या ठिकाणी शिकवण्या घेऊन त्यांनी आपले शिक्षण चालू ठेवले. १८८१ मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा पास झाले. नंतर मुंबईच्या विल्सन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. एल्फिन्स्टन कॉलेज मधून १८८४ मध्ये गणित विषय घेऊन बी.ए. झाले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मुंबईत मुलींच्या हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी स्वीकारली. १५ नोव्हेंबर १८९१ रोजी ते पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणित विषयाचे प्राध्यापक म्हणून रूजू झाले. १८९२ मध्ये ते पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य बनले. फर्ग्युसन कॉलेजमध्ये १८९१ ते १९१४ अशी २३ वर्षे सेवा केली. कर्वे प्राथमिक शाळेत असताना त्यांना लाभलेले सोमण गुरूजी म्हणजे त्यांच्या मनाला सुयोग्य आकार देणारी व्यक्ती होय. समाजसेवेचा पहिला धडा कर्वेनी सोमण

गुरूजींकडूनच घेतला. समाजसुधारक रानडे, गोखले, आगरकर यांच्या कार्याचा त्यांच्या मनावर ठसा उमटला होता.

### विधवेशी विवाह

महर्षी कर्वे यांनी विधवा विवाहाचा पुरस्कार केलाच त्याचबरोबर स्वत:च्या कृतीतून समाजात आदर्श निर्माण केला. त्यांचा प्रथम विवाह ते १५ वर्षाचे असताना १८७३ मध्ये राधाबाई नावाच्या मुलीशी झाला. पण दुर्देवाने राधाबाई १८९१ मध्ये मृत्यू पावल्या. त्यावेळेच्या प्रथेप्रमाणे एखाद्या कुमारिकेशी विवाह करता आला असता. पण महर्षी कर्व्यांनी एका विधवेशी विवाह करण्याचा निर्णय घेतला. ११ मार्च १८९३ रोजी त्यांनी पंडिता मनोरमाबाई व बाळकृष्ण या जोशी दाम्पत्याच्या 'गोदुताई' नावाच्या विधवा कन्येशी विवाह केला. पंडिता रमाबाई यांच्या शारदा सदन मधील ही पहिली विधवा विद्यार्थीनी होय. पुढे त्या आनंदीबाई उर्फ बाया कर्वे म्हणून प्रसिद्धीस आल्या. या विवाहामुळे त्यांना समाजाकडून आणि जवळच्या नातेवाईकांकडूनही त्रास सहन करावा लागला. त्यांच्यावर गावकऱ्यांनी बहिष्कार टाकला. ही घटना त्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी ठरली. तेथून पुढे त्यांनी स्त्री मुक्तीसाठी आयुष्यभर कार्य करण्याचे ठरविले.

### विधवा विवाहाचा पुरस्कार

समाजात विधवांचे होत असलेले हाल, दु:ख पाहून कर्वे व्याकुळ होत असत. याकाळात विधवांचे प्रमाण मोठ्या संख्येने होते. बालविवाहाची सर्रास रूढ असलेली प्रथा आणि बालमृत्यूचे मोठे प्रमाण ही त्याची प्रमुख कारणे होती. या विधवांची स्थिती अत्यंत दुर्देवी होती. त्यांच्या घरातील माणसेही त्यांना वाईट वागणूक देत असत. समाजातील या विधवांचे दु:ख कमी करणे गरजेचे आहे असे महर्षी कर्वेना वाटत होते. म्हणून त्यांनी विधवाविवाहाचा आग्रह धरला. विधवाविवाहाला चालना मिळावी म्हणून ३१ डिसेंबर १८९३ रोजी 'विधवा विवाहोत्तेजक मंडळी' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून समाजात जागृती घडवून आणण्याचे कार्य केले. पुढे २० ऑगस्ट १८९५ रोजी या संस्थेच्या नावात बदल करून 'विधवाविवाह प्रतिबंध निवारक मंडळी' असे नामकरण केले. या संस्थेचे उद्देश पुढीलप्रमाणे होते.

१. विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन देणे.

२. विधवा पुनर्विवाहाबाबतीत समाजात जागृती करणेसाठी प्रचार दौरे काढणे, भाषणे देणे.

३. पुनर्विवाहाची इच्छा असणाऱ्यांना योग्य ती मदत करणे.

४. ज्यांचे पुनर्विवाह झालेले आहेत त्यांचे मेळावे आयोजित करणे.

५. विधवा स्त्रियांचे पुनर्विवाह घडवून आणून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे इत्यादी.

## 'अनाथ बालिकाश्रम मंडळी' संस्थेची स्थापना

समाजात विधवांना भोगावी लागणारी दु:खे कमी करण्यासाठी १४ जून १८९६ रोजी पुणे येथे पेरूच्या गेट जवळ गोरे यांच्या वाड्यात 'अनाथ बालिकाश्रम मंडळी' या संस्थेची स्थापना केली. या आश्रमाच्या कार्यास १८९९ पासून सुरुवात झाली. पुढे जून १९०० मध्ये ही संस्था पुण्याहून जवळच्याच हिंगणे या गावी स्थलांतरित केली. या संस्थेचे खालीलप्रमाणे उद्देश होते.

१. विधवा स्त्रियांना स्वावलंबी बनवून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे.

२. विधवांना शिक्षण देऊन त्यांना सुशिक्षित करणे.

३. विधवांच्या मनोवृत्तीत व विचारात सकारात्मक बदल घडवून आणणे.

४. आपले जीवन निरर्थक नसून आपणही एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहोत याची जाणीव स्त्रियांमध्ये उत्पन्न करणे इत्यादी.

या संस्थेच्या श्रीमती पार्वतीबाई आठवले, श्रीमती वेणूबाई जोशी व काशीबाई देवधर या अत्यंत जिद्दीच्या कार्यकर्त्या होत्या.

## महिला विद्यालयाची स्थापना

महिलांच्या दैनंदिन जीवनात उपयोगी पडेल आणि त्यांच्या स्वभावाला पोषक ठरेल अशा प्रकारचे शिक्षण देणाच्या उद्देशाने महर्षी कर्व्यांनी ४ मार्च १९०७ रोजी पुणे येथे 'महिला विद्यालयाची' स्थापना केली. हे विद्यालय डिसेंबर १९११ मध्ये हिंगणे येथे स्थलांतरित केले. या विद्यालयात गृहजीवनशास्त्र, आरोग्यशास्त्र, शिशु संगोपनशास्त्र यासारखे विषय शिकविले जात. जून १९१७ मध्ये त्यांनी अध्यात्मिक विद्यालय सुरू केले, तर एप्रिल १९१८ मध्ये पुणे येथे शाळेची स्थापना केली.

## निष्काम कर्ममठ

स्त्रियांच्या उद्धाराचे आणि त्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या संस्थांचे कार्य नि:स्वार्थीपणे व त्यागीवृत्तीने करणारे समाजसेवक निर्माण करण्याच्या उद्देशाने कर्वे यांनी ४ नोव्हेंबर १९०८ रोजी निष्काम कर्ममठ या संस्थेची स्थापना केली. कोणत्याही प्रकारच्या लाभाची अपेक्षा न करता कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी निर्माण करणे व त्यांना समाजसेवेचे शिक्षण देणे व त्या माध्यमातूनच स्त्री समाजाच्या सेवेचे कार्य चांगल्या प्रकारे करता येईल असा कर्वे यांना विश्वास होता.

## स्त्री शिक्षणासाठी स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना

स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे हे अत्यंत पवित्र देशकार्य आहे अशी कर्वे यांची श्रद्धा होती. स्त्रियांच्या स्वाभाविक प्रवृत्तीस पोषक ठरेल अशा प्रकारचे शिक्षण द्यावे अशी त्यांची स्त्री

शिक्षणविषयक धारणा होती. सन १९१५ मध्ये जपानमधील स्त्रियांच्या विद्यापीठाची माहिती देणारी पुस्तिका कर्वे यांना मिळाली. त्या पुस्तिकेतील विचारांनी प्रभावित होऊन आपणही स्त्रियांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करावे असे त्यांना वाटू लागले. या विचारांना मूर्त स्वरूप देण्यासाठी ३ जून १९१६ रोजी हिंगणे येथे स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना केली. या विद्यापीठाची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती.

१. शिक्षणाचे माध्यम म्हणून मातृभाषेचा स्वीकार करणे.

२. इंग्रजी भाषेचे महत्त्व ओळखून या भाषेतूनही अध्यापनाची सोय करणे.

३. स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्व विकासास अनुरूप व पोषक असे गृहजीवनशास्त्र, आरोग्यशास्त्र, वनस्पतीशास्त्र यासारखे विषय सक्तीचे करणे.

४. स्त्रियांना स्वावलंबी, स्वाभिमानी व कर्तृत्ववान बनविणे.

५. स्त्रियांच्या शारीरिक व मानसिक व्यक्तिभेदास अनुरूप अशा अध्ययन विषयामध्ये विविधता आणणे.

या कार्यात सरकारचे कोणतेही सहकार्य न घेता त्यांनी मुंबई, मद्रास, बंगाल इत्यादी प्रांतात दौरे काढून निधी जमा केला. अनेक शाळा या विद्यापीठाला जोडल्या. लोकवर्गणीतून विद्यापीठ व कन्याशाळा चालविल्या. सन १९२० मध्ये विठ्ठलदास ठाकरसी यांनी विद्यापीठास आपली आई श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी यांच्या स्मरणार्थ २० लाख रू. देणगी दिली. तेव्हा पासून हे विद्यापीठ श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला (एस्.एन.डी.टी.) विद्यापीठ म्हणून ओळखले जाते. महर्षी कर्वे यांनी स्थानिक लोकांच्या मदतीने सांगली, सातारा, बेळगाव येथे शाळा काढल्या. सर्व सुधारणांचा पाया शिक्षण आहे. तेच शिक्षण स्त्रियांना दिले पाहिजे म्हणजे बाकीच्या सुधारणा आपोआप येतील या विचारातून ते प्रथम विधवांच्या व कुमारिकांच्या शिक्षणाकडे वळले. त्यामुळे असंख्य विधवांच्या अंधकारमय जीवनात कर्वेंच्या रूपाने जगण्याचा नवा किरण दिसू लागला. आपणास जगण्यासारखे काही आहे असे त्यांना वाटू लागले. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची, स्त्री उन्नतीची चळवळ गतिमान झाली.

प्रारंभी महर्षी कर्वे यांची अवहेलना झाली. पण पुढे मात्र लोकांना त्यांच्या कार्याचे खरे मोल समजले. बनारस (१९४२) व पुणे (१९५१) या विद्यापीठानी त्यांना डी.लिट. ही सन्मानदर्शक पदवी देऊन त्यांचा गौरव केला. मुंबई विद्यापीठाने त्यांना १९५७ मध्ये एल.एल.डी. पदवी प्रदान केली. भारत सरकारने १८ एप्रिल १९५८ रोजी 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान प्रदान करून त्यांच्या कार्याचा गौरव केला.

## ● पंडिता रमाबाई (१८५८ ते १९२२)

१९ व्या शतकात महाराष्ट्रात ज्या अनेक कर्तबगार व बुद्धिमान स्त्रिया होऊन गेल्या त्यामध्ये प्रामुख्याने पंडिता रमाबाई यांचे नाव घ्यावे लागते. ज्या काळात स्त्रियांच्या कर्तबगारीला समाजात वाव मिळत नव्हता, स्त्रियांना हीन लेखले जात होते, त्यांच्यावर अनेक बंधने लादली होती त्या काळात पंडिता रमाबाईंनी आपल्या बुद्धिमत्तेच्या, कर्तबगारीच्या आणि धाडसाच्या जोरावर महत्त्वपूर्ण कामगिरी करून दाखविली.

पंडिता रमाबाई यांचा जन्म २३ एप्रिल १८५८ रोजी कर्नाटकातील मंगरूळ जिल्ह्यात गंगमूळ येथे एका चित्पावन ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई आणि वडिलांचे नाव अनंतशास्त्री डोंगरे होते. अनंतशास्त्री हे स्वत: संस्कृतचे गाढे अभ्यासक होते. अनंतशास्त्रीनी आपल्या दोन मुलांना - रमाबाई व श्रीनिवास यांना - संस्कृत व प्राचीन हिंदुशास्त्रे यांचे उत्तम शिक्षण दिले. रमाबाईंच्या वयाच्या १६ व्या वर्षी त्यांच्या आई-वडिलांचे निधन झाले. पोरक्या झालेल्या रमाबाई व श्रीनिवास या बहिण-भावंडानी आपला मुलुख सोडला व सुमारे सहा वर्षे हिंदुस्थानात संचार केला. सन १८७८ मध्ये ते कोलकत्ता येथे आले. येथील वास्तव्यात त्यांना मोठी प्रसिद्धी मिळाली. कलकत्त्याच्या विद्‌वत्त सभेने त्यांचा सरस्वती व पंडिता या पदव्या देऊन जाहीर सन्मान केला. कलकत्त्यातील वास्तव्यातच १३ ऑक्टोबर १८८० रोजी पंडिता रमाबाईंचा बाबूबिपिन बिहारीदास मेथानी या ब्राह्मो समाजाशी संबंधित वकीलाशी विवाह झाला. हा आंतरजातीय विवाह होता. रमाबाईना संसार सुख फार काळ लाभले नाही. ४ फेब्रुवारी १८८२ रोजी त्यांच्या पतींचे निधन झाले. १५ मे १८८० रोजी त्यांचा भाऊ श्रीनिवास यांचे निधन झाले. त्यामुळे त्या एकट्या पडल्या. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कार्याने प्रभावित होऊन त्यांनी १८८३ मध्ये आपल्या मुलीसह ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. पुढे ५ एप्रिल १९२२ रोजी त्यांचे केडगाव येथे निधन झाले.

### आर्य महिला समाजाची स्थापना

रमाबाई ज्यावेळी प्रतिकूल परिस्थितीत होत्या त्यावेळी न्या. रानडे, भांडारकर या महाराष्ट्रातील सुधारकांनी रमाबाईना महाराष्ट्रात येण्याचे निमंत्रण दिले. त्यांच्या आग्रहाखातर त्या पुण्यात आल्या. पुण्यातील वास्तव्यात त्या ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या संपर्कात आल्या. त्यांनी १ मे १८८२ रोजी 'आर्य महिला समाजाची' स्थापना करून स्त्रियांच्या स्थितीबाबत लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याचे कार्य हाती घेतले. देशाची उन्नती व्हायची असेल तर स्त्रियांची स्थिती सुधारली पाहिजे असे ठाम मत मांडले. भारतातील शिक्षणविषयक प्रश्नांचा विचार करण्यासाठी सरकारने हंटर कमिशनची नियुक्ती केली. त्या हंटर कमिशनपुढे साक्ष देताना स्त्री शिक्षणाच्या आवश्यकतेची आग्रही मते मांडली. स्त्री

सुधारणेवर व्याख्याने देऊन स्त्रियांना शिक्षणातून आत्मसन्मान मिळवून देण्याचे महान कार्य केले. आर्य महिला समाजाच्या शाखा अनेक ठिकाणी सुरू केल्या.

**शारदा सदनची स्थापना**

पंडिता रमाबाईंना मिशनऱ्यांच्या सहकार्याने इंग्लंडला जाण्याची संधी मिळाली होती. एप्रिल १८८३ ते फेब्रुवारी १८८९ या काळात त्या परदेशात होत्या. त्यांनी इंग्लंडमधील वास्तव्यात आपल्या विद्वत्तेची छाप ब्रिटिश लोकांवर पाडली होती. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी रमाबाईंना आश्वासन दिले की, त्यांनी हिंदुस्थानात जाऊन स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेतल्यास त्या कार्याला आर्थिक सहकार्य देऊ. भारतात परत आल्यानंतर त्यांनी आपले लक्ष स्त्री शिक्षणावर केंद्रित केले. त्यासाठी त्यांनी मुंबई येथे ११ मार्च १८८९ रोजी 'शारदा सदन'ची स्थापना केली. या संस्थेची खालीलप्रमाणे वैशिष्ट्ये होती.

१. निराश्रित, विधवा व अनाथ स्त्रियांच्या राहण्या-जेवण्याची मोफत व्यवस्था करणे.

२. स्त्रियांच्या शिक्षणाची सोय करणे.

३. ज्या स्त्रियांना आजपर्यंत साधा शब्दही सुखाचा मिळत नव्हता अशा अनाथ व विधवांना खरे प्रेम व आपुलकी देणे.

४. स्त्रियांमध्ये घराबाहेर पडून धीटपणाने पुरूष समुदायात वावरण्याची सवय निर्माण करणे.

५. बाह्य जगाचा परिचय करून देणे, स्त्रियांमध्ये व्यापक दृष्टी व आत्मविश्वास निर्माण करणे.

मुंबईत शारदा सदनला पुरेशा विद्यार्थिनी मिळू शकल्या नाहीत. त्यामुळे पुढे १ नोव्हेंबर १८९० रोजी रमाबाईंनी आपली संस्था मुंबईहून पुण्याला केडगाव येथे हालविली.

**मुक्तिसदनची स्थापना**

रमाबाईंनी पुण्यापासून थोड्या अंतरावर केडगाव या ठिकाणी जमीन खरेदी केली. २४ सप्टेंबर १८९८ रोजी मुक्तिसदनाची स्थापना केली. या मुक्तिसदनामध्ये अनाथ मुली व विधवा स्त्रियांच्या राहण्याची-जेवण्याची तसेच शिक्षणाची सोय मोफत केली होती. केडगावच्या सुमारे १०० एकर माळावर सुमारे ३०० अनाथ बालकांसह इथला आश्रम फुलविला होता. या सदनात गरीब, अपंग, पतित निराश्रित, विधवा स्त्रियांना मुक्त प्रवेश होता. आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनविणे हे या सदनात शिकविले जात होते. तेथे एक छापखाना सुरू केला होता. हातमाग, शेती, बुरूडकाम, विणकाम, धोबीकाम इत्यादी उद्योग सुरू केले होते. पुरूषाच्या सहकार्याविना आपण सन्मानाने जगू शकतो असा आत्मविश्वास स्त्रियांमध्ये निर्माण करण्याचे कार्य या संस्थेने केले. अनाथ स्त्रियांचा उद्धार करणे हेच त्यांनी आपले जीवित कार्य मानले होते. त्यासाठी त्यांनी कठोर परिश्रम घेतले होते. पण रमाबाई आपल्या संस्थेतील

मुली व स्त्रियांना ख्रिश्चन धर्मात ओढण्यासाठी प्रयत्न करत आहेत असा अपप्रचार त्यांच्या विरूद्ध करण्यात आला. त्यामुळे हिंदू लोकांत त्यांच्याविषयी गैरसमज निर्माण झाले.

**कृपासदनाची स्थापना**

पतित स्त्रियांना प्रेमाने वागवून योग्य मार्गावर आणण्यासाठी पंडिता रमाबाई यांनी कृपासदनाची स्थापना केली. समाजाने टाकून दिलेल्या या स्त्रियांना या सदनात सन्मानांचे जीवन जगण्याची सोय केली.

**प्रीतिसदनची स्थापना**

ज्याकाळात सामान्य स्त्रियांची फार दुरावस्था होती तेथे लुळे, पांगळे, मुके, बहिरे अशा स्त्रियांना कोण विचारणार ? त्यांची फार मोठी दुःखद परिस्थिती होती. अशा म्हाताऱ्या, दुबळ्या पांगळ्या स्त्रियांसाठी रमाबाईंनी प्रीतिसदनची स्थापना केली.

थोडक्यात, महाराष्ट्राच्या समाजसुधारणेच्या इतिहासामध्ये स्त्री उद्धाराचे कार्य अनेक समाजसुधारकांनी केले. त्या मालिकेत पंडिता रमाबाई यांचे स्त्री शिक्षणासाठीचे, त्यांच्या उद्धारासाठीचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण व मोलाचे समजले जाते. एका स्त्रीने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी सामना देत यशस्वीपणे कार्य पार पाडले. अशा महान स्त्रीचे इ.स. १९२२ मध्ये निधन झाले. पंडिता रमाबाई या खऱ्या अर्थाने मानवतावादी होत्या. स्त्रियांचे हाल, अपेष्टा पाहून त्यांचे मन व्यथित होत होते. स्त्रिया देखील माणूस आहेत. त्यांना माणसासारखे वागविले पाहिजेत. त्यांचा मानसिक व शारीरिक विकास झाला पाहिजे. म्हणून अनाथ, विधवा, पतित स्त्रियांवर मायेची पाखर घालण्यास त्या पुढे आल्या. त्याचबरोबर स्त्री धर्मनीती, द हाय कास्ट हिंदू वुमन ही पुस्तके लिहून स्त्रियांच्या समस्यांकडे लक्ष वेधले.

## ● बाबा पद्मनजी (१८३१ ते १९०६)

याकाळात राजकीय स्थित्यंतराबरोबरच सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात भारतात बदलास प्रारंभ झाला. हिंदू धर्मातील अनिष्ट चालरीती, रूढी, परंपरांविरूद्ध आवाज उठवून हिंदू धर्मातच सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न काही विचारवंतांनी चालविला होता. याकाळात ख्रिस्ती धर्मातील मानवतावादी तत्त्वांचे काहीना आकर्षण वाटले. त्यामुळे त्यांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. बाबा पद्मनजी यांनीही ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला होता. बाबा पद्मनजी यांचा जन्म मे १८३१ मध्ये बेळगाव येथे झाला. त्यांचे मूळचे आडनाव मुळे असे होते. ते जातीने कासार होते. त्यांचे पूर्वज व्यापारानिमित्त सुरतेस राहिले होते. त्यामुळे त्यांना सुरतकर हे आडनाव मिळाले. बाबा

पद्मनजींच्या घरचे वातावरण अत्यंत धार्मिक स्वरूपाचे होते. साहजिकच लहानपणापासूनच त्यांच्यावर धार्मिक संस्कार झाले होते.

बाबा पद्मनजींचा भारतीय समाजातील अनिष्ठ, चालरीती, रूढी, परंपरांना विरोध होता. ते दादोबा पांडुरंग यांनी स्थापन केलेल्या परमहंस सभेचे सभासद होते. त्यांनी विधवा पुनर्विवाहाला पाठिंबा दर्शविला होता. आपल्या लिखाणाद्वारे हिंदू धर्मातील स्त्रियांच्या दु:खद स्थितीकडे लोकांचे लक्ष वेधले. त्यांनी आपल्या 'यमुना पर्यटन' या कादंबरीतून विधवा स्त्रियांच्या दु:खाचे दर्शन समाजाला घडविले होते. १८८४ मध्ये त्यांनी 'अरूणोदय' हे आत्मचरित्र लिहिले. तसेच इंग्रजी-मराठी व संस्कृत-मराठी शब्दकोश तयार केले. काही काळ त्यांनी 'सत्यदिपिका' हे नियतकालिक चालविले. महात्मा फुल्यांचे प्रारंभीचे बरेचसे लिखाण बाबा पद्मनजींच्या सत्यदिपिकेत प्रकाशित झाले होते. तसेच 'ब्राह्मणांचे कसब' या महात्मा फुलेंच्या ग्रंथास बाबा पद्मनजींची प्रस्तावना आहे. बाबा पद्मनजींच्या कार्याला काही मर्यादा होत्या, तरी सामाजिक व धार्मिक सुधारणासंबंधी त्यांची तळमळ व त्यांचा प्रामाणिक हेतू नि:संशय होता.

## ● ताराबाई शिंदे (१८५० ते १९१०)

ताराबाई शिंदे यांनी महात्मा फुले यांच्या कार्यापासून प्रेरणा घेतली होती. ताराबाईंचे वडील बापूजी हरि शिंदे हे महात्मा फुलेंचे अनुयायी होते. ताराबाईंचे वडील सत्यशोधक समाजाचे पदाधिकारी होते. त्यामुळे सत्यशोधक समाजाच्या विचारांचा वारसा त्यांना मिळाला होता. ताराबाईंचे मराठी, इंग्रजी, संस्कृत भाषेवर प्रभुत्व होते.

**स्त्री-पुरूष समानता**

ताराबाई शिंदे यांनी आपल्या 'स्त्री-पुरूष तुलना' या ग्रंथातून स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. ताराबाई शिंदे यांचे भाऊ रामचंद्र हरि शिंदे हे जोतिबांच्या कॉण्ट्रॅक्ट् कंपनीत भागीदार होते. त्यामुळे ताराबाईंच्या घरात सुरुवातीपासूनच स्त्री-पुरूष समानतेचे वातावरण होते. ताराबाई शिंदे यांनी आपल्या पुस्तकात विधवा विवाहास उच्चवर्णीयांनी केलेली मनाई, केशवपनासारख्या दुष्ट रूढी तसेच पुरूषांना अनेक लग्न करायची असलेली मुभा या सर्व प्रश्नांवर टीका केली. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत देखील सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रात योगदान दिले. त्यांनी स्त्रियांच्या शोषणाच्या विरोधात दिलेला लढा हा सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला चालना देणारा होता. ज्या ईश्वराने पुरूष व स्त्रियांना निर्माण केले त्या स्त्रियांना समान संधी का नाही ? असा प्रश्न विचारला. पती कसाही असला त्याने आपल्या पत्नीवर अमानुष अन्याय, अत्याचार केले तरी स्त्रीने पतीला परमेश्वर मानून त्याची पूजा करावी. पती हा परमेश्वर असेल तर पतीने ही परमेश्वरासारखे वागले पाहिजे असे परखड विचार त्यांनी मांडले. महात्मा फुले यांनी स्त्री-पुरूष विषमतेविरूद्ध लढा उभारला. त्याला पूरक धोरण

ताराबाईंनी अवलंबिले. त्यांचे लेखन बंडखोर व तत्कालीन समाजाला हादरवून सोडणारे होते. त्यांनी पुरुषी वर्चस्व संपल्याशिवाय समाजाची निकोप वाढ होणार नाही असे स्पष्ट मत मांडले.

- **राजर्षी छत्रपती शाहू महाराज (१८७४ ते १९२२)**

शाहू महाराजांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी अनुकूल धोरण स्वीकारले होते. त्यांनी स्त्री शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले होते. राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना फी माफीची सवलत दिली होती. आपल्या सूनबाई (इंदुमती राणीसाहेब) विधवा झाल्यानंतर त्यांना शिक्षण देऊन कोल्हापूर संस्थानाचे शिक्षण खाते सोपविण्याचा विचार होता पण राणीसाहेबांचा मृत्यू झाल्याने त्यांची इच्छापूर्ण होऊ शकली नाही. कोल्हापूर संस्थानच्या शिक्षणाधिकारी म्हणून श्रीमती रखमाबाई केळवकर यांची नेमणूक केली होती. स्त्री शिक्षणामुळे कुटुंबाचा, समाजाचा विकास होतो. स्त्रियांना कुटुंबात आदराचे स्थान मिळाले पाहिजे असा शाहू महाराजांचा स्त्री विषयक दृष्टिकोन होता.

- **विष्णुशास्त्री पंडित (१८२७ ते १८७६)**

विष्णुशास्त्री पंडित यांचा जन्म सन १८२७ मध्ये सातारा येथे झाला. त्यांचे मूळगाव सातारा जिल्ह्यातील बावधन हे होय. त्यांनी आपले वडील परशुरामशास्त्री यांचेकडून संस्कृत भाषेचे प्राथमिक शिक्षण घेतले होते. ते १८४५ मध्ये इंग्रजी शिक्षणासाठी पुण्यात आले. दुर्दैवाने त्यांच्या वडिलांचे आकस्मिक निधन झाल्याने त्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागले. सन १८४८ मध्ये विष्णुशास्त्रींनी सरकारी नोकरीत प्रवेश केला. पुढे त्यांनी सरकारी नोकरीचा त्याग केला आणि ते वृत्तपत्र व्यवसायाकडे वळले. सन १८६२ मध्ये मुंबई येथे 'इंदुप्रकाश' हे साप्ताहिक सुरू केले.

विष्णुशास्त्री पंडितांनी सरकारी नोकरीतून बाहेर पडल्यानंतर स्त्रियांच्या उद्धारासाठी कार्य करण्याचे ठरविले. त्यांना 'इंदुप्रकाश' या पत्राच्या संपादकपदाचा खूप लाभ झाला. त्यांनी भारतीय स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा व्हावी यासाठी गावोगावी व्याख्याने दिली. अनेक ग्रंथ व लेख लिहिले. स्त्री शिक्षण, बालविवाह, जरठ-कुमारी विवाह, केशवपन पुनर्विवाह इत्यादी प्रश्नांचा त्यांनी आपल्या लेखांतून ऊहापोह केला आहे. स्त्रियांच्या समस्याविषयी सुधारणावादी भूमिका स्वीकारली. विधवाविवाहाच्या प्रश्नाला विशेष प्राधान्य दिले. २८ जानेवारी १८६६ रोजी 'पुनर्विवाहोत्तेजक मंडळी'ची स्थापना केली. या सभेचे ते चिटणीस होते. विधवाविवाहाच्या प्रश्नावर त्यांनी अनेक शास्त्री-पंडितांशी वेळोवेळी वाद-विवाद केले आणि आपल्या मतांना प्राचीन धर्मग्रंथाचे प्रमाण मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

### विधवाविवाह मंडळाची स्थापना

विधवा पुनर्विवाहास उत्तेजन देण्यासाठी विष्णुशास्त्री पंडितांनी १४ डिसेंबर १८६५ रोजी विधवा विवाह मंडळाची स्थापना केली. त्यांच्या प्रोत्साहनाने पुणे येथील नारायण जगन्नाथ भिडे यांनी पुनर्विवाह केला. त्यानंतर १५ जून १८६९ रोजी मुंबईत प्रभाकर भट-परांजपे यांची कन्या वेणूबाई हिचा पांडुरंग विनायक करमरकर यांच्याशी पुनर्विवाह घडवून आणला. या विवाहामुळे विष्णुशास्त्री पंडितांना सनातन्यांचा रोष सहन करावा लागला.

### विधवेशी पुनर्विवाह

विष्णुशास्त्री हे कृतीशील समाजसुधारक होते. सन १८७४ च्या सुमारास त्यांची पत्नी मृत्यू पावली. त्यावेळी त्यांनी वामनराव आगाशे यांची विधवा कन्या कुसाबाई हिच्याशी पुनर्विवाह केला.

### बालविवाह प्रथेस विरोध

आपल्या समाजातील बालविवाहाची प्रथा बंद करण्यासाठी विष्णुशास्त्रींनी प्रयत्न केले. बाल विवाहामुळे बालपणीच वैधव्य आलेल्या मुलीचे उभे आयुष्य मातीमोल होत असे. म्हणून त्यांनी या प्रथेस विरोध करून समाजात जागृती घडवून आणली. त्यांनी सनातनी व सुधारक यांना मान्य होईल असे एक संमतिपत्र तयार करून प्रसिद्ध केले होते. त्या संमतिपत्रात मुलीचा विवाह बारा वर्षापासून ते सोळा वर्षापर्यंत करावा आणि मुलाचा विवाह सतरा वर्षापासून ते पंचेचाळीस वर्षापर्यंत करावा असे म्हटले होते.

अशा प्रकारे, विष्णुशास्त्री पंडितांनी स्त्रियांच्या सुधारणेला प्राधान्य दिले होते. त्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वाहून घेतले होते.

## स्वयं अध्ययन प्रश्न - २

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१. द सब्जेक्शन ऑफ वुमेन हा ग्रंथ कोणी लिहिला ?

२. भारतीय प्रबोधनाचे अग्रदूत कोणाला म्हणतात ?

३. ताराबाई शिंदे यांचे कोणते पुस्तक प्रसिद्ध आहे ?

४. महर्षी कर्वे यांनी कोणत्या विद्यापीठाची स्थापना केली ?

५. अनाथ बालिकाश्रमाची स्थापना कोणी केली ?

६. ‘यमुना पर्यटन’ ही कादंबरी कोणी लिहिली ?

७. शारदा सदनची स्थापना कोणी केली ?

८. जरठ-कुमारी विवाह म्हणजे काय ?

९. मुक्तिसदनची स्थापना कोणी केली ?

१०. पहिल्या भारतीय स्त्री शिक्षिका म्हणून कोणाला संबोधले जाते ?

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१. महात्मा जोतिबा फुले यांनी पुण्यात पहिली शाळा इ.स. ............... मध्ये सुरू केली.

(अ) १८५१ (ब) १८५० (क) १८४८ (ड) १८४९

२. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना ..... रोजी हिंगणे येथे केली.

(अ) ३ जून १९१६ (ब) ३ जून १९१८

(क) ३ जुलै १९१९ (ड) १० मार्च १९१५

३. ऑन द सिव्हिल इम्प्रव्हमण्ट ऑफ वुमेन हा ग्रंथ सन १७९४ मध्ये ....... यांनी प्रकाशित केला.

(अ) जॉन स्टुअर्ट मिल (ब) मेटकाफ

(क) ॲरिस्टॉटल (ड) हिप्पल

४. बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना ......... साली झाली.

(अ) १८६३ (ब) १८७३ (क) १८९४ (ड) १८८३

५. निष्काम कर्ममठाची स्थापना ...... यांनी केली.

(अ) महर्षी कर्वे (ब) महात्मा जोतिबा फुले

(क) पंडिता रमाबाई (ड) ताराबाई शिंदे

६. राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना फी माफीची सवलत ..... यांनी दिली.

(अ) राजाराम मोहन रॉय (ब) राजर्षी शाहू महाराज

(क) विष्णुशास्त्री पंडित (ड) लोकहितवादी

## ३.२.३ अस्पृश्यता निर्मूलन आणि जातिभेदाचा अंत

**प्रस्तावना**

१९ व्या शतकात महिलांच्या प्रश्नांप्रमाणेच दलितांचा प्रश्नही महत्त्वपूर्ण ठरला. दलितांचे प्रश्न सोडविण्यासाठी याकाळात जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू झाले. याकाळातील समाजात दलित समाजास स्त्रियांपेक्षाही दुय्यम दर्जाचे स्थान होते. त्यांना गावाबाहेर रहावे लागत होते. दिवसा त्यांची सावली पडत असल्याने पुण्यासारख्या शहरात त्यांना प्रवेश दिला जात नसे. याबाबात जोतिबा फुले यांच्या शाळेतील मुक्ता साळवे यांचा निबंध महत्त्वाचा ठरतो. तिने पेशवाईच्या काळात दलितांना कसे वागविले जात असे याचा तपशीलवार आढावा आपल्या निबंधात घेतला होता. विशेष म्हणजे तिचे वडील लहुजी साळवे यांनी दुसऱ्या बाजीरावाच्या काळात पुण्यातील सामाजिक परिस्थितीचे अवलोकन बारकाईने केले होते आणि तिच माहिती मुक्ताने आपल्या निबंधात नमूद केली होती. दलितांच्या भयावह परिस्थितीस जे घटक कारणीभूत होते त्या विरोधात समाजसुधारकांनी उठाव करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये सर्वात महत्त्वाचा वाटा महात्मा जोतिबा फुलेंचा आहे. त्यांनी दलितांच्या प्रश्नांना प्रामाणिकपणे वाचा फोडली आणि त्यांच्या सुधारणेसाठी आग्रह धरला. त्याच बरोबर विठ्ठल रामजी शिंदे, पंडिता रमाबाई, बाबा पद्मनजी, गोपाळबाबा वाळंगकर, राजर्षी शाहू महाराज, शिवराम जानबा कांबळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादींचे कार्य महत्त्वपूर्ण ठरले.

**जातिसंस्था**

प्रत्येक मानवी समाजाची विभागणी काही समूहात झालेली असते. या समाजाचे वेगळेपण काही बाबींमुळे स्पष्ट दिसून येते. भारतीय समाजाचे विभाजन वेगवेगळ्या जातींमध्ये झालेले आहे. भारतीय समाजात आढळून येणारी एक विशिष्ट प्रकारची वर्गरचना जातीच्या पायावर उभी आहे. भारतात जातीयवाद आर्यांच्या आगमनानंतर सुरू झाला असे मानले जाते. आर्यांच्या आगमनानंतर भारतात आर्य आणि अनार्य असे दोन वर्ग निर्माण झाले. आर्य आणि अनार्य यांची वेळोवेळी युद्धे होत राहिली. परिस्थितीनुरूप देवपूजा करणे, युद्ध करणे, कृषिकार्य यासाठी पुरोहित, योद्धा आणि वीर असे तीन वर्ग निर्माण झाले. याच तीन वर्गांना ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य असे संबोधण्यात येऊ लागले. जेव्हा आर्यांनी अनार्यांना युद्धात पराजित करून त्यांना बंदी बनविले तेव्हा दस्यु वर्गाचा उदय झाला. त्यांना शुद्र म्हटले जाऊ लागले.

**जातीचा अर्थ**

'जन' या धातूपासून 'जात' हा मराठी शब्द बनला आहे. जन या धातूचा अर्थ 'जन्म' असा होतो. यावरून जन्माने प्राप्त होणारा समूह म्हणजे जात होय. जातीला इंग्रजीमध्ये Caste असे म्हणतात.

या शब्दाची उत्पत्ती Castas या लॅटिन शब्दापासून झाली आहे. Castas या शब्दाचा अर्थ वंशाची शुद्धता असा आहे. Caste हा शब्द पोर्तुगीजांनी वंशशुद्धतेला उद्देशून प्रथम १५६७ मध्ये गोवा मंडळाच्या हुकुमनाम्यात वापरला.

## १९ व्या शतकातील प्रारंभीचे महाराष्ट्रातील सामाजिक जीवन

### १) वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव

१९ व्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रातील समाजात जातिसंस्था व कडक जातिनिर्बंधाना विशेष महत्त्व मिळालेले होते. वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात निर्माण झाला नव्हता. भौतिकविद्या, बुद्धिप्रामाण्यवाद निर्माण झालेला नव्हता. समाजात परंपरा, ग्रंथ प्रामाण्याला विशेष महत्त्व दिले जात होते.

### २) जातिसंस्थेचे कडक निर्बंध

जातिसंस्थेमुळे समाजाचे निरनिराळ्या गटांत विभाजन झाले होते. एका जातीमध्येही अनेक जाती निर्माण झाल्या होत्या. जाती-जातीमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठत्वांचे विचार असल्याने प्रत्येक जातीला समाजात विशिष्ट स्थान प्राप्त झाले होते. प्रत्येक जातीला आपल्या स्थानानुसार सामाजिक हक्क, विशेषाधिकार व कर्तव्ये ठरवून दिली होती. जातिव्यवस्थेची बंधने इतकी कडक होती की, कोणत्या जातीने कोणते कपडे घालावे, लग्नात मिरवणूक कशी काढावी, भांडी कोणती वापरावी इत्यादी अनेक बंधने लादली होती. परदेशगमन, रोटी-बेटी व्यवहार निषिद्ध मानले जात होते. याबंधनांचे उल्लंघन केल्यास सामाजिक बहिष्काराची किंवा तुरूंगवासाची शिक्षा दिली जात होती. जातिसंस्थेतील कनिष्ठ जातीतील व्यक्तींना त्यांच्यावरील विविध बंधनांमुळे विकासाची संधी नव्हती.

### ३) अस्पृश्यता

याकाळात समाजात अस्पृश्यता पाळली जात होती. अस्पृश्यांची अत्यंत दयनीय अवस्था होती. शिक्षणाचा अधिकार नव्हता, मंदिरे, पाणवठे तसेच इतर सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांना प्रवेश करण्यास सक्त मनाई होती. त्यांच्या सावलीच्या स्पर्शानेही विटाळ होतो असे मानून अस्पृश्यांना शहरात, गावात येण्याची परवानगी नव्हती. अशा अनेक बंधनामुळे गुलामगिरीपेक्षाही निकृष्ट दर्जाचे जीवन या वर्गाला जगावे लागत होते.

### ४) अंधश्रद्धा, व्रतवैकल्ये व लोकभ्रमाचे स्तोम

याकाळात समाज जीवनात अनिष्ठ चालरीती, रूढी, परंपरा व पोथीनिष्ठता यांचे स्तोम माजले होते. समाजात सर्वच क्षेत्रांत अज्ञान, निरक्षरता व धर्मभोळेपणा होता. त्यामुळे धर्ममार्तंड सांगतील

तोच खरा धर्म मानला जात असे. कर्मकांड, व्रतवैकल्ये यांना महत्त्व प्राप्त झाले होते. यज्ञयाग, सोवळे-ओवळे, ब्राह्मण-भोजने, दानधर्म, जोतिष, मुहूर्त, जप-तप, शकुन-अपशकुन, मांजर आडवे जाणे, भांडणे, भालू भूंकणे, घुबड घुमणे, विधवा स्त्री आडवी जाणे इत्यादी शकुन-अपशकुन पाळले जात होते. शिंकणे चांगले-वाईट, पाल चुकचुकणे, अंगावर पडणे, कुत्रे रडणे इत्यादींवर लोकांचा विश्वास होता. त्यामुळे अंधश्रद्धा व बुवाबाजी यांना ऊत आला होता.

### ५) वेठबिगार, दास-दासी

समाजातील अतिशुद्र जातीतील लोकांना पाटील, देशमुख, जहागीरदार इत्यादी वतनदारांच्या घरी वेठबिगार म्हणून विविध स्वरूपाची कामे करावी लागत होती. त्याचबरोबर श्रीमंत लोक घरगुती कामासाठी दास-दासी ठेवत असत.

## सामाजिक सुधारणांची आवश्यकता

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी कालखंडात भारतात सामाजिक आणि सांस्कृतिक बदलास सुरुवात झाली. ब्रिटिशांनी इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ केल्याने भारतीय तरूणांना स्वातंत्र्य, सामाजिक समता, उदारमतवाद, बुद्धिप्रामाण्यवाद यासारखे नव विचार ज्ञात झाले. त्यामुळे अंधानुकरण व परंपरागततेला छेद दिला गेला. विविध ज्ञान मिळविणेच्या जिज्ञासेतून ज्ञानाचा मागोवा घेण्यास नवसुशिक्षितांनी सुरुवात केली. समाजातील हीन आचार-विचार दूर सारणे आवश्यक आहे असे म्हणणारा समाजसुधारकांचा एक गट निर्माण झाला.

याचकाळात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी हिंदू धर्मातील वाईट-चालरीतींवर टीका सुरू केली. नवसुशिक्षितांना हे आवडले नाही. त्यांच्या मतानुसार शास्त्रीय दृष्टिकोन, बुद्धिप्रामाण्यवाद समाजात निर्माण झाला पाहिजे. त्याचबरोबर सामाजिक व धार्मिक जीवनात योग्य त्या परंपरांचाही स्वीकार आवश्यक आहे. भारतीय समाजसुधारकांनी विविध संस्थांच्या माध्यमातून समाजसुधारणेला प्रारंभ केला. महाराष्ट्रातही अनेक समाजसुधारकांनी समाजप्रबोधनास सुरुवात केली. त्यांनी स्त्री उद्धार, दलितोद्धार इत्यादी प्रश्नांवर लक्ष केंद्रित करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रात जातिसंस्थेच्या निर्मूलनासाठी अनेक सुधारकांनी आपले आयुष्य वेचले. त्यामध्ये महात्मा जोतिबा फुले, लोकहितवादी दादोबा तर्खडकर, न्या. रानडे, महर्षी शिंदे, आगरकर, राजर्षी शाहू महाराज, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, गोपाळ बाबा वाळंगकर, शिवराम कांबळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान महत्त्वाचे ठरते.

## ● महात्मा जोतिबा फुले (१८२७ ते १८९०)

महात्मा फुले यांचा जन्म सन १८२७ मध्ये झाला. त्यांच्या जन्मतारखेबाबत निश्चित पुरावा नसला तरी संशोधकांनी ११ एप्रिल ही त्यांची जन्मतारीख असल्याचे प्रतिपादन केले. तिच त्यांची जन्म तारीख मानली जाते. त्यांच्या पूर्वजांचे मूळगाव सातारा जिल्ह्यातील कटगुण होते. महात्मा फुलेंचे पणजोबा त्या गावाचे चौगुले होते. ते क्षत्रिय माळी होते. पण काही कारणाने त्यांना त्यांचे गाव सोडावे लागले. पुढे ते पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील खानवडी गावी येऊन राहिले. जोतिबांचे आजोबा उधळ्या स्वभावाचे असल्याने त्यांना आपली मालमत्ता गमवावी लागली. त्यामुळे त्यांना स्थलांतर करावे लागले. ते पुणे येथे येऊन राहिले. तेथे फुले विकण्याचा व्यवसाय करू लागले. त्यावरूनच त्यांच्या पूर्वीच्या गोऱ्हे आडनावाऐवजी फुले असे आडनाव प्राप्त झाले. त्यांच्या तीन मुलांपैकी गोविंद यांचे लग्न चिमणाबाई हिच्याशी झाले. त्यांच्या पोटी जोतिबांचा जन्म झाला. जोतिबा फुले एक वर्षाचे असताना त्यांची आई मृत्यू पावली. गोविंदानी दुसरे लग्न केले नाही. आपल्या मुलांचे संगोपन चांगले केले. जोतिबांना सातव्या वर्षी खाजगी पाठशाळेत घातले. तेथे संस्कृत, व्याकरण, जोतिष वेदांत, धर्मशास्त्र इत्यादीचे शिक्षण दिले जात होते. शाळेत असताना गोवंडे या उत्साही, उद्योगी व महत्वकांक्षी तरूणाशी जोतिरावांची मैत्री जमली. दोघांनी शिवाजी महाराज व जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या चरित्रांचा अभ्यास केला. त्याचबरोबर प्रख्यात विचारवंत व बंडखोरवृत्तीचे लेखक थॉमसपेन यांच्या 'राईटस ऑफ मॅन' या ग्रंथातील उदात्त विचारांचा पगडा त्यांच्या मनावर पडला होता. जोतिबा तेरा वर्षाचे असताना त्यांचा विवाह धनकवडीच्या झगडे-पाटील यांच्या सावित्रीबाई या कन्येशी झाला. महात्मा जोतिबा फुले यांनी दुर्बल घटकांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्याचे त्यांचे कार्य आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत केले. अशा या महात्म्याचे निधन २८ नोव्हेंबर १८९० रोजी झाले.

### महात्मा फुलेंचे अस्पृश्योद्धाराचे कार्य

#### अस्पृश्यांचे शिक्षण

अस्पृश्यता ही वंशपरंपरेने चालत आलेली अत्यंत वाईट प्रथा होती. १९ व्या शतकात महाराष्ट्रात ती अधिक तीव्र झाली होती. महात्मा जोतिबा फुलेंच्या जीवनात एक घटना घडली. ती म्हणजे जोतिबांचे मित्र सखारामपंत परांजपे यांच्या लग्नाच्या वरातीत शुद्र म्हणून जोतिबांचा अपमान झाला. या घटनेमुळे जोतिबांना जातिव्यवस्थेच्या विद्रुप स्वरूपाचे दर्शन झाले. कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणाला वरिष्ठ समजल्या जाणाऱ्या वर्गाचा विरोध होता. तरीही काही मुलांनी शिकण्याचा प्रयत्न केला. त्यांना उच्चवर्णीयांनी निर्दयी वागणूक दिली. पुण्याच्या शाळेतील एका पंतोजीने एक वेताची काठी ठेवली

होती. त्याचबरोबर काही मातीची ढेकळेही ठेवली होती. त्याबद्दल आदम वाईट यांनी त्या शाळेला भेट दिल्यानंतर विचारले ही ढेकळे तुमच्या जवळ कशाकरिता ठेवली आहेत ? पंतोजीने उत्तर दिले, 'जेव्हा स्पृश्य विद्यार्थी चुकतो तेव्हा त्यांना काठीने मारतो आणि जेव्हा अस्पृश्य विद्यार्थी चुकतो तेव्हा ढेकूळ मारतो. कारण छडीबरोबर विटाळ होईल'.

महात्मा फुलेंनी अस्पृश्यांच्या मुलांना शिकण्याचा अधिकार का नाही असा प्रश्न उपस्थित केला. या वर्णभेदाविरूद्ध आवाज उठविण्यासाठी त्यांनी शिक्षण या प्रभावी माध्यमाचा प्रचार व प्रसार केला. अस्पृश्यांना आपल्या हक्काची जाणीव व्हावी म्हणून त्यांना शिक्षण मिळवून देण्याचे कार्य जोतिबांनी हाती घेतले. सन १८५२ मध्ये अस्पृश्यांसाठी वेताळ पेठेत स्वखर्चाने एक शाळा सुरू केली. सन १८५३ साली आपल्या काही होतकरू मित्रांच्या साहाय्याने 'महार-मांग' इत्यादी लोकांना विद्या शिकविण्याकरिता 'मंडळी' नावाची संस्था काढली. महात्मा फुल्यांच्या कार्यास युरोपियन व एतद्देशीय शिक्षणप्रेमीनी सहकार्य केले. दक्षिणाप्राईज फंडातूनही काही आर्थिक साहाय्य मिळाले. सन १८५८ पर्यंत या संस्थेमार्फत पुण्यात तीन शाळा सुरू केल्या. शाळेतील मुलांना पाणी पिण्याची अडचण भासू लागली. म्हणून या महामानवाने आपल्या राहत्या घरातील पाण्याचा हौद सर्वांसाठी खुला केला. महात्मा फुल्यांनीच प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे असा विचार मांडला.

## अस्पृश्यता निवारण

महात्मा फुले हे कर्ते समाजसुधारक होते. जसे त्यांचे विचार तशी त्यांची कृतीही होती. अस्पृश्यतेबाबत जसे विचार मांडले तशी कृतीही त्यांनी केली. अस्पृश्यांमध्ये जागृती घडवून आणावी म्हणून त्यांनी त्याच वर्गातील लोकांचे सहकार्य घेतले. राजकीय गुलामगिरी तर वाईटच पण त्याहून सामाजिक गुलामगिरी अधिक दुष्ट आहे. शुद्रांना अत्यंत हीन अवस्थेत व निरंतर अपमानित करून पिचत ठेवले जाते हे पाहून व अनुभव घेऊन जन्मजात उच्च-नीचतेची कल्पना समूळ उखडून टाकली पाहिजे हे जोतिबानी ठरविले. 'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहून उच्चभ्रू जमातीवर कठोर टीका केली. जातिसंस्थेवर आणि दांभिकतेवर त्यांनी कोरडे ओढले. शुद्रांनी आपल्या उन्नतीसाठी विद्या संपादन करावी असा संदेश त्यांनी या ग्रंथात दिला. या ग्रंथात ते म्हणतात ''ब्राह्मणांकडून तुमची फसवणूक कशी होत आहे हे माझ्या शुद्रबांधवाना सांगण्याच्या उद्देशानेच केवळ मी हा ग्रंथ लिहिला आहे.''

## सत्यशोधक समाजाची स्थापना

महात्मा फुलेंच्या आणि त्यांच्या पूर्वीच्या काळात बहुजन समाजात धार्मिक व सामाजिक बाबतीत सर्वत्र ग्लानी पसरली होती. बहुजन समाजाला धर्मज्ञान नव्हते. अनेक चालरितींना धर्माचे स्वरूप प्राप्त झाले होते. धर्माला धर्ममार्तंडाच्या मगरमिठीतून सोडविण्यासाठी, बौद्धिक गुलामगिरीतून आणि सामाजिक शोषणातून मुक्त करण्यासाठी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना

१८७३ साली पुणे येथे केली. मागासलेल्यावर्गातील वेड्या कल्पना नष्ट कराव्यात, आपल्या बुद्धीने विचार करून खरे-खोटे बरे-वाईट ठरविण्यास त्यांना समर्थ करावे या हेतूने जोतिरावांनी सामाजिक संघर्षाचे व्यासपीठ उभे केले. सत्यशोधक समाज ही समाजसुधारणेची महाराष्ट्रातील पहिली चळवळ होती. या समाजाची प्रमुख तत्त्वे पुढीलप्रमाणे होती.

१) सर्व माणसे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत व परमेश्वर त्यांचा आई-बाप आहे.

२) आईला भेटायास अगर बापाला प्रसन्न करण्यास ज्याप्रमाणे मध्यस्थांची जरूरी नसते त्याप्रमाणे परमेश्वराची प्रार्थना करण्यास पुरोहिताची आवश्यकता नसते.

३) वरील तत्त्वे कबुल असल्यास कोणालाही या समाजाचे सदस्य होता येईल.

सत्यशोधक समाजाची चळवळ ही एका विशिष्ट वर्गाविरूद्ध नव्हती. बहुजन समाजात जागृती घडवून आणण्यासाठी, समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता हा विचार रूजविण्यासाठी होती.

## ● महर्षी विठ्ठल रामजी शिंदे (१८७३ ते १९४४)

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म २३ एप्रिल १८७३ रोजी कर्नाटकात जमखिंडी येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रामजी व आईचे नाव यमुनाबाई होते. त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण जमखिंडी या गावीच झाले. सन १८९१ मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर काहीकाळ शिक्षकाची नोकरी केली. सन १८९३ मध्ये ते उच्च शिक्षणासाठी पुण्याला आले. पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात त्यांनी आपले नाव दाखल केले. पुण्याच्या डेक्कन मराठी एज्युकेशन असोसिएशनने थोडी आर्थिक मदत केली. बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी त्यांना शिष्यवृत्ती सुरू केली. सन १८९८ मध्ये ते बी.ए. झाले. पुढे सन १९०१ मध्ये प्रार्थना समाजाच्या साहाय्याने त्यांना शिक्षणासाठी इंग्लंडला जाण्याची संधी मिळाली. ऑक्टोबर १९०३ मध्ये ते मायदेशी परतले. इंग्लंडहून मायदेशी परताना त्यांनी ॲमस्टरडॅम येथे भरलेल्या उदार धर्मपरिषदेत भाग घेऊन हिंदुस्थानातील उदार धर्म या विषयावर प्रबंध वाचला. भारताच्या स्वातंत्र्य लढ्याबरोबरच भारतीय समाजातील पददलित व उपेक्षितवर्गाची सेवा करण्यासाठी आयुष्यभर परिश्रम घेतले. अशा या महान समाज सुधारकाचा मृत्यू २ जाने. १९४४ रोजी पुणे येथे झाला.

## महर्षी विठ्ठल रामजी शिंदेंचे अस्पृश्योद्धाराचे कार्य

महर्षी वि.रा. शिंदे यांचे अस्पृश्य जातींच्या उद्धारासाठी केलेले कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. समाजातील अस्पृश्यांची स्थिती पाहून त्यांना खूप वाईट वाटत असे. सन १९०५ मध्ये महर्षी शिंदे

यांना अहमदनगरजवळच्या भिंगार गावी अस्पृश्यांच्या परिषदेत निमंत्रित केले होते. या परिषदेत अस्पृश्यांनी आपणास भोगावा लागणाऱ्या मरणप्राय यातनांचे निवेदन केले. या परिषदेत अस्पृश्य समाजास भोगाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांचे प्रत्यक्ष दर्शन झाले. या समाजासाठी काहीतरी कृती करणे आवश्यक आहे असे त्यांच्या संवेदनशील मनाला वाटले. या जाणीवेतून ते अस्पृश्योद्धारांच्या कार्याकडे वळले.

**डिप्रेस्ड क्लासेस मिशनची स्थापना**

अस्पृश्य बांधवांच्या उद्धार कार्यासाठी महर्षी वि. रा. शिंदे यांनी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थेची स्थापना मुंबई येथे केली. या संस्थेचे पुढील उद्देश होते.

१) अस्पृश्य बांधवांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्याचे निवारण करणे.

२) अस्पृश्य समाजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणणे.

३) अस्पृश्य बांधवाना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे.

४) अस्पृश्य बांधवांना खऱ्या धर्माची शिकवण देणे इत्यादी.

या मिशनच्या शाखा मुंबई, पुणे, हुबळी, सातारा, ठाणे, दापोली, मालवण, मंगळूर, मद्रास, अकोला, अमरावती, इंदूर, भावनगर, कोल्हापूर या ठिकाणी उघडण्यात आल्या. या संस्थेच्यावतीने महर्षी शिंदे यांनी अनेक उपक्रम हाती घेतले होते. उदा. अस्पृश्य मुलांसाठी शाळा काढणे, वसतिगृहे उघडणे, कीर्तने आयोजित करणे, व्याख्याने इत्यादी.

**अस्पृश्यता निवारण परिषदांचे आयोजन**

अस्पृश्यांचे प्रश्न समजून घेणेसाठी त्यांनी देशभर दौरे काढले व या प्रश्नावर जनजागृती घडवून आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. ठिकठिकाणी अस्पृश्यता निवारण परिषद भरविल्या. सन १९१७ मध्ये कोलकत्ता येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात अस्पृश्यता निवारण्यासंबंधीचा ठराव संमत व्हावा म्हणून पुढाकार घेतला. अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याची दिशा ठरविण्यासाठी महर्षी शिंदे यांनी २३ व २४ मार्च १९१८ रोजी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषद आयोजित केली. सन १९३३ मध्ये 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हे पुस्तक लिहून या प्रश्नाकडे समाजाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

महर्षी शिंदे यांनी आपले संपूर्ण जीवन समाजसेवेसाठी वेचले. समाजातील दीन, दुबळ्या व उपेक्षितवर्गाचे दु:ख दूर करण्यासाठी झटले. कसल्याही फळाची अपेक्षा न बाळगता आपले अंगीकृत कार्य जीवनाच्या अखेरपर्यंत चालू ठेवले. निराश्रीतांसाठी निवारा निर्माण करणारा, माणसाला देव

मानणारा आणि समाज हेच मंदिर समजणारा हा महापुरूष निष्काम कर्मयोगी होता. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या समाजसुधारणा कार्याची दखल घेतल्याखेरीज महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास पूर्ण होणार नाही.

## ● राजर्षी शाहू महाराज (१८७४ ते १९२२)

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक सुधारणांद्वारे बहुजन समाजाला जागृत करण्याचे महान कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. प्रजेची सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडवून आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजर्षी शाहू महाराज होत. त्यांनी विचारपूर्वक सामाजिक आणि राजकीय सुधारणातत्त्वांबाबतीत कधीही तडजोड केली नाही. म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व फक्त कोल्हापूर संस्थान, महाराष्ट्रापुरते मर्यादित न रहाता भारतातही लोकप्रिय झाले. कोल्हापूर संस्थानाचे अधिपती या नात्याने त्यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करण्यावर त्यांनी भर दिला. समाजसुधारणेच्यादृष्टीने अनेक कायदे केले. अस्पृश्य व दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्याचे कार्य केले. महात्मा फुल्यांच्या मृत्यूनंतर नेतृत्वहीन बनलेल्या महाराष्ट्रातील बहुजन समाजाला राजर्षी शाहू महाराजांच्या रूपाने समर्थ नेतृत्व लाभले. बहुजन समाजाला त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी राजर्षी शाहूंनी प्रस्थापित समाजाविरूद्ध संघर्ष केला. त्यांच्या या कार्याविषयी प्रचंड टीका झाली. पण त्यांनी आपल्या ध्येयधोरणात व कार्यपद्धतीत बदल केला नाही. त्यांच्या या कार्यामुळेच ते बहुजन समाजाचा लोकनेता म्हणून लोकप्रिय झाले.

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जुलै १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळनाव यशवंतराव होते. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे, तर आईचे नाव राधाबाईसाहेब होते. जयसिंगराव घाटगे हे कागल जहागिरीच्या 'थोरल्या' पातीचे प्रमुख होते. कोल्हापूर संस्थानचे चौथे शिवाजी यांना इंग्रजांनी वेडसर ठरवून अहमदनगर जिल्ह्यात कैदेत ठेवले होते. तेथेच त्यांचा सन १८८३ मध्ये दुर्देवी अंत झाला. चौथे शिवाजी यांना औरस पुत्र नसल्याने त्यांची पत्नी आनंदीबाईसाहेब यांनी कागलच्या घाटगे घराण्यातील जयसिंगराव घाटगे यांचा मुलगा यशवंतराव यास १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले. दत्तक विधानानंतर त्यांचे नाव 'शाहू' असे ठेवण्यात आले. २ एप्रिल १८९४ रोजी राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची अधिकार सूत्रे आपल्या हाती घेतली.

### वेदोक्त प्रकरण

वेदोक्त प्रकरण सन १८९९ मध्ये घडले. छत्रपती शाहू महाराज आपली नित्य पूजाअर्चा करीत असताना त्यांचा पुरोहित नारायण भटजी वेदोक्त मंत्राऐवजी पुराणोक्त मंत्र म्हणत होता. याबद्दल त्यांनी पुरोहिताला विचारले असता पुरोहिताने असे उत्तर दिले की, आपण क्षत्रिय नाही म्हणून

पुराणोक्त मंत्र म्हणत आहे. या उत्तराने शाहू महाराजांना ब्राह्मणशाहीची प्रवृत्ती समजून आली. प्रत्यक्ष राजाबरोबर असे वर्तन करणाऱ्या पुरोहितांचे सर्वसामान्य जनतेशी कसे वर्तन असेल याची जाणीव झाली. त्यामुळेच त्यांनी या भिक्षुशाहीविरूद्ध संघर्ष करण्याचा निश्चय केला.

### राजर्षी शाहू महाराजांचे जातिभेद निर्मूलनाचे विचार

भारतीय समाजाच्या प्रगतीच्या मार्गावर जातिभेद ही फार मोठी धोंड उभी होती. ही धोंड बाजूला सारून प्रगतीचा मार्ग मोकळा करणे ही सहज साध्य गोष्ट नव्हती. हिंदू समाजातील प्रत्येक जात स्वतंत्र होती. दुसऱ्या जातीशी रोटी-बेटी व्यवहार होत नव्हते. जातीतही अनेक उपजाती होत्या. प्रत्येक उपजात दुसऱ्या उपजातीशी फटकून वागत असे.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या भाषणांमधून जातिभेद समस्येविषयी निर्भिड मते मांडली. सामाजिक विषमता, अन्याय, शोषण इत्यादींबाबत समाजात जे रोष निर्माण झाले आहेत त्याचे मूळ कारण या जातिभेदात आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते. सर्वप्रथम जातिभेद मोडले पाहिजेत हे प्रतिपादन करताना ते म्हणतात, ''जातिद्वेष हा हिंदुस्थानचा पुराणा रोग आहे. परशुरामाने निःक्षत्रिय पृथ्वी केली या म्हणण्यात जातिद्वेषाचे प्रतिबिंब पूर्णपणे पडलेले दिसते. या जातिद्वेषाची उचलबांगडी करायची असेल तर जातिभेदच मोडला पाहिजे. जातिभेद मोडून आपण सर्व एक होऊ या''. शाहू महाराजांनी आपल्या भाषणात जपानमधील सामुराई लोकांचे उदाहरण देतात. जपानच्या प्रगतीसाठी जसे सामुराई या श्रेष्ठ दर्जाच्या लोकांनी आपला वरिष्ठ दर्जा व हक्क सोडून दिला तसा प्रयत्न ब्राह्मण व क्षत्रिय (मराठे) यांच्यापासून झाला पाहिजे.

### राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृश्योद्धाराचे कार्य

#### अस्पृश्यांचे शिक्षण

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील सर्वच मागासलेल्या जातींचा उद्धार शिक्षणाच्या माध्यमातून करण्याचे धोरण स्वीकारले होते. शिक्षणाच्या प्रसारासाठी अस्पृश्य मानलेल्या जातीत 'विद्याप्रसारक मंडळी' नावाची संस्था स्थापन केली होती. भास्करराव जाधव हे त्या संस्थेचे प्रमुख होते. या संस्थेमार्फत वसतिगृहासाठी विद्यार्थी शोधणे, अस्पृश्य मुलाचा शैक्षणिक दर्जा स्पृश्य शाळांतील मुलांच्या दर्जाइतका आणणे, अस्पृश्य मुलांमध्ये शिक्षणाविषयी आस्था निर्माण करणे व त्या शाळांची संख्या वाढविणे इत्यादी महत्त्वपूर्ण कार्य हाती घेतले. सन १८९४ मध्ये कोल्हापूर संस्थानात अस्पृश्यांसाठी फक्त ५ शाळा होत्या व विद्यार्थी संख्या १६८ होती. पुढे शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे सन १९०७-०८ साली अस्पृश्य शाळांची संख्या १६ वर गेली व

अस्पृश्य मुलांची संख्या ४१६ इतकी झाली. सन १९१२ पर्यंत अस्पृश्य शाळांची संख्या २७ व विद्यार्थी संख्या ६३६ इतकी झाली.

**अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी शाहू महाराजांनी काढलेले काही खास आदेश**

१. त्यावेळी कोल्हापूरात चांभार, महार इत्यादी अस्पृश्य लोकांसाठी एक रात्रशाळा होती. शाहू महाराजांनी २८ नोव्हेंबर १९०६ च्या आदेशाने ती शाळा कायम केली.

२. ४ ऑक्टोबर १९०७ च्या आदेशाने कोल्हापुरात चांभार व ढोर समाजातील मुलींच्या शाळेसाठी मंजुरी दिली. त्याचबरोबर या शाळेसाठी दरसाल ९६ रू. ची तरतूद संस्थानाच्या स्त्री शिक्षणाच्या अंदाजपत्रकात केली.

३. १९०९ मध्ये भास्करराव जाधव यांनी स्थापन केलेल्या अस्पृश्यांच्या वसतिगृहाच्या इमारतीसाठी जागा उपलब्ध करून दिली.

४. २४ नोव्हेंबर १९११ रोजी काढलेल्या आदेशाने संस्थानातील सर्व अस्पृश्यवर्गास सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले. त्याचबरोबर अस्पृश्यातील हुशार विद्यार्थ्यांना दरबाराकडून वेळोवेळी खास शिष्यवृत्या दिल्या.

५. २८ सप्टेंबर १९१९ च्या आदेशाने संस्थानातील अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद केल्या.

६. शाहू महाराजांचे धाकटे पुत्र प्रिन्स शिवाजी यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ १९२० साली अस्पृश्य लोकांच्या विद्येच्या उत्तेजनाकरिता १० हजार रूपयांची प्रॉमिसरी नोट तयार करून त्याच्या व्याजात दरमहा ५ रू. प्रमाणे ८ शिष्यवृत्या सुरू केल्या.

अशा प्रकारे, अस्पृश्यांना उच्चवर्णीयांच्या बरोबरीने आणण्यासाठी शाहू महाराजांनी शिक्षणाच्या क्षेत्रात क्रांतिकारक आणि धाडसी निर्णय घेतले.

**हजेरी व वेठवरळा पद्धती बंद केली**

मागासवर्गीयांना, दलित पतितांना दारिद्रय आणि दु:खाच्या खाईतून बाहेर काढणे हे शाहू महाराजांनी पवित्र कार्य मानले. दीन-पददलित, दु:खी पिडीतांची सेवा म्हणजेच मानवतेचा सेवा या भूमिकेतून त्यांनी अस्पृश्य मुक्तिसंग्राम चालविला. अस्पृश्य मुक्तीचा पहिला आदेश २७ जुलै १९१८ रोजी मंजूर होऊन तो ३ ऑगस्ट १९१८ रोजी कोल्हापूर गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाला. त्यामध्ये अस्पृश्यांवर लादलेल्या हजेरी पद्धतीचे निर्मूलन करण्यात आले आहे. २९ सप्टेंबर १९१८ रोजीच्या महाराजांच्या हजेरी संदर्भातील आदेशाने 'गट्टेचोर' जातीची हजेरी महाराजांनी माफ केल्याचे जाहीर केले. पुढे माणगाव येथे भरलेल्या अस्पृश्यांच्या परिषदेत शाहू महाराजांनी आपण हजेरी का बंद केली हे स्पष्ट केले.

हजेरीप्रमाणेच अस्पृश्यांच्या विशेषत: महार समाजाच्या माथ्यावर वेठवरळा ही अमानुष पद्धत लादली होती. वेठवरळा पद्धतीखाली पाटील, कुलकर्णी हे गावकामगार अथवा सरकारी अधिकारी महारांस अनेक प्रकारची कामे सांगून विनामोबदला राबवून घेत असत. या संदर्भात १ ऑगस्ट १९१८ रोजीच्या आदेशात महाराज म्हणतात, ''जर महार लोकांनी आपली वतने रयताच्यात दाखल करावीत म्हणून अर्ज दिला तर त्यांच्याकडून अर्जाच्या तारखेपासून वेठवरळा नोकरी घेणेचे नाही. जर कोणी आपल्या मनगटाच्या जोरावर सदर लोकांना वेठवरळा करण्यास लावील तर त्यांना नोकरीतून पेन्शन न देता कमी केले जाईल व वतनदार असल्यास त्यास वतनातूनही कमी केले जाईल याची दखल प्रत्येक गाव कामगारास द्यावी याप्रमाणे जरूर तजवीज करावी''.

## अस्पृश्यता निवारणार्थ जाहीरनामे

अस्पृश्यता हा मानवजातीवरील कलंक आहे. हा कलंक पुसून काढण्यासाठी व अस्पृश्यतेचे, जातिसंस्थेचे निर्मूलन करण्यासाठी १९१९ च्या जानेवारी मध्ये दोन जाहीरनामे मंजूर केले. त्यातील पहिला महसूल, व्याज इत्यादी खात्यांना होता. त्यात महाराज म्हणतात, ''कोल्हापूर इलाख्यातील रेव्हिन्यू, ज्युडिशियल आदि करून सर्व अधिकाऱ्यांनी आमच्या संस्थानात जे अस्पृश्य नोकरी धरतील त्यांना प्रेमाने व समतेने वागविले पाहिजे. जर कोणा अधिकाऱ्याची वरीलप्रमाणे अस्पृश्यांना वागविण्याची इच्छा नसेल त्याने हा हुकूम पोहोचल्यापासून सहा आठवड्यांच्या आत नोटीस देऊन राजीनामा द्यावा. त्याला पेन्शन मिळणार नाही. आमची अशी इच्छा आहे की, आमच्या राज्यातील कोणाही इसमाला जनावराप्रमाणे न वागविता मनुष्य प्राण्याप्रमाणे वागवावे. आमच्या अधिकाऱ्यांनी मिशनरी, आर्य समाजिस्ट, रेल्वे व गव्हर्नमेंट अधिकाऱ्यांचे ह्या बाबतीत अनुकरण करावे.''

असाच एक जाहीरनामा आरोग्य खात्यालाही जारी केला होता. विद्या खात्याच्या काढलेल्या आदेशातही त्यांनी असे स्पष्ट केले होते की, ''अस्पृश्यांना समानतेच्या पातळीवर वागविले नाही तर संबंधित प्राचार्यांना त्याचा जाब द्यावा लागेल आणि त्यांना मिळणारे अर्थसाहाय्य बंद केले जाईल.''

## अस्पृश्यता निर्मूलनासाठी प्रत्यक्ष कृती

शाहू महाराज हे कृतिशील समाजसुधारक होते. अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी अनेक जाहीरनामे काढले होते. जाहीरनाम्यातील तत्त्वांची प्रत्यक्ष कृती हवी होती. स्वत: प्रत्यक्ष आचरण केले. अस्पृश्यांना आपल्या खाजगी सेवेत आणि सरकारी नोकऱ्यांत घेऊन त्यांच्याविषयीची अस्पृश्यता काढून टाकली. शाहू महाराजांनी १९१७ मध्ये आपल्या लष्करी फडात चार अस्पृश्यांची नेमणूक केली, त्यापैकी दोन महार व दोन मांग होते. ५ ऑगस्ट १९१८ रोजीच्या एका हुकूमाने अस्पृश्य जातीच्या लोकांना तलाठी नेमण्याबद्दल आदेश दिला. संस्थानातील कुलकर्णी वतने खालसा केली आणि ब्रिटिश मुलखाप्रमाणे तलाठी नेमले. अस्पृश्यांसाठी तलाठीवर्ग सुरू केले. ८ ऑगस्ट १९१८ रोजीच्या हुकूमाने असा आदेश

दिला की, ''ज्या जातीची लोकवस्ती जास्त असेल त्या जातींचा तलाठी नेमावा. महार, मांग, चांभार इत्यादी जातीच्या लोकांना होईल तितका प्रेफरन्स् द्यावा, प्रत्येक पेट्यास पाच व प्रत्येक महालास निदान तीन अस्पृश्य असावेत.''

शाहू महाराजांनी अस्पृश्य जातीतील काही जणांच्या नेमणुका मुलकी खात्यात दप्तरबंद म्हणून तर काहीच्या नेमणुका पोलीस खात्यात पोलीस म्हणून केल्या. १९२० साली महाराजांनी शहरातील पोलीस गेटवर सोळा महारांची नेमणूक केली. चांभार जातीतील पैलवानांना 'सरदार' व भंग्याना 'पंडित' अशी नावे दिली. महार, भंगी, चांभार या नावांना जी अस्पृश्यता चिकटलेली होती ती काढून टाकायचा प्रयत्न केला.

छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्योद्धाराचे केवळ विचार मांडले नाहीत तर प्रत्यक्ष कृतीही केली. त्यातून बहुजन समाजासमोर आदर्श निर्माण केला. त्यामुळे महाराष्ट्रातील अस्पृश्य समाज त्यांना देव मानू लागला. १९२० साली कोल्हापूर संस्थानातील माणगांव येथे भरलेल्या परिषदेत डॉ. आंबेडकरांना अस्पृश्य चळवळीचे नेतृत्व करण्याबाबत प्रोत्साहन दिले. स्वतः नागपूर, दिल्ली येथे भरलेल्या अस्पृश्य परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारले. शाहू महाराजांच्या अस्पृश्योद्धारक कार्यावर व धोरणावर फार मोठी टीका झाली. परंतु ते या कार्यापासून दूर गेले नाहीत. अस्पृश्यांना शिक्षणाची प्रेरणा दिली. त्यांना जागृत केले व आपल्या अधिकार प्राप्तिसाठी चळवळ करण्यास प्रोत्साहन दिले. अशा प्रकारे, राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्योद्धाराचे भरीव कार्य केले.

### ● डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९१ ते १९५६)

महात्मा फुले यांना गुरूस्थानी मानून त्यांनी चालू केलेली अस्पृश्यता निर्मूलन, स्त्री दास्य विमोचन, अस्पृश्यांचे शिक्षण, स्त्री शिक्षण, सांस्कृतिक विषमतेचा अंत, आर्थिक शोषणमुक्ती चळवळ पुढे नेण्याचा वसा डॉ. आंबेडकरांनी घेतला. त्यांनी या चळवळीला अधिक क्रियाशील, धारधार आणि सक्षम बनविले. विशेषतः शोषितवर्गाचे शिक्षण झाले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. सामाजिक सुधारणेच्या किंवा प्रबोधनाच्या काळात काही समाजसुधारकांनी अस्पृश्यता निवारण्याचे कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वानुभवाच्या आधारावर अस्पृश्यांना या गुलामगिरीच्या बंधनातून मुक्त होण्यासाठी जागृत व संघटित करण्याचे, शिक्षणाद्वारे त्यांच्यात नवविचारांचा प्रसार करण्याचे व आत्मसन्मानाचा नवीन मार्ग दाखविण्याचे काम केले. डॉ. बाबासाहेबांच्या मते शिक्षण हीच शोषण मुक्तीची पायवाट आहे. भारतातील शोषितांच्या आणि पददलितांच्या दैन्यावर रामबाण उपाय म्हणजे शिक्षण होय अशी त्यांची विचारसरणी होती. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या तीन तत्त्वात डॉ. बाबासाहेबांच्या सर्व शैक्षणिक विचारांचे सार सामावलेले आहे. अनेक वर्षांच्या गुलामगिरीतून, अत्याचारातून आपल्या बांधवांची सुटका करून भारतीय घटनेनुसार त्यांना आर्थिक विकासाची संधी

उपलब्ध करून देण्याचे अलौकिक कार्य त्यांनी केले. ते अन्यायाविरूद्ध समर्थपणे लढणारे बंडखोर नेते, व्यासंगी व अलौकिक बुद्धिमत्ता लाभलेले व्यक्तिमत्त्व होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेशातील महू या गावी झाला. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोलीपासून आठ कि.मी. अंतरावर असलेले आंबावडे हे त्यांचे मूळगाव. माता भीमाबाई व पिता रामजी यांचे बाबासाहेब हे १४ वे अपत्य. डॉ. बाबासाहेबांचे मूळगाव भीमराव रामजी आंबेडकर असे होते. बाबासाहेबांचे वडील लष्करात सुभेदार होते. पुढे ते सातारा येथे स्थायिक झाले. तेथेच त्यांचे बालपण गेले. बाबासाहेबांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण दापोली, सातारा व मुंबई येथे झाले. मुंबईच्या एलूफिन्स्टन हायस्कूलमधून १९०७ मध्ये मॅट्रिकची परीक्षा पास झाले. त्यांचा जन्म महार जातीत झाला असल्याने त्यांना अगदी बालपणापासूनच अस्पृश्यतेचे चटके बसले होते. शैक्षणिक जीवनात त्यांना अनेक प्रकारचे कटू अनुभव आले होते. वर्गातील बरोबरीच्या मुलांकडून त्यांना अवहेलना सहन करावी लागली होती. सातारा येथील शाळेतील शिक्षकाने 'मी महारांच्या मुलाला संस्कृत विषय शिकवणार नाही' असे सांगून त्यांचा मनोभंग केला होता. या सर्व घटनांचा बाबासाहेबांच्या मनावर खोल परिणाम झाला होता. कॉलेजच्या शिक्षणासाठी मुंबईच्या एलूफिन्स्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यांना बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी शिष्यवृत्ती दिली. नोव्हेंबर १९१२ मध्ये ते बी.ए. झाले. उच्च शिक्षणासाठी १९१३ मध्ये ते अमेरिकेला गेले. १९१५ मध्ये 'प्राचीन भारतातील व्यापार' या विषयावर प्रबंध लिहून कोलंबिया विद्यापीठाची एम.ए.ची पदवी संपादन केली. १९१६ मध्ये सादर केलेल्या 'नॅशनल डिव्हिडण्ड् ऑफ इंडिया : ए हिस्टॉरिकल ॲण्ड ॲनॅलिटिकल स्टडी' या प्रबंधाबद्दल १९२५ मध्ये कोलंबिया विद्यापीठाने त्यांना पीएच.डी. पदवी दिली. २१ ऑगस्ट १९१७ रोजी ते भारतात परत आले. १९१८ मध्ये मुंबईच्या सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये एका वर्षासाठी त्यांची अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली. ५ जुलै १९२० रोजी डॉ. आंबेडकर आपले अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण करण्यासाठी पुन्हा इंग्लडंला गेले. तेथे त्यांनी प्रथम अर्थशास्त्रामध्ये बी.एस्सी. पदवी संपादन केली. 'द प्रॉब्लेम ऑफ रूपी' या त्यांच्या प्रबंधाबद्दल त्यांना विद्यापीठाने डी.एस्सी. पदवी दिली. त्याचबरोबर डॉ. आंबेडकर याच वास्तव्यात 'बार ॲट लॉ'ची परीक्षा उत्तीर्ण झाले. १९२३ मध्ये ते मायदेशी परत आले.

### डॉ. बाबासाहेब आंबडकरांचे अस्पृश्योध्दाराचे कार्य

### अस्पृश्यांना संघटित व संघर्षासाठी जागृत केले

भारतीय हिंदू समाजात केवळ विचाराने बदल होण्याची किंवा हा उच्चवर्णीय समाज स्वत:हून सुधारणा करण्याची डॉ. आंबेडकरांना शक्यता वाटत नव्हती. आर्थिक व सामाजिक समतेच्या आपल्या हक्कासाठी अस्पृश्यांना संघटित करणे व अहिंसात्मक मार्गाने संघर्ष करून आपले न्याय हक्क मिळविणे त्यांना आवश्यक वाटत होते. परंपरागत गुलामगिरीचे परावलंबी जीवन जगणाऱ्या समाजात आत्मविश्वास निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी हाती घेतले.

**बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना**

इंग्लंडहून भारतात परत आल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी आपल्या सार्वजनिक कामाला सुरुवात केली. अस्पृश्य समाजात जागृती घडवून आणण्यासाठी व त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी २० जुलै १९२४ रोजी डॉ. आंबेडकरांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्यावतीने अस्पृश्य समाजासाठी वाचनालये, प्रौढांसाठी रात्रीच्या शाळा सुरू केल्या. शिक्षण घेण्यासाठी अस्पृश्यांना प्रोत्साहित केले. या शिक्षणसंस्थांमध्ये शिक्षकांची नियुक्ती करताना दलित विद्यार्थ्यांकडे सहानुभूतीने पाहणाऱ्या व त्यांच्या उन्नतीचा प्रयत्न करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती केली जात असे. अस्पृश्यांना विशेष सवलती मिळाल्याशिवाय त्यांचा विकास होणार नाही याची त्यांना जाणीव होती. गव्हर्नरच्या कार्यकारी मंडळाचा सदस्य म्हणून काम करताना किंवा घटना समितीमध्ये सदस्य म्हणून काम करताना अस्पृश्यवर्गाला आपल्या सर्वांगीण प्रगतीसाठी आवश्यक त्या सवलती मिळतील अशी त्यांनी दक्षता घेतली.

**अस्पृश्यांच्या हक्कांसाठी संघर्ष**

डॉ. आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्य बांधवांना अन्यायाचा प्रतिकार करण्यास आणि न्याय हक्कांसाठी संघर्ष करण्यास शिकविले. अस्पृश्य हे देखील या देशाचे नागरिक आहेत आणि या देशावर इतरांसारखाच अस्पृश्यांचाही अधिकार आहे हे सांगितले. आपल्या अस्पृश्य बांधवांमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी त्यांनी वृत्तपत्राचा आधार घेतला. त्यांनी ३ एप्रिल १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक सुरू केले. यातून आपल्या बांधवांवर शतकानुशतके होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. हे पाक्षिक १५ नोव्हेंबर १९२९ पर्यंत चालले.

**महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह**

महाडचा सत्याग्रह म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दलित मुक्तिक्रांतीची सुरुवात होय. त्यांनी चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर हल्ला करून बंडाचे पहिले निशाण येथेच रोवले. १९ व २० मार्च १९२७ रोजी बहिष्कृत हितकारिणी सभेचे पहिले अधिवेशन महाड येथे घेण्याचे ठरविले गेले. अस्पृश्योद्धारक गोपाळबुवा वाळंगकर हे महाडचेच होते व आपल्या कार्यावर प्रेम करणारे अनेक सहकारी महाडचेच होते म्हणून या कार्यासाठी महाडची निवड करण्यात आली. ४ ऑगस्ट १९२३ रोजी रा.ब.सी.के. बोले यांनी मुंबईच्या विधिमंडळात एक ठराव पास करून घेतला. त्यानुसार सार्वजनिक पाणवठे, धर्मशाळा, शाळा व बगीचे इत्यादी ठिकाणी अस्पृश्यांना मुक्त संचार असावा असा कायदेवजा मांडलेला ठराव मंजूर झाला. ५ ऑगस्ट १९२६ रोजी श्री. बोले यांनी कायदेमंडळात ठराव पास करून घेतला की, म्युनिसिपालिटी, लोकल बोर्ड यांनी पूर्वीच्या ठरावाची अंमलबजावणी केली नाही तर त्यांना सरकारतर्फे मिळणारी ग्रँट बंद होईल. महाडच्या म्युनिसिपालिटीने या ठरावाची अंमलबजावणी

केली होती. पण तेथील अस्पृश्यांना तळ्यावर जाऊन पाणी भरण्याचे धाडस होत नव्हते. म्हणून डॉ. आंबेडकरांनी या चवदार तळ्यातील पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरविले. या घटनेमुळे अस्पृश्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होणार होता. महाडच्या घटनेबद्दल वृत्तपत्रातून टीका सुरू झाली. त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी डॉ.आंबेडकरांनी ३ एप्रिल १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक पन्हा सुरू केले. ४ एप्रिल १९२७ च्या बैठकीत सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांच्या मुक्त संचाराविषयी केलेला ठराव रद्द केला. डॉ. आंबेडकरांनी २५ व २६ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथेच सत्याग्रह परिषद घेण्याचे ठरविले. या परिषदेच्या प्रारंभी त्यांनी सत्याग्रह परिषदेचा उद्देश स्पष्ट केला. २० मार्च १९२७ रोजी महाड येथे सत्याग्रह करून त्या तळ्याच्या पाण्यावर अस्पृश्यांचाही हक्क आहे याची जाणीव सर्वांना करून दिली.

### मनुस्मृतीचे दहन

जातिव्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या मनुस्मृती हा हिंदूच्या धर्मग्रंथाचे दहन करण्याचा निर्णय २५ व २६ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे भरलेल्या सत्याग्रह परिषदेतच घेतला होता. राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक गुलामगिरीची वचने या धर्मग्रंथात आहेत. २५ डिसेंबर १९२७ रोजी डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन केले. यापुढे दलित जाती-जमाती हिंदू धर्माने दिलेली अन्यायी वागणूक सहन करणार नाहीत हे स्पष्ट केले. या घटनेमुळे अस्पृश्य समाजात आत्मविश्वास निर्माण झाला. आपल्यावरील अन्यायाविरूद्ध लढण्याची जिद्द निर्माण झाली.

### डॉ. बाबासाहेबांची मंदिरप्रवेशाची चळवळ

हिंदू धर्मातील उच्चवर्णीयांनी अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवट्यावर येण्यास जसा हक्क नाकारला होता तसाच मंदिर प्रवेशाचा हक्कही नाकारला होता. अस्पृश्य जर मंदिरात आले तर मंदिर भ्रष्ट होईल असा अपसमज समाजात पसरविला होता. मंदिरात प्रवेश केल्याने अस्पृश्यांचे प्रश्न सुटणार नाहीत हे डॉ. बाबासाहेबांना माहीत होते. हिंदू मंदिरप्रवेशाची चळवळ अस्पृश्यांच्या सामाजिक गुलामगिरीची बंधने तोडण्यासाठी केलेली चळवळ होती. मंदिरप्रवेशामागे पूजन करण्याचा प्रमुख उद्देश नसून त्यांच्या प्रवेशाने मंदिर भ्रष्ट होत नाही किंवा मूर्ती अपवित्र होत नाही हे सिद्ध करावयाचे होते.

### १) अंबादेवी मंदिर सत्याग्रह

विदर्भातील अमरावती शहरात अंबादेवीचे फार प्राचीन मंदिर आहे. तेथे दरवर्षी विजयादशमीला मोठी यात्रा भरते. नऊ दिवस नवरात्र उत्सव चालतो. संपूर्ण विदर्भातील लोक विजयादशमीला देवीच्या दर्शनासाठी येतात. परंतु या मंदिरात अस्पृश्यांना प्रवेशबंदी होती. या मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून अस्पृश्य बांधव १९२५ सालापासून प्रयत्न करीत होते. मंदिरप्रवेशाला सनातन्यांचा

विरोध होता. डॉ. बाबासाहेबांच्या विचाराने प्रभावित होऊन मांगोजी नावाच्या महाराने मंदिरात प्रवेश करून दर्शन घेतले. पण मंदिराच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर खटला भरला. त्याला १ महिन्याची शिक्षा झाली.

डॉ. पंजाबराव देशमुखांनी मंदिरप्रवेशाच्या चळवळीला पाठिंबा देण्यासाठी गावोगावी दौरे काढले. त्यांच्या अध्यक्षतेखाली सत्याग्रह समिती स्थापन केली. मंदिरप्रवेशासाठी सत्याग्रह करणाऱ्या सत्याग्रहींना दिशा देण्यासाठी डॉ. बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यांची एक परिषद अमरावती येथे घेण्याचे ठरविले. त्यानुसार १३ व १४ नोव्हेंबर १९२७ रोजी अमरावतीच्या इंद्रभुवन नाट्यगृहात वऱ्हाड अस्पृश्य परिषद भरली. १५ नोव्हेंबर पासून मंदिरप्रवेश सत्याग्रह करण्याचे ठरविण्यात आले. अंबादेवी देवस्थानचे अध्यक्ष श्री. दादासाहेब खापर्डे यांनी पुरातन मंडळीचे मतपरिवर्तन करून अमरावतीचे अंबादेवी मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केले. याबद्दल श्री. खापर्डे यांना स्वजातीयांनी दोष दिला.

### २) पुणे येथील पर्वती मंदिर सत्याग्रह

पुण्यामध्ये पर्वती टेकडीवर असलेल्या मंदिरप्रवेशासाठीही अस्पृश्य बांधवाना सत्याग्रह करावा लागला. हे मंदिर अस्पृश्य बांधवाना खुले करावे म्हणून ना.ग. गोरे, रा.के. खाडिलकर, एस.एम. जोशी, शिरूभावू लिमये इत्यादींनी मंदिराच्या ट्रस्टला पत्र लिहिले होते. परंतु विश्वस्त मंडळाने हे मंदिर खाजगी आहे असा दावा करून या पत्राला दाद दिली नव्हती. मंदिरप्रवेशासाठी सत्याग्रह मंडळ स्थापन केले. मंडळाचे अध्यक्ष शिवराम कांबळे व उपाध्यक्ष पा.ना. राजभोज होते. १३ ऑक्टोबर १९२९ रोजी पुणे मंदिर सत्याग्रह सुरू झाला. श्री. एस.एम. जोशी, भुस्कुटे, शिवराम कांबळे, काका गाडगीळ इत्यादी सुमारे २५० कार्यकर्त्यांनी सत्याग्रहात भाग घेतला. त्यात स्त्रियांनीही भाग घेतला होता. सत्याग्रहीना मारहाण केली. पुढे वर्षभरानंतर अस्पृश्यांना मंदिर खुले केले.

### ३) नाशिक येथील काळाराम मंदिर सत्याग्रह

नाशिक येथील मंदिरप्रवेशाची चळवळ महाराष्ट्रात गाजली. १९३० साली नाशिक येथील प्रसिद्ध काळाराम मंदिरात प्रवेश मिळविण्यासाठी हजारोंच्या संख्येने सत्याग्रह पार पडला. तथापि, मंदिरप्रवेशाचा निर्णय ताबडतोब लागला नाही. सन १९३५ पर्यंत हा लढा चालू होता. ३ मार्च १९३० रोजी झालेल्या मंदिरप्रवेश सत्याग्रहात डॉ. आंबेडकर, अमृतराव रणखांबे, पा. ना. राजभोज, पतितपावन दास, केशव नारायण देवरे इत्यादींनी भाग घेतला. या घटनेकडे नाशिकचे जिल्हाधिकारी गॉर्डन हे कायदा व सुव्यवस्थेच्यादृष्टीने बघत होते. २ मार्च १९३० रोजी नाशिक काळाराम मंदिर बंद ठेवण्याचा आदेश दिला. ३ मार्चला सुरू झालेल्या सत्याग्रहात १४५ सत्याग्रही होते. त्यात ३९ स्त्रिया होत्या. काळाराम मंदिर खाजगी मालकीचे असल्याने मंदिरात सत्याग्रहींनी प्रवेश करू नये असे पुजाऱ्यांचे मत होते. तर या मंदिराला सरकारी अनुदान मिळते म्हणून ती सार्वजनिक मालमत्ता आहे असे सत्याग्रहींचे म्हणणे होते.दि. १ एप्रिल, ७ एप्रिल व ९ एप्रिल या दिवशी सत्याग्रह झाले.

सहभागी स्त्री-पुरूष सत्याग्रहींना अटक केली. १५ एप्रिल रोजी रामनवमीच्या दिवसी सत्याग्रह होऊ नये म्हणून १४४ कलम लावण्यात आले. तरीही सत्याग्रहींनी मंदिरप्रवेशाचा प्रयत्न केला. त्यांना अटक होऊन शिक्षा झाल्या. पुढे १९३६ नंतर मंदिराचे दरवाजे अस्पृश्यांसाठी खुले केले. या सत्याग्रहामुळे अस्पृश्यांना आपल्या हक्काची जाणीव होऊन अन्यायाविरूद्ध लढा कसा द्यावयाचा याची शिकवण मिळाली.

### अस्पृश्यांच्या शिक्षणासाठीचे कार्य

शिक्षण हे समाजोन्नतीचे एक प्रभावी साधन आहे. शिक्षणातून व्यक्तीचा मानसिक आणि बौद्धिक विकास होतो असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा'' हा त्यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा पाया आहे. अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी २० जुलै १९२४ रोजी डॉ. बाबासाहेबांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' या संस्थेची स्थापना केली. १९४६ मध्ये त्यांनी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली. या संस्थेच्यावतीने मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना केली. १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. दलित समाजाच्या, अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी वसतिगृहांची निर्मिती केली. परिषदा, मेळावे, सभा घेऊन स्त्री-पुरूषांना शिक्षण घेण्यासाठी प्रवृत केले.

### वृत्तपत्रे व ग्रंथ

वर्तमानपत्र हे समाजाच्या विचारांना चालना देण्याचे अतिशय महत्त्वाचे कार्य करते. भारतातील अस्पृश्यतेच्या मुक्ततेच्या लढ्यासाठी वृत्तपत्रांची नित्तांत आवश्यकता आहे याची जाणीव डॉ. आंबेडकरांना होती. अस्पृश्यांच्या चळवळीमागील भूमिका स्पष्ट करणे व या चळवळीला ज्यांनी विरोध केला त्यांना सडेतोड उत्तर देण्यासाठी ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' पाक्षिक सुरू केले. या पाक्षिकासाठी राजर्षी शाहू महाराजांनी अडीच हजार रूपये देणगी दिली. डॉ. आंबेडकर इंग्लंडला गेल्यावर लोकाश्रयाभावी हे वृत्तपत्रातून ते स्पृश्यवर्गाच्या टीकेला उत्तर देऊ शकणार होते. सन १९२७ मध्ये 'बहिष्कृत भारत' पाक्षिक सुरू केले. तथापि हे पाक्षिकही अल्पजीवी ठरले. १९२८ साली समता परिषदेतर्फे 'समता' पत्र सुरू केले. त्यानंतर बाबासाहेबांनी 'जनता' व 'प्रबुद्ध भारत' ही पत्रे सुरू केली. डॉ. बाबासाहेबांची वृत्तपत्रे अल्पजीवी ठरली असली तरी त्यांनी या वृत्तपत्रांतून अस्पृश्यांवर होणाऱ्या विविध प्रकारच्या अन्यायाला वाचा फोडली.

डॉ. आंबेडकर हे ग्रंथांना गुरू मानत असत. परदेशात असताना त्यांनी विविध विषयांवर सखोल चिंतन केले. कोणताही विषय मांडत असताना गाभ्यापर्यंत जाऊन संशोधन करण्याचे त्यांचे वैशिष्ट्ये होते. प्रारंभीच्या काळातील आर्थिक स्थिती व सिद्धांताविषयीचे त्यांचे प्रबंध व ग्रंथ, नंतरच्या काळातील हिंदू धर्माच्या मीमांसेच्या संदर्भात त्यांनी केलेले लिखाण यावरून त्यांच्या विद्वत्तेची व

बुद्धिमत्तेची प्रचीती येते. शिक्षणसंस्था, वाचनालये, वृत्तपत्रे, सभा-संमेलने, परिषदा आणि विविध ग्रंथ याद्वारे आपल्या अस्पृश्य बांधवाना संघटित करून सुशिक्षित करण्याचे कार्य केले. त्यामध्ये 'हू वेअर दी शूद्राज ? बुद्ध अँड हिज धम्म, द अनूटचेबल्स, दि प्रॉब्लेम ऑफ रूपी, रिडल्स इन हिंदुइझम, थॉटस ऑन पाकिस्तान, महाराष्ट्र ॲज अ लिंग्विस्टिक स्टेट, स्टेटस अँड मायनॉरिटीज इत्यादींचा समावेश होतो.

### डॉ. बाबासाहेबांचे राजकीय कार्य

डॉ. बाबासाहेब इंग्लंडहून परत आल्यानंतर त्यांनी आपल्या बांधवांच्या मुक्तिसंग्रामासाठी आयुष्य समर्पित करण्याचा निर्णय घेतला. अस्पृश्यांना राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू केले. १९२६ ते १९३६ या काळात मुंबई विधिमंडळावर सदस्य म्हणून काम करताना अस्पृश्यांचे कल्याण, प्राथमिक शिक्षणातील दोष, दारूबंदीची आवश्यकता इत्यादी विषयांवर त्यांनी विद्वत्तापूर्ण विचार मांडले. सायमन कमिशनच्यावेळी त्यांनी ब्रिटिशांना सहकार्य करून अस्पृश्यांच्या हितासाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. सायमन कमिशनला एक स्वतंत्र निवेदन देऊन प्रांतिक कायदेमंडळात अस्पृश्यांचे हितसंबंध व हक्काचे रक्षणासाठी कोणत्या तरतूदी असाव्यात हे कळविले. अस्पृश्यांच्या शिक्षणाची सोय, त्यावर समान खर्च करण्याची तरतूद, सैन्य व पोलीस दलात अस्पृश्यांची भरती, अस्पृश्यांना नोकरीत प्राधान्य देण्याची ३० वर्षाची तरतूद अशा मागण्या केल्या.

### गोलमेज परिषदा

डॉ. आंबेडकरांना ब्रिटिशांनी सन १९३० मध्ये लंडन येथे भरविलेल्या पहिल्या गोलमेज परिषदेत भारतातील अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून बोलविण्यात आले होते. त्यावेळी अस्पृश्यांवर होणारे अन्याय, अत्याचार व त्यांचे खडतर जीवन, त्यांचे दु:खमय जीवन इत्यादी विषयांवर त्यांनी प्रभावीपणे विचार मांडले. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी केलेली स्वतंत्र मतदार संघाची मागणी ब्रिटिशांनी उचलून धरली. सप्टेंबर १९३१ मध्ये भरलेल्या (लंडन) दुसऱ्या परिषदेत महात्मा गांधी उपस्थित होते. यावेळी अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदार संघाबाबत डॉ. आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्यात तीव्र मतभेद झाले. महात्मा गांधीनी स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीस प्रखर विरोध केला.

### पुणे करार

दुसऱ्या गोलमेज परिषदेत एकमत होऊ शकले नाही. म्हणून इंग्लंडचे तत्कालीन पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी ऑगस्ट १९३२ मध्ये 'जातीय निवाडा' जाहीर केला. यात अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ देण्याचे मान्य केले होते. महात्मा गांधीचा याला प्रखर विरोध होता. या ब्रिटिशांच्या कुटिल धोरणाला विरोध करण्यासाठी महात्मा गांधीनी आमरण उपोषण सुरू केले. प्रारंभी हे महात्मा गांधींचे उपोषण म्हणजे राजकीय स्टंट आहे असे डॉ. आंबेडकरांना वाटले. पण गांधीजींच्या प्रकृतीची काळजी सर्वत्र निर्माण झाली. तेव्हा श्रेष्ठ नेत्यांनी एकत्र बसून एक योजना तयार केली. त्यानुसार

स्वतंत्र मतदार संघाऐवजी अस्पृश्यांना राखीव मतदार संघ दिले. याला डॉ. बाबासाहेबांनी मान्यता दिली. या योजनेवर १९३२ मध्ये महात्मा गांधी व डॉ. आंबेडकर यांच्या पुणे येथे सह्या झाल्या. म्हणून या योजनेला 'पुणे करार' असे म्हणतात. मोठ्या मनाने डॉ. बाबासाहेबांनी महात्मा गांधीजींचे प्राण वाचविले. या घटने संदर्भात धनंजय कीर म्हणतात, 'महात्मा गांधीजींचे प्राण वाचवून आंबेडकर महात्मा बनले'. या करारामुळे महात्मा गांधीजींचे जीवनही वाचले आणि दुसरीकडे अस्पृश्यांच्या कल्याणाचा व संरक्षणाचा प्रश्न सुटला.

### स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना

१९३५ चा कायदा अंमलात आल्यानंतर निवडणुका होणार होत्या. या निवडणूकीत भाग घेण्याचे त्यांनी ठरविले. राजकारणात प्रत्यक्ष भाग घेऊनच गांजलेल्या आपल्या अस्पृश्यवर्गाची दुःखे दूर करता येतील असा त्यांचा विश्वास होता. आपले हित दुसरे कोणी करणार नाही. आपले हित आपणच पाहिले पाहिजे. यासाठी त्यांना राजकारणात प्रवेश करण्याची गरज वाटली. त्यासाठी त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. १९३७ च्या निवडणूकीत या पक्षाने १३ राखीव जागा जिंकल्या. बाबासाहेब निवडून आले. १९३६ते १९४२ या काळात मजूर पक्षाने बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली शेतकरी व कामगारांच्या प्रश्नांविषयी विधिमंडळात व बाहेर आवाज उठविला.

### अखिल भारतीय शेड्युल्ड कास्टस् फेडरेशनची स्थापना

अस्पृश्यांचा सर्वांगीण उद्धार व्हावा, त्यांच्यात राजकीय हक्काची जाणीव व्हावी यासाठी त्यांनी अखिल भारतीय शेड्युल्ड कास्टस् फेडरेशनची स्थापना केली. १९५२ च्या निवडणूकीत फेडरेशनने २२ पैकी फक्त १३ जागा जिंकल्या. १९४२-१९४६ या काळात क्रिप्स मिशन, कॅबिनेट मिशन, भुलाभाई-लियाकत करार, वेव्हेल योजना इत्यादी राजकीय तोडग्यात अस्पृश्यांच्या मागण्या डावलल्या होत्या. म्हणून डॉ. आंबेडकरांनी ब्रिटिश मुत्सदी नेत्यांना निवेदने दिली, भेटी घेतल्या.

### भारतीय घटनेचे शिल्पकार

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात डॉ. बाबासाहेब कायदामंत्री होते. ते भारताच्या घटना समितीचे सभासद होते. घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली होती. त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार केला. त्यांचा भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीत सिंहाचा वाटा आहे. म्हणूनच 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' अशा शब्दात त्यांचा उचित गौरव केला जातो.

डॉ. आंबेडकर कायदामंत्री असताना त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक 'हिंदू कोड बिल' तयार केले. पंडित नेहरूनीही या बिलाची प्रशंसा केली होती. या बिलास कॉंग्रेसमधील प्रतिगाम्यांनी विरोध केला. त्यामुळे नेहरूंनीही माघार घेतली. परिणामी डॉ. आंबेडकरांनी आपल्या कायदामंत्रीपदाचा राजीनामा

दिला. स्वातंत्र्योत्तर काळात सर्व पददलित वर्गाचे प्रतिनिधित्व करणारा 'भारतीय रिपब्लिकन पक्ष' स्थापन केला.

**धर्मांतर**

हिंदू धर्मातील अस्पृश्यतेचे चटके प्रत्यक्षात डॉ. आंबेडकरांनी सोसले होते. त्यांनी आपल्या अस्पृश्य बांधवाना न्याय मिळवून देण्यासाठी आपले आयुष्य खर्च केले. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून त्यांनी हिंदू धर्मात सुधारणा करण्याचा शेवटचा प्रयत्न केला. पण सनातन्यानी हा त्यांचा प्रयत्न यशस्वी होऊ दिला नाही. या हिंदू धर्मात दीर्घकाळ राहिल्यास आपल्या समाजास माणुसकीचे अधिकार मिळणार नाहीत. त्यामुळे अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी हिंदू धर्माचा त्याग केल्याशिवाय दुसरा पर्याय नाही असे त्यांचे मत बनले. १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवला येथील परिषदेत 'मी हिंदू' म्हणून मरणार नाही अशी प्रतिज्ञा केली होती. ही प्रतिज्ञा त्यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी पूर्ण केली. नागपूर येथील ऐतिहासिक समारंभात आपल्या असंख्य बांधवासह त्यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी केलेल्या कार्याला भारताच्या इतिहासात तोड नाही. वर्षानुवर्षे असहाय जीवन जगणाऱ्या आपल्या अस्पृश्य बांधवांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क त्यांनी मिळवून दिला. अस्पृश्य हे सुद्धा भारतीय समाजाचे एक घटक आहेत. त्यांनाही इतराप्रमाणे समान हक्क मिळाले पाहिजेत आणि हे हक्क जर नाकारत असतील तर अस्पृश्य बांधवांनी संघटित होण्याचा मंत्र दिला. त्यांनी स्वतःच्या पायावर उभा रहावे यासाठी प्रयत्न केले. त्यांच्यातील आत्मविश्वास वाढविला. त्यांना आत्मसन्मानाने जगण्यास शिकविले. अस्पृश्यांमधील माणूस जागा केला. ही एक समाज परिवर्तनीय क्रांतिकारक घटना होती. हिंदू समाजात आपल्या समाजाची होणारी दुर्दशा पाहून त्यांनी बौद्ध धर्माचा मार्ग दाखविला. भारतीय राज्यघटनेच्या आधारे आपले स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न केला. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत १७ व्या कलमात अस्पृश्यतेवर कायदेशीर बंदी घातली. आज अस्पृश्य समाजात जी स्वत्वाची भावना निर्माण झालेली आहे त्याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाच द्यावे लागते.

- **गोपाळबाबा वाळंगकर**

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात बाबा पद्मनजी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, भिकोबादादा चव्हाण, रामकृष्ण भांडारकर, सर चंदावरकर या समाजसुधारकांनी दलितांच्या उन्नतीसाठी कार्य केले. या समाजसुधारकांनी अस्पृश्यांविषयी सहानुभूती किंवा भूतदया म्हणून निरनिराळ्या संस्था सुरू केल्या. सहभोजनासारखे कार्यक्रम घडवून आणले. या समाजसुधारकांचा भर मतपरिवर्तनावर होता. महात्मा

फुले, राजर्षी शाहू महाराजांनी प्रत्यक्ष कृतीतून अस्पृश्योद्धाराचे कार्य केले. महात्मा फुल्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन गोपाळबाबा वाळंगकरांसारखे नेते निर्माण झाले. ते अस्पृश्य उद्धार चळवळीचे प्रमुख कार्यकर्ते होते. ब्रिटिशपूर्वकाळात महार, मांग, चांभार इत्यादी मागासवर्गीय जातींनी मराठ्यांच्या लष्करात पराक्रम गाजवून मानाची पदे भूषविली. शिवरायांच्या मावळ्यांमध्ये या जातींचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. परंतु पेशवे काळातील राज्यकर्ते मनुवादी असल्याने विटाळासारख्या दांभिक बाबींचा अतिरेक झाला. त्याचा परिणाम म्हणून पेशवेकाळात अस्पृश्य जातीतील पराक्रमी सरदारांचाही छळ झाला. विटाळ्याच्या कल्पनेच्या अतिरेकामुळेच पेशव्यांनी अस्पृश्य जातीच्या सैनिकांची भरती केली नाही. सवर्ण हिंदूनी त्यांना शाळा, सरकारी गेस्ट हाऊस, पाणवठे, सरकारी नोकऱ्या या ठिकाणी प्रवेश नाकारला होता. या संदर्भात १८९५ साली पुणे येथे भरलेल्या सामाजिक परिषदेत गोपाळबाबा वाळंगकर यांनी मन हेलावून सोडणारे भाषण केले होते. त्यांनी आपल्या लेखनाद्वारे जागृती केली. त्यांचे लेखन, भाषणे दीनबंधूच्या जुन्या फाईलीमध्ये पहावयास मिळतात.

गोपाळबाबा वाळंगकरांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरपूर्वकालीन अस्पृश्यांच्या चळवळीचे जनक म्हणून मानाचे स्थान आहेच. त्याचबरोबर आद्य दलित पत्रकार, विद्रोही साहित्यिक, कीर्तनकार म्हणून त्यांची ओळख आहे. 'अनार्य दोष परिहार मंडळी' या संस्थेचे गोपाळबाबा वाळंगकर संस्थापक अध्यक्ष होते. जनजागृतीसाठी गोपाळबाबानी जे अभंग लिहिले ते 'अखंड' या नावाने प्रसिद्ध आहेत. अशा विविध मार्गांनी अस्पृश्यता निवारण करण्यासाठी त्यांनी प्रखर लढा दिला. ते म्हणतात, 'जातिभेद व अस्पृश्यता हे दोन काल्पनिक राक्षस आर्य म्हणविणाऱ्या हिंदूनी निर्माण केलेले आहेत. त्यात परमेश्वराचे काडीमात्र अंग नाही'. त्यांनी १ ऑगस्ट १८८९ रोजी 'विटाळ विध्वंसन' नावाचे पुस्तक लिहिले. त्यात हिंदू धर्मपंडितांना २६ प्रश्न विचारून आव्हान दिले होते. हिंदू उच्चवर्णीयांच्या सांगण्यावरून इंग्रज सरकारने १८९३ साली अस्पृश्यांना लष्करात घेण्यास बंदी घातली होती. या अन्यायाविरूद्ध गोपाळबाबानी लढा उभारला. सन १८८६ मध्ये ते सैन्यातून निवृत्त झाले आणि समाजसेवेचे कार्य हाती घेतले. त्यांनी सार्वजनिक जीवनात जे कार्य केले त्याची सरकारने दखल घेऊन १८९५ मध्ये त्यांची महाड तालुक्याच्या लोकल बोर्डावर सदस्य म्हणून निवड केली. २० मार्च १८९५ रोजी होणाऱ्या लोकल बोर्डाच्या बैठकीवर सर्व सवर्ण समाजातील सदस्यांनी बहिष्कार घातला. गणसंख्ये अभावी बैठक स्थगित केली. पण कुलाबा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व वाळंगकर हे सवर्णांच्या दडपणाला बळी पडले नाहीत. त्यांनी 'अनार्य दोष परिहारक' या नावाची संस्थाही काढली. अस्पृशोद्धारक चळवळीतील त्यांच्या योगदानाबद्दल डॉ. बाबासाहेब म्हणतात, ''अस्पृश्यतेची चळवळ प्रथम सुरू करण्याचा मान कोणास द्यावयाचा झाल्यासा तो अनार्य दोष परिहारक मंडळास व मुंबई प्रांतास द्यावा लागले.'' अशा महान समाज सुधारकाचा मृत्यू १९०० साली झाला.

- **शिवराम जानबा कांबळे**

शिवराम जानबा कांबळे यांनी गोपाळबा वाळंगकर यांच्यानंतर अस्पृश्य चळवळीत महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. ते मराठीतील एक नामांकित लेखक होते. त्यांचे वडील जानबा कांबळे हे पुण्यातील भांबुर्डे गावचे वतनदार महार होते. त्यांनी आपला गावकीचा व्यवसाय सोडून पुण्यामध्ये युरोपियनांकडे नोकरी धरली. त्यांचे सुपुत्र शिवराम यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे शिकविले. त्यांनी मराठी व इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान संपादन केले.

शिवराम कांबळे यांनी सासवड येथे इ.स. १९०३ मध्ये महार समाजाच्या ५१ गावातील लोकांची सभा बोलवली. या सभेत समाजातील लोकांना शिक्षण मिळावे आणि महार बटालियनचे पुनर्गठन करून लष्करात तसेच पोलीस खात्यात नोकऱ्या मिळाव्यात यासाठी सरकार दरबारी अर्ज दाखल करण्याचे ठरविले. ते पुण्याच्या पर्वती मंदिर सत्याग्रहात सहभागी होते. अस्पृश्यता निवारण्यासाठी त्यांनी अनेक सभा, संमेलने, अधिवेशने भरविली. १९०४ साली 'श्रीशंकर प्रासादिक सोमवंशीय हितचिंतक मित्र सभा' स्थापन केली. या समाजाच्यावतीने ग्रंथालय सुरू केले. त्यांनी १९२० च्या नागपूर येथील अखिल भारतीय बहिष्कृतवर्ग परिषदेत प्रभावी भाषण केले. जुन्या चालरीतींना विरोध केला. जातिभेद हे सर्व सुधारणांच्या मार्गातील अडथळे आहेत असे त्यांचे मत होते.

## स्वयं अध्ययन प्रश्न - ३

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१. सत्यशोधक समाजाची स्थापना कोणी केली ?

२. डिप्रेस्ड क्लासेस मिशनची स्थापना कोणी केली ?

३. प्रख्यात विचारवंत व बंडखोरवृत्तीचे लेखक थॉमस पेन यांनी कोणता ग्रंथ लिहिला ?

४. 'अनार्य दोष परिहार मंडळी' या संस्थेची स्थापना कोणी केली ?

५. सन १९०३ मध्ये सासवड येथे महार समाजाच्या ५१ गावातील लोकांची परिषद कोणी बोलावली ?

६. 'बहिष्कृत हितकारिणी सभेची' स्थापना कोणी केली ?

७. १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवला येथे झालेल्या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणती प्रतिज्ञा केली ?

८. पुणे करार कोणांमध्ये झाला ?

९. राजर्षी शाहू महाराजांना कोणत्या प्रकरणामुळे ब्राह्मणशाहीची प्रवृत्ती समजली ?

१०. 'हू वेअर दी शुद्राज' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१. ........ यांनी सन १८५३ मध्ये महार, मांग इत्यादी लोकांना विद्या शिकविण्याकरिता मंडळी नावाची संस्था काढली.

(अ) शिवराम जानबा कांबळे (ब) महात्मा जोतिबा फुले

(क) राजर्षी शाहू महाराज (ड) महर्षी वि. रा. शिंदे

२. ......... च्या आदेशाने राजर्षी शाहू महाराजांनी संस्थानातील अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद केल्या.

(अ) २८ सप्टेंबर १९१९ (ब) २८ सप्टेंबर १९२२

(क) १० नोव्हेंबर १९१७ (ड) १० नोव्हेंबर १९१८

३. विटाळ विध्वंसन हे पुस्तक ....... यांनी लिहिले.

(अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (ब) गोपाळबाबा वाळंगकर

(क) महात्मा जोतिबा फुले (ड) धोंडो केशव कर्वे

४. अस्पृश्य समाजातील व्यक्तीना 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मंत्र ....... यांनी दिला.

(अ) बाबा पद्मनजी (ब) शिवराम जानबा कांबळे

(क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (ड) सर चंदावरकर

५. राजर्षी शाहू महाराजांनी ........ रोजी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतली.

(अ) ५ डिसेंबर १८९४ (ब) २ एप्रिल १८९५

(क) २ एप्रिल १८७४ (ड) २ एप्रिल १८९४

## ३.२.४ वृत्तपत्रांची कामगिरी

आधुनिक काळात वृत्तपत्रे ही सामाजिक जीवनाचा एक अविभाज्य अंग बनली आहेत. आज लोकशाही राष्ट्रांमध्ये वृत्तपत्र व्यवसायाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून वृत्तपत्रांना ओळखले जाते. समाजातील विविध हालचाली, घडामोडी यांची माहिती वृत्तपत्राद्वारे जनतेला होते. लोकशिक्षण आणि समाजजागृती करणे हे वृत्तपत्रांचे महत्त्वपूर्ण कार्य आहे. राज्यकर्त्यांची

चांगली-वाईट कामे, त्यांची ध्येय धोरणे, शासकीय धोरणे व कामकाज हे वृत्तपत्रांमुळेच जनतेला कळते. भारतीय स्वातंत्र्य लढा, राजकीय क्रांती, सामाजिक प्रश्न सोडविण्याचे आणि आर्थिक विकासाचे साधन म्हणूनही आतापर्यंत वृत्तपत्रांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. कोणत्याही समाजाचे प्रतिबिंब वृत्तपत्रात उमटत असते. त्याचबरोबर समाजात विविध विचारांचा प्रसार वृत्तपत्रांच्या माध्यमातून होत असतो. भारतात प्रारंभी इंग्रजांनी आपली वृत्तपत्रे सुरू केली. या वृत्तपत्रांचे महत्त्व जाणून पुढे भारतीय भाषेतील वृत्तपत्रे भारतीय संपादकानी सुरू केली. त्यानंतर विविध प्रांतांमध्ये प्रादेशिक भाषेत वृत्तपत्रे सुरू झाली. भारतीय वृत्तपत्रसृष्टीच्या इतिहासात सामाजिक पत्रकारितेला विशेष महत्त्व आहे. प्रारंभीच्या काळातील वृत्तपत्रे एका ध्येयाने झपाटलेली होती. सामाजिक सुधारणांबरोबरच इंग्रजांना हाकलून देण्यासाठी त्यांच्याविरूद्ध लढा देणारी होती. महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रांनीही महाराष्ट्राच्या समाजसुधारणेस फार मोठा हातभार लावला आहे.

### मुद्रणकला व ख्रिश्चन मिशनरी

मुद्रणकला व वृत्तपत्रे परस्परांशी निगडित आहेत. मुद्रणकलेच्या ज्ञानाशिवाय वृत्तपत्रांची निर्मिती होणे अशक्यच आहे. युरोपियनांना मुद्रणकलेचे ज्ञान होते. भारतीयांना मुद्रणकलेचे ज्ञान नव्हते. मराठा सत्तेच्या काळात पोथ्याची हस्तलिखिते केली जात. पण मुद्रणाचे ज्ञान नव्हते. भारतात मुद्रणकलेचा प्रसार करण्याचे श्रेय ख्रिश्चन मिशनऱ्यांना जाते. भारतात आल्यावर ख्रिश्चन धर्माची तत्त्वे येथील समाजात रूजविण्यासाठी बायबल या ख्रिश्चन धर्मग्रंथांची भारतीय भाषांमध्ये छपाई करण्याची आवश्यकता भासू लागली. अतिशय परिश्रमाने भारतीय भाषांमधील टाईप पाहून देशी भाषेतील ग्रंथरचनेला मुद्रणकलेचा उपयोग करून देण्याचे श्रेय डॉ. कॅरे या धर्मप्रसारकाकडे जाते. डॉ. कॅरे हे बंगालमधील श्रीरामपूर येथे धर्मप्रसारक होते. त्यांच्या परिश्रमामुळे आशिया खंडातील ३०-४० भाषांमध्ये ख्रिश्चनांच्या बायबलचा प्रसार झाला असा लेख डॉ. कॅरे यांच्या कबरीवर कोरलेला आहे.

पोर्तुगीजांनी सर्वप्रथम गोव्यामध्ये छापखाना आणला आणि १५५७ मध्ये 'कॅटेसिझम' हे पहिले पुस्तक छापले. दुसरा छापखाना तामिळनाडू राज्यात तिनेवेली येथे सुरू झाला. महाराष्ट्रात मुंबई येथे १७६२ मध्ये भिमजी परिख यांनी हिंदू धर्मग्रंथ छापण्यासाठी छापखाना सुरू केला. त्याचबरोबर इंग्रजांनी पहिला छापखाना १६७४ मध्ये मुंबईत सुरू केला. १७७२ मध्ये मद्रास व १७७९ मध्ये कलकत्ता येथे छापखाने सुरू झाले.

## भारतातील वृत्तपत्रांचा प्रारंभ

इंग्रजांनी १७५७ च्या प्लासीच्या लढाईने हिंदुस्थानात आपल्या सत्तेचा पाया घातला. त्यानंतर कंपनीने प्रादेशिक विस्ताराला सुरुवात केली. ईस्ट इंडिया कंपनीच्या शासकीय व्यवहाराबाबत असंतोष निर्माण होऊन तो प्रकट करण्याच्या इच्छेतून भारतात वृत्तपत्रांचा जन्म झाला. भारतात पहिले वृत्तपत्र काढण्याचा प्रयत्न ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी बोल्ट यांनी केला. त्याच्या या कृतीबद्दल त्याना इंग्लंडला परत पाठविण्यात आले. वृत्तपत्रांबाबत कंपनीचा दृष्टिकोन उदार नसल्याने बोल्टनंतर १२ वर्षे वृत्तपत्र काढण्याचा कोणी प्रयत्न केला नाही. भारतात पहिले वृत्तपत्र काढण्याचे श्रेय जेम्स ऑगस्ट हिकी यांच्याकडे जाते. २९ जानेवारी १७८० रोजी बंगाल गॅझेट (Bengal Gazette) किंवा कलकत्ता ॲडव्हर्टायझर (Calcutta General Advertiser) या नावाने साप्ताहिक चालू केले. हे वृत्तपत्र १७८२ पर्यंत चालले. त्याने कंपनीच्या अधिकाऱ्यांवर टीका केली. त्यामुळे कंपनीने हिकीच्या वृत्तपत्रावर बंदी घातली. त्याच्यावर खटला भरला आणि त्याला तुरूंगात जावे लागले. त्यानंतर १७८० मध्ये 'इंडिया गॅझेट', १७८४ मध्ये कलकत्ता गॅझेट, १७८५ मध्ये बंगाल जरनल आणि ओरिएंटल मॅगेझीन ऑफ कलकत्ता, १७८६ मध्ये कलकत्ता क्रॉनिकल, १७८८ मध्ये मद्रास कुरिअर, १७८९ मध्ये दि बॉम्बे हेरॉल्ड इत्यादी अनेक वृत्तपत्रे निघाली.

## महाराष्ट्रातील वृत्तपत्रारंभ

महाराष्ट्रात वृत्तपत्राचा प्रारंभ सन १७८९ मध्ये सुरू केलेल्या दि बॉम्बे हेरॉल्ड या साप्ताहिकाने झाला. त्यानंतर सन १७९० मध्ये बॉम्बे करिअर व सन १९९१ मध्ये बॉम्बे गॅझेट ही वृत्तपत्रे सुरू झाली. कालांतराने बॉम्बे टाईम्स व टेलिग्राफ ही वृत्तपत्रे चालू झाली. रॉबर्ट नाईट यांनी बॉम्बे टाइम्स, स्टँडर्ड व टेलिग्राफ या पत्रांचे एकत्रीकरण करून टाईम्स ऑफ इंडिया हे वृत्तपत्र सुरू केले. ही सर्व वृत्तपत्रे इंग्रजांनी चालविलेली व त्यांच्या वाचनासाठी होती. भारतीय समाजाच्या स्थितीचे किंवा त्यांच्या विचारांचे ज्ञान या वृत्तपत्रातून होत नव्हते.

## मराठी वृत्तपत्रांचा आरंभ

ब्रिटिशांच्या शिक्षणविषयक धोरणामुळे भारतीयांनी पाश्चिमात्यांच्या प्रगत विचारसरणीचे ज्ञान आत्मसात केले. या ज्ञानाच्या प्रभावामुळे महाराष्ट्रात अनेक समाजसुधारक निर्माण झाले. या सुधारकांनी आपल्या ज्ञानाचा प्रसार करून समाजसुधारणा घडवून आणावी यादृष्टीने प्रयत्न केले. त्यातूनच मराठी वृत्तपत्रांचा आरंभ झाला. बाळशास्त्री जांभेकरांच्या दर्पण या वृत्तपत्राअगोदर 'मुंबापूर वर्तमान' हे मराठी पत्र २० जुलै १८२८ पासून सुरू होते. परंतु त्याचा चालक व संपादक कोण होता, प्रकाशक कोण, हे पत्र किती काळ चालले या विषयी माहिती मिळत नाही. मुंबईमध्ये दर्पणच्या अगोदर पहिले गुजराती वृत्तपत्र मुंबईना समाचार (मुंबई समाचार) १ जुलै १८२२ रोजी पारशी गृहस्थ 'फर्दुनजी मर्झबान' यांनी चालू केले होते.

## मराठी वृत्तपत्राचे जनक बाळशास्त्री जांभेकर

मराठी वृत्तपत्राचे जनक बाळशास्त्री जांभेकरांचा जन्म ६ जानेवारी १८१२ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील पोंभुर्ले या गावी झाला. त्यांचे संपूर्ण नाव बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर असे होते. त्यांची बुद्धी अतिशय कुशाग्र होती. लहान वयातच त्यांनी संस्कृत, मराठी, इंग्रजी, गुजराती, बंगाली, फारसी या भाषा आत्मसात केल्या होत्या. ते सन १८३० मध्ये बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे डेप्युटी सेक्रेटरी व पुढे दोन वर्षांनी सेक्रेटरी झाले. अक्कलकोट युवराजाचे शिक्षक म्हणून त्यांची नेमणूक झाली. १८३४ मध्ये मुंबईच्या एलूफिन्स्टन कॉलेजमध्ये असिस्टंट प्रोफेसर म्हणून त्यांची नियुक्ती झाली. मुंबईतील पहिल्या ट्रेनिंग कॉलेजचे संचालक म्हणून त्यांनी काम केले. १७ मे १८४६ रोजी त्यांचे अकाली निधन झाले.

बाळशास्त्री जांभेकरांनी ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू केले. ६ जानेवारी हा बाळशास्त्रींचा जन्मदिन आणि दर्पण प्रकाशनदिन हा 'पत्रकारदिन' म्हणून साजरा केला जातो. दर्पण हे साप्ताहिक होते आणि ते इंग्रजी व मराठी अशा दोन भाषांत प्रसिद्ध होत असे. हे वृत्तपत्र सुमारे आठ वर्षाहून अधिक काळ लोकजागृतीचे कार्य करीत होते. २६ जून १८४० रोजी दर्पणचा शेवटचा अंक प्रकाशित झाला. हे मतपत्र म्हणून लोकप्रिय झाले. जांभेकरांनी विधवाविवाह, स्त्रीशिक्षण यांचा पुरस्कार केला. बालविवाहाचा निषेध केला. या संदर्भात दर्पणमधून त्यांनी सातत्याने लेखन केले.

दर्पणप्रमाणेच बाळशास्त्री जांभेकर आणि भाऊ महाजन यांनी 'दिग्दर्शन' या नावाचे मराठी भाषेतील पहिले मासिक सुरू केले. त्यामध्ये मुख्यत्वे करून शास्त्रीय नीतिविषयक लेख प्रसिद्ध होत असत. दिग्दर्शनमध्ये विषयांची विविधता होती. उदा. सणांची उत्पत्ती, रसायनशास्त्र, चीन देशाचे वर्णन, सूक्ष्मदर्शक यंत्र, मुंबईचे वर्णन, वाफयंत्रे, तपकिरीचे व्यसन इत्यादी. अशा प्रकारे, जांभेकरांनी सामाजिक पत्रकारितेचा पाया रचून वृत्तपत्रसृष्टीचा शुभारंभ केला.

### प्रभाकर

बाळशास्त्री जांभेकरांचे 'दर्पण' पत्र निघाल्यानंतर सुमारे नऊ वर्षांनी 'प्रभाकर' चा उदय झाला. ते एक स्वतंत्र बाण्याचे वृत्तपत्र होते. 'प्रभाकरा'चे संपादक गोविंद विठ्ठल उर्फ भाऊ महाजन (१८१५-१८९०) हे १९ व्या शतकाच्या पूर्वार्धातील बाळशास्त्री जांभेकर इत्यादी विद्वान लोकांत गणले जात. स्वतंत्र बाण्याचे नि:स्पृह असे हे गृहस्थ होते. भाऊ महाजन यांनी वृत्तपत्र व्यवसाय केल्यामुळे त्यांचे कर्तृत्व 'प्रभाकर' सारखे एक साप्ताहिक चालवून संतुष्ट न रहाता त्यांनी 'धुमकेतू' नावाचे आणखी एक साप्ताहिक १८५३ साली सुरू केले. पुढे १८५४ साली त्यांनी 'ज्ञानदर्शन' नावाचे त्रैमासिक काढले.

'प्रभाकर' या वृत्तपत्रात लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख यांनी शतपत्रांद्वारे लिखाण केले. हा महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा पहिला प्रयत्न म्हणता येईल. लोकहितवादीनी आपल्या पत्रस्वरूप लेखांतून समाजाविषयी परखडपणे लिहिण्यास प्रारंभ केला. इतिहास, राज्यशास्त्र, अर्थकारण हे त्यांचे अभ्यासाचे विषय होते. त्यांना समाजात सुधारणा व्हावी असे मनापासून वाटत होते. ईश्वराचे मनाने भजन, पूजन करावे व मन शुद्ध ठेवावे हाच धर्म. स्नान केले नाही तर दुःख वाटू नये, लबाड बोलले तर दुःख वाटावे. परंतु ही भावना आमच्या लोकांत नाही. हे लोक आचरणाकरिता प्राण देतात आणि विचार मुळीच करीत नाहीत. भस्म लावले म्हणजे शुद्धि होते असे समजतात. परंतु पन्नास वेळा भस्म लावले व दोनशे वेळा अंग धुतले तर मनाचे मळ जातील काय ? ईश्वर शरीरास पाहत नाही मनास पाहतो.''

**केसरी - टिळक : सुधारक - आगरकर**

समाजसुधारणेचे हे व्रत पुढे प्रि. गोपाळ गणेश आगरकर (१८५६-१८९५) यांनी चालविले. प्रि. आगरकर हे केसरीचे पहिले संपादक होते, 'सामाजिक सुधारणा' हा त्यांच्या विचारांचा व लिखाणाचा केंद्रबिंदू होता. त्यांतून त्यांचे टिळकांशी मतभेद झाले. आगरकरांनी १८८७ मध्ये 'केसरी' सोडला. पुढे विजयादशमी म्हणजे १५ ऑक्टोबर १८८८ रोजी 'सुधारक' या आपल्या पहिल्या वृत्तपत्राचा पहिला अंक प्रकाशित केला. फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य, केसरी व सुधारकचे संपादक आणि समाजसुधारक म्हणून आगरकरांची कामगिरी महत्त्वपूर्ण आहे. ते स्पष्ट, परखड आणि ध्येयवादी विचारसरणीचे होते. बालविवाह, केशवपन इत्यादी विरूद्ध ते पोटतिडकीने लिहित. 'सामाजिक सुधारणा कायदा' या लेखात ते म्हणतात, ''ज्यांना मृत्यूपाशाने घेरण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत अशा ९९ वर्षाच्या थेरड्यास नवरा मुलगा समजून एखाद्या सात-आठ वर्षाच्या अल्लड लेकरास बाहुल्यावरच रंडकी करण्यास ज्यास अनीतीचा यत्किंचितही भाग दिसत नाही व तिचा पुनर्विवाह झाल्यास 'अब्रह्मण्यम', 'अब्रह्मण्यम' म्हणून दाही दिशा दणाणून सोडण्यास जे तयार अशा लोकांस आईबापानी व सासूसासऱ्यांनी केवळ आपल्या हौसेखातर सजिव बाहुला-बाहुलीची लग्ने लावण्याचा खेळ खेळल्यापासून तुमचा खेळ होतो. परंतु आमचा जीव जातो'' याच लेखात त्यांनी केशवपनाच्या मूर्ख चालरीविरूद्धही परखड टीका केली आहे.

केसरीचे संपादकपद आगरकरांनी सोडले आणि २५ ऑक्टोबर १८८७ रोजी 'केसरी' टिळकांचा झाला. लोकमान्य टिळकांनी अग्रलेखातून राजकीय, सामाजिक, आर्थिक, शेतीविषयक तसेच दुष्काळ निवारण, आरोग्य संवर्धन इत्यादी विषय हाताळले. असंतोषाला वाचा फोडण्याचे, राजकारणाला जोरदार हादरे देण्याचे सामर्थ्य लोकमान्य टिळकांच्या लेखनात होते. इंग्रजी सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय असा सवाल उपस्थित करून शिक्षण, समाज, अर्थकारणातील अनेक ज्वलंत प्रश्न त्यांनी

हाताळले. अजूनतरी आमच्या सरकारचे डोळे उघडतील का ? राज्य करणे म्हणजे सूड उगविणे नव्हे, हे त्यांच्या अग्रलेखाचे मथळे त्यांच्या मार्मिक आणि उपरोधिक शैलीचे उत्तम नमुने आहेत.

**ज्ञानोदय**

मराठी जनतेत धर्मप्रसाराचे काम सुकर व्हावे म्हणून मिशनऱ्यांनी मराठी भाषा अवगत करून घेतली. पुस्तके तयार केली, शाळा काढल्या, रोगग्रस्थांसाठी मोफत औषधोपचाराची मदत केली. लोकांशी संवाद साधण्याचा एक प्रभावी मार्ग म्हणून मिशनऱ्यांनी आपले लक्ष वृत्तपत्राकडे वळविले. 'ज्ञानोदय' पत्र धर्मप्रसारासाठी निघाले होते. १८४२ साली सुरू झालेले पत्र निरनिराळ्या स्वरूपात वेळोवेळी प्रसिद्ध झाले. महाराष्ट्रातील सामाजिक जीवनात 'ज्ञानोदयाला' एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात विशेष प्रतिष्ठा होती. डॉ. भाऊ दाजी, दादाबो पांडुरंग, डॉ. आत्माराम पांडुरंग, औंधचे राजेसाहेब असे अनेक नामवंत हिंदू त्यांच्या देणगीदारांत होते. महाराष्ट्रातील सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या काळातील एक वादातीत, एक बलवान प्रतीपक्षी व टीकाकार म्हणून एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ज्ञानोदयाला महत्त्व होते. महाराष्ट्राच्या तत्कालीन सांस्कृतिक इतिहासाचे ज्ञान करून घेण्यास त्याचा चांगला उपयोग होतो.

**कृष्णराव भालेकरांच्या दीनबंधूची कामगिरी**

मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासात 'विविध ज्ञानविस्तार' या मासिकाचे विशेष स्थान आहे. कृष्णराव भालेराव (१८५०-१९१०) यांनी पुण्यात १ जानेवारी १८७७ रोजी दीनबंधू पत्राचा पहिला अंक प्रसिद्ध केला. सुरुवातीला पुण्याचे ८ व मुंबईचे १३ वर्गणीदार होते. १८८० पर्यंत वर्गणीदारांची संख्या ३२० वर गेली. कृष्णराव भालेकरांनी मोठ्या धडाडीने व निष्ठापूर्वक दीनबंधू चालविला. पुढे 'दीनबंधू' पत्राची जबाबदारी सोडावी लागली. सत्यशोधक समाजाचे आणखी एक कट्टर पुरस्कर्ते व मुंबईतील कामगार संघटनेचे नेते नारायण मेघाजी लोखंडे व रामजी संतुजी आवटे यांच्या स्वाधीन 'दीनबंधू' पत्र करण्यात आले. ९ मे १८८० रोजी मुंबईहून दीनबंधूचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. दीनबंधूंचे संपादक लोखंडे झाले तरी त्यांचे धोरण जराही बदलले नाही. टीकाकारांना तशाच खरमरीत शब्दांत प्रत्युत्तर देण्यात नारायणराव लोखंडेनी जराही कुचराई केली नाही.

दीनबंधू वृत्तपत्रातून सातत्याने सत्यशोधक विचारांचा प्रसार केला. शेतकऱ्यांची आणि कंत्राटी कामावरच्या मजुरांची दैन्यावस्था इंग्रज सरकारच्या नजरेस आणण्याचे काम या वृत्तपत्राने केले. दीनबंधू मधून महात्मा फुले यांनी धार्मिक रूढी, परंपरा, धार्मिक ग्रंथावर टीका करणारे लेख लिहिले. त्याचबरोबर शिक्षणाचे महत्त्व सांगून निर्मिकाच्या निर्मितीबाबत लेखनातून विवेचन केले. कृष्णराव भालेकर यांनी दीनबंधू, दीनमित्र, अबालहरी, शेतकऱ्यांचा कैवारी या नावाची वृत्तपत्रे काढून लोकजागृती केली. बहुजन समाजाच्या समस्यांना वाचा फोडण्याचे कार्य केले. त्यांनी आपले जीवन सामाजिक पत्रकारितेसाठी, समाजसुधारणेसाठी खर्च केले.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय घटनेचे शिल्पकार व दलितांचे नेते होते. त्याचबरोबर ते संपादक व पत्रकार होते. ब्राह्मणेत्तर वृत्तपत्रांनी जे सामाजिक सुधारणेसाठी योगदान दिले त्या प्रेरणेतून वृत्तपत्र काढण्याची कल्पना पुढे आली. वृत्तपत्र हे आधुनिक युगाच्या प्रगतीचे, लोकशिक्षणाचे माध्यम म्हणून अस्पृश्यांच्या हक्काची मागणी मांडता येईल हे लक्षात घेऊन ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' हे पाक्षिक सुरू केले. 'मूकनायक' मध्ये डॉ. आंबेडकरांनी एकूण १४ लेख लिहिले. 'मूकनायक' सुमारे सहा महिने चालले. पुढे अंतर्गत वादामुळे ते १९२३ साली बंद पडले. मूकनायकने दलित समाजाची चळवळ उभी केली. आपल्या न्याय हक्काची जाणीव अस्पृश्यांमध्ये निर्माण करण्याची कामगिरी केली.

### इंदुप्रकाश

महाराष्ट्रात ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर जे विचारमंथन झाले त्यातून महादेव गोविंद रानडे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर इत्यादीनी समन्वयप्रवण विचारसरणी सुसंगतपणे मांडण्याचा प्रयत्न केला. आपल्या उन्नतीसाठी सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्याची गरज त्यांनी प्रतिपादन केली. मुंबईतील सुशिक्षितवर्गात सुधारणा प्रवृत्तीचा आविष्कार करण्यासाठी वृत्तपत्राची आवश्यकता भासू लागली. त्यातूनच २ जानेवारी १८६२ रोजी 'इंदुप्रकाश' या साप्ताहिकाचा पहिला अंक बाहेर पडला. 'इंदुप्रकाश' हे पत्र विशेष गाजले ते त्यांनी हिरिरीने केलेल्या विधवाविवाहाच्या पुरस्कारामुळे. याचे श्रेय नोकरी सोडून वृत्तपत्राकडे वळलेले विष्णू परशुरामशास्त्री पंडित यांना जाते. त्यांनी १८६४ च्या प्रारंभी इंदुप्रकाशची संपादकीय सूत्रे हाती घेतली व ही जबाबदारी मृत्यूपर्यंत म्हणजे १८७६ सालापर्यंत पार पाडली. विष्णुशास्त्री पंडित हे कर्ते सुधारक असल्याने त्यांच्या संपादनामुळे इंदुप्रकाशचे नाव सर्वतोमुखी झाले.

सन १८७४ साली विष्णूशास्त्री चिपळूणकरानी 'निबंधमाला' मासिक सुरू केले. त्यांनी निबंधमालेतून, स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांचा जोरदार पुरस्कार केला. पाश्चात्यांच्या अंधानुकरणाने आपल्या चालरीती, आचारविचार, भाषा इत्यादीविषयी एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण झाला होता. तो दूर करून आत्मविश्वास निर्माण करण्यात निबंधमालेने मोलाचे कार्य केले.

भारतामध्ये वृत्तपत्रांचा विकास होत असताना महाराष्ट्रात मराठी भाषेतील वृत्तपत्रांचा शुभारंभ झाला. पुणे-मुंबई सोडून महाराष्ट्राच्या इतर भागातही काही वृत्तपत्रे सुरू झाली. सोलापूर येथून कल्पतरू आनंदवृत्त, सोलापूर समाचार, सातारा जिल्ह्यातून श्री शाहू, शुभ सूचक, महाराष्ट्र मित्र इत्यादी वृत्तपत्रांनी महाराष्ट्रातील प्रबोधनाच्या चळवळीमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली.

थोडक्यात, सामाजिक पत्रकारितेमध्ये महात्मा फुले, कृष्णराव भालेकर, बाळशास्त्री जांभेकर, टिळक, आगरकर मुकुंदराव पाटील, गणपतराव पाटील, लोकहितवादी, म. गो. रानडे, डॉ. आंबेडकर इत्यादी संपादकांचे कार्य महत्त्वाचे ठरते. सामाजिक पत्रकारितेचे श्रेय सत्यशोधक चळवळीतील वृत्तपत्र व साप्ताहिकांना दिले जाते. त्यांनी सामाजिक प्रश्नांच्या बाजूने लिखाण केले. सामाजिक पत्रकारितेमुळे बहुजन समाजात शैक्षणिक क्रांती झाली. शिक्षणाचे फायदे-तोटे काय, शिक्षण कसे असावे, कसे शिकवावे, शिक्षणाची गोडी लागण्यास काय करावे या संदर्भात लेख लिहून प्रबोधन केले. धर्म कोणता, अधर्म कोणता याची जाणीव समाजास करून दिली. विधवा पुनर्विवाह, आंतरजातीय विवाह, अनौरस बालकांचा सांभाळ या संदर्भात जनजागृती केली. अशा प्रकारे विविध वृत्तपत्रांनी सामाजिक पत्रकारितेचा पाया घालून सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात मोठी कामगिरी बजावली आहे.

१८८१ मध्ये लोकमान्य टिळक व आगरकर यांनी केसरी वृत्तपत्रातून स्वातंत्र्यविषयक विचार मांडले. भारतीयांना पारतंत्र का आले, स्वराज्य मिळविणे किती आवश्यक आहे, भारतीयांचे पारतंत्र कसे दूर होईल या विषयांवर लिखाण केले. या काळापासून वृत्तपत्राद्वारा होणाऱ्या प्रबोधनाचा दुसरा टप्पा सुरू झाला. पहिल्या टप्प्यात फक्त समाजप्रबोधन, धार्मिक चळवळी यावर लिखाण झाले होते. याच काळात दैनिक साप्ताहिकाबरोबरच दिग्दर्शन, विविध ज्ञानविस्तार, निबंधमाला इत्यादी नियतकालिके सुरू झाली. या नियतकालिकांनी विविध राजकीय व सामाजिक विषयांची मीमांसा करून लोकजागृतीचे कार्य केले. समाजात राष्ट्रभावना निर्माण केली. वृत्तपत्रांची ही भूमिका महत्त्वाची होती.

## स्वयं-अध्ययन प्रश्न - ४

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१. मराठी वृत्तपत्राचे जनक कोणाला म्हणतात ?

२. 'केसरी' वृत्तपत्राचे पहिले संपादक कोण होते ?

३. 'दीनबंधू' वृत्तपत्राने प्रामुख्याने कोणत्या विचारांचा प्रसार केला ?

४. आगरकर कोणत्या महाविद्यालयाचे प्राचार्य होते ?

५. सन १८७४ मध्ये विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी कोणते मासिक सुरू केले ?

६. भारतातील पहिले वृत्तपत्र 'बंगाल गॅझेट' किती वर्षे चालले ?

७. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी कोणत्या वृत्तपत्रात शतपत्राद्वारे लिखाण केले ?

८. केसरीचे पहिले संपादक प्रि. आगरकरांच्या लिखाणाचा केंद्रबिंदू कोणता होता ?

**ब)	योग्य पर्याय निवडा.**

१. भारतात सर्वप्रथम ....... यांनी छापखाना सुरू केला.

(अ) इंग्रज (ब) फ्रेंच (क) पोर्तुगीज (ड) डच

२. भारतात पहिले वृत्तपत्र .......... यांनी सुरू केले.

(अ) जेम्स ऑगस्ट हिकी (ब) बाळशास्त्री जांभेकर

(क) बाळ गंगाधर ठिळक (ड) विष्णुशास्त्री पंडित

३. रॉबर्ट नाईट यांनी बॉम्बे टाईम्स, स्टँडर्ड आणि टेलिग्राफ या वृत्तपत्रांचे एकत्रीकरण करून ........... हे वृत्तपत्र सुरू केले.

(अ) महाराष्ट्र टाईम्स (ब) रणझुंझार

(क) कलकत्ता क्रॉनिकल (ड) टाइम्स ऑफ इंडिया

४. ................ हे मराठीतील पहिले वृत्तपत्र होय.

(अ) ज्ञानोदय (ब) दर्पण (क) केसरी (ड) विजयी मराठा

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी ............ हे पाक्षिक सुरू केले.

(अ) मूकनायक (ब) दीनबंधू

(क) विविध ज्ञानविस्तार (ड) दीनमित्र

६. महाराष्ट्रात वृत्तपत्राचा प्रारंभ ................. या साप्ताहिकाने झाला.

(अ) इंडिया गॅझेट (ब) स्टँडर्ड

(क) दि बॉम्बे हेरॉल्ड (ड) मुंबईना समाचार

## ३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१) मिशन : धर्मप्रसार करणारी संस्था

२) मिशनरी : ख्रिस्ती धर्मप्रसारक

३) गालिचा : लोकरीची सतरंजी

४) बाप्तिस्मा : ख्रिस्ती धर्माची दीक्षा

| | | | |
|---|---|---|---|
| ५) | परिचारिका | : | रूग्णांची शुश्रूषा करणारी स्त्री |
| ६) | शेणवी | : | सारस्वत ब्राम्हण |
| ७) | जरठ | : | म्हातारा |
| ८) | चातुर्वण्य | : | ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चार वर्गाची विशिष्ठ अशी समाजरचना |
| ९) | निष्काम | : | फलाची इच्छा न धरता केलेले कर्म |
| १०) | दस्यु | : | दास |
| ११) | विमोचन | : | मुक्ती, सुटका |
| १२) | अब्रम्हण्यम | : | ब्राम्हणास अनुचित |
| १३) | चौगुले | : | एक गावकामगार |
| १४) | बहुपत्निकत्व | : | एकाच वेळी अनेक भार्या असणे |

## ३.४ सारांश

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीचा कालखंड म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासातील नव्या युगाचा प्रारंभ होय. या काळात ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली सुव्यवस्थित, योजनाबद्ध व कार्यक्षम शासन पद्धतीला प्रारंभ झाला. त्याचबरोबर जातिसंस्थेच्या श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या विचारांनी जखडलेला व अनेक अनिष्ट सामाजिक रूढी परंपरा यांनी बंदिस्त झालेल्या समाजाला सामाजिक समतेचा नवा साक्षात्कार झाला. आधुनिक महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या इतिहासात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी केलेल्या शैक्षणिक व वाङ्मयीन कार्याला महत्त्वाचे स्थान आहे. मिशनऱ्यांनी अनेक शिक्षणसंस्थांची निर्मिती करून समाजातील सर्व वर्गांना प्राधान्याने कनिष्ठ जाती व स्त्रियांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. पाश्चात्यांच्या शिक्षणामुळे परदेशातील भौतिकशास्त्रे तसेच राजकीय, सामाजिक व आर्थिक विचारांचे समाजाला ज्ञान झाले. आपल्या समाजातील सती प्रथा, बालविवाह, विधवा केशवपन इत्यादी अनिष्ट रूढी मानवतेच्यादृष्टीने किती भयानक आहेत याचे ज्ञान भारतीय समाजाला झाले. त्यामुळे काहीनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला तर काहीनी आपल्या समाजातील अनिष्ट रूढी परंपरा दूर करण्याचा प्रयत्न केला. यातून समाजसुधारकांची एक फळी निर्माण झाली. त्यांना समाजसुधारणेची नितांत आवश्यकता जाणवू लागली. त्यांच्या प्रयत्नांतून समाजसुधारणा घडून आली.

याकाळात स्त्रियांच्या विमोचनासाठी आणि अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या वर्गाच्या उद्धारासाठी अनेक समाजसुधारकांनी दिलेले योगदान महत्त्वाचे ठरते. स्त्रियांना जोपर्यंत परंपरागत जीवनातून मुक्त करत नाही, तिला शिक्षण देऊन सुशिक्षित करत नाही तोपर्यंत स्त्रियांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्रस्थापित समाज व्यवस्था देणार नाही याची जाणीव समाजसुधारकांना झाली होती. प्रथमत: महात्मा फुले यांनी स्त्री-पुरूष समानतेचा विचार कृतीत आणला. बाळशास्त्री जांभेकरांसारख्या समाजसुधारकांनी वृत्तपत्रातून स्त्री-शिक्षण, बालविवाह, विधवा पुनर्विवाह इत्यादी विषयांवर आपली सुधारणावादी मते, लोकहितवादीनीही मुलगामी बदलांना पोषक विचार मांडले. पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे यांनी महत्त्वाचे योगदान दिले. समाजातील जातिसंस्थेचा धिक्कार करून समाजात समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न अनेक सुधारकांनी केला. महात्मा जोतिबा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज यांनी अस्पृश्यांची दु:खे दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्य बांधवांच्या न्याय हक्कासाठी आपले आयुष्य खर्च केले. त्याचबरोबर गोपाळबाबा वाळंगकर, शिवराम जानबा कांबळे इत्यादींचे कार्यही महत्त्वाचे ठरते. याचकाळात भारतीयांनी वृत्तपत्रांचे महत्त्व ओळखून देशी भाषेतील अनेक वृत्तपत्रे चालू केली. या वृत्तपत्रांनी राजकीय, सामाजिक स्वरूपाची मोलाची कामगिरी केली.

## ३.५ स्वयं-अध्ययन प्रश्नाची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न - १**

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१) ज्ञानोदय
२) कॅथॉलिक व प्रोटेस्टण्ट
३) ८
४) सन १८१३ चा सनदी कायदा
५) बायबल
६) मिशन हॉस्पिटल
७) मिशनरी
८) जेम्स टी मोल्सवर्थ

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) मुंबईचे वर्णन
२) अहमदनगर
३) रेव्हरंट जस्टिस ॲबट
४) इंग्लंड
५) ७
६) कुमारी फेरार

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१) जॉन स्टुअर्ट मिल
२) राजाराम मोहन रॉय
३) स्त्री-पुरूष तुलना
४) महिला विद्यापीठाची
५) महर्षी धोंडो केशव कर्वे
६) बाबा पद्मनजी
७) पंडिता रमाबाई
८) वधूचा म्हाताऱ्या वराबरोबर केला जाणारा विवाह
९) पंडिता रमाबाई
१०) सावित्रीबाई फुले

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) १८४८
२) ३ जून १९१४
३) हिप्पल
४) १८६३
५) महर्षी कर्वे
६) राजर्षी शाहू महाराज

**स्वयं अध्ययन प्रश्न ३**

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१) महात्मा जोतिबा फुले
२) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे
३) राईटस् ऑफ मॅन
४) गोपाळबाबा वाळंगकर
५) शिवराम जानबा कांबळे
६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
७) मी हिंदू म्हणून मरणार नाही
८) महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर
९) वेदोक्त प्रकरण
१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) महात्मा जोतिबा फुले
२) २८ सप्टेंबर १९१९
३) गोपाळबाबा वाळंगकर
४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
५) २ एप्रिल १८९४

**स्वयं अध्ययन प्रश्न ४**

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१) बाळशास्त्री जांभेकर
२) प्रि. आगरकर
३) सत्यशोधक
४) फर्ग्युसन
५) निबंधमाला
६) २ वर्षे
७) प्रभाकर
८) सामाजिक सुधारणा

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) पोर्तुगीज
२) जेम्स ऑगस्ट हिकी
३) टाईम्स ऑफ इंडिया
४) दर्पण
५) मूकनायक
६) दि बॉम्बे हेरॉल्ड

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. महाराष्ट्राच्या समाजसुधारणेच्या इतिहासात ख्रिस्ती मिशनऱ्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घ्या.

२. महात्मा जोतिबा फुले यांनी स्त्री मुक्तीसाठी केलेल्या कार्याची माहिती द्या.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याची माहिती द्या.

४. महर्षी वि. रा. शिंदे यांनी अस्पृश्य उद्धारासाठी केलेले कार्य स्पष्ट करा.

५. १९ व्या शतकात स्त्री मुक्तीसाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घ्या.

६. राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्योद्धारासाठी केलेल्या कार्याची माहिती द्या.

७. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्रियांसाठी केलेले कार्य स्पष्ट करा.

८. पंडिता रमाबाई यांच्या स्त्री उद्धाराची माहिती द्या.

**ब) टीपा लिहा.**

१) महात्मा जोतिबा फुले
२) विष्णुशास्त्री पंडित
३) शिवराम जानबा कांबळे
४) गोपाळबाबा वाळंगकर
५) पंडिता रमाबाई
६) राजर्षी शाहू महाराज
७) महर्षी वि. रा. शिंदे
८) महर्षी धोंडे केशव कर्वे

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. के सागर - महाराष्ट्रातील समाज सुधारक, के. सागर पब्लिकेशन, पुणे.

२. गं. बा. सरदार - महाराष्ट्र जीवन व परंपरा, खंड १ व २.

३. धनंजय कीर - राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

४. धनंजय कीर - महात्मा जोतिबा फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

५. डॉ. बी. एन. सरदेसाई, डॉ. व्ही. एन. नलावडे - आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६. पाटील व्ही. बी. - १९व्या शतकातील समाजसुधारणेचा इतिहास, के. सागर प्रकाशन, पुणे.

७. जी. एल. भिडे, एन. डी. पाटील - महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

८. शंकरराव खरात - सामाजिक चळवळीचा इतिहास, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे.

# घटक : ४

# अर्थव्यवस्था

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ शेतीचे व्यापारीकरण आणि परिणाम, दख्खनचे दंगे

४.२.२ आधुनिक उद्योगाचा उदय-कापड गिरणी उद्योग

४.२.३ कामगारवर्गाचा उदय-नारायण मेघाजी लोखंडे यांची भूमिका

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ सारांश

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास -

- शेतीच्या व्यापारीकरणाची कारणे व त्याचे परिणाम विशद करता येतील.
- दख्खनच्या शेतकरी उठावाची कारणे व परिणाम स्पष्ट करता येतील.
- आधुनिक उद्योगांसंदर्भात ब्रिटिशांची नीती स्पष्ट करता येईल.
- कापड उद्योगाची माहिती सांगता येईल

- कामगार वर्गाच्या उदयाची कारणे सांगता येतील.
- कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे यांचे कामगार चळवळीतील कार्य, त्यांची भूमिका अभ्यासता येईल.

## ४.१ प्रास्ताविक

ब्रिटिशांच्या व्यापारीवृत्तीचे प्रतिबिंब त्यांच्या आर्थिक धोरणात पाहावयास मिळते. स्वयंपूर्ण असलेल्या ग्रामव्यवस्थेत महत्त्वाचे बदल या काळात झाले. शेतीमध्ये कोणते उत्पादन घ्यायचे हे शेतकऱ्यांच्या मर्जीवर न राहता ब्रिटिशांच्या व्यापारासाठी आवश्यक असलेल्या बाजारपेठेत मागणी असलेली नगदी पीके घेण्याची सक्ती शेतकऱ्यांवर होऊ लागली. या पिकांचा फायदा शेतकऱ्याला होण्याऐवजी दलालांना झाला. बी-बियाणांच्या खरेदीसाठी व शेतसारा भरण्यासाठी त्याला सावकारावर अवलंबून रहावे लागले. शेतकऱ्यांच्या परिस्थितीमध्ये मात्र कोणताही बदल झाला नाही. उलट शेतसारा वसुलीमध्ये सरकारने केलेले बदलही त्याला जाचक ठरू लागले होते. दुष्काळासारख्या संकटासही त्याला सामोरे जावे लागत होते. अशा प्रकारे शेतकरी अस्मानी सुलतानी संकटात सापडला. ब्रिटिशांच्या या व्यापारीवृत्तीतूनच शेतीचे व्यापारीकरण कसे घडून आले, शेतकऱ्यांवर व समाजावर कोणते परिणाम झाले, आधुनिक उद्योगधंद्याला विशेषत: कापड उद्योगाला कशी चालना मिळाली, कामगारवर्गाचा उदय कसा झाला इत्यादी मुद्यांचा अभ्यास या घटकात करणार आहोत.

**पारंपरिक कृषिजीवन**

'कृष' या धातूपासून 'कृषि' हा शब्द बनलेला आहे. जमीन नांगरूण तिच्यात बी पेरणे आणि पेरलेल्या बियांची व त्याच्या रोपांची काळजी घेऊन त्यापासून धान्य मिळवणे म्हणजे कृषि अथवा शेती होय. भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. स्वयंपूर्ण ग्रामीण जीवन हे भारताच्या कृषि अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये होते. शेतातून निघणाऱ्या धान्य उत्पादनातून कुटुंबाच्या व गावाच्या गरजा भागवल्या जात होत्या. या धान्य उत्पादनाव्यतिरिक्त गावाच्या इतर गरजा गावातील कारागीर (अलुतेदार व बलुतेदार) पूर्ण करीत. गावात जे धान्य उत्पादन केले जात होते त्यातून काही भाग महसूल रूपाने सरकारला मिळत असे. गावात पाटील किंवा ग्रामप्रमुख मामलेदाराच्यावतीने कर वसूल करीत असे. हे कराचे प्रमाण साधारण १/६ व १/३ इतके असे. मुख्यत: पाणीपुरवठा, सार्वजनिक बांधकामे व महसूल या बाबतीतच शासनाचा गावाशी संबंध येत असे. तंटेबखेडे झालेच तर गावाची पंचायत न्यायनिवाडा करीत असे. तत्कालीन

खेडेगाव स्वयंपूर्ण असे. गावात वस्तुविनिमयाची पद्धती अस्तित्वात होती. दैनंदिन आर्थिक व्यवहारांमध्ये पैशाला विशेष स्थान नव्हते. शासनसत्ता बदलली तरी त्याचा ग्रामीण समाजरचनेवर, जीवनपद्धतीवर वा अर्थरचनेवर काही परिणाम होत नसे. खेड्यांची ही वैशिष्ट्यपूर्ण आर्थिक स्वयंपूर्णता प्राचीन काळापासून ते मुघल राजवटीच्या अस्तापर्यंत अखंडपणे टिकून होती.

**ब्रिटिशकालीन महसूलविषयक धोरण**

कंपनी सरकारने जास्तीत जास्त जमीन महसूल वसूल करण्याच्यादृष्टीने आपले महसूलविषयक धोरण निश्चित केले. हे धोरण देशाच्या निरनिराळ्या भागात भिन्न भिन्न स्वरूपाचे होते. या महसुली उत्पन्नातून येथील कंपनी सरकारचा खर्च करण्यात आला आणि अतिरिक्त उत्पन्न निरनिराळ्या मार्गांने इंग्लंडला नेण्यात आले.

**कायमधारा**

गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्जने बंगालमध्ये कायमधारा पद्धती लागू केली. याला जमीनदारी पद्धतीही म्हणतात. या पद्धतीत महसूल गोळा करण्याच्या अधिकाराचा लिलाव सुरू केला. जी व्यक्ती जास्तीत जास्त बोली बोलेल त्या व्यक्तीस जमीन महसूल जमा करण्याचा अधिकार देण्यात आला. ही पद्धती बंगाल, ओरिसा व मद्रास प्रांताच्या उत्तरेकडील जिल्ह्यांत आणि वाराणसी जिल्ह्यात लागू केली.

**रयतवारी**

या पद्धतीमध्ये जमिनीच्या उत्पादनाचा अंदाज घेऊन शेतसारा निर्धारित करण्यात आला. प्रत्यक्ष रयतेकडून सरकारी अधिकारी महसूल गोळा करणार असल्यामुळे या व्यवस्थेला रयतवारी असे संबोधण्यात आले. इ.स. १८२० मध्ये रयतवारी व्यवस्था दक्षिण भारतात मद्रास प्रांतात आणि पश्चिम भारतात मुंबई प्रांतात लागू करण्यात आली. यात दर वीस ते तीस वर्षांनी शेतसाऱ्याचा फेर विचार करण्यात येणार होता. शेतसारा रोख स्वरूपात द्यावा लागत असे.

**महलवारी पद्धती**

या व्यवस्थेत रयतेकडून प्रत्यक्ष महसूल गोळा करण्याऐवजी सरकारने गावकऱ्यांशी सामूहिक करार केले. प्रत्येक गावाने किती महसूल द्यावा हे ठरवून देण्यात आले. ही महसूलाची रक्कम ग्रामप्रमुखाने, पाटलाने/मुखियाने सरकारला द्यावी असे ठरविण्यात आले. महलवारी व्यवस्थेनुसार कराचे निर्धारण तीस वर्षासाठी करण्यात आले. ही पद्धती उत्तरप्रदेशाच्या बहुतांशी भागात, मध्य भारतात व पंजाबात लागू करण्यात आली.

**महसूल गोळा करण्याच्या कठोर पद्धती**

महसूलाची पद्धती कोणतीही असो ती गोळा करण्याची पद्धती अतिशय कठोर होती. त्यामुळे वेळेवर शेतसारा भरण्यासाठी त्यांना सावकारांकडून कर्जे काढावी लागत. ती वेळेत भरली नाही तर त्यांच्या जमिनी सावकार काढून घेत असे. त्यातच भारतातील शेतकरी अडाणी, पिकवण्याची पद्धती जुनाट, उत्तम पद्धतीच्या बी-बियाणांचा अभाव, खतांचा अभाव शिवाय दुष्काळ अशा अनेक संकटांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागे. अशा परिस्थितीत इंग्रजांनी त्यांच्या व्यापारी व औद्योगिक वाढीसाठी भारतात नगदी पिकांच्या उत्पादनाला प्राधान्य दिले.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ शेतीचे व्यापारीकरण आणि परिणाम, दख्खनचे दंगे

**शेतीचे व्यापारीकरण**

स्वयंपूर्ण खेड्यांच्या अर्थव्यवस्थेत शेतीच्या व्यापारीकरणाला वाव नव्हता. शेती हा व्यवसाय उदरनिर्वाह पद्धतीने चाले. परिणामी जादा धान्य उत्पादनाला वावही नव्हता किंवा उत्पादित धान्य बाजारपेठेत जाऊन शेतकऱ्याला अर्थप्राप्ती होईल अशी व्यवस्था नव्हती. प्रो. अब्राहम व सबनीस यांनी भारतीय खेडयांची वैशिष्ट्ये सांगितली आहेत. त्यांच्या मते खेड्याची स्वयंपूर्णता ही आनुवंशिक गुण-कर्मावर अवलंबून नव्हती. भौगोलिकदृष्ट्या खेडी अलग असून वाहतूक व दळणवळणाची साधने अपुरी होती. त्यामुळे ग्रामीण लोक परावलंबी बनले. श्रम व काम यांची विभागणी योग्य न झाल्याने कामाच्या पद्धतीत एकसारखेपणा आला. परिणामी वस्तुविनिमय रूढ झाले. खेड्यांचा बाह्य जगाशी संबंध नसल्याने परंपरा चालरीत यांनाच महत्त्व प्राप्त झाले व हे चक्र वर्षानुवर्ष चालू राहिले. या कालखंडात आधुनिकीकरणाची प्रक्रिया सर्व जगभर गतिमान झाली होती. ब्रिटिशांनी त्यांच्या व्यापारी व औद्योगिक धोरणानुसार भारतात नगदी पिकांच्या उत्पादनाला महत्त्व दिले. ही उत्पादने जनतेच्या उपयोगाची नव्हती तर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठा डोळ्यासमोर ठेवून घेतली जात होती.

**शेतीचे व्यापारीकरण - व्याख्या**

व्यापारासाठी पिकांचे उत्पादन म्हणजे शेतीचे व्यापारीकरण होय. इथे, केवळ उदरनिर्वाहाचे साधन म्हणून शेती न करता एक व्यवसाय म्हणून शेती केली जाते. थोडक्यात ज्या शेतमालाचे उत्पादन विक्री करण्याच्या हेतूने केले जाते आणि आपल्या गरजेपेक्षा जादा शेतमाल उत्पादन करून बाजारात त्याची विक्री करून अधिकाधिक नफा मिळवणे हा त्यामागे हेतू असतो तेव्हा त्याला शेतीचे व्यापारीकरण असे म्हणतात.

**शेतीच्या व्यापारीकरणाची कारणे**

ब्रिटिशांनी देशांतर्गत व विदेशी व्यापारामध्ये कंपनीला हितकारक ठरेल असे उत्पादन शेतीमधून घेण्याची सक्ती शेतकऱ्यांवर केली. त्यामुळे कापूस, ऊस, ताग, शेंगदाणा, तीळ, तंबाखू, नीळ, चहा, कॉफी, रबर ही नगदी पिके अन्नधान्याऐवजी घेण्यात येऊ लागली. त्याचबरोबर मसाल्याचे पदार्थ व फळे यांचेही उत्पादन होऊ लागले. शेतीच्या व्यापारीकरणाची काही महत्त्वाची कारणे पुढीलप्रमाणे -

**१) वस्तुविनिमयाऐवजी पैशांचा वापर**

ब्रिटिशपूर्व काळात वस्तुविनियम पद्धतीने दैनंदिन व्यवहार मोठ्या प्रमाणावर चालत होता. गावगाड्यातील बलुतेदारी पद्धतीमुळे पैशाची गरज भासत नसे. कुटुंबाला वर्षभर पुरेसे होईल एवढ्या धान्याचे उत्पादन घेतले जात होते. ब्रिटिशांच्या रोख सारावसुलीच्या धोरणामुळे शेतकऱ्याला पैशाची गरज भासू लागली. त्यासाठी शेतकऱ्याला त्याचा शेतमाल खुल्या बाजारात विकावा लागला. यातून शेतीच्या व्यापारीकरणाला चालना मिळाली.

**२) दळणवळणाची आधुनिक साधने**

रस्ते, रेल्वे व जहाज इत्यादी वाहतुकीच्या नव्या सुविधा निर्माण झाल्या. तारायंत्र व टपालसुविधा यामुळे संदेशवहन त्वरित होऊ लागले. इ.स. १८३६ पासून इंग्रजांनी रस्ते बांधणीस सुरुवात केली. इ.स. १८३६ मध्ये कलकत्ता ते दिल्ली हा रस्ता बांधून पूर्ण झाला. इ.स. १८४२ मध्ये मुंबई ते कलकत्ता हा रस्ता बांधण्यात आला. मुंबई व आग्रा ही दोन शहरे रस्त्यांनी जोडली गेली. मुंबई-ठाणे हा पहिला रेल्वेमार्ग १८५३ साली सुरू करण्यात आला. पुढे इ.स. १८६२ मध्ये ठाणे ते पुणे रेल्वे मार्ग तयार करण्यात आला. पुढील काळात पाचशे पंच्चाहत्तर लांबीचे रेल्वे मार्ग तयार करण्यात आले.

**३) अमेरिकन यादवी युद्ध**

इ.स. १८६० ते १८६५ या काळात अमेरिकेत यादवी युद्ध झाले आणि अमेरिकेतून इंग्लंडला जाणारी कापूस निर्यात थांबली. मँचेस्टरमधील अनेक कापड गिरण्या बंद पडण्याच्या मार्गावर होत्या. त्यामुळे इंग्लंडने भारतीय कापूस खरेदी करणे सुरू केले. मध्यप्रांतात इ.स. १८६१ मध्ये ३,७५,६२३ एकर जमिनीवर कापूस लागवड केलेली होती. ते क्षेत्र १८६५ मध्ये ७,५०,८७९ एकर एवढे झाले. इ.स. १८६७ मध्ये केवळ मुंबईतून ७,१७,८२१ कापसाच्या गाठी इंग्लंडला पाठविण्यात आल्या. यादवी युद्धापूर्वी मुंबईत जो कापूस ५० ते ६० रु. खंडी (२० मण) दराने विकत असे. त्याची किंमत

आता ५०० ते ६०० रुपये खंडी इतकी झाली. कापसाच्या वधारलेल्या भावामुळे शेतकरी वर्ग उत्साहित झाला. त्यांनी इतरही नगदी पिके घेण्यास सुरुवात केली.

**४) सुएझ कालवा निर्मिती**

इ.स. १८६९ मध्ये सुएझ कालव्याची निर्मिती होऊन तो वाहतुकीस खुला झाला. या कालव्यामुळे युरोप ते अतिपूर्वेकडील देश यांच्यातील अंतर दुपटीने म्हणजे ४८३० कि.मी. कमी झाले. वाहतुकीचा खर्चही पन्नास टक्क्यांनी कमी झाला. भारत व आशियायी देशांना ही बाब फायदेशीर ठरली. भारतीय कापूस व इतर शेतीमालास इंग्लंड ही फार मोठी व्यापारपेठ मिळाली. त्यामुळे शेतीचे व्यापारीकरण घडून आले.

**५) सिंचनाच्या वाढत्या सोयी**

भारतीय शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून होती. नव्या राजवटीत कालवे, धरणे, पाण्याच्या टाक्या बांधण्यात आल्या. त्यामुळे बागायती क्षेत्र वाढले. पाणी पुरवठ्यासाठी जादा करही शेतकऱ्यांना द्यावे लागले. त्यामुळे शेतीचा खर्च वाढला. हा वाढलेला खर्च भागवण्यासाठी नगदी पीके काढणे शेतकऱ्यांना आवश्यक झाले.

**६) पतपुरवठ्याची सोय**

ग्रामीण भागात शेतीसाठी शेतकऱ्यांना सावकार कर्ज देत. नगदी पीक काढण्यासाठी शेतकरी सावकारांकडून कर्ज घेऊ लागले. तसेच व्यापारी दलालही शेतकऱ्यांना पतपुरवठा करू लागले. इ.स. १८४० मध्ये बँक ऑफ मुंबईची स्थापना झाली. या बँकेच्या मुंबईत सात शाखा होत्या. इ.स. १८६१ पर्यंत तिची उलाढाल तीन कोटी रुपयांपर्यंत वाढली. शेतीसाठी पतपुरवठा उपलब्ध होऊ लागला. यामुळे शेतीच्या व्यापारीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली.

**७) भारतीय शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा**

भारतीय पेढीवाले इंग्रज व्यापारी पेढीवाल्यांना माल पुरवण्याचे काम करत. ते भारतीय शेतकऱ्यांना पिकांच्या लागवडीसाठी कर्जाऊ रक्कमा देत. या कर्जावर भरमसाठ व्याजही वसूल करीत. शेतकऱ्यांना ही कर्जे फेडणे कठीण जात असे. या कर्जाच्या चक्रातून सुटण्यासाठी त्यांना नगदी पिकाकडे वळावे लागे. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणामुळेही शेतीच्या व्यापारीकरणास गती मिळाली.

## ८) मोठे शेतकरी

अल्पभूधारक शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा पाहून मोठे शेतकरी सावध झाले. त्यांनी मोठ्या प्रमाणात नगदी पिके घेण्यास सुरुवात केली. यातून मिळालेला पैसा अल्पभूधारकाला कर्जाऊ देऊन ते त्यातून मोठा नफा मिळवू लागले. मोठ्या शेतकऱ्यांच्या या धोरणामुळे शेतीच्या व्यापारीकरणाला गती मिळाली.

## ९) शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनात बदल

गावातील शेतकरी वस्तुविनिमय पद्धतीतून बाहेर पडू लागला. गरजेपुरते धान्य न पिकवता शेती हे पैसा मिळवण्याचे साधन आहे हे त्याच्या लक्षात आले. तो नगदी पिकाकडे वळू लागला. त्याच्या दृष्टिकोनात झालेल्या या बदलामुळे शेतीच्या व्यापारीकरणाला सुरुवात झाली.

## १०) सरकारी धोरणे

अमेरिकन यादवी युद्धानंतर ब्रिटिश सरकारच्या धोरणात लक्षणीय बदल झाला. त्यांच्या लक्षात आले की, कापसासाठी अमेरिकेवर अवलंबून राहणे अव्यवहार्य आहे. तेव्हा इंग्लंडने आपणास व्यापारासाठी आवश्यक असलेल्या पिकांच्या उत्पादनाला भारतात चालना दिली. परिणामी भारतीय शेती निर्वाहशेती न राहता तिचे व्यापारीकरण घडून आले. कापूस, ताग, चहा, गहू, तांदूळ इत्यादी पिकांच्या लागवडीस सरकारने प्रोत्साहन दिले.

## शेतीच्या व्यापारीकरणाचे परिणाम

शेतीच्या व्यापारीकरणामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती चांगली व्हायला हवी होती. मात्र व्यापारीकरणाचा कोणताही फायदा छोट्या शेतकऱ्यांना मिळाला नाही. शेतीच्या व्यापारीकरणाचे फायदे शेतकऱ्यांऐवजी ब्रिटिशांना अधिक मिळाले. त्यांच्या पाठोपाठ भारतीय जमीनदार, सावकार व दलाल यांना मोठ्या प्रमाणात फायदा झाला. भाव वाढले तर नफ्याचा फार मोठा वाटा दलाल बळकावत असत आणि मालाच्या किंमती घसरल्यास मात्र त्याचा तोटा शेतकऱ्यांना सोसावा लागे. शेतकऱ्यांवर सरकार व सावकाराचे नियंत्रण होते. परदेशी व्यापारपेठेत मोठ्या प्रमाणात मागणी असलेला कापूस, ताग, नीळ, ऊस, तंबाखू, अफू व फळे अशा प्रकारची पिके शेतीतून घेतली जाऊ लागली. शेतीच्या व्यापारीकरणाचे पुढील दूरगामी परिणाम भारतीय शेतीवर व शेतकऱ्यांवर झाले.

## १) खेड्यांची स्वयंपूर्णता नष्ट झाली

ब्रिटिश सत्तेच्यापूर्वी भारताची अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण व स्थिर स्वरूपाची होती. वस्तुविनिमयाच्या पद्धतीचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला जात होता. गावातील लोकांच्या गरजा गावातच पूर्ण होत

होत्या. शेतीच्या व्यापारीकरणामुळे खेडी जागतिक बाजारपेठेशी जोडली गेली. देशांतर्गत दळणवळणाच्या साधनांमुळे खेड्यातील माल शहरातील बाजारपेठेत पाठवणे शक्य झाले. पारंपरिक उद्योग व हस्तकलेचा ऱ्हास झाला. शेतीवर आधारित गावगाडा पूर्णपणे कोसळला.

## २) शेतीमालाला मोठ्या बाजारपेठेची उपलब्धता

शेतीमालाला मोठ्या बाजारपेठा उपलब्ध झाल्या. दळणवळणाच्या सोयी झाल्यामुळे व भारताचा व्यापार आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडल्यामुळे भारतीय मालाला मागणी वाढली. विशेषत: इंग्लंडमध्ये भारतीय मालाला मोठी मागणी होती.

## ३) कंपनी सरकारचा मोठा फायदा

ब्रिटनमधील व्यापाऱ्यांनी, भांडवलदारांनी भारतीय शेतीत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली. भारतात युरोपियन मळेवाले तयार झाले. त्यांनी चहा, नीळ, अफू, सागवान, मसाल्याचे पदार्थ याचे प्रचंड उत्पादन घेतले. या पदार्थांच्या निर्यातीतून मोठा नफा मिळवला. याचा फायदा भारतीय शेतकऱ्यांऐवजी परदेशी मळेवाल्यांना झाला.

## ४) औद्योगिकरणाची सुरुवात झाली

शेतीच्या व्यापारीकरणातून औद्योगिकरणाची सुरुवात झाली. कापसाच्या पिकाला मोठी मागणी निर्माण होऊन मुंबईत कापड गिरण्यांची सुरुवात झाली. यामुळे मुंबई शहराचा विकास झाला. मुंबई पाठोपाठ सोलापूर, नागपूर व खानदेशातही कापड गिरण्यांची सुरुवात झाली.

## ५) मोठे जमीनदार, सावकार व दलाल यांचा फायदा

भारतीय जमीनदार, सावकार व दलाल यांना व्यापारीकरणाचा फायदा मिळाला. जरी शेतकरी शेतीवर राबत असला तरी जमीन, अवजारे, बियाणे, खते इत्यादीवर वरिष्ठवर्गीय धनिकांचा ताबा होता. विशिष्ट पिके घेण्याची सक्ती शेतकऱ्यांवर केली जात होती. जागतिक बाजारपेठेत या मालाला चांगला भाव आला तरी त्याचा सामान्य शेतकऱ्यांना फायदा होत नव्हता. मात्र जागतिक बाजारपेठेत मालाचे भाव कमी झाले की त्याचा फटका मात्र शेतकऱ्यांना सोसावा लागत होता.

## ६) शेतकऱ्यांची जमीन विक्रीयोग्य झाली

ब्रिटिशांच्या धोरणामुळे शेतकऱ्यांची जमीन विक्रीयोग्य झाली. शेतसारा नगदी पैशाच्या रुपाने भरावा लागे. भारतीय शेती जागतिक बाजार पेठेशी जोडल्यामुळे तेथील भावातील चढउताराचा फटका शेतकऱ्यांना बसत असे. अशावेळी शेतसारा भरण्यासाठी किंवा शेतीसाठी घेतलेले कर्ज फेडणे शेतकऱ्यांना अशक्य होत असे. अशावेळी सावकार शेतकऱ्यांच्या जमिनीवर जप्ती आणत. या शेतीवरच ते शेतकरी कुळे म्हणून राबत असत. इ.स. १८६५ ते १८९६ या काळात शेतजमीन गहाण पडण्याचे प्रमाण देशात विलक्षण वाढले होते.

### ७) अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली

शेतकरी नगदी पिकाकडे वळू लागले. नगदी पिकांच्या लागवडीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले. इ.स. १८४० ते १८५० या काळात पुणे, सोलापूर, धारवाड व अहमदनगर इत्यादी जिल्ह्यांत लागवडीखालील जमिनीचे क्षेत्र १५ लाखांपर्यंत वाढल्यामुळे अन्नधान्य लागवडीचे क्षेत्र तेवढ्याने कमी झाले. त्यामुळे महाराष्ट्रात अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली.

### ८) विविध प्रकारच्या नगदी पिकांचे उत्पादन वाढले

पूर्वीप्रमाणे परंपरागत शेती उत्पादने कमी झाली. व्यापारी धोरण डोळ्यासमोर ठेवून पिके घेतली जाऊ लागली. कापूस, ताग, ऊस, तंबाखू, अफू, फळे इत्यादी विविध प्रकारच्या पिकांचे उत्पादन वाढले.

ब्रिटिशांच्या शेतीविषयक व्यापारी धोरणाचे असे दूरगामी परिणाम शेतीक्षेत्रावर झाले. भारत ही इंग्लंडला कच्चा माल पुरवणारी व त्यांचा पक्का माल खपवणारी बाजारपेठ बनली. त्यांचे महसूल विषयक धोरण व त्यांच्या व्यापारविषयक आर्थिक धोरणातून शेतीचे व्यापारीकरण घडून आले. या व्यापारीकरणाचा फायदा शेतकऱ्यांना होण्याऐवजी जमीनदार व दलाल यांना झाला. शेतकऱ्यांची अवस्था मात्र बिकट झाली. यातूनच शेतकऱ्यांचे उठाव देशभर होऊ लागले.

## दख्खनचे दंगे (उठाव)

इ.स. १८१८ मध्ये पेशव्यांची सत्ता नष्ट करून ब्रिटिशांनी आपला अंमल महाराष्ट्रावर सुरू केला. त्यांनी येथील शेतकऱ्यांकडून वाढीव दराने व जुलूमजबरदस्तीने शेतसारा वसूल करण्यास सुरुवात केली. त्यातच दुष्काळ, रोगराई यासारख्या संकटाची मालिका होती. सावकाराच्या पाशात अडकलेल्या शेतकऱ्यांना कर्ज फेडता आले नाही तर त्यांच्या जमिनीवर जप्ती येत असे. त्यामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत खालावत गेली. त्यांच्यात असंतोष पसरू लागला व त्याचे रूपांतर बंडात झाले. इ.स. १८६० मध्ये बंगालमध्ये नीळ उत्पादकांचा उठाव, इ.स. १८६६-६८ मध्ये बिहारमधील दरभंगा व चंपारण्यातील शेतकऱ्यांचा उठाव, इ.स. १८७० मधील पूर्वबंगालमधील कुळांचा, इ.स. १८७४-७९ च्या दरम्यान महाराष्ट्रातील पुणे, अहमदनगर या भागातील शेतकरी व रामोशांचा उठाव, इ.स. १८९३ मध्ये आसाममधील शेतकऱ्यांचा उठाव हे सर्व उठाव अत्यंत उग्र स्वरूपाचे होते. या संघटित उठावांना दडपून टाकणे स्थानिक पोलिसांना शक्य न झाल्याने सरकारला लष्कर पाठवून हे उठाव मोडून काढावे लागले. आपण महाराष्ट्रात झालेल्या शेतकऱ्यांच्या उठावाचा अभ्यास करणार आहोत. महाराष्ट्रात झालेल्या उठावाला दख्खनचे दंगे किंवा उठाव म्हणतात. या उठावामध्ये पुणे, अहमदनगर जिल्ह्यांच्या ६ तालुक्यांतील ३३ गावांतील शेतकऱ्यांनी सावकारांविरूद्ध चळवळी केल्या.

**दख्खनच्या दंग्याची कारणे**

**१) ब्रिटिशांनी कृषिव्यवस्थेत केलेले बदल**

ब्रिटिशांनी भारतीय कृषिव्यवस्थेत व्यापक स्वरूपात बदल केले. नवी भूधारणा पद्धती, मालकी हक्काच्या नव्या कल्पना, वहिवाटीतील बदल यांसारख्या गोष्टींमुळे ग्रामीण कृषिक्षेत्र ढवळून निघाले. शेतीचे व्यापारीकरण झाले. याचे बरे-वाईट परिणाम ग्रामीण भागावर झाले. रयतवारी पद्धतीमुळे शेतकऱ्यांला आपली जमीन विकणे, हस्तांतरित करणे किंवा बिगर शेतीमध्ये रूपांतरित करणे असे पर्याय मिळाले. यामुळे शेतकरी कर्जापोटी आपल्या जमिनी विकू लागला.

**२) जमीन महसूलाचा अवाजवी दर**

इ.स. १८१९-२७ या काळात एलूफिन्स्टन मुंबई प्रांताचा गव्हर्नर होता. इ.स. १८२४ - २८ च्या दरम्यान प्रिंगले याने जमिनीचे नियमित सर्वेक्षण केले आणि निव्वळ उत्पादनाच्या ५५ टक्के भाग सरकारचा हिस्सा म्हणून निश्चित केला. तथापि, बहुतांशी सर्वेक्षण सदोष होते आणि उत्पादनाचा केलेला अंदाज योग्य नव्हता. जमीन महसूलाचे प्रमाण अधिक निश्चित करण्यात आल्यामुळे शेतकरी त्रस्त झाले. शेतसारा निश्चित करण्याचे व वसूल करण्याचे काम शासकीय यंत्रणाच करीत असे. सर्वसामान्य शेतकरी किंवा ग्रामप्रमुखाचे मत अगर शेतीतील पीक याबाबत विचार केला जात नव्हता. त्यामुळे अवाजवी पद्धतीने शेतसाऱ्याची निश्चिती केली जात होती.

**३) जमीन महसूल गोळा करण्याच्या जाचक पद्धती**

शेतकऱ्यांनी ठरावीक वेळेत शेतसारा भरला नाही तर कठोरपणे त्यांच्या जमिनी जप्त केल्या जात होत्या. शेतसारा पैशाच्या स्वरूपात भरावा लागत असे. शेतकरी आपल्या हातून जमिनी जाऊ नयेत म्हणून सावकराकडून कर्जे घेऊन शेतसारा भरत. जर शेतसारा भरला नाही तर त्यांना अनंत यातना सहन कराव्या लागत असत. त्यांना उपाशी ठेवणे, नैसर्गिक विधीला जाऊ न देणे, वाकलेल्या स्थितीत ठेवणे, म्हशीच्या किंवा गाढवाच्या शेपटीला त्या व्यक्तीचे केस बांधणे, गळ्यात हाडाचे हार घालणे अशा प्रकारच्या यातना आणि अत्यंत अपमानास्पद वागणूक शेतकऱ्यांना दिली जात असे.

**४) सावकारांचा प्रबळवर्ग**

राजस्थानमध्ये पेढी व्यवसाय करणारे लोक बोहरा, शेठजी, सराफ, बनिया या नावांनी ओळखले जात. १७ व्या शतकात राजस्थान व गुजरातमधून आलेले हे सावकार महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांत स्थायिक झाले. ते शेतकऱ्यांस शेतीसाठी लागणारी विविध अवजारे खरेदी करण्यासाठी, शेतसारा भरण्यासाठी, याशिवाय लग्नकार्य, मयत अथवा सणसूदीला डोईजड व्याजदराने कर्ज देत. शेतकरी कर्जासाठी तारण म्हणून जमीन ठेवत. हे धनाढ्य शेठ, सावकार प्रसंगी आपल्या राज्यकर्त्यांनासुद्धा मोठ्या रक्कमा कर्जाऊ देत. बहुदा एखाद्या तारण, स्थावर अथवा जंगम मालमत्तेवरच

कर्जे दिली जात. पेशव्यांच्या आमदानीत दीक्षित, पटवर्धन, घारपूरे, जगताप, अनगळ, पाठक, तांबवेकर, वैद्य या घराण्यांमध्ये वंशपरंपरेने पेढी व्यवसाय चालू होता. याकाळात काही घराणी अत्यंत प्रभावशाली होती. काही घराण्यांचे पेशव्यांशी वैवाहिक संबंध होते. महाराष्ट्रात कर्जावर दरमहा व्याजदर आकारला जात होता. तो दरमहा दरशेकडा १ टक्क्यापासून ५ टक्क्यांपर्यंत बदलत असे. म्हणजेच दरसाल दरशेकडा १२ टक्क्यांपासून ६० टक्क्यांपर्यंत असे. तुकाराम करमचंद सावकाराने पारनेर तालुक्यात इ.स. १८५५-७५ या २० वर्षात नव्या कायद्याच्या आधारे एक हजार एकर जमीन घेतली. इंदापूर तालुक्यातील १९ हजार ४४३ पैकी २१८९ एकर जमीन बळकावली. इंदापूरजवळील भोवरी गावात सावकाराने १४३८ एकर जमीन हडप केली. अशा सावकारांच्या जुलमाला शेतकऱ्यांनी या उठावात मोठ्या संख्येने सामील होऊन प्रतिकार केला.

### ५) शेतकरी सावकारीपाशात अडकला

जमीनदार व सावकारांनी ब्रिटिशांशी संगनमत करून सर्वसामान्य शेतकऱ्यांचे अमर्याद आर्थिक शोषण करण्यास सुरुवात केली.जमीन महसूल इतका जास्त होता की तो भागवण्यासाठी शेतकऱ्यांना सावकाराचे कर्ज घ्यावे लागत असे. शेतकऱ्यांना आपले पीकपाणी येईल त्या किंमतीला विकून टाकावे लागत असे. कधी कधी तेच पीकपाणी शेतकऱ्यांला काही काळाने अधिक दाम मोजून विकत घ्यावे लागत असे. दुष्काळ किंवा इतर नैसर्गिक संकटांचा विचार न करता सारा वसुली अतिशय कठोरपणे केली जात असे. यासाठी शेतकऱ्यांना खाजगी सावकारांकडून भरमसाठ व्याजदराने कर्ज घेणे भाग पडत असे. सावकार शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन कराच्या कागदपत्रात हवे ते बदल करीत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिढ्यानूपिढ्यांना कर्जबाजारी रहावे लागत असे. त्यांच्या जमिनी सावकारांकडे गहाण पडत. वेळेवर कर्जाची परत फेड केली नाही तर सावकार त्या जमिनी बळकावत. शेतकऱ्यांना त्याच जमिनीवर कूळ म्हणून रहावे लागे. सावकार या शेतकऱ्यांना वेठबिगाराप्रमाणे वागवत. हा सावकारांचा वर्ग इंग्रजी अधिकाऱ्यांच्या मदतीने आर्थिक व सामाजिक जीवनात एक प्रभावशाली गट बनला होता.

### ६) बुद्धिवंतांचे कार्य

महाराष्ट्रात महात्मा फुले यांनी ‘शेतकऱ्यांचा आसूड’, ‘गुलामगिरी’ यासारख्या ग्रंथांमधून शेतकऱ्यांच्या हालअपेष्टांची व शोषणाची कारणमीमांसा केली. सत्यशोधक समाजाच्या ‘दीनबंधू’ या वृत्तपत्राने शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडली. इ.स. १८७३ मध्ये पुण्याच्या सार्वजनिक सभेने महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीची पहाणी केली. इ. स. १८७६- ७७ च्या दुष्काळात सार्वजनिक सभेने शेतकऱ्यांना मदत केली आणि त्यांची गाऱ्हाणी सरकारपुढे ठेवून त्यांना न्याय मिळवून दिला.

### ७) विविध संस्था व विचारवंत यांनी बंडाच्या कारणांची केलेली चिकित्सा

### (i) डेक्कन रॉयट्स कमिशनचा अहवाल

शेतकऱ्यांच्या असंतोषाची चौकशी करण्यासाठी मुंबई सरकारने डेक्कन रॉयट्स कमिशन नेमले. कमिशनने शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे परीक्षण करून आपला अहवाल सादर केला. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणामध्ये नैसर्गिक परिस्थितीतील अनियमितपणा तसेच अदूरदृष्टी व पैशाची उधळपट्टी यामुळे त्यांची परिस्थिती बिकट झाली. नवा कायदा व ब्रिटिश राजवट यामुळे समाजातील प्रतिष्ठित वर्गाला आव्हान प्राप्त झाले. तेव्हा आपले महत्त्व टिकविण्यासाठी श्रीमंतवर्गांनी मध्यमवर्गीय शेतकऱ्यांना पाठिंबा देऊन हा उठाव घडवून आणला. या कमिशनचे सभासद सी. डब्ल्यु. कार्पेटर याने महसूल मोठ्या प्रमाणात वाढवून त्याची आकारणी एकदम लागू केली. नवीन महसूल व्यवस्था रयतेला समजली नाही व महसूलाची आकारणी अन्यायकारक व असमान होती. ही उठावाची कारणे या अहवालामध्ये दिली आहेत.

### (ii) प्रा. एस. सी. लाल

महसूलाची आकारणी वाढीव दराने झाली व शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोझा वाढला. अशी कारणे प्रा. एस. सी. लाल यांनी दिली आहेत.

### (iii) सर ऑक्लंड कॉलविस

शेतकऱ्यांची पूर्वपार चालत आलेली कर्ज काढण्याची पध्दती व ते न फेडण्याची प्रवृत्ती, शेतकरी व सावकार यांच्यातील संबंध बिघडले ही कारणे सर ऑक्लंड कॉलविस यांनी दिली आहेत.

### (iv) प्रा. रविंद्र कुमार

इ. स. १८७५ च्या शेतकरी उठावासंदर्भात पूर्वी जमीन महसूलासाठी शेतकरी हा वैयक्तिकरित्या जबाबदार नसे. रयतवारीमुळे शेतकऱ्याला आपली जमीन विकणे किंवा हस्तांतरित करणे किंवा बिगरशेतीमध्ये रुपांतरित करणे असे पर्याय मिळाले. त्यामुळे शेतकरी सावकारी कायद्याच्या तावडीत सापडला. मारवाडी गुजर सावकारांना शेती करण्यामध्ये रस नव्हता. ते कोर्टाकडून जमिनी ताब्यात घेत. पूर्वीच्या मालकाला आपल्या शेतावर मजूर म्हणून काम करावे लागत असे. हा उठाव शेतकरी, सावकार व सरकार यांच्या संबंधावर मोठा प्रकाश टाकतो.

### (v) कॅटनॅच

याने या उठावाची तुलना १९ व्या शतकामधील बंगाल व बिहारातील उठावांशी केली आहे. उदा. इ. स. १८५५ चा संताळाचा उठाव व इ.स. १८७१ ची खारवार चळवळ तसेच इ.स. १८७५ ते १९०० या काळातील बिरसा चळवळींशीसुध्दा त्यांनी तुलना केली आहे.

### (vi) प्रो. रणजित गुहा

हा उठाव शेतकऱ्यांनी आपले शोषण करणाऱ्यांच्या विरूध्द केला नव्हता तर सावकारांना निःशस्त्र करणे हा त्यांचा प्रधान हेतू होता. त्यांनी सावकारांकडील बॉन्डस व हिशोबाची कागदपत्रे जाळली. सन १८३० च्या इंग्लंडमधील डुलपस चळवळींसारखा हा उठाव होता.

### (vii) प्रो. ब्रम्हानंद

इ.स. १८७५ च्या शेतकरी उठावाचे किंवा चळवळीचे स्वरूप मर्यादित नव्हते. सन १८७५ पूर्वी झालेल्या उठावाशी यांचा संबंध आहे. या उठावाला खेड्यातील सर्व जनतेने पाठिंबा दिला व काहीवेळा सर्व जातीच्या लोकांनीही सक्रिय पाठिंबा दिला.

### (viii) सार्वजनिक सभा

पुण्याच्या सार्वजनिक सभेने या उठावासंदर्भात पुढील मुद्दे मांडले. खेड्यामध्ये पूर्वी सहसा न दिसलेली एकी दिसून आली. हा उठाव पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा या जिल्ह्यांत होता. ज्या ठिकाणी जमाबंदीचे नवे दर लागू केले होते तेथे मोठ्या प्रमाणात उठाव झाला.

थोडक्यात, या उठावाच्या कारणांची चर्चा विविध संस्था व विचारवंतानी केली. ब्रिटिश सरकारची व्यापारीवृत्ती, जमीन महसूलाचा अवाजवी दर, हा महसूल रोख रक्कमेत, ठरावीक वेळेतच भरावा लागत होता. तो भरण्यासाठी शेतकऱ्यांना सावकारांकडून भरमसाठ व्याजदराने कर्ज काढावे लागत होते. या कर्जापोटी सावकार त्यांच्या जमिनी बळकावत होते. अशी विविध कारणे या उठावाची होती.

### शेतकरी उठावाचे स्वरूप (१८७५)

मुंबई प्रांताचा पहिला गव्हर्नर माऊंट स्टयुअर्ट एल्फिन्स्टन याने सिव्हिल कोर्टाची स्थापना केली. त्यामुळे सावकारांनी शेतकऱ्यांकडून येणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी सिव्हिल कोर्टात धाव घेतली. कर्जबाजारी शेतकरी आता सावकार व सिव्हिल कोर्ट यांच्या कैचीत सापडला. दख्खनच्या उठावाची सुरुवात अशाच एका प्रकरणाने झाली.

या उठावाची सुरुवात डिसेंबर १८७४ मध्ये पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील कर्धे या गावातून झाली. काळूराम नावाच्या सावकारकडे गावातील एका शेतकऱ्यांची झोपडी न्यायालयाच्या हुकूमाच्या अंमलबजावणीपोटी पाडू नये म्हणून गावातील शेतकऱ्यांनी विनवणी केली. पण काळूराम सावकाराने न्यायालयाच्या हुकूमाची अंमलबजावणी केली. गावातील शेतकऱ्यांनी आपल्या मागण्या मान्य कराव्यात यासाठी सावकारांवर बहिष्कार टाकला. त्यांच्या दुकानातून वस्तू विकत घेण्याचे नाकारले. न्हावी, सुतार, लोहार, चांभार आदी बलुतेदार किंवा अन्य कोणीही त्यांची सेवा करण्याचे नाकारले. त्यांच्या घरची कामे करावयास एकही घरगडी तयार नव्हता. असे बहिष्कृत सावकार

तालुक्याच्या ठिकाणी जाण्याची तयारी करू लागले. तेव्हा त्यांच्या बैलगाड्या चालवण्यास एकही गाडीवान मिळाला नाही. एवढेच नाही तर सावकारांवरील सामाजिक बहिष्कारात जे गावकरी सामील होणार नाहीत त्या शेतकरी व बलुतेदारांवरही गावातील शेतकऱ्यांनी बहिष्कार टाकला.

जेव्हा या सामाजिक बहिष्काराचा फारसा परिणाम झाला नाही तेव्हा या बहिष्काराचे रुपांतर दंग्यात झाले. १२ मे १९७५ रोजी बाजाराच्या दिवशी शेतकरी भीमथडी तालुक्यात (पारनेर तालुका) सुपे येथे जमले आणि त्यांनी सावकारांच्या घरावर व पेढ्यांवर पध्दतशीरपणे हल्ले सुरू केले. सावकरांची घरे लुटून त्यांच्याकडील कर्जरोखे व कर्जविषयक कागदपत्रांची होळी केली. काही ठिकाणी सावकारांना मारहाण करणे, त्यांची संपत्ती लुटणे, त्यांच्या घरांना आगी लावणे इत्यादी प्रकारही झाले. अहमदनगर जिल्ह्यात दोन दरोडे, पाच घरफोड्या झाल्या. पुणे जिल्ह्यात १ खून, ७ लुटमारी, ८ ठिकाणी चोऱ्या व २४ ठिकाणी सावकारांवर हल्ले झाले. एकूण ७७ गुन्हे घडले. सरकारने पुणे जिल्ह्यात ५८९ लोकांना पकडले. ३३१ लोकांचे गुन्हे शाबीत केले. ५५८ लोकांना निर्दोष सोडण्यात आले. सावकारांकडून कर्जविषयक दस्तऐवज काढून घेतल्याने हिंसाचार फार झाला नाही.

**उठावाचा प्रसार**

थोड्याच दिवसांत ही मोहीम पुणे, अहमदनगर, सोलापूर, रत्नागिरी व अहमदाबाद जिल्ह्यातील इतर गावात पसरली. भीमथडी तालुक्यात १७ गावे, शिरूर तालुक्यात १० गावे, इंदापूर तालुक्यात ३ गावे असा पुणे भागात उठाव झाला होता. तसेच अहमदनगर जिल्ह्यात पारनेर तालुक्यात ६ गावे. श्रीगोंद्यामध्ये ११ गावे, कर्जतमध्ये १ गावात हा उठाव पसरला होता. शेवटचा उठाव १५ जून १८७५ रोजी भीमथडीमधील मुधाळी गावात झाला.

आंदोलनाचा जोर तीन आठवडे टिकला. तरीही पुढे एक-दोन महिने किरकोळ घटना घडत राहिल्या. या दख्खनमधील उठावाचे उद्दिष्ट फार मर्यादित होते. या उठावात वसाहतवादविरोधीच्या जाणीवेचा अभाव होता. शेतकऱ्यांचा कर्जफेडीला विरोध नव्हता. पण त्यांची जमीन लांडीलबाडीने काढून घेतली जात होती त्याला विरोध होता.

**द डेक्कन ॲग्रिकल्चरल रिलीफ ॲक्ट**

इ.स. १८७९ मध्ये 'द डेक्कन ॲग्रिकल्चरल रिलीफ ॲक्ट' करून सावकांरापासून शेतकऱ्यांना संरक्षण देण्यात आले. या ॲक्टमध्ये पुढील तरतुदी करण्यात आल्या.

१) कर्जबाजारी शेतकऱ्यांचे कर्ज सावकाराला एकदम वसूल करता येणार नाही. त्यासाठी सावकाराने दिवाणी कोर्टात खटला दाखल केला पाहिजे.

२) निकाल मान्य नसेल तर दिवाणी कोर्टामार्फत निकाल व्हावा.

३) दिवाणी कोर्टाला जर गरज भासली तर कर्जावरील व्याजाच्या दरात कपात करण्याचा अधिकार कोर्टाला देण्यात आला.

४) कोर्टाने गरज असेल तर हप्ते करून वसुली मान्य करावी.

५) सावकाराला शेतकऱ्याची जमीन अत्यंत निकड वाटल्याशिवाय खरेदी करण्यास कोर्टाने मज्जाव करावा.

६) शेतकऱ्यांची प्रकरणे दिवाणी कोर्टामध्ये न येता स्थानिक स्तरावर 'मुन्सफ' नावाच्या अधिकाऱ्याने मिटवावीत.

७) जमीन तारण द्यावयाची असेल किंवा विकावयाची असेल तर त्याबाबतची नोंद कुलकर्णीने एका रजिस्टरमध्ये करावी.

अशा प्रकारे ब्रिटिश सरकारने या कायद्याद्वारे शेतकऱ्यांना दिलासा देऊन त्यांच्यामधील असंतोष कमी करण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांना तगाईची सोय असावी व नवीन उपाय म्हणून शेतकरी बँका सुरू कराव्यात असे ठरविण्यात आले.

**स्वयं अध्ययन प्रश्न - १**

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१) बंगालमध्ये कायमधारा पद्धती कोणी लागू केली ?

२) शेतीचे व्यापारीकरण म्हणजे काय ?

३) कलकत्ता ते दिल्ली रस्ता कोणत्या साली बांधून पूर्ण झाला ?

४) मुंबई ते ठाणे हा पहिला रेल्वे मार्ग कोणत्या साली सुरू करण्यात आला ?

५) सुएझ कालव्याची निर्मिती कोणत्या साली झाली ?

६) बँक ऑफ मुंबईची स्थापना कोणत्या साली झाली ?

७) सुएझ कालव्याच्या निर्मितीमुळे युरोप व अतिपूर्वेकडील देश यांच्यातील अंतर किती किलोमीटरने कमी झाले ?

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१. जमिनीच्या उत्पादनाचा अंदाज घेऊन ........ पद्धतीत शेतसारा निर्धारित करण्यात येतो.

(अ) रयतवारी (ब) कायमधारा (क) महलवारी (ड) जमीनदारी

२. मुंबई प्रांतात रयतवारीपद्धती इ.स. ........... मध्ये लागू करण्यात आली.

(अ) १८२० (ब) १८१८ (क) १८३१ (ड) १८२१

३. महलवारी व्यवस्थेनुसार करांचे निर्धारण ......... वर्षासाठी करण्यात आले.

(अ) २५ (ब) ३० (क) ५० (ड) १५

४. इ.स.१८१९ ते १८२७ या काळात ................ हा मुंबई प्रांताचा गव्हर्नर होता.

(अ) माऊंट स्टुअर्ड एल्फिन्स्टन (ब) लॉर्ड कॅनिंग

क) लॉर्ड कर्झन ड) लॉर्ड लिटन

५. 'द डेक्कन ॲग्रिकल्चरल रिलीफ ॲक्ट' .................. साली मंजूर झाला.

(अ) १८७९ (ब) १८७५ (क) १८७० (ड) १८९०

६. सिव्हिल कोर्टाची स्थापना .............. या गव्हर्नरने केली.

(अ) माऊंट स्टुअर्ड एल्फिन्स्टन (ब) लॉर्ड कॅनिंग

(क) लॉर्ड कर्झन (ड) लॉर्ड डफरीन

## ४.२.२ आधुनिक उद्योगाचा उदय- कापड गिरणी उद्योग

### आधुनिक उद्योगधंद्यांचा उदय

प्राचीन काळापासून भारताचा बाहेरच्या जगाशी व्यापार चालू होता. भारतीय कलावस्तुंना बाहेरच्या जगामध्ये मागणी होती. सुती व रेशीम कापड, कलात्मक विणकाम केलेले कापड, ताग, शस्त्रे, धातुची भांडी, कलात्मक दागदागिने, औषधे, मौल्यवान रत्ने इत्यादी वस्तुंची निर्यात होत होती. भारतीय कारागीर आपल्या कलाकौशल्यासाठी जगभर प्रसिद्ध होते. १८ व्या शतकाच्या पूर्वार्धात भारतातील अनेक उद्योग भरभराटीला आले होते. बंगालमधील ढाका व मुर्शिदाबाद, बिहारमधील पाटना, गुजरातमधील अहमदाबाद व सुरत, मध्यप्रदेशातील चंदेरी व बुऱ्हाणपूर, दक्षिण भारतातील कोईमतूर व मदुराई इत्यादी शहरे गजबजलेली व्यापारी केंद्रे होती. महाराष्ट्र, आंध्र व बंगालमध्ये जहाज बांधणीचा उद्योग चालत होता. येथे तयार होणारी जहाजे काही युरोपियन कंपन्या खरेदी करत. या परंपरागत उद्योगात सर्वात महत्त्वपूर्ण उद्योग सुती व रेशमी कापडाचा होता. ढाक्याच्या तलम व मोहक कशिदा काढलेल्या उंची वस्त्रांना युरोपामध्ये खूप मागणी होती.

### ब्रिटिशांचे व्यापारविषयक धोरण

ब्रिटिशांनी भारतातील व्यापार व वाणिज्यविषयक धोरण ठरविताना भारतीय वसाहतीचा आपल्या देशाच्या विकासासाठी उपयोग कसा होईल याकडे प्राधान्याने लक्ष दिले. आपल्या या धोरणाला भारतीय वसाहतीतील समाजाचा विरोध होऊ नये म्हणून समाजातील प्रतिष्ठितवर्ग, सावकार यांना खूश

ठेवण्यासाठी सवलती देण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले. ईस्ट इंडिया कंपनी भारतातून कच्चा माल आपल्या मायदेशी पाठवित असे आणि त्या कच्च्या मालाचे रुपांतर पक्क्या मालात झाल्यावर तोच पक्का माल भारतात विकला जात असे. अशा तऱ्हेने भारत ही त्याची हक्काची बाजारपेठ होती. त्यांच्या या आर्थिक नीतीमुळे भारतातील खेडी ओस पडली व उद्योगधंदे संपुष्टात आले.

ब्रिटिश व्यापाऱ्यांनी भारतीय माल युरोपियन बाजारपेठेमध्ये येऊ नये यासाठी इ.स. १७००-०१ मध्ये भारताचे उच्चदर्जाचे आणि कलात्मक विणीचे मलमल कापड, रेशीम कापड, ढाक्याची मलमल इंग्लंडमध्ये आयात करू नये असा निर्बंध पास करून घेतला. इ.स. १७१३ च्या फर्मानानुसार कंपनी हिंदुस्थानात पाठवित असलेल्या मालावर कोणतीही जकात ठेवली नव्हती. पण भारतीय मालाच्या निर्यातीवर जबरदस्त कर लावण्यात आले होते. इ.स. १८१३चा कायदा करून इंग्लंड संसदेने कंपनीचा भारतातील व्यापारावरील एकाधिकार समाप्त केला. कारण मँचेस्टर व लॅकेशायर येथील उद्योगपतींकडून मोठ्याप्रमाणावर निर्माण होणाऱ्या कापडाला बाजारपेठ हवी होती. त्यासाठी त्यांनी इंग्लंड सरकारवर दबाव आणला व हा कायदा पास करून घेतला. त्यानुसार भारतातून इंग्लंडमध्ये जाणाऱ्या कापडावर ७० टक्के जबर जकात आकारली तर इंग्लंडमधून येणाऱ्या कापडावर नाममात्र कर लावला. इंग्लंडमध्ये लोकरीचे कापड विणण्याची कला फार जुनी असली तरी कापसाची वस्त्रे विणण्यास प्रारंभ १७६० च्या सुमारास झाला. इंग्लंडच्या कारखान्यांना पूरक ठरेल अशा वस्तूंचे उत्पादन करण्याची सक्ती भारतातील उत्पादकांवर करण्यात आली. त्यामुळे चहा, कॉफी, नीळ, ताग, अशा वस्तूंचे उत्पादन सुरू झाले. युरोपियनांना आसाम, बंगाल, निलगिरी क्षेत्रात नाममात्र दराने शेकडो एकर जमीन देण्यात आली. तेथे प्रामुख्याने चहा व कॉफीचे मळे तयार होऊ लागले. थोडक्यात ब्रिटिश मालाला संरक्षण देणे हेच ब्रिटिश सरकारचे धोरण राहिले.

स्वत:च्या स्वार्थासाठी का होईना पण कंपनीला भारतात उद्योगधंद्याची उभारणी करावी लागली. याच काळात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली. यातूनच पक्क्या रस्त्यांची बांधणी, रेल्वेची उभारणी, पोस्ट, टेलिग्राम, बंदरे, बँकांची स्थापना, विमा योजना, जलसिंचन योजना उभाराव्या लागल्या. कोळसा, लोखंड, पोलाद, ताग, सुती कापड या सर्व उद्योगधंद्याची सुरुवात कंपनी सरकारच्या काळातच झाली. त्यांनी उद्योगासाठी बँकांच्या स्थापनेला उत्तेजन देऊन कर्ज पुरवठ्याच्या सोयी केल्या. इंग्लंडच्या भांडवलदारांनी कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करून दिले. भारतात दगडी कोळसा व लोखंड उपलब्ध होत असल्याने उद्योगधंद्याच्या उभारणीस मदत झाली.

**भारतात उद्योगधंदे सुरू करण्यासंदर्भात इंग्रज सरकारचे प्रयत्न**

१८८० साली स्थापन झालेल्या 'फॅमिन कमिशन' ने ही दुष्काळाचा प्रतिबंध करण्यासाठी नवे उद्योग सुरू करावेत व जुन्या उद्योगाची पुनर्रचना करावी असे सुचवले. कमिशनने तपशीलवार शिफारशी केल्या. या शिफारशीनुसार १८८३ साली सरकारने असा हुकूम काढला की भारतात ज्या वस्तूंचे

औद्योगिक उत्पादन केले जात नाही केवळ अशाच वस्तूंकरिता युरोपीय बाजारपेठेत मागणी नोंदवली जावी. असा बदल करून काही प्रमाणात भारतीय उद्योगांना प्रोत्साहन दिले.

### लॉर्ड कर्झनचे प्रयत्न

कर्झनने 'इंम्पिरियल डिपार्टमेंट ऑफ कॉमर्स ॲण्ड इण्डस्ट्रिज' या उद्योगधंद्याशीसंबंधित खात्याची स्थापना केली. १९१० साली संयुक्त प्रांतात 'डायरेक्टर ऑफ इण्डस्ट्रिज' हे पद नव्याने निर्माण करण्यात आले.या अधिकाऱ्याने संयुक्त प्रांतातील साखर कारखान्यांना सरकारी कर्जे दिली. कानपूर येथे स्वतःच्या मालकीची सरकीच्या तेलाची गिरणी स्थापन केली. 'सुपरिटेंडेट ऑफ इण्डस्ट्रिज', 'इन्सपेक्टर ऑफ टेक्निकल ॲण्ड इण्डस्ट्रिअल इन्स्टिट्यूशन' हे पद निर्माण करण्यात आले. याद्वारे नव्या उद्योगांना प्रोत्साहन देण्यास सुरुवात झाली. मध्य प्रांतात कुटीरोद्योगांना चालना देण्यात आली. सरकारच्या या धोरणाला भारतमंत्र्याने विरोध दर्शवून होणारी औद्योगिक वाढ रोखण्याचा प्रयत्न केला.

### पहिले महायुध्द व औद्योगिक धोरण

१९१४ साली पहिले महायुध्द सुरू झाले. इंग्लंडला युरोपिय राष्ट्रांकडून कच्चा व पक्का माल मिळणे बंद झाले. तेव्हा त्यांनी भारतीय औद्योगिक विकासाला चालना दिली. आता त्यांना भारताचा औद्योगिक विकास इंग्लंडच्या लष्करीदृष्ट्या महत्त्वाचा वाटू लागला. १९१६ साली ब्रिटिश सरकारने 'इण्डस्ट्रिअल कमिशन'ची स्थापना केली. या आयोगाने जकातीसंबंधीचे धोरण (Tarrif Policy) आणि तांत्रिक व औद्योगिक शिक्षणावर भर देणारा अहवाल सादर केला.

### भारतीय युध्द साहित्य मंडळाची स्थापना (१९१७)

या बोर्डाने केलेल्या शिफारशी -

१) सैन्याला, नागरी खात्यांना व रेल्वेला लागणाऱ्या मालाची खरेदी भारतातच करावी.

२) इंग्लंडकडून व इतर ठिकाणांहून मागवल्या जाणाऱ्या साहित्यांमध्ये अग्रक्रमाने भारतीय उत्पादकांकडे मागणी पाठवावी.

३) जुने उद्योग विकसित करण्यासाठी किंवा नवे उद्योग स्थापन करण्यासाठी सयंत्रे, रसायने, तांत्रिक ज्ञान, श्रमिकांच्या सेवा आयात करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना व संस्थांना मदत करावी.

४) नवे उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना, संस्थांना तज्ज्ञ सल्ला व प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करावी.

### माँटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा कायदा (१९१९)

या कायद्याने प्रांतात द्विदल राज्यपद्धती सुरू करण्यात आली. त्यामध्ये उद्योग खाते सोपीव करण्यात आले. या कायद्याने प्रत्येक प्रांतात 'डिपार्टमेंट ऑफ इण्डस्ट्रिज' सुरू करण्यात आले. या कायद्याने पहिले महायुध्द सुरू असतानाच प्रांतामध्ये अनेक उद्योग सुरू करण्यात आले.

राज्य वित्तीय आयोगाची (Industrial Fiscal Commission) स्थापना इ.स. १९२२ मध्ये करण्यात येऊन याद्वारे उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्यात आले. इ.स.१९२३ मध्ये जकात मंडळाची (Tariff Board) नेमणूक करण्यात आली. इ.स. १९२४ मध्ये स्टील इण्डस्ट्रिज ॲक्ट पास झाला. इ.स. १९२७ ते १९३४ या काळात पोलाद उद्योग, सुती कापड उद्योग यांना संरक्षण देण्यात आले. जकात मंडळाने इतरही काही उद्योगांना संरक्षण जाहीर केले. यामध्ये कागद, साखर, काडीपेट्या, अवजड रसायने, सोन्याच्या धाग्याचा उद्योग, रेशीम उत्पादन, काच, लोकर इत्यादी उद्योगांचा समावेश करण्यात आला.

ब्रिटिशांनी इ.स. १८५८ ते १९२७ या कालावधीत शेतीशी निगडीत असलेले काही उद्योग भारतात प्रस्थापित केले. पहिल्या महायुद्धामुळे लोखंड, पोलाद, रसायने,काच इत्यादी वस्तूंच्या उत्पादनाला चालना देण्याचे धोरण सरकारने स्वीकारले. थोडक्यात, स्वतःच्या फायद्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या उद्योगधोरणांमध्ये बदल केले.

**ब्रिटिशांच्या व्यापारविषयक धोरणाचा परिणाम**

वेगवेगळ्या मार्गाने संपत्तीचा ओघ भारताकडून इंग्लंडकडे वाहू लागला. या पैशातून इंग्लंड सर्वात संपन्न आणि औद्योगिक राष्ट्र बनले. या पैशामुळेच इंग्लंडमध्ये औद्योगिकरणाला चालना मिळाली. भारत दरिद्री बनला.भारतातील कुटिरोद्योगांचा ऱ्हास झाला.अनेक आक्रमकांनी भारतावर आक्रमणे केली. येथे साम्राज्य स्थापन केले. पण त्याकाळात देशाचा पैसा देशात राहिला. भारताच्या या परिस्थितीचा अभ्यास दादाभाई नौरोजींनी केला. त्यांनी भारताच्या दारिद्रयाची कारणमीमांसा केली. त्यांनी 'हिंदुस्थानातील दारिद्रय' (Poverty in India) हा ग्रंथ लिहिला आणि ब्रिटिश भारताची सर्वमार्गाने आर्थिक पिळवणूक कशी करतात हे सर्वप्रथम जगापुढे आणले. त्यांनी 'आर्थिक निःसारण' (Drain of Wealth) सिध्दांत मांडला व भारताच्या दारिद्रयाच्या मूळाशी ब्रिटिशांचे आर्थिक धोरण आहे हे ठामपणे मांडले.

**कापड उद्योग**

१८ व्या शतकाच्या पूर्वार्धात इतर उद्योगांबरोबर कापड उद्योगही भारतात भरभराटीला आला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सुती कापड गिरण्या सुरू झाल्या. या गिरण्यांना फारसे उत्तेजन दिले नाही. ब्रिटिशांनी भारतीय कापड उद्योगाच्या वाढीसाठी कोणतीही उपाययोजना केली नाही. उलट या उद्योगात आपलीच मक्तेदारी कशी टिकेल याकडे लक्ष दिले. शिवाय भारतीय कापड उद्योगाची वाढ रोखण्यासाठी भारतात 'फॅक्टरि ॲक्ट' लागू करावा असा दबाव इंग्लंडमधील कापड व्यापाऱ्यांनी ब्रिटिश शासनावर आणला होता. भारताच्या तलम कापडाला देशविदेशी मोठी मागणी होती. परंतु कंपनी सरकारच्या काळात या उद्योगाला संरक्षण दिले नाही.

**मुंबईत कापड उद्योगाची सुरुवात व विकास**

भारतातील पहिली कापड गिरणी १८१८ साली कलकत्त्याला सुरू झाली. मुंबईत कापड उद्योगासाठी आवश्यक असलेले हवामान, स्वस्त मजूर व तयार कापडासाठी हक्काची बाजारपेठ असल्यामुळे पारशी व गुजराती व्यापारी कापड उद्योगाकडे आकर्षित झाले. अमेरिकेतील यादवी युद्धामुळे (इ.स.१८६१ ते १८६५) अमेरिकन कापूस जागतिक बाजारपेठेत येऊ शकत नव्हता. तोपर्यंत भारतीय कपड्याला चांगला भाव मिळत होता व निर्यातही चांगली होती. परंतु यादवी युध्द समाप्तीनंतर परिस्थिती बदलली व कापूस निर्यातीला फटका बसला. साहजिकच मुंबईत कापूस व कापडधंदा स्थिरावणे आवश्यक होते. १८७० च्या दशकात कापसाच्या जिनिंग फॅक्टरिज् व कापड गिरण्या सुरू झाल्या व या धंद्यात पारशी-गुजराथी भांडवलदारांनी मोठ्या प्रमाणात आपले भांडवल गुंतविले. ब्रिटिश भांडवदारांशी स्पर्धा, शासनाचे प्रतिकूल धोरण इत्यादी अडचणींवर मात करून भारतीय उद्योजकांनी कापड गिरण्या सुरू केल्या.

इ.स. १८५० मध्ये भाऊ दाजी लाड यांनी मुंबई शहरात कापड गिरण्यांसारखा व्यवसाय सुरू करण्याची कल्पना मांडली होती. ७ जुलै १८५४ रोजी कावसजी नानाजी दावर यांनी ५० व्यापाऱ्यांच्या मदतीने मुंबईत ताडदेव येथे पहिली कापड गिरणी सुरू केली. या गिरणीचे नाव 'बॉम्बे स्पिनिंग द विव्हिंग कंपनी' असे ठेवले. कंपनीचे अधिकांश भागधारक पारसी होते. पहिल्या कापड गिरणीनंतर १८५४ साली माणेकजी पेटीट यांनी दुसरी गिरणी काढली. इ.स. १८६० पर्यंत मंगळदास नमुभाई, दिनशा पेटीट, बोमनजी वाडिया, केशवजी नाईक इत्यादींनी कापडगिरण्या सुरू केल्या. इ.स. १८६१ पर्यंत गिरण्यांची संख्या १२ झाली. त्यानंतर मुंबई, गुजरातसह देशाच्या अन्य भागातही कापड गिरण्या सुरू झाल्या.इ.स. १९०५ पर्यंत भारतात २०६ कापड गिरण्या कार्यरत होत्या. इ.स. १९१४ पर्यंत ही संख्या २६४ वर पोहचली. कापड उद्योगात यावेळी भारताचा जगात चौथा क्रमांक होता.

कापड उद्योग महाराष्ट्रात मुंबईत भरभराटीला आला. गुजराथी व पारशी लोकांनी या व्यवसायात मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गुंतवणूक केली. मुंबई प्रांतात गिरण्यांची संख्या २०२ इतकी झाली. तेथील गिरण्यांच्या अधिक संख्येवरुन त्या वस्तीला गिरणगाव (पुढे गिरगाव) असे नाव पडले. इ.स. १९०५ साली स्वदेशी आंदोलन सुरू झाले व स्वदेशी वस्त्रास, देशी कापड उद्योगास प्राधान्य मिळाले. भारतात कापड आधुनिकीकरणाचे श्रेय जमशेटजी टाटा यांना जाते.

स्पिनिंग व विव्हिंग मिलच्या जोडीलाच जिनिंग व प्रेसिंग हा उद्योगही पुढे येत होता. मुंबईमध्ये इतर भागातून येणारा कापूस कच्चा व अस्वच्छ असे. तो साफ करून कापड गिरणीमध्ये उपयोगास आणण्यासाठी जिनिंग व प्रेसिंग मिलचा उपयोग चांगला होत असे. हळूहळू स्टिम प्रेसिंगलाही महत्त्व आले. १८९४-९५ साली मुंबई इलाख्यात १०० गिरण्या होत्या. त्यापैकी ६७ गिरण्या मुंबई शहरात तर ३३ गिरण्या इतर ठिकाणी होत्या.

**महाराष्ट्रातील कापड उद्योगाचा विस्तार**

महाराष्ट्रात मुंबईच्या खालोखाल सोलापूरमध्ये कापड गिरण्यांची संख्या होती. इ.स. १८७६ मध्ये सोलापुरात पहिली कापड गिरणी शेठ मुरारजी गोकुळदास यांनी सुरू केली. त्यानंतर थोड्या दिवसांत पाच कापड गिरण्या सुरू झाल्या. खानदेशात कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे धुळे, जळगाव, चाळीसगाव आणि अमळनेर या शहरात कापड उद्योगाला सुरुवात झाली. त्यानंतर नागपूर व औरंगाबाद शहरात कापड गिरण्या सुरू झाल्या. नंतर पश्चिम महाराष्ट्रात सोलापूर, सांगली, मिरज, भोर, इचलकरंजी, बुधगाव व कोल्हापूर येथे कापड गिरण्या सुरू झाल्या. अशा प्रकारे कापड उद्योगाचा विकास महाराष्ट्रात घडून आला.

**महाराष्ट्रात कापड गिरण्याची संख्या वाढ दाखवणारा तक्ता**

| सन | कापड गिरण्यांची संख्या |
|---|---|
| १८७५ | ३६ |
| १८७६ | ३९ |
| १८७८ | ४२ |
| १८७९ | ५६ |
| १८९५ | १०० |

पहिल्या महायुद्धानंतर इंग्रजांनी भारतीय उद्योगाला चालना दिली. १९१६ साली औद्योगिक आयोग नेमला. या आयोगाचे अध्यक्ष टी. एच. हॉलंड होते. पंडित मदन मोहन मालवीय व दोराबजी टाटा हे या आयोगाचे सदस्य होते. या आयोगाच्या शिफारशी सरकारने स्वीकारल्या. त्यामुळे उद्योगाची मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. दुसऱ्या महायुद्धापर्यंत म्हणजे १९३९ सालापर्यंत कापड व सूतावर नियंत्रण आणून 'टेक्स्टाइल कमिशन'ची नेमणूक केली. सरकारला नियंत्रणविषयक सल्ला देण्यासाठी २५ तज्ञांचे एक 'टेक्स्टाइल कंट्रोल बोर्ड' (कापड नियंत्रण मंडळ) स्थापन केले. पुढे इ.स. १९५५ पर्यंत कापड उत्पादन घटू लागले. म्हणून डी. एस. जोशी यांची चौकशी समिती नेमण्यात आली. या समितीने यंत्रसामुग्रीच्या आधुनिकीकरणाची शिफारस केली.

**कापड उद्योगाशीसंबंधित व्यवसाय**

कापड उद्योगाशीसंबंधित रंग, खळ, तार, सुतकांड्या, सरकी काढणे व यंत्रसामुग्री तयार करण्याचे कारखाने महाराष्ट्रात सुरू झाले. महाराष्ट्रात होजिअरीचे १४ कारखाने निघाले. मुंबई व ठाणे येथे ५ लोकरीचे कारखाने, रेशीम उद्योगाचे ७ कारखाने सुरू झाले होते. अशा प्रकारे कापड उद्योगाशी संबंधित अनेक कारखाने सुरू झाले.

**स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील कापड उद्योग**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतात ८० लाख हेक्टर जमिनीवर कापूस लागवड केली जात होती. त्यापैकी २६ लाख एकर जमिनीवर महाराष्ट्रात कापूस लागवड केली जात होती. एकूण उत्पादनापैकी २५% कापसाचे उत्पादन महाराष्ट्रात होत होते. देशातील एकूण कापड गिरण्यांपैकी १५% कापड गिरण्या महाराष्ट्रात होत्या. इ.स. १९६० पर्यंत महाराष्ट्रातील औद्योगिक कामगारांपैकी २५% कामगार कापड गिरणीत काम करत होते. महाराष्ट्रातील एकूण उत्पादनापैकी १०% उत्पादन कापूस आणि कापड गिरण्यांमधून होत होते. कापड गिरण्यांशिवाय आधुनिक महाराष्ट्रात वीज निर्मिती, लोखंड व पोलाद कारखाने, धातूकामाचे कारखाने, गूळ उद्योग, साखर कारखाने, ताग उद्योग, औषधी कारखाने असे अनेक प्रकारचे उद्योग उभे राहिले.

**स्वयं अध्ययन प्रश्न - २**

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१. कोणत्या कारणाने इंग्लंड संसदेने कंपनीचा भारतातील व्यापारावरील एकाधिकार समाप्त केला?

२. कोणत्या कायद्यान्वये उद्योग खाते सोपीव करण्यात आले ?

३. ब्रिटिश सरकारने इण्डस्ट्रिअल कमिशनची स्थापना कोणत्या साली केली ?

४. स्टील इण्डस्ट्रिज ॲक्ट कोणत्या साली पास झाला ?

५. दादाभाई नौरोजी यांनी कोणता ग्रंथ लिहिला ?

६. भारताच्या आर्थिक पिळवणुकीसंदर्भात दादाभाई नौरोजींनी कोणता सिद्धांत मांडला ?

७. इ.स. १८६१ ते १८६५ या काळात अमेरिकेतील कापूस जागतिक बाजारपेठेत का येऊ शकत नव्हता ?

८. १९१६ साली नेमलेल्या इण्डस्ट्रिअल कमिशनचे अध्यक्ष कोण होते ?

९. सोलापुरात पहिली कापड गिरणी कोणी सुरू केली ?

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१. भारतातून इंग्लंडमध्ये जाणाऱ्या कापडावर ............... टक्के जकात आकारण्यात येत असे.

(अ) ७५ (ब) ६५ (क) ७० (ड) ७९

२. फॅमिन कमिशनची स्थापना ............... साली झाली.

(अ) १८८५ (ब) १८८० (क) १८८७ (ड) १८२७

३. ................. कमिशनने दुष्काळावर प्रतिबंध करण्यासाठी नवे उद्योगधंदे सुरू करावे अशी शिफारस केली.

(अ) माँटेग्यु-चेम्सफोर्ड (ब) सायमन (क) फॅमिन (ड) इण्डस्ट्रिअल

४. लॉर्ड कर्झनने उद्योगधंद्यासंदर्भात........................ खात्याची स्थापना केली.

(अ) इंम्पिरियल डिपार्टमेंट ऑफ कॉमर्स ॲण्ड इण्डस्ट्रिज

(ब) इण्डस्ट्रिअल डिपार्टमेंट

(क) कॉमर्स डिपार्टमेंट

(ड) जकात मंडळ

५. सन ...................चा कायदा करून इंग्लंड संसदेने कंपनीचा भारतातील व्यापारावरील एकाधिकार समाप्त केला.

(अ) १८१३ (ब) १८१४ (क) १८२५ (ड) १८२७

६. राज्य वित्तीय आयोगाची स्थापना ............... साली केली.

(अ) १९१२ (ब) १९२२ (क) १९२५ (ड) १९१९

७. भारतीय कापड उद्योगाची वाढ रोखण्यासाठी भारतात ..................... ॲक्ट लागू करावा असा दबाव इंग्लंडमधील कापड व्यापाऱ्यांनी ब्रिटिश शासनावर आणला होता.

(अ) फॅक्टरी (ब) इण्डस्ट्रिज (क) काउन्सिल् (ड) बंगाल रेंट

८. भारतातील पहिली कापड गिरणी १८१८ साली ................. येथे सुरू झाली.

(अ) मद्रास (ब) कलकत्ता (क) मुंबई (ड) अहमदनगर

९. मुंबईतील पहिली कापड गिरणी ........ साली सुरू झाली.

(अ) १८५० (ब) १८२२ (क) १८५४ (ड) १८५५

### ४.२.३ कामगारवर्गाचा उदय - नारायण मेघाजी लोखंडे यांची भूमिका

इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीची सुरुवात होऊन तिचा प्रसार संपूर्ण युरोपमध्ये झाला. तेथून ती क्रांती साम्राज्यवादाच्या माध्यमातून सर्व जगभर पसरली. या औद्योगिक क्रांतीमधून कामगार व भांडलदारवर्गाची निर्मिती झाली.

भारतात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आधुनिक उद्योग उभे राहू लागले. रेल्वे, टपाल, तारा यासारख्या सेवासुविधाचे जाळे विणले जाऊ लागले. भारतीय राष्ट्रीय आंदोलन, राष्ट्रीयत्वाच्या जाणीवांचा विकास, त्यातून भारत हे राष्ट्र म्हणून उभे राहण्याची प्रक्रिया आणि भारतातील कामगार चळवळीचा विकास या बाबी एकमेकांशी संबंधित आहेत. भारतातील कामगारवर्गाचा उदय आणि कामगार चळवळीचा विकास याचा परामर्श घेतल्याशिवाय भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासाला पूर्णत्व येऊ शकत नाही. मुंबई कापड गिरण्यांच्या विकासाबरोबर कामगारवर्गाचा उदय झाला. या कामगारवर्गाच्या हक्क व अधिकारांसाठी लढा उभा करणारे नारायण मेघाजी लोखंडे हे कामगाराचे नेते होते.

सत्यशोधक चळवळ मुंबईत रूजविण्यात आणि हिंदुस्थानात कामगार चळवळ जन्माला घालण्यात लोखंडे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांचा जन्म १८६८ साली ठाणे येथे माळी समाजात झाला. त्यांचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील कव्हेरसर हे होय. त्यांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण ठाणे येथे झाले. त्यांचे घराणे वारकरी संप्रदायाशी संबंधित होते. त्यांच्या घरात व विचारात अंधश्रध्दा आणि जातीय भेदभावाला थारा नव्हता. ते मॅट्रिकनंतर नोकरीसाठी मुंबई शहरात आले. प्रथम त्यांनी रेल्वे लोकोमोटिव्ह खात्यात कारकून पदावर नोकरी केली. १८७० साली रेल्वेतील नोकरी सोडून पोष्ट खात्यात  नोकरी केली. पुढे १८७७ मध्ये त्यांनी मांडवी मिलमध्ये स्टोअरकीपरची नोकरी केली. या नोकरीत त्यांची गिरणी कामगारांच्या जीवनाशी ओळख झाली. यातूनच ते कामगार चळवळीकडे ओढले गेले.

#### कामगारवर्गाचा उदय व त्याची वैशिष्ट्ये

ग्रामीण भागातील न परवडणारी शेती सोडून, दुष्काळ व उपासमारीला कंटाळून लाखो ग्रामीण कष्टकरी जनतेचे लोंढे मुंबईत पोटापाण्यासाठी येत होते. दुष्काळ पडल्यावर ग्रामीण जनतेचे हाल होत होते.  इंग्रजांनी अशा वेळी दुष्काळावर इलाज म्हणून धरणांची कामे काढली पण ती तुटपुंजी होती. शहरी भागातून कारखानदारी, त्यासाठी लागणाऱ्या इमारतीची कामे, डाकयार्ड, वाहतुकीसाठी रस्ते व रेल्वेची कामे यासाठी शहरात कामगारांची आवश्यकता निर्माण झाली होती. ही गरज ग्रामीण भागातील शेतकरी व शेतीवर आधारित अलुतेदार-बलुतेदार यांनी पूर्ण केली. मुंबईत गिरणी उद्योग भरभराटीला येत होता. मात्र त्याबरोबर गिरणी कामगारांचे प्रश्नही उग्र बनत चालले होते.

## कामगारवर्गाची स्थिती

राजकीय पारतंत्र्य व सामाजिक गुलामगिरीच्या काळात कामगार, कष्टकऱ्यांचे प्रश्न कोणीही समजून घेत नव्हते. त्यांचा जन्मच कष्ट करण्यासाठी आहे अशी भारतीय समाजाची धारणा होती. जमीनदारी, सावकारी व शैक्षणिक क्षेत्रात उच्चवर्णीयांचा दबदबा होता. वरिष्ठ, क्लार्क आणि निरीक्षकांच्या जागेवर उच्चवर्गीयांचा कब्जा होता. मागास जातीतील लोक कारखान्यात मुख्यतः अंगमेहनतीच्या, कंत्राटी वा साफसफाईच्या कामावर असत. अस्पृश्याप्रमाणेच स्त्रियांनाही गिरणीतील विव्हिंग खात्यात काम करण्यास प्रवेश नव्हता.जातिव्यवस्था व भांडवलशाही यातून निर्माण होणाऱ्या दुहेरी शोषणाला भारतीय कामगाराला सामोरे जावे लागत होते. मुंबईत कापड गिरण्या उभ्या राहत होत्या. या गिरण्यांमधून ग्रामीण भागातून स्थलांतरित झालेल्या विविध जातीधर्माचा माणूस राबत होता. अत्यंत तुटपुंजा पगार, राहण्याची नीट व्यवस्था नाही. खुराड्यासारख्या असणाऱ्या चाळीत तो राहत होता. कामाचे तास ठरलेले नव्हते. गिरणी व्यवस्थापक मनाला वाटेल तसे पगार कपात करीत होता. आठवड्याची सुट्टीही नव्हती. स्त्रिया व मुलांना १४ तास कोंदट जागेत व हवेत काम करावे लागत होते. स्वच्छ हवेच्या अभावी कित्येक मजूर क्षय, दमा व इतर आजारांना बळी पडत. काम करताना अपघात झालाच तर त्या कामगाराला कोणत्याही प्रकारचा मोबदला मिळत नसे. अपघातात अधू झालेल्या कामगाराला नोकरीला मुकावे लागत असे. अपघातामुळे मृत्यू पावलेल्या मजुरांच्या कुटुंबाची वाताहत होत असे. कामगाराला कामावर जायला पाच-दहा मिनिटे उशीर झाला तर त्याला दंड केला जात असे. आजारी कामगारांना पगारी रजा नसे. त्या दिवसाचे त्याचे वेतन कापून घेतले जात असे. थोडक्यात, या कामगारांना ना कायद्याचे, ना मालकाचे, ना सरकारचे संरक्षण होते. गिरणी मालकाच्या मनमानी कारभाराचा तो काळ होता. भारतीय कामगारांचे अधिकाधिक शोषण करून जास्तीत जास्त नफा कमविणे हा देशी मिल मालकांचा उद्देश होता. तर भारतीय गिरणी उद्योगाला व त्याच्या विकासाला पायबंध घालणे हा मँचेस्टर या फॅक्टरि ॲक्ट मागे हेतू होता. अशा वेळी भारतीय वृत्तपत्रे देशी गिरणी मालकांच्या बाजूने उभी होती. पण ब्रिटिश प्रशासन मँचेस्टरची बाजू घेत होते. अशा परिस्थितीत गिरणी कामगारांची बाजू नारायण मेघाजी लोखंडे यांनी घेतली.

## फॅक्टरि ॲक्ट १८८१

भारतातील व मुंबईतील गिरणी उद्योग भरभराटीला आल्यामुळे मँचेस्टर व लॅंकेशायरवाल्या गिरणी मालकांनी मुंबईच्या गिरणी उद्योगाला खीळ घालण्यासाठी, मुंबईतील गिरणी कामगारांच्या आरोग्य व कल्याणाच्या मुद्दांना महत्त्व देऊन मुंबईच्या गिरणी मालकांना पेचात पकडण्याचा प्रयत्न चालविला होता. या डावपेचाचा एक भाग म्हणून त्यांनी मुंबईच्या गिरणी कामगारांच्या हितासाठी गिरणी उद्योगाला फॅक्टरि ॲक्ट लावण्याची सन १८७४ मध्ये मागणी केली होती. ब्रिटिश सरकारनेही फॅक्टरि ॲक्ट तयार करण्याची आवश्यकता व्यक्त केली.

इंग्लंडमध्ये इ.स. १८३२ नंतर फॅक्टरि अॅक्ट पास केला होता. हा कायदा कामगारांसाठी उपकारक ठरला होता. भारतीय कामगारांची परिस्थिती सुधारण्याची जबाबदारी भारत सरकारची आहे अशी भूमिका गव्हर्नर जनरल लॉर्ड रिपन येईपर्यंत सरकारने कधीही घेतली नाही. परंतु औद्योगिक क्षेत्रातील अनिर्बंध व्यक्ती स्वातंत्र्याचे तत्त्व रिपनला मान्य नव्हते. उलट कामगार कल्याणाची जबाबदारी स्वीकारून तत्संबंधी कायदे सरकारने करणे आवश्यक आहे असे त्याचे मत होते. भारतमंत्री वस्तुतः रिपनच्या या भूमिकेशी सहमत नव्हता. परंतु त्याचे मन वळवून इ.स. १८८१ मध्ये रिपनने फॅक्टरि अॅक्ट पास केला.

### गिरणी मालकांची बॉम्बे मिल ओनर्स संघटना

मुंबईच्या गिरणी मालकांना फॅक्टरि अॅक्ट लागू झाल्यास कापड उद्योगाला खीळ बसेल असे वाटून मुंबईच्या गिरणी मालकांनी कामगाराची संघटना निर्माण होण्यापूर्वीच दि. २/२/१८७५ रोजी 'बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन' नावाची संघटना स्थापन केली. या संघटनेचे पुढील हेतू होते -

१) गिरण्यांच्या कारभारात हस्तक्षेप करणाऱ्या कोणत्याही बाह्य मागणीला धुडकावून लावणे.

२) गिरणी मालकांचे हित जपण्यासाठी संघटित शक्ती निर्माण करणे.

### अर्बुथनॉट यांच्या अध्यक्षतेखाली कमिशनची नियुक्ती

ब्रिटिश सरकारने २३ मार्च १८७५ रोजी मुंबईचे कलेक्टर एफ. अर्बुथनॉट यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले. या कमिशनला फॅक्टरि अॅक्ट निर्माण करण्याइतकी मुंबईच्या गिरणी कामगारांची स्थिती आहे काय याबाबत चौकशी करून रिपोर्ट द्यायला सांगण्यात आले. एप्रिल ते जून १८७५ दरम्यान आयोगाच्या १० बैठका होऊन मिल मालकाच्या संघटित विरोधामुळे या कायद्याच्या संदर्भात विशेष काही घडले नाही. गिरणी मालकांनी अतिशय हुशारीने अनेक सबबी पुढे करून या आयोगाने केलेल्या शिफारशी नाकारल्या. पण लोखंडे यांनी कामगारांच्या मागण्यांचा सातत्याने पाठपुरावा चालूच ठेवला. १८८१ साली कामगाराच्या हितासाठी फॅक्टरि अॅक्ट करण्यात आला.

### मिडकिंग यांची कारखाना तपासणीस (निरीक्षक) म्हणून नियुक्ती

१८८१ साली कामगारांच्या हितासाठी फॅक्टरि अॅक्ट करण्यात आला होता. मात्र तो अद्याप अंमलात आला नव्हता. मँचेस्टर येथील गिरणी मालकांनी व त्याच्या भांडवलशाही प्रशासनाने मिडकिंग यांना मुंबईतील कापड गिरण्या सन १८८१ च्या कायद्यानुसार चालतात का या गोष्टीचा तपास व पहाणी करण्यासाठी पाठवले होते. मिडकिंग यांनी मुंबईत येऊन गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या पुरुष, महिला व बालकामगार यांची पाहणी करून व गिरण्यांच्या अवस्थेची, तेथील वातावरणाची तपशीलवार

माहिती जमा करून त्या आधारे तयार केलेला अहवाल मँचेस्टरच्या प्रशासनाला दिला. त्यांनी सुचविलेल्या शिफारशी पुढील प्रमाणे होत्या.

१) आठ वर्षाच्या आतील मुलांना कारखान्यात / गिरणीत कामाला ठेवू नये.

२) आठ वर्षावरील बाल व महिला कामगारांना सकाळी सहापूर्वी व संध्याकाळी सहा वाजल्यानंतर काम करण्यास लावू नये.

३) कामाच्या वेळेत विश्रांतीसाठी सुट्टी असावी.

**डब्ल्यु. बी. मुलक यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती**

मिडकिंग यांनी सरकारला सादर केलेल्या अहवालाचा सरकारवर चांगला परिणाम झाला. मुंबईचे कलेक्टर डब्ल्यु. बी. मुलक यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिटिश सरकारने त्वरित मे १८८४ मध्ये एक चौकशी समिती नेमली. मुलक यांच्या समितीने नारायण मेघाजी लोखंडे व इतर मान्यवरांच्या साक्षी घेतल्या. या साक्षीच्या आधारावर तयार केलेल्या अहवालामध्ये पुढील महत्त्वाचे मुद्दे होते.

१) गिरणीत काम करणाऱ्या मुलांचे वय १२ ते १४ वर्ष इतके असावे.

२) अशा मुलांकडून सकाळी ७ पूर्वी व संध्याकाळी पाचनंतर काम करून घेऊ नये.

३) मध्यंतरी जेवण व विश्रांतीसाठी एक तासाची सुट्टी देण्यात यावी.

४) नवीन कायद्यात या आधीच्या कायद्यांतील निवडक नियमांचा समावेश करण्यात यावा.

**कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे**

मुलक आयोगाने चालवलेला वेळकाढूपणा, चौकशा व चर्चेच्या फेऱ्यात हे काम अतिशय संथपणे चालले होते. आयोगाने आतापर्यंत काही मोजक्या व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्याऐवजी या आयोगाने प्रत्यक्ष गिरणीत जाऊन तेथे काम करणाऱ्या कामगारांच्या मुलाखती घ्याव्यात, त्यांच्या कैफियती ऐकाव्यात अशी नारायण लोखंडेची मागणी होती. या काळात कामगाराचे शोषण, राहणीमान, कामाचे स्वरूप, त्याबदल्यात त्यांना मिळणारा मोबदला, मालकाची स्वार्थी व नफेखोर वृत्ती या बाबींवर दबाव आणून त्यांना कामगार हिताचे निर्णय घेण्यास भाग पाडण्यासाठी लोखंडे कामगारांमध्ये अहोरात्र काम करू लागले होते. त्यासाठी त्यांना आता आपल्या हाती एखादी कामगार संघटना असावी जिच्यामार्फत आपण मालकवर्ग व सरकारशी बोलणी करू शकू असे वाटू लागले होते. त्यांनी सत्यशोधक समाजाच्या दशकपूर्ती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत २३ सप्टेंबर १८८४ रोजी 'बॉम्बे मिलहॅण्डस असोसिएशन' ही देशातील पहिली कामगार संघटना स्थापन केली.

ही संघटना स्थापन करण्यासाठी त्यांनी अहोरात्र झटून, मुंबईतील विविध भागातील कामगार वस्त्यांत जाऊन, लहान मोठ्या बैठका घेऊन कामगारांना त्यांच्या हक्कांसाठी संघटित लढा देण्यासाठी

सिद्ध केले. यासाठी संघटना, गिरणीतील शोषण, भांडवलदार-गिरणीमालक यांचे हितसंबंध याबाबत प्रबोधन केले. विशेष म्हणजे या संघटनेच्या स्थापनेमध्ये अनेक नामवंत जॉबर मंडळी अग्रेसर होती. यामध्ये रघू भिकाजी, गणू बाबाजी, नारायण सुर्कोजी, विठ्ठलराव कोरगावकर, कृष्णाजी अर्जुन केळूसकर, रामचंद्र शिंदे व नारायणराव पवार इत्यादी सत्यशोधक होते. या संघटनेकडे आपले नियम तयार नव्हते. सभासदाची यादी नव्हती. तरीही भारतातील ही पहिली कामगार संघटना होय. या संघटनेने कधी संप, कधी विनंती अर्ज करून कामगारांना सुविधा मिळवून दिल्या. रिपनने लागू केलेल्या फॅक्टरि ॲक्टच्या पुढील त्रुटी लोखंडे यांनी दाखवून दिल्या.

१) १६ वर्षांपर्यंतच्या मुलांना फॅक्टरिमध्ये कामावर ठेवू नये. कारण कामाच्या अकाली ताणामुळे मुलांच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम होतो. या वयात काम केल्यामुळे मुलांना शिक्षणाला मुकावे लागते. या मुलांच्या शिक्षणाची गिरणी मालकांनी सोय करावी.

२) कामगारांच्या पगाराच्या नियमित वाढीसाठी सरकारने कायदा करावा.

३) कामाच्या दरम्यान कामगारांना थोडी विश्रांती मिळावी व त्यादृष्टीने कामाच्या पाळ्या बनविण्यात याव्यात.

४) साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी गिरणी मालक कामगारांना साफसफाईसाठी कारखान्यात बोलवत असत. सबब या दिवशीचा पगारही कामगारांना मिळावा.

### इंडियन फॅक्टरि कमिशनची नियुक्ती

लोखंडे यांच्या नेतृत्त्वाखाली संघटनेची शक्ती दिवसेंदिवस वाढतच होती. छोट्या मोठ्या सभा घेऊन कामगारांमध्ये जागृती केली जात होती. २३ सप्टेंबर १८८४ रोजी परळ येथे आणि २६ सप्टेंबर १८८४ रोजी भायखळा येथे दोन सभा घेतल्या. कामगार चळवळीच्या रेट्यामुळे सरकारने फॅक्टरि ॲक्टमधील त्रुटी दूर करण्यासाठी १८९० मध्ये इंडियन फॅक्टरि कमिशनची नियुक्ती केली. या कमिशनचे अध्यक्ष डब्ल्यु. बी. मुलक होते. लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली साडे पाच हजार कामगारांच्या सह्यांचे मागणी निवेदन कमिशनला सादर करण्यात आले. यामध्ये त्यांनी कामगार हिताच्या खालील मागण्या केल्या होत्या.

१) कामाचे तास कमी करावेत.

२) सर्व कामगारांना आठवड्यातून रविवारची एक सुट्टी मिळावी.

३) कामगारांना जेवणासाठी किमान अर्धा तासाची सुट्टी मिळावी.

४) कामगारांचा पगार वेळेवर व्हावा.

५) अपघातात जखमी झालेल्या कामगाराला नुकसान भरपाई व रजेचा पगार मिळावा. कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुंटुंबाला पेन्शन देण्यात यावी.

इ. स. १८८५ मध्ये लोखंडे यांनी पगार कपात व पगाराला उशीर या कारणांवरून दोन गिरण्यात संप सुरू केला. टाटा यांच्या मालकीच्या कुर्ल्याच्या स्वदेशी मिलमध्येही वाढीव पगारासाठी संप करण्यात आला. नारायण मेघाजी लोखंडे यांच्या नेतृत्त्वाखाली कामगारांचा लढा चालू होता. त्यांनी २४ एप्रिल १८९० रोजी महालक्ष्मी रेसकोर्सवर मोठी सभा घेतली. यावेळी १७,००० कामगारांच्या सह्यांचे निवेदन गव्हर्नर जनरलकडे सादर केले. तर बॉम्बे मिल ओनर्स या गिरणी मालकांच्या संघटनेकडे ही १०,००० कामगारांच्या सह्या असलेला कामगारांच्या मागण्याचा अर्ज देण्यात आला. सर्व मागण्या लवकरात लवकर मंजूर कराव्यात असा आग्रह धरण्यात आला. विशेष म्हणजे या निवेदनावर सह्या करणाऱ्यांत स्त्रियांची संख्याही खूप मोठी होती.

शेवटी कामगार संघटना शक्तीचा रेटा आणि संघटना शक्तीचे बळ विचारात घेऊन गिरणी मालकांनी १० जून १८९० रोजी रविवार हा सुट्टीचा दिवस असावा असे जाहीर केले. हा कामगार शक्तीचा मोठा विजय होता. सरकार दरबारी त्यांच्या कार्याची नोंद घेण्यात येऊ लागली. २५ सप्टेंबर १८९० च्या फॅक्टरि लेबर कमिशनमध्ये त्यांचा समावेश करण्यात आला. या कमिशनचे अध्यक्ष सर ह्यामल्टिन फ्रियर स्मिथ होते. यामध्ये बाबू रसिकलाल घोष, सोराबजी शापूरजी बेंगाली, फ्रामजी माणिकजी इत्यादींचा समावेश होता. या सदस्यांनी कामगार प्रश्न, न्याय हक्क व गिरण्यांची वस्तुस्थिती यावर अहवाल तयार केला. यातून इ.स. १९९१ चा विधायक फॅक्टरि ॲक्ट तयार झाला. हा ॲक्ट होण्यात लोखंडे यांनी खूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

**इतर कार्य**

कामगार चळवळीच्या व सत्यशोधक समाजाच्या कार्याबरोबरच इतर सामाजिक कार्यातही नारायण मेघाजी लोखंडे अग्रभागी होते. त्यांनी 'दीनबंधू' हे वृत्तपत्र १८८० मध्ये चालविण्यास घेतले. या वृत्तपत्रामध्ये ते संपादकीय लिहित. दीनबंधूच्या मुखपृष्ठावर "Journal Devoted to the Interest of Working Class' असे इंग्रजीत छापलेले असे. त्यांनी कामगारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी व सत्यशोधक विचारांच्या प्रसार करण्यासाठी या वृत्तपत्राचा उपयोग केला. या पत्रातून त्यांनी शुद्र-अतिशुद्र समाजातील मुलामुलींना शिक्षणासाठी फ्रीशिप मिळावी अशी मागणी लावून धरली. दि. १९ डिसेंबर १८८० च्या 'दीनबंधू' मध्ये त्यांनी निम्न जातींना शिक्षणात आरक्षण द्यावे अशी क्रांतिकारी मागणी केली होती. ब्राह्मण समाजामध्ये केशवपनाची अनिष्ट प्रथा चालू होती ती बंद व्हावी म्हणून मुंबईतील सर्व न्हाव्यांची डोंगरी येथे सभा आयोजित करून त्यांचा संप घडवून आणला. डोंगरीच्या तुरूंगातून टिळक, आगरकर सुटले त्यावेळी लोखंडे यांनी त्यांचा सत्कार करून त्यांना मानपत्र दिले.

इ. स. १८९३ मध्ये मुंबईत हिंदू-मुस्लिम दंगलीनंतर राणी बागेत त्यांनी ऐक्य मेळावा आयोजित केला. या मेळाव्याला साठ हजार कामगार हजर होते. लोखंडे यांनी दोन समाजामध्ये शांतता निर्माण होण्यासाठी प्रयत्न केले. यासाठी त्यांनी शांतता कमिट्या स्थापन केल्या, सहायक

निधी उभा करून झळ पोहचलेल्या कुटुंबांना साहाय्य केले. हिंदू-मुस्लिम एकोपा मेळावा आयोजित करून त्यांचे प्रबोधन केले आणि शांतता प्रस्थापित केली. त्यांनी कामगाराच्या प्रश्नांबरोबरच शेतकऱ्यांचे प्रश्न देखील सोडवण्याचा प्रयत्न केला. कामगाराच्या फॅक्टरि ॲक्टचा जसा पुरस्कार केला तसाच शेतकऱ्यांसाठीच्या 'द डेक्कन ॲग्रिकल्चर रिलीफ ॲक्टला'ही पाठिंबा दिला. 'शेतकरी हितचिंतक मंडळीची सभा' या नावाची सभा स्थापन करून बदलापूर येथे शेतकरी परिषद आयोजित केली. या परिषदेत त्यांनी 'सहकाराशिवाय सावकारीतून मुक्ती नाही' हे ब्रीदवाक्य शेतकऱ्यांना अंगिकारायला सांगितले. प्लेग, कॉलरा या रोगाने हजारो लोक मृत्युमुखी पडत. गोरगरिबांना वेळेवर उपचार मिळावा यादृष्टीने सन १८९६ मध्ये मुंबईतील उदार, धनिक आणि सत्यशोधक कार्यकर्त्यांच्या मदतीने मराठा हॉस्पिटलची स्थापना केली. १ मे १८८७ रोजी मराठा ऐक्येच्छु सभा या संस्थेची स्थापना केली.

**नारायण मेघाजी लोखंडे यांचे साहित्य**

१) सत्यशोधक निबंधमाला अथवा हिंदू धर्माचे खरे ज्ञान, भाग १ ला (सप्टेंबर १८८६)

२) सत्यशोधक निबंधमाला अथवा हिंदू धर्माचे खरे ज्ञान, भाग २ रा (सप्टेंबर १८८७)

३) पंचदर्प (१८७६) स्त्रियांनी नैतिकता पाळण्यासाठी पंचदर्प मासिक सुरू केले. समाजामध्ये चालत आलेल्या चुकीच्या रूढी व परंपरा नाहीशा करण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्या सर्वंकष मौलिक कार्याची दखल ब्रिटिश सरकारने घेऊन त्यांना सन १८९० मध्ये 'जस्टिस ऑफ पीस' ही पदवी बहाल केली. इ.स.१८९३ मध्ये मुंबईत हिंदू-मुस्लिम दंगा झाला तेव्हा लोखंडे यांनी शांतता प्रस्थापित करण्यासाठी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना सन १८९५ मध्ये 'रावबहादूर' हा किताब मुंबई प्रांताचे पोलीस कमिशनर आर. एच. व्हिन्सेंट यांच्या हस्ते बहाल करण्यात आला. आपल्या मनोगतात ते म्हणतात, ''इंग्लंडमध्ये गिरणी कामगार लोकांचा खरा पक्ष धारण करणारे जॉन बर्क आहेत, त्यांच्या तोडीचे इंडियाचे जॉन बर्क मि. लोखंडे आहेत.'' त्यांच्या या वक्तव्यावरून लोखंडे यांनी कामगारांचा लढा उभारण्यासाठी केलेल्या कार्याची महती कळते. असा हा भारतीय कामगार चळवळीचा जनक दि. ९ फेब्रुवारी १८८७ रोजी प्लेगच्या साथीत आकस्मिकपणे वयाच्या ४९ व्या वर्षी मरण पावला. त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे भारतात मार्क्सवाद पोहचण्यापूर्वीच सत्यशोधकी प्रेरणेतून त्यांनी कामगार चळवळीची सुरुवात करून ऐतिहासिक कार्य केले.

**स्वयंअध्ययन प्रश्न - ३**

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१. फॅक्टरि ॲक्ट कोणत्या साली पास झाला ?

२. कोणत्या गव्हर्नर जनरलच्या काळात फॅक्टरि ॲक्ट पास झाला ?

३. मुंबईच्या कापड गिरणी मालकांनी कोणती संघटना स्थापन केली ?

४. नारायण मेघाजी लोखंडे यांनी कामगारासाठी कोणती संघटना स्थापन केली ?

५. स्वच्छ हवेच्या अभावी कामगार कोणत्या रोगांना बळी पडत ?

६. मँचेस्टर व लॅकेशायर येथील गिरणी मालकांनी भारतात फॅक्टरि ॲक्ट कोणत्या हेतूने लागू करण्याची मागणी केली ?

७. इंडियन फॅक्टरि कमिशनची नियुक्ती कोणत्या साली करण्यात आली ?

८. इंडियन फॅक्टरि कमिशनचे अध्यक्ष कोण होते ?

९. लेबर कमिशनचे अध्यक्ष कोण होते ?

१०. विधायक फॅक्टरि ॲक्ट केव्हा तयार झाला ?

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१. इंग्लंडमध्ये फॅक्टरि ॲक्ट सन ........ नंतर पास झाला.

(अ) १८३२ (ब) १८३१ (क) १८५० (ड) १८२७

२. नारायण मेघाजी लोखंडे यांचा जन्म ........ येथे झाला.

(अ) मुंबई (ब) पुणे (क) कव्हेरसर (ड) ठाणे

३. बॉम्बे मिल हॅण्डस असोसिएशन ही कामगार संघटना ........... साली स्थापन झाली.

(अ) १८८० (ब) १८९० (क) १८८४ (ड) १८७०

४. .......... गव्हर्नर जनरलच्या काळात फॅक्टरि ॲक्ट पास झाला.

(अ) लॉर्ड रिपन (ब) लॉर्ड कॅनिंग (क) लॉर्ड डलहौसी (ड) लॉर्ड मयो

५. मँचेस्टर येथील प्रशासनाने ......... यांची कारखाना तपासनीस म्हणून नियुक्ती केली.

(अ) मिडकिंग (ब) डब्ल्यु. बी मुलक

(क) बुनॉट (ड) अर्बुनॉट

६. गिरणी मालकांनी ......... रोजी रविवार हा सुट्टीचा दिवस असावा असे जाहीर केले.

(अ) ९ जून १८९० (ब) १० जुलै १८९०

(क) १० जून १८९० (ड) १५ जून १८९०

## ४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

| | | | |
|---|---|---|---|
| १. | वाणिज्यवाद | - | व्यापारविषयक विचार |
| २. | निःसारण | - | वाहून जाणे |
| ३. | नगदी पीके | - | पैशाची पीके |
| ४. | शेतीचे व्यापारीकरण | - | व्यापारासाठी, विक्री करण्याच्या उद्देशाने पिकांचे उत्पादन घेणे |
| ५. | पतपेढी | - | गरजूंना पैसे देणारी संस्था |
| ६. | उपरा | - | बाहेरगावाहून आलेला, गावात शेती नसलेला भूमिहीन मजूर |
| ७. | तगाई | - | कर्ज |

## ४.४ सारांश

ब्रिटिशांनी साम्राज्यवादी धोरण व व्यापार केंद्रस्थानी ठेवून भारताच्या अर्थव्यवस्थेचा विचार केला होता. ब्रिटिशांच्या व्यापारीवृत्तीचे प्रतिबिंब त्यांच्या आर्थिक धोरणात पाहावयास मिळते. स्वयंपूर्ण असलेल्या ग्रामव्यवस्थेत महत्त्वाचे बदल या काळात झाले. ब्रिटिशांच्या या व्यापारीवृत्तीतूनच शेतीचे व्यापारीकरण घडून आले.शेतीमध्ये कोणते उत्पादन घ्यायचे हे शेतकऱ्यांच्या मर्जीवर न राहता ब्रिटिशांच्या व्यापारासाठी आवश्यक असलेल्या बाजारपेठेत मागणी असलेली नगदी पिके घेण्याची सक्ती शेतकऱ्यांवर होऊ लागली. या पिकांचा फायदा शेतकऱ्यांना होण्याऐवजी दलालांना झाला. बी-बियाणांच्या खरेदीसाठी व शेतसारा भरण्यासाठी त्यांना सावकारांवर अवलंबून रहावे लागले. शेतकऱ्यांच्या परिस्थितीमध्ये मात्र कोणताही बदल झाला नाही. उलट शेतसारा वसुलीमध्ये सरकारने केलेले बदलही त्यांना जाचक ठरू लागले होते. दुष्काळासारख्या अस्मानी संकटासही त्यांना सामोरे जावे लागत होते. शेतीच्या व्यापारीकरणाचा खरा फायदा दलालांना व इंग्लंडमधील व्यापाऱ्यांना झाला.

प्रामुख्याने कृषिक्षेत्रात ब्रिटिश काळात झालेले बदल व या बदलांमुळे सावकारांनी शेतकऱ्यांचे केलेले आर्थिक शोषण यामुळे दख्खनच्या शेतकऱ्यांनी उठाव केले. हे उठाव पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा इत्यादी जिल्ह्यांत झाले. या उठावांत सावकारांना मारहाण करणे, त्यांना लुटणे, त्यांच्याकडील गहाणखत जाळणे, दरोडे अशा घटना मोठ्याप्रमाणात घडल्या. शेतकऱ्यांच्या असंतोषाची चौकशी करण्यासाठी 'डेक्कन रॉयट्स कमिशन' ची नियुक्ती केली व काही प्रमाणात शेतकऱ्यांना दिलासा मिळाला.

ब्रिटिशांनी भारतातील व्यापार व वाणिज्यविषयक धोरण ठरविताना भारतीय वसाहतीचा आपल्या देशाच्या विकासासाठी कसा उपयोग होईल हे पाहिले. ईस्ट इंडिया कंपनी भारतातून कच्चा माल आपल्या मायदेशी पाठवित असे आणि त्या कच्च्या मालाचे रुपांतर पक्क्या मालात झाल्यावर तोच पक्का माल भारतात विकला जात असे. अशा तऱ्हेने भारत ही त्याची हक्काची बाजारपेठ होती. त्यांच्या या आर्थिक नीतीमुळे भारतातील खेडी ओस पडली व उद्योगधंदे संपुष्टात आले. इंग्लडच्या कारखान्यांना पूरक ठरेल अशा वस्तूंचे उत्पादन करण्याची सक्ती भारतातील उत्पादकांवर करण्यात आली. त्यामुळे चहा, कॉफी, नीळ, ताग, अशा वस्तूंचे उत्पादन सुरू झाले. युरोपियनांना आसाम, बंगाल, निलगिरी क्षेत्रात नाममात्र दराने शेकडो एकर जमीन देण्यात आली. तेथे प्रामुख्याने चहा व कॉफीचे मळे तयार झाले. थोडक्यात, ब्रिटिश मालाला संरक्षण देणे हेच ब्रिटिश सरकारचे धोरण राहिले. १९२० नंतर महाराष्ट्रात आधुनिक उद्योग व्यवसाय सुरू झाले. सुरुवातीच्या काळात शेतीशी संबंधित उद्योग सुरू करण्यात आले. त्यामध्ये सर्वात महत्त्वाचा कापड उद्योग होता. स्वतःच्या स्वार्थासाठी का होईना पण कंपनीला भारतात उद्योगधंद्याची उभारणी करावी लागली. याच काळात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली. यातूनच पक्क्या रस्त्यांची बांधणी, रेल्वेची उभारणी, पोस्ट, टेलिग्राम, बंदरे, बँकांची स्थापना, विमा योजना, जलसिंचन योजना उभाराव्या लागल्या. कोळसा, लोखंड, पोलाद, ताग, सुती कापड या सर्व उद्योगधंद्यांची सुरुवात कंपनी सरकारच्या काळातच झाली. त्यांनी उद्योगासाठी बँकांच्या स्थापनेला उत्तेजन देऊन कर्ज पुरवठ्याच्या सोयी केल्या. इंग्लंडच्या भांडवलदारांनी कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करून दिले. भारतात दगडी कोळसा व लोखंड उपलब्ध होत असल्याने उद्योगधंद्यांच्या उभारणीस मदत झाली.

भारतातील पहिली कापड गिरणी १८१८ साली कलकत्ता येथे सुरू झाली. १८५४ मध्ये कावसजी नानाजी दावर यांनी मुंबईत पहिली कापड गिरणी सुरू केली. पुढे कापड उद्योग महाराष्ट्रात मुंबईत भरभराटीला आला. पोषक हवामान, कच्च्या मालाचा पुरवठा, कमी पगारात मिळणारा कामगारवर्ग, खात्रीची बाजारपेठ, दळणवळणाच्या सुविधा असल्यामुळे मुंबईतील पारशी व गुजराती व्यापारी कापड उद्योगाकडे आकर्षित झाले. इ.स. १८७० च्या दशकात कापसाच्या जिनिंग फॅक्टरिज् व कापड गिरण्या सुरू झाल्या. गुजराथी व पारशी लोकांनी या व्यवसायात मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गुंतवणूक केली. मुंबई प्रांतात गिरण्यांची संख्या २०२ इतकी झाली. तेथील गिरण्यांच्या अधिक संख्येवरुन त्या वस्तीला गिरणगाव (पुढे गिरगाव) असे नाव पडले. १९०५ साली स्वदेशी आंदोलन सुरू झाले व स्वदेशी वस्त्रास, देशी कापड उद्योगास प्राधान्य मिळाले. भारतात कापड आधुनिकीकरणाचे श्रेय जमशेटजी टाटा यांना जाते.

भारतात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आधुनिक उद्योग उभे राहू लागले. रेल्वे, टपाल, तारा यासारख्या सेवासुविधाचे जाळे विणले जाऊ लागले. मुंबई कापड गिरण्यांच्या विकासाबरोबर कामगारवर्गाचा उदय झाला. या कामगारवर्गाच्या हक्क व अधिकारांसाठी लढा उभा करणारे नारायण

मेघाजी लोखंडे हे कामगाराचे नेते होते. कामगारांशी संबंधित कायदे नसल्यामुळे गिरणी मालक मनाला वाटेल तसे त्यांना राबवून घेत, पगार कपात करीत असत. या गिरण्यांमध्ये ग्रामीण भागातून स्थलांतरित झालेला विविध जातीधर्माचा माणूस राबत होता. अत्यंत तुटपुंजा पगार, राहण्याची नीट व्यवस्था नाही. खुराड्यासारख्या चाळीत तो राहत होता. कामाचे तास ठरलेले नव्हते. आठवड्याची सुट्टीही नव्हती. स्त्रिया व मुले कारखान्यात राबू लागले. त्यांना १४ तास कोंदट जागेत व हवेत काम करावे लागे. काम करताना अपघात झालाच तर कामगाराला कोणत्याही प्रकारचा मोबदला मिळत नसे. या कामगारांचे संघटन करून नारायण मेघाजी लोखंडे यांनी कामगारांची 'बॉम्बे मिल अॅण्ड मिल हॅण्डस असोसिएशन' ही पहिली कामगार संघटना स्थापन केली व या संघटनेमार्फत कामगारांच्या हक्क व अधिकारांसाठी लढा दिला. विशेष म्हणजे तोपर्यंत कार्ल मार्क्स यांची साम्यवादी चळवळ भारतात पोहचली नव्हती. ही कामगार संघटना सत्यधोधक समाजाच्या मुशीतून तयार झाली होती. नारायण मेघाजी लोखंडे हे सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते होते. त्यांनी कामगारांच्या हक्क व अधिकारासाठी संप घडवून आणले. दीनबंधू या वृत्तपत्रामधून कामगारांमध्ये जागृती घडवून आणली.त्यांनी कामगारांना रविवारची सुट्टी मिळवून दिली. त्याचबरोबर सुधारित फॅक्टरि अॅक्ट पास करून घेतला. त्यांच्या या कामाची दखल ब्रिटिश शासनाने घेतली व त्यांना 'जस्टिस ऑफ पीस' व 'रावबहादूर' या पदव्या देऊन सन्मानित केले.

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न - १**

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१) गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज

२) व्यापारासाठी, विक्री करण्याच्या उद्देशाने पिकांचे उत्पादन घेणे

३) १८३६ ४) १८५३

५) १८६९ ६) १८४०

७) ४८३० कि.मी.

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) रयतवारी २) १८२०

३) ३० वर्षे ४) माऊंट स्टुअर्ड एल्फिन्स्टन

५) १८७९ ६) माऊंट स्टुअर्ड एल्फिन्स्टन

**स्वयं अध्ययन प्रश्न - २**

**अ)** १) मँचेस्टर व लॅकेशायर येथील उद्योगपतींकडून मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या कापडाला बाजारपेठ हवी होती

२) माँटेग्यु-चेम्सफोर्ड सुधारणा कायदा - १९१९

३) १९१६

४) १९२४

५) Poverty in India (हिंदुस्थाणातील दारिद्र्य)

६) Drain of Wealth (आर्थिक निःसारण)

७) यादवी युद्ध

८) टी. एच. हॉलंड

९) शेठ मुरारजी गोकुळदास

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) ७० २) १८८०

३) फॅमिन ४) इंम्पिरियल डिपार्टमेंट ऑफ कॉमर्स ॲण्ड इण्डस्ट्रिज

५) १८१३ ६) १९२२

७) फॅक्टरि ॲक्ट ८) कलकत्ता

९) १८५४

**स्वयं अध्ययन प्रश्न - ३**

**अ) एका वाक्यात उत्तर द्या.**

१) १८८१ २) लॉर्ड रिपन

३) बॉम्बे मिल ओनर्स संघटना ४) बॉम्बे मिल हॅण्डस असोसिएशन

५) क्षय व दमा

६) भारतीय गिरणी उद्योगाला व विकासाला पायबंद घालणे.

७) १८९० ८) डब्ल्यु. बी मुलक

९) सर ह्यार्माल्टन फ्रियर स्मिथ १०) १९९१

**ब) योग्य पर्याय निवडा.**

| | |
|---|---|
| १) १८३२ | २) ठाणे |
| ३) १८८४ | ४) लॉर्ड रिपन |
| ५) मिडकिंग | ६) १० जून १८९० |

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. शेतीच्या व्यापारीकरणाची कारणे व परिणाम स्पष्ट करा.

२. सन १८७५ च्या दख्खनच्या उठावाची कारणे स्पष्ट करून उठावाची थोडक्यात माहिती द्या.

३. आधुनिक उद्योगाबाबतची ब्रिटिशांची भूमिका स्पष्ट करून कापड गिरणी उद्योगाची सविस्तर माहिती द्या.

४. नारायण मेघाजी लोखंडे यांचे कामगार चळवळीतील योगदान स्पष्ट करा.

**टीपा लिहा.**

१. ब्रिटिशकालीन महसूलविषयक धोरण

२. शेतीचे व्यापारीकरण

३. सन १८७५ चा शेतकरी उठाव

४. ब्रिटिशांचे उद्योगविषयक धोरण

५. कापड गिरणी उद्योग

६. कामगारवर्ग

७. नारायण मेघाजी लोखंडे

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१) आधुनिक भारताचा इतिहास - वैद्य सुमन व कोठेकर शांता

२) आधुनिक भारत - कदम य. ना.

३) आधुनिक भारताचा इतिहास - सरदेसाई बी. एन व नलावडे व्ही. एन

४) आधुनिक भारत (सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास) - भिडे, गायकवाड व पाटील

५) आधुनिक भारत (१७५०- १९७१) - आचार्य धनंजय

६) आधुनिक भारत ( १७५० -२००९) - तांबोळी एन. एस, पवार व्ही. पी

७) नारायण मेघाजी लोखंडे - माळी मा. गो.

८) सत्यशोधक कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे - सुर्यवंशी राजाराम

९) इंडियाज स्ट्रगल फॉर इण्डिपेण्डस् - मराठी अनुवाद काळे एम. व्ही.